म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र.

REFBK-0001818

Part I

दा. क्र १८९८

टे- टेकाडे- आनंद, कृष्णाजी

~~मुंबई [illegible]~~

नागपूर

---

प्रका- मनोरंजन, मुंबई

१९२८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
स. क्रमांक ८८४
ता. ३१५।६०

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १८७८

REFBK-0001818

REFBK-0001818

सं.क्र. ७८
३।५।७८



नमो भगवते वासुदेवाय।

Copy Right. ]

[ चित्रकार–तु. ग. मोहिते, मुं

# दुसरी आवृत्ति

आज बरोबर तीन वर्षांनीं " **आनंद–गीत** " पुस्तकाची दुसरी आवृत्ति परमेश्वरकृपेनें प्रसिद्ध होत आहे. त्याबद्दल महाराष्ट्र–वाचकां-प्रियांच्या कृतज्ञतेनें माझें मन अगदीं भरून गेलें आहे. **आनंद–गीताच्या** पहिल्या आवृत्तीच्या दोन हजार प्रति अवघ्या दीड वर्षांत संपून जाऊन आजवर त्याची सारखी मागणी होत असल्यामुळें ही दुसरी आवृत्ति इतक्या लौकर काढणें भाग पडलें.

या दुसऱ्या आवृत्तींत **आनंद–गीतानंतर** लिहिण्यांत आलेल्या कांहीं नवीन कविता घालण्याचा विचार होता. व तशा सूचनाही कांहीं मित्र-मंडळीकडून झाल्या. पण नवीन कविता पुष्कळच लिहिण्यांत आल्या-कारणानें नवीन कवितांचा स्वतंत्र दुसरा भागच काढण्याचें ठरविलें आहे. त्यामुळें जुनें **आनंद–गीतच** भाग १ ला म्हणून पुन्हां छापून काढलें आहे. **आनंद–गीताचा** दुसरा भागही रा. माधवरावजी अणे यांच्याच विस्तृत प्रस्तावनेसह लवकरच वाचकांच्या हातांत पडेल अशी उमेद आहे.

पहिल्या आवृत्तींत असलेलें रंगीत चित्र याही आवृत्तींत टाकण्याचा विचार होता. पण तें चित्र सर्वस्वीं परस्वाधीन असल्यामुळें ऐन वेळीं हातीं येऊं शकलें नाहीं. तेव्हां नाइलाजानें अखेरीस तो बेत रहित करावा लागला. **आनंद–गीताच्या** दुसऱ्या भागांत त्याची भरपाई होईल.

प्रस्तुत **आनंद–गीत** मुंबई विश्वविद्यालयानें बी. ए. च्या मराठी ऐच्छिक विषयासाठीं मंजूर केलें असून हिंगणें–बुद्रुक येथील महिला विश्वविद्यालय व मुंबईचें राष्ट्रीय विद्यालय यांत आवश्यक म्हणून शिक-वीत आहेत. पुण्याच्या दक्षिणा प्राईज कमेटीनें आणि इंदूरच्या महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक मंडळानें त्यास यथोचित बक्षीस दिलें आहे. आणि बडोदें, ग्वालेर, आणि मध्यप्रांत–वऱ्हाड, येथील विद्याधिकाऱ्यांनीं बक्षीस आणि लायब्ररी यांकरितां व मुंबईच्या विद्याधिकाऱ्यांनीं लायब्ररी करितां सदरहू पुस्तक मंजूर केलें आहे, त्याबद्दल या सर्व संस्थांचा मी फार फार आभारी आहें.

बडोद्याचे श्रीमंत खासेराव यांनीं " तारितों महाराष्ट्राला " ही कविता ऐकून त्यांतील शिवाजीमहाराजांच्या पोषाखासंबंधानें—पर्यायानें मराठ्यांच्या पोषाखासंबंधानेंच त्यांनीं जी माहिती सांगितली त्याबद्दल श्री. खासेराव साहेबांचे प्रेमपूर्वक आभार मानणें रास्त आहे.

**आनंद—गीता**च्या पहिल्या आवृत्तीच्या वेळीं महाराष्ट्र भाषेंतील बहुतेक सर्व प्रमुख वृत्तपत्रकार आणि मासिक पुस्तककार यांनीं तसेंच महाराष्ट्रांतील एका प्रमुख राष्ट्रीय इंग्रजी दैनिक वृत्तपत्रकारानें त्याचा जो आदरपूर्वक गौरव आणि कौतुक केलें त्याबद्दल त्या त्या संपादकांचे व त्यांतील टीकालेखकांचे मी मनःपूर्वक आभार मानतों.

ह्या पुस्तकाच्या मागील आवृत्तींत आढळून आलेल्या चुका ह्यावेळीं शक्य तितक्या दुरुस्त केल्या आहेत. नजर चुकवून आणखीही कांहीं राहिल्या नसतील असें नाहीं परंतु त्याबद्दल वाचक उदार मनानें क्षमा करतील अशी आशा आहे. ह्या चुका निवडून काढून दुरुस्त करण्याचे कामीं तसेंच प्रुफें वगैरे तपासण्याच्या कामीं माझ्या कांहीं विद्वान स्नेह्यांची मला मोठी बहुमोल मदत झाली आहे. त्याचप्रमाणें जगद्धितेच्छु छापखान्याचे मालक व चालक आणि माझे मित्र रा. रा. नानासाहेब गोंधळेकर ह्यांनीं पुस्तकाचें बाह्यसौंदर्य आपलेपणानें शक्य तितकें मनोहर करण्याचा प्रयत्न केला ह्याबद्दल ह्या सर्वांचे जितके आभार मानावे तितके थोडेच आहेत.

शेवटीं, पहिल्या आवृत्तीच्या वेळीं रसिक वाचकांनीं **आनंद—गीता**बद्दल जो आपलेपणा व लोभ दाखविला तसाच या आवृत्तीचे वेळींही ते दाखवोत अशी त्या दयाघन परमेश्वराच्या चरणीं वंदन करून त्याची अनन्यभावानें करुणा भाकतों व वाचकांचा निरोप घेतों.

**नागपूर,**
श्रीशिवजयंती,
वैशाख, शुद्ध २. शके १८४५.

**आनंदराव कृष्णाजी टेकाडे.**

# अनुक्रमणिका.


| कवितेचें नांव. | पान. |
| --- | --- |
| श्रीकृष्णावर फिर्याद ... | ३०७ |
| श्रीशारदेस ... | २८० |
| अनुकरण ... | ११७ |
| अनुकाराचा प्रतिकार ... | १४५ |
| अभिनंदन ... | २८० |
| असें कां ... | १४० |
| अस्तंगत तारा ... | ७८ |
| अक्षम्य पाप ... | २७३ |
| अंबरास ... | ५१ |
| आत्मकल्याण ... | २३९ |
| आत्मविश्वास ... | २७१ |
| आंधळें जगत् ... | ११४ |
| आधुनिक कवींची कुरकुर | ९६ |
| आनंद ... | ४० |
| आर्यांची शान्ति ... | २५२ |
| आशेस ... | ५६ |
| आव्हान ... | ३१८ |
| ईश कुतूहल ... | १५८ |
| ईश प्रार्थना ... | १६३ |
| ईश्वराचा न्यायीपणा ... | ३३३ |
| उफराटी सृष्टि ... | ३८ |
| उषा ... | १९४ |
| उषःकाल ... | ३० |

| कवितेचें नांव | पान |
| --- | --- |
| ऐक्याचा प्रभाव ... | १४४ |
| ओढा ... | ९० |
| कर्तव्य जागृति ... | १४१ |
| कलिका ... | १२५ |
| कलिका आणि भृंग ... | ३२ |
| कवि आणि कलिका ... | ५४ |
| कविता देवी ... | १ |
| कविता हरवली ... | १०५ |
| कवितेस ... | १३० |
| कवीचा संदेश ... | ३४९ |
| कवीची ओळख ... | ९१ |
| कवीस पाचारण ... | ४५ |
| काल ... | ७१ |
| कृष्णनाम ... | २२१ |
| कृष्णरजनी ... | ६५ |
| कोण हें आई ... | ४४ |
| कोण हें आई ... | ३०१ |
| खग्रास ग्रहण ... | ३१५ |
| खुळखुळा ... | ४८ |
| खेळगडी ... | ३४९ |
| खेळगड्यांस हितोपदेश ... | १२९ |
| गुलाबाचें फूल ... | ३२ |

| कवितेचें नांव. | पान. | कवितेचें नांव. | पान. |
|---|---|---|---|
| गुलाबास ... | १५५ | पुण्य महति ... | २७४ |
| गोपीची याचना ... | २६५ | पूर्व स्मृति ... | २९७ |
| चतुर हंस ... | १८० | पोरें बिघडलीं ... | ३२४ |
| चंद्रमा ... | ९ | प्रणय कोप ... | २४६ |
| चन्द्रसेना ... | १३६ | प्रणय शोभा ... | १४ |
| चन्द्रावलोकन ... | २३७ | प्रणाम ... | ३५४ |
| चन्द्रास ... | ३०५ | प्रभु–कृति ... | ८१ |
| चंद्रिका ... | २५५ | प्रभु–मोद ... | २२० |
| चला जाऊं–चला पाहूं ... | २१४ | प्रिय फूल ... | ३६ |
| चांगला खेळगडी ... | ८९ | प्रीतीचें चुंबन ... | ३९ |
| जीवित–कर्तव्य ... | २७ | प्रेम आणि कविता ... | ६० |
| जॉर्ज बादशहास प्रार्थना ... | १६ | प्रेम–प्रार्थना ... | १६४ |
| तारका ... | २१ | प्रेम–मीलन ... | ४९ |
| तारकांचें मनोराज्य ... | २४ | प्रेमाची खूण ... | १५३ |
| तारिलें महाराष्ट्राला ... | ३४ | प्रेमाचें मार्ग ... | ११२ |
| दर्पण ... | १२ | बन्दिवान तरवार ... | ३१६ |
| दुःखाचें बीज ... | १५ | बन्धुभाव ... | ३२४ |
| दुःखिताचे उद्गार ... | ३ | बा कोकिळा ... | ७५ |
| देवाची करणी ... | २१ | बाल ... | २७ |
| देशभक्तांचें आगमन ... | २२ | बालक ... | २५३ |
| नको तें स्मरण ... | ३३ | बालमूर्ति ... | १६३ |
| नवल कौतुक ... | २६ | बाल–शांति ... | ११३ |
| नांवांत जादू आहे ... | १८ | बाल–संगीत ... | १४८ |
| नीरस कवि ... | ३ | बाल–हट्ट ... | २८८ |
| नूतन भागिदार ... | | बाळा जो जो रे ... | २२८ |
| नूतन वर्ष ... | १३ | बांसरी ... | २१७ |
| पाऊस ... | २९ | भाऊबिजेचें रहस्य ... | २२१ |

| कवितेचें नांव. | पान. |
|---|---|
| भारत भूमीचें दुर्दैव ... | २०१ |
| भारतास संदेश ... | २५७ |
| भास्करास ... | ३३८ |
| भिकाऱ्याचे उद्गार ... | २१ |
| भ्रम ... | १० |
| मत्सर ... | ५ |
| मधु बोल ... | १६१ |
| मधु बांसरी ... | ३२३ |
| मन मोहन ... | २९५ |
| मनोहर स्वप्न ... | १७ |
| माझी कविता ... | १११ |
| माझी निराशा ... | २४ |
| माझे सृष्टीचे शिक्षक ... | २८ |
| मातेचा आनंद ... | २९१ |
| मार्गस्थ कवि ... | ८७ |
| मित्राची भेट ... | १२८ |
| मुरली ... | ९८ |
| मुरलीची जादू ... | २८१ |
| मुलें फुलें ... | ४३ |
| मृत व्याघ्रास ... | ७२ |
| मोडकी तरवार ... | ३२० |
| मोल काय त्याला ... | २८६ |
| मौज ... | ५९ |
| रजनी चंद्राचा विवाह ... | ११६ |
| राधा—माधव ... | १७० |
| राधे ऊठ ... | ३४६ |
| राम काल ... | १७६ |
| राम गणेश ... | ३१२ |

| कवितेचें नांव. | पान. |
|---|---|
| लढाईवर जाणारा मुलगा | २६३ |
| लता आणि फुलें ... | १९ |
| लांकडी तरवार ... | २६० |
| लिहूं कविता कोणती ... | ९४ |
| वनमाली ... | १९८ |
| वसंत कालीन बालभानु .. | १८१ |
| वाचाळ पंडित . | ३२९ |
| वाणीचा श्रेष्ठता ... | २९४ |
| वियोग ... | १०८ |
| विरह गीत ... | ७९ |
| विरही चंद्र ... | २० |
| विवाह मंगलाष्टक ... | २४९ |
| विश्वामित्राची याचना ... | २४० |
| वीरतनय ... | २०८ |
| वेडा ... | ४२ |
| वेणुरव ... | १९१ |
| शान्ति ... | १०४ |
| शान्ति समाधान ... | २७२ |
| शारदा देवी ... | ३१ |
| शुकनिष्ठा ... | २२८ |
| शुकबोध ... | ३ |
| शुक्राच्या ताऱ्यास ... | ८५ |
| शुभचिंतन ... | ८९ |
| सखा असे कवि देवाचा ... | ४६ |
| संक्रांतीचा तिळगूळ ... | १२७ |
| संध्या ... | १६८ |
| सरिता | १३ |

| कवितेचें नांव. | पान. | कवितेचें नांव. | पान |
|---|---|---|---|
| सरोवरावरील सायंकाळ... | ११७ | स्वर्गी कीं भूतलीं ... | ८८ |
| सरस्वती भक्तांस ... | १९५ | स्वभाव धर्म ... | १६६ |
| साधु ... | ३१४ | स्नेहता ... | २७१ |
| साधु महिमा ... | १५ | स्वैर विचार ... | २६ |
| साधु वाणी ... | २७३ | स्वैर विचार ... | १९७ |
| सिंहगड पाहिल्यावर ... | १३६ | स्वैर विचार ... | २०० |
| सीता शोक ... | १७७ | हा दोष कोणाकडे ... | ७४ |
| सुधाकराचा उदयकाळ ... | १९० | हांस हांस सारसा ... | २१६ |
| सुरबाला ... | १६८ | हिन्द भूमिच्या तिलका ... | ३३६ |
| सुलोचना ... | ९ | हिन्द भूमीचें ध्येय ... | २६९ |
| सुस्वागतम् ... | १६० | हिन्द भूमीचें सौभाग्य ... | २६१ |
| सूर्याचा चंद्र झाला ... | ३०३ | हे कल्याणी ... | २६७ |

भरत वाक्य.


सूचना:—शुद्धिपत्र शेवटीं जोडलें आहे त्याप्रमाणें कृपा करून दुरुस्ती करावी.

काव्य ५५८

श्री.

आजपर्यंच्या माझ्या सर्व कविता एकत्र पुस्तकरूपानें छापून निघाव्या अशी बरेच दिवसांपासून असलेली माझ्या स्नेह्यांची मनीषा परमेश्वर-कृपेनें आज पूर्ण झालेली पाहून माझ्या स्नेह्यांप्रमाणें मलाही समाधान वाटत आहे आनंद–गीतांतील कविता पहिल्यापासून जसजशा लिहिण्यांत आल्या त्या अनुक्रमानेंच दिलेल्या आहेत. सर्वसाधारण कविता लिहिण्याला सुरवात सुमारें १९०८–१९०९ सालापासून झाली आहे. म्हणजे हा संग्रह जवळ जवळ एका तपाचा आहे असें म्हणतां येईल. कित्येकांच्या मतें प्रस्तुत पुस्तकांतील कविता निवड करून छापावयाच्या होत्या. पण स्वतःच निवडानिवड करणारा मी कोण ? शिवाय एकाची निवड दुसऱ्याला पटतेच असें नाहीं. तेव्हां या पुस्तकांत ज्याला जें रुचेल त्यावरच लक्ष देऊन बाकीच्याबद्दल अंतःकरण उदार ठेवावें अशी वाचकांस प्रार्थना आहे.

—आनंद.

पहिली आवृत्ति.
श्रीशिवजयंति, वैशाख शुद्ध २,
शके १८४२

६८
1920

# पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना.

आनंदरावांच्या या काव्यग्रंथाला प्रस्तवाना लिहिण्याचें काम एखाद्या सहव्यवसायी कविबंधूवर जर सोंपविण्यांत आलें असतें तर वाचकांस आनंदरावांचें हृदय व त्यांच्या काव्याचें रहस्य समजण्यास प्रस्तावनेचा फार उपयोग झाला असता. संसारांतील सुखदुःखांचा अनुभव सामान्य जनांबरोबर घेत असतां किंबहुना " सुख पाहतां जवापाडें, दुःख पर्वताएवढें " अशा स्थितीचा प्रत्यहीं प्रत्यय येत असतां आपल्या सुखदुःखाचा स्वतःस विसर पाडून कवि अभिनव सृष्टि निर्माण करून तींत स्वतः कसा रममाण होतो, इतकेंच नाहीं तर " संसृतिकोलाहलें त्रासलेल्या जीवांना " रंजविण्याकरितां " सदैव नवीं गीतें " कशीं गातो याचें रहस्य तुकोबारायांच्या प्रासादिक शब्दांनीं लिहावयाचें म्हणजे " जावें त्याच्या वंशा तेव्हां कळे " हेंच खरें ! मॅथ्यू अर्नोल्ड या नामांकित कवि टीकाकारानें एके ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं, ' ज्याच्यांत रसिकता नाहीं तो कविपदारूढ कधींही होणार नाहीं; आणि उलट पक्षीं ज्याच्यांत कवित्व नाहीं तो रसिक म्हणून मिरवूं शकत नाहीं. ' आणि ह्या विधानांत जर कांहीं सत्यांश असला तर प्रस्तुत लेखकाकडे प्रस्तावना लिहिण्याचें काम सोंपविण्यांत ग्रंथकर्त्यांची अक्षम्य चूक झाली आहे असें म्हणण्यांत मला मुळींच प्रत्यवाय दिसत नाहीं ! आनंदरावांनीं नुसती इच्छा प्रदर्शित केली असती तरी त्यांच्या ग्रंथास प्रस्तावना लिहिण्यास ज्यांची रसिक व मार्मिक लेखणी तत्काल तत्पर झाली असती असे निस्सीम सरस्वतीभक्त आनंदारावांच्या स्नेही मण्डळांत कांहीं आहेत; परन्तु त्या सर्वांकडे दुर्लक्ष्य करून प्रस्तवनालेखनाची जबाबदारी त्यांनीं मजवर टाकली यावरून काव्यसृष्टींत " विचारापेक्षां विकाराचेंच प्राबल्य अधिक असतें " या सिद्धांताची सत्यता कांहीं अंशीं तरी वाचकांना पटल्याशिवाय राहणार नाहीं.

" आनन्दगीता "स प्रस्तावनेदाखल चार शब्द लिहिण्याची आवश्यकता आहे असें मला मुळींच वाटत नाहीं. यांतील बहुतेक गीतें पूर्वी प्रसिद्ध झालेलीं आहेत, व कित्येक तर मध्यप्रान्त व वऱ्हाड यांतील लोकांस कण्ठगत आहेत. आनंदरावांच्या कवितावधूनें मासिकांच्या

फटींतून रसिकांवर आपले नेत्रकटाक्ष फेंकून त्यांचीं मनें यापूर्वीच आप-णाकडे वेधून घेतलीं आहेत, व त्यांची सर्व कविता एकत्र करून ती ग्रंथरूपानें प्रसिद्ध करण्यांत यावी अशी पुष्कळांकडून अनेकवार इच्छाहि प्रदर्शित करण्यांत येत होती. अर्थात् "आंनंदगीता"चें रसिक वाचक-वर्ग प्रेमानें स्वागत करील याबद्दल मला बिलकुल शंका वाटत नाहीं.

प्रस्तुत प्रस्तावना गुणदोषविवेचनात्मक असावी अशी आनंदरावांची इच्छा होती; परन्तु प्रस्तावनालेखकाचें कार्य हें जवळ जवळ प्राचीन कालच्या स्वयंवरांत उपवर झालेल्या राजकन्येसंबंधानें दौवारिकी जें काम करीत असे तशाच प्रकारचें आहे. ग्रंथकर्त्याचा वाचकांशीं परिचय करून देणें आणि रसिकांचा ग्रंथकर्त्याशीं परिचय करून देणें अशीं दोन कामें प्रस्तावनालेखकास करावीं लागत असतात. परन्तु प्रस्तुत ग्रंथाचे कर्ते आनन्दराव व महाराष्ट्रांतील रसिक वर्ग यांचा निव्वळ परिचय नसून त्यांची गानलुब्ध व नादप्रिय अन्तःकरणें आनन्दरावांनीं आपल्या काव्य-रूपी बांसरीवर घेतलेल्या मंजुळ व कर्णमधुर आलापांनीं केव्हांच खेचून घेतलेलीं असल्यामुळें तशाही प्रकारचें काम करण्याचें प्रयोजन मला दिसत नाहीं. गुणदोषविवेचनाचें कार्य प्रस्तावनालेखकानें आपल्या क्षेत्र-मर्यादेचें अतिक्रमण केल्याशिवाय करितां येणार नाहीं.

महाराष्ट्रांतील रसिक व मार्मिक वाचकवर्ग यथावकाश आनंदरा-वांच्या कवितेची गुणदोषविवेचनात्मक समालोचना करील यांत कांहींएक शंका नाहीं. व असल्या टीकेच्या निकषग्रावावर आपली व काव्याची कसोटी लागावी अशी आनन्दरावांच्या मनांत फार इच्छा आहे. कांहीं आधुनिक कवींकडून

" उणीव रसिकांचीच परी । आज भासते खरोखरी । "

अशा तऱ्हेनें जी कुरकुर करण्यांत येते ती आनंदरावांच्या मते अत्यन्त अप्रयोजकपणाचीं आहे; इतकेंच नव्हे तर अशा तऱ्हेची भावना कवि-कृतीच्या दृष्टीनें देखील हितावह नाहीं. असल्या भावनेमुळें जगतांत सुंदर काव्यें निर्माण होऊन तीं चिरंतन लोकप्रीतीस पात्र राहतील ही आशाच नष्ट होते. हजारों वर्षांपूर्वीं उद्भवलेल्या काव्यकुसुमांतील प्रफु-ल्लितपणा, सुगंध व रंग हीं अजूनही अगदीं जशींच्या तशीं दिसत

असतील त्याचें श्रेय कवींच्या नितान्तमधुर स्फूर्तीकडे तर आहेच; परंतु त्याबरोबर हजारों वर्षेपर्यंत त्या कविकृतींचा आस्थापूर्वक आणि प्रेमपूर्वक अभ्यास करणाऱ्या काव्यलोलुप रसिकांकडून आपल्या सरस व्याख्यानांनीं त्यास वेळोवेळीं जीवन देण्यांत आलें ही गोष्टही विसरतां कामा नये. असलें जीवन मिळालें नसतें तर महाकाव्यें देखील कालाच्या उष्णतेंत तळपून सुकून गेलीं असतीं! व ज्या आधुनिक कवींना रसिकांच्या दुष्काळांत आपण काव्यफुलें उधळीत आहोंत असें वाटत असेल त्यांना त्यांचीं फुलें लतेपासून विलग्न होतांच नीरस वाचकांच्या उष्ण श्वासाच्या स्पर्शानें शुष्क होतील अशा विचारानें अंतः-करणांत भय व कातरता उत्पन्न झाल्याशिवाय राहाणार नाहीं; आणि त्यामुळें आपलीं अपत्यें अल्पायु होणार ही गोष्ट निश्चित माहीत असल्या-मुळें पुत्रजन्मोत्सवाचे प्रसंगीं देखील ज्याप्रमाणें मृकण्ड ऋषि खिन्न वदन करून सचिन्त बसलेला होता तशीच स्थिति या कविजनांची होईल. ज्यांच्या अंतःकरणांतून "सुंदर व चिर काव्याची" भावी आशा अजीबात लोपून गेली आहे त्यांच्या कल्पनासागरांत उठणाऱ्या लहरी देखील क्षणभंगुरच असणार. जगतांतील रसिकतेचे झरे आटून शुष्क झाले असून त्यांचा किंचितसा ओलावा कोठें उरला असेल तर तो माझ्या अंतःकरणांत उरला आहे अशा अहंतेच्या खडकांतील एका खाचींत सांचलेल्या गोष्पदप्राय उदकसंचयांत मज्जन करणाऱ्या कूप-मण्डुकाच्या बेसूर ओरडण्यास मंजुल गीत समजून तच्छ्रवणार्थ रसि-कांच्या झुंडी लोटल्या नाहींत तर त्याचा दोष कोणाकडे आहे? आनंद-रावांचें सहृदय अंतःकरण अशा दुराग्रहापासून अलिप्त आहे, इतकेंच नव्हे तर रसिकांविषयींच्या आदरानें तें किती ओतप्रोत भरलेलें आहे याची साक्ष त्यांच्या काव्याचें वरवर निरीक्षण करणारांस देखील सहज पटेल. "आधुनिक कवींची कुरकुर," "अनुकाराचा प्रतिकार," वगैरे त्यांचीं कांहीं काव्यें तर केवळ रसिक प्रशंसेकरितांच त्यांनीं लिहि-लेलीं आहेत. ह्यावरून रसिकांकडून आपल्या काव्याची गुणदोषचर्चा व्हावी याबद्दल त्यांस केवढी उत्कण्ठा लागून राहिलेली आहे हें सहज दिसून येणार आहे.

कल्पनेच्या आकाशांत स्वैर भरारी मारून स्वच्छंदानें सृष्टिदेवतेचीं स्तोत्रगीतें मधुर आलापांत गाणारा कवि व गायनशास्त्राचा शास्त्रोक्त-रीत्या परिश्रमपूर्वक अभ्यास करून आपल्या कौशल्यानें मजलसींत रंग भरूं पाहणारा गवयी या दोघांच्याही मनोवृत्तींत व पेशांत पुष्कळच साम्य आहे. समोर बसलेल्या श्रोत्यांत आपल्या कलेचा परीक्षक कोणी नाहीं, अशी कल्पना गवयास झाली असतां त्याच्या बैठकीस ज्याप्रमाणें कधींहि रंग येणें संभवनीय नाहीं तशीच स्थिति अंशतः कवीची देखील आहे. विशेषतः ज्याला इंग्रजींत वीणाकाव्य म्हणतात अशा प्रकारचीं काव्यें रचणाऱ्या कवींना तर हा नियम विशेषतः लागू होतो. " आनंद गीतांत " ग्रथित केलेली सर्व कविता याच वर्गांत मोडणारी आहे. अशा तऱ्हेच्या काव्याला आधुनिक काव्यचिकित्सकांनीं इंग्रजी परिभाषेचा अनुवाद करण्याच्या हेतूनें 'वीणाकाव्यें' किंवा 'तंतुकाव्यें' ही संज्ञा दिलेली आहे. प्राचीन साहित्यांतून काव्याचें वर्गीकरण करतांना या तऱ्हेच्या काव्यास निराळें स्थान दिलें नसल्यामुळें त्याला अन्वर्थक शब्द साहित्य व अलंकार यावरील संस्कृत ग्रंथांतून आपणांस सांपडला नाहीं, व त्यामुळें अर्वाचीन साहित्यवेत्त्यांनीं वीणाकाव्य किंवा तंतुकाव्य ही नवी शब्दयोजना केलेली आहे. या काव्याची खरी माधुरी ती उंच आवाजानें गाऊन दाखविल्याशिवाय रसिकांस चाखतां येत नाहीं. त्यांतील रसाचा आस्वाद, कोश, अलंकार व रसपरिपोषाचें विवेचन करणारीं साहित्यग्रंथांतील वचनें यांच्या साहाय्यानें घेऊं पहाणारांची स्थिति व गंगेसारख्या निर्मल व गंभीर प्रवाहाचे काठीं बसून त्या प्रवाहां-तील पाणी चांदीच्या गंगाळांत घेऊन स्नान करणाऱ्या एखाद्या शीतभीरु मनुष्याची स्थिति कांहीं अंशीं सारखीच आहे. या दुसऱ्या दुर्दैवी व्यक्तीला गंगाजलगत गंगाजलस्नानानें गंगा प्रवाहांत स्वैर विहार करणाऱ्याच्या आनंदाचा अनुभव ज्याप्रमाणें कल्पनेनेंच घ्यावा लागतो, तद्वतच वीणाकाव्यांतून उठणाऱ्या आनंदलहरींत यथेच्छ विहार करणाऱ्या रसि-कांच्या आनंदाचा अनुभव साहित्यालंकाराच्या रुपेरी भाजनांत काव्य-रस ओतून तो कोशाच्या पात्रानें अंगावर घेणाऱ्या पंडितांना कल्पनेनेंच जाणणें भाग आहे. मनोहर कल्पना, मृदुल शब्दरचना व मधुर चाल,

हीं असल्या काव्याचीं प्रधान अंगें असतात; व त्याला जेव्हां मर्दानी पण मोहक अशा खड्या उंच आवाजीची सांथ मिळते, तेव्हांच त्यांतील खरी बहार रसिकांना लुटावयास मिळते. आनंदरावांनीं आपली कविता अनेक प्रसंगीं गाऊन दाखविलेली आहे व त्यांच्या गोड स्वरांतून जेव्हां या काव्यलहरी श्रोतृवृन्दाच्या अन्तःकरणास स्पर्श करीत तेव्हां तेथें उठणाऱ्या आनन्दकल्लोळाचें वर्णन शब्दांनीं करणें अशक्य आहे ! त्यांचीं काव्यें त्यांच्या तोंडून ऐकत असतां प्रत्येक सहृदय श्रोत्याच्या अन्तःकरणांत 'वाहवारे कवि !' असे उद्गार उठल्याशिवाय राहात नाहींत ! कवीला अभिप्रेत असलेल्या वृत्ति व विचारांचें दृश्य प्रतिबिंब, श्रोत्यांच्या चेहेऱ्या-वर-नव्हे, मानवी अन्तःकरणांतील गूढ विचारांचें प्रतिबिंब बाह्य जगतास पाहण्यास मिळावें म्हणून परमेश्वरानें निर्माण केलेल्या व नेत्रयुगुलाचे तेजानें चमकणाऱ्या निर्मल दर्पणावर स्पष्टपणें उमटलेलें आहे, हें अशा प्रसंगीं हजर असलेल्या हजारों लोकांच्या दृष्टीस पडलें आहे ! ज्या वाद्यांच्या किंवा उपकरणांच्या साहाय्यानें कवि वरील चमत्कार करून दाखवितो, त्याला अनुलक्षून आंग्लसाहित्यकारांनीं या तऱ्हेच्या काव्य-रचनेस Lyrical Poetry हें अभिधान दिलेलें आहे यांत संशय नाहीं. परन्तु अशा काव्यश्रवणापासून श्रोत्यांच्या चित्तवृत्तींत जो आनन्द-कल्लोळ उचंबळतो, त्याला अनुलक्षून जर त्याला "आनन्दगीत" ही संज्ञा दिली तर ती अन्वर्थक नाहीं असें कोण म्हणेल ?

कवि हे सृष्टीचे उपासक आहेत असें म्हणतात, आणि एका अर्थानें ती गोष्ट खरी आहे, असें आपल्या अनुभवासही येते. परन्तु कवीनें आपल्या उपासनेकरितां घेतलेली सृष्टी चर्मचक्षूस व हपस्तादादि इन्द्रि-यांस प्रत्यहीं आपल्या अस्तित्वाची साक्ष पटविणारी जड सृष्टि मात्र नव्हे. विश्वामित्रानें त्रिशंकूच्या उद्धाराकरितां प्रतिसृष्टि निर्माण केली, अशी पौरा-णिक कथा आहे. ती कोणास विश्वसनीय वाटो किंवा न वाटो, परन्तु कवि हे दररोज अभिनवसृष्टि निर्माण करितात ही गोष्ट कोणत्याही रसिकास ना-कबूल करितां यावयाची नाहीं. जडसृष्टींतील जलांत किंवा स्थलांत जे नयन मनोहर रंग कधींही दृष्टीस पडत नाहींत अशा रंगांनीं सुरम्य दिसणारीं हजारा

चित्रें कवीच्या अंतर्दृष्टीपुढें उभीं असतात व आपल्या वाणीची मोहनी टाकून प्रेक्षकांच्यापुढें त्या सुंदर चित्रांचे कौशल्यानें विणलेले आणि चितारलेले पट ते मांडीत असतात, आणि क्षणभर नजरबंद करणाऱ्या गारोड्याप्रमाणें ती सृष्टि सत्य आहे अशा भावनेची भुरळ त्यांच्यावर पाडीत असतात. ही नजरबंद करण्याची विद्या, ही निर्जीव सृष्टि सजीव करणारी संजीवनी त्याला कोणत्या तपश्चर्येमुळें प्राप्त होते याचा तपास करण्यांत रस्किन्, अर्नोल्ड यांच्यासारख्या मार्मिक काव्यविवेचकांनीं आपलीं बहुमोल आयुष्यें खर्चीं घातलीं व त्यांनीं असा सिद्धांत काढला आहे, कीं, केवळ कवीच्या अंतःकरणांत वसत असलेल्या विश्वबंधुत्वाच्या विश्वप्रेमाच्या कल्पनेच्या आत्यंतिक विकासामुळेंच ही सिद्धि त्याला प्राप्त होत असते. प्रेममय दिसणाऱ्या सृष्टीचें—नव्हे, परमेश्वरी दृश्य स्वरूपाचें स्तोत्र करावें हाच त्याला हव्यास, आणि रसिक, संत व सज्जन यांच्या रूपानें मानवी विग्रह धारण करून जगतांत जें पारमेश्वरी चैतन्य वावरतें आणि जगदुद्धारांत मग्न असतें त्यांना निववावें हाच त्यांच्या मनाला रात्रंदिवस लागलेला नाद—या हव्यासांत आणि या नादांत तो स्वत्वाला विसरतो आणि विश्वमय विराट् स्वरूपांत स्वतः विरघळून जातो. जगताशीं एकरूप होतो. सज्जनांशीं समरस होतो. असल्या एकतानतेंत व साम्यरसांत असतांना जेव्हां यदृच्छेनें तो स्वैरालाप घ्यावयास लागतो, तेव्हां यमुनातटाकीं वाजणाऱ्या वांसरीची ताण कानावर पडतांच व्रजांतील पशुपक्षी, स्त्रीपुरुष, वृक्षजलाशय व अगनगादिजड यांचें देहभान हरपून जाऊन "मुरलीवाल्या" कडे टक लावून पाहण्यांतच त्यांना जशी कृतार्थता वाटे, तशीच स्थिति सर्व रसिकांची होऊन जाते. अशा उच्च वातावरणांत विहार करणाऱ्या कवीच्या मुखांतून निघणाऱ्या आलापांचा प्रतिध्वनि सृष्टीच्या कोनाकोंपऱ्यांतून यावच्चन्द्रदिवाकर सारखा होत असतो व त्या नादाचा एक तरी मधुर स्वर आपल्या कानीं पडावा व त्या स्वप्नांतील माधुरी आपल्या हृदयस्थ वाद्यांत शाश्वत टिकावी म्हणून रसिक आपल्या हृदयाच्या तारा त्या सुरांत लावण्यांत सदोदित निमग्न असतात. या दिव्य आनंदाचा मनमुराद अनुभव घेणारा कवि आपल्या वाणींतून सहजगत्या प्रकट

होणाऱ्या शब्दाची व अर्थांची फारशी फिकीर करीत नाहीं. कारण बेफिकीरपणें गावयास बसल्याशिवाय त्याच्या गाण्यास रंग चढत नाहीं. असे कवि नेहमींच अत्यन्त निरभिमान वृत्तीनें " काय म्यां पामरें बोलावीं उत्तरें । परि विश्वम्भरें बोलविलें ॥ " असें म्हणून भगवच्चरणीं मिलिंदायमान होण्यांतच धन्यता मानीत असतात. कधीं कधीं रसिकांचीं मनें आपल्या गायनांत तल्लीन झालीं हा चमत्कार पाहून ते क्षणभर विस्मयचकित होऊन " रसिकांचीं मनें हीच माझी स्फूर्ति आहे " असें समजून आपल्या श्रोत्यांविषयीं परमादर व्यक्त करितात. माझ्या प्रतिभाशक्तीनें रसिकांचा आनन्दसागर हेलावला अशा अहंवृत्तीचा वारा त्याला शिवेनासा होतो. " आनन्द-कवी " नें कवीच्या मनस्थितीचें वर्णन खालील ओळींत मोठ्या मार्मिकतेनें केलें आहे:—

" पूर्णेन्दु जेंवि या गगनीं । तुम्हि तसे विलसतां भुवनीं ॥ "

अशा दृष्टीनें कवि रसिकांकडे पाहतात व तेच " आग्रहें गीत गा ! म्हणती " म्हणूनच कवि गावयास लागतात. परन्तु हें गीत गात असतां

" जें काय बोलतों लिहितों । मुळिं तदर्थ मजच न कळतो ।
तें सर्व हरिच जाणे तो । "

हीच त्यांची मनःस्थिति असते; व ज्यांच्या प्रेरणेनें गीत गाण्याची स्फूर्ति उत्पन्न होते त्या सज्जनांची सेवा आपल्या हातून घडावी एवढीच सात्त्विक मनीषा कविजनांची असल्यामुळें

" वेंचुनी शब्द सुमनांला । गुंफितों तयांची माला ।
कशि तरी गमे जे मतिला । ठेवितों सज्जनांपुढतीं ॥ "

असें उद्गार काढून कांहीं सत्सेवा आपल्या हातून घडली याच विचारांत ते स्वतःस धन्य समजतात !

" आनन्दकवि " हा अशा कोटींतील दिव्य गीताचे आलाप घेणारा एक स्वच्छन्दी चण्डोल आहे ! त्याचे गायनांत आगामी प्रभाताची व भावी उत्कर्षाची छटा उमटलेली आहे. त्याचप्रमाणें प्राचीन वैभवाचें विस्मृतिरूप धुरळयाचें दाट पटल सध्यांच्या पिढीच्या अन्तःकरणरूप निर्मल दर्पणावर पडल्यामुळें त्यांच्या ठिकाणची स्वस्वरूपाची ओळख नष्टप्राय

झाली आहे ती धूलि देखील आपल्या उदयोन्मुख बालरवीचें स्तोत्र गात असतां पडलेल्या प्रकाशकिरणांत रंगीत झालेल्या सुवर्णपंखाच्या मनोरम हालचालीनें अजीबात झाडून टाकून स्वस्वरूपाची जाणीव पुनः उत्पन्न करण्याचें सामर्थ्य त्यांच्या काव्यांत आहे हें सहृदय रसिकांस या गीतांतील थोडेसे आलाप कानावर पडल्याबरोबर कळून येईल !

या प्रस्तावनेच्या शेवटीं आम्हांला मोठ्या अभिमानानें एका गोष्टीचा उल्लेख करावासा वाटतो. महाराष्ट्रसरस्वतीला जेव्हां " पहिली माझी ओंवी " गावीशी वाटली तेव्हां मुकुंदराजानें अंबमनोहर क्षेत्रांत अध्यात्मवादाची " एकतारी " तयार केली; त्यानंतर पैठणस्थ एकनाथांनीं तिला भक्तीची दुसरी तार जोडिली; कालान्तरानें ही विदर्भस्थ वीणा गवसणींत धूळ खात पडली होती. तिला देवनाथ व दयाळनाथ यांनीं नाथ सांप्रदायी " मतवालेपणा " स साजेशा खणखणीत आवाज देणाऱ्या दोन " जोडा " च्या तारा चढविल्या. परन्तु त्यानन्तर गेल्या साठ वर्षांत ही विदर्भवीणा अदृश्य झाली होती, ती " आनन्दकवी "नीं पुनः हातांत घेऊन तिजवर राष्ट्रप्रेमाची पञ्चम स्वराची तार चढविली आहे व ती पुनश्च आपल्या मंजुळ स्वरानें रसिकांचीं मनें आकर्षण करून घ्यावयास लागली आहे. या वीणेचा हा मंजुळ ध्वनि असाच शाश्वत टिकून हिच्या नादांत मोहून गेलेल्या विदर्भवासीयांच्या हातून महाराष्ट्रभाग्योदयाचें किंवा भारतभाग्योदयाचें महत्कार्य पार पाडण्यास तो साधनीभूत होवो व ही दीर्घ निद्रेनन्तर जागृत झालेली विदर्भप्रेरणा इत्युत्तर तरी देशाचा भाग्योदय होईपर्यन्त सुप्तावस्थेस न जावो एवढीच भगवंतास अनन्यभावें प्रार्थना करून ही छोटेखानी प्रस्तावना पुरी करितों.

| | |
|---|---|
| **यवतमाळ,**<br>चैत्र शु. ९ शके १८४२. | **माधव श्रीहरि अणे.** |

क्रा०ठ्य ६५८—

# छत्र हरपलें ! !

माझे परमपूज्य मातुल व आनंद–गीताचे पुरस्कर्ते.



जन्म—नवेंबर १८५४. मृत्यु २१, एप्रील १९२०.

**कै. वा. रामचंद्र नारायण ऊर्फ तात्यासाहेब गडकरी,**

म्यानेजर–सीनीअर भोंसला इस्टेट, नागपूर,

( राहणार धापेवाडा, जि. नागपूर, मध्यप्रांत. )

सं.का. ८०८
३१५।२८

श्रीः

# आनंद-गीत

## १

## कविता-देवी

( भूपती खरे ते० या चालीवर )

ग्रंथ संग्रहालय
ग्रं. क्र. १०९८

हे कविता देवी ! काय वानुं मी तुजला
 तव अगम्य महिमा मला न अजुनी कळला
तव कृपाकटाक्षचि पडतां तो नर धन्य
 अवकृपा तुझी लव, दुःखि न त्यासम अन्य
गत मयूर, वामन, तुकया आदि करोनी
 तव कृपेंच वसती कीर्तिमंत अजि भुवनीं
लव कवित्व अंगीं अर्थ तरिच या जननीं
 मृत जीवित न तरी सजीवता जरि असुनी
हा चंद्र मनोरम दीप दुजा कीं म्हणतों
 नातरी तयाला क्षयी, कलंकी वदतों
त्या कुवच बोलण्या अधिकार न कवणाचा
 तो भोग भोगितो आपुल्या कृतकर्माचा
हें कळायास तरि शक्ति तुझी ये कामा
 नाकळतें जरिही प्रसन्न विधितनया, मा

तव ठायीं अविरत अविकल्पें रत होतां
कधि क्षुधा तृषेची स्मृति नच होई चित्ता
दुःखांत, दुखःमय शोक निवारुनि सारा
जणुं येती हृदयीं आनंदाच्या लहरा
जरि गिरीं कंदरीं वनीं उपवनीं वास
बहु गोड वाटतो प्रासादाहुनि खास
हा दिवस, रात्र ही भास न होतो ऐसा
जगिं काय चाललें येइ न ध्यानीं सहसा
दुष्प्राप्य वस्तु ती प्राप्त करोनी देशी
जें इतरां दुर्गम त्या स्थानीं बसवीशी
जी शक्ति न कवणा ती तव ठायीं वसते
कुठवरी करूं मी वर्णन तव हें कविते !
कविराज वर्णिती परी न लागे पार
मग अल्पमतीची गती किती असणार
ते बसायास तुज स्वर्ण आसना देती
ते छत्र तुजवरी विविध रत्नमय धरिती
मी दीन तुला वद देउं बसाया काय
मी निर्धन आणूं छत्र कोठचें हाय !
ते थोर, दीन हा भेद असा तुजपाशीं
नाहींच वाटतो असा भरंवसा मजसी
तूं उदार तुजला नसे सान कुणि थोर
'आनंद' राहुं दे तरी कृपेंत, किशोर

२

# शुक-बोध

( श्लोक )

फिरत फिरत एका रम्य उद्यानिं गेलों
बघुनि रुचिर शोभा अंतरीं फार धालों
बघत बघत एका आम्रशाखेवरी ती
सहज नजर जातां कीर ये दृष्टिपंथीं

निज सदनिं असावा प्राणि हा लालसा ही
हृदयिं परि मिळे तो केंवि चिंता अती ही
उगिचाचि बसवेना मारिली हांक अंतीं
परिसुनि शुक बोले–' का ? ' " तुला मद्विनंती

" स्थिर हृदय असो दे चित्तिं शंका न आणीं
गरलसम न कांहीं सत्य हे बोल मानीं
सुहृदसम तुझा मी एक या जाण लोकीं
सदय मन करोनि मित्र मोदें विलोकीं

" मम मनिं बहु इच्छा संग तूझा घडावा
सतत, म्हणुनि माझा हेतु हा पूर्ण व्हावा
वच मम वद मातें मान्य हें काय चित्तीं
प्रियतम सखया रे ! हीच तूतें विनंती

तुजसि उणिव कांहीं होउं देणार नाहीं
पुरविन तव कोडा, वांछिसी जें सदाही

अनुभव सहवासें पूर्ण येईल तूतें
स्तुति निज करणें हें गोड वाटे न मातें

" सुहृद्-वचन माझें व्यर्थ जाणार नाहीं
अबुध नससि तूं रे ! जाणसी सर्व कांहीं
उशिर बहुत होतो चाल वेगें गृहाला
धरिं न प्रिय सख्या रे ! तूं वृथा आग्रहाला "

परिसुनि शुक तेव्हां देतसे उत्तरातें
" श्रवण करुनि बोला ह्या हसूं फार येतें
तुजसह जरि यावें गेहिं या त्वद्विचारें
खचित तरि लयाला सौख्य जाईल सारें

" उडुनि गगनिं साऱ्या स्वैर मी संचरीतों
अवनिवरि कुठेंही स्वेच्छ लीला करीतों
स्मृति नच मनिं येई त्यांत रे ! कोणतीही
हृदयिं भरत सारें सौख्य, आनंद पाहीं

" हृदयिं तव कशी ये कल्पना त्या सुखाची
भुवनिं कुणि मला जे साम्य त्या होय साची
वद तव सदनीं हें सौख्य होईल काय ?
करशिल मृदु कीं तें बोलुनी दग्ध हाय

" अनुपम जरि सौख्यीं तूं मला ठेविलेंस
सरि तरि विपिनाची त्या न येईल लेश
अतुल सुख मिळालें त्यागितां आज मी हें
प्रिय नच तरि होतां तुच्छ वाटेल पाहे

" कितिहि जरि अपेष्टा त्यांत येवोत दैवें
भय न, खचित धैर्यें सोशितों सर्व भावें
तुज गुज कथितों मी एक, कोपें न, सान
सुख नच तव गेहीं नें मला देइ रान"

वचन वदुनि ऐसें व्योमपंथें उडाला
क्षणहि न दिसतां तो दृष्टिच्या आड झाला
विपुल शुक-वियोगें अश्रु नेत्रांत येती
गृहिं न परत जातां बैसलों तेथ अंतीं

अवचित मग येई मित्र तेथें, विचारी
स्थिति बघुनि म्हणे तो,–' होसि कां खिन्न भारी !
सकल कथियलें त्या वृत्त, ऐकोनि बोले:—
" शुक-वच नच खोटें, त्वां वृथा दु:ख केलें "

३

## मत्सर

( भूपती खरे ते० या चालीवर )

हा मत्सर बुडवी अखिल जगाला पाहीं
स्वाधीन तयाच्या होउं नको तूं कधिंही
या रोगासम नच दुष्ट रोग या जगतीं
जरि जडे कुणाही टळे न तो कल्पान्तीं

श्रीमंत दीन होती या मत्सरें
धीमंत कुधी होती या मत्सरें
जे सुखी, असुखि होती या मत्सरें

हें विदित असुनि तुज मग कां ऐसें करिसी
वाटतें नवल बहु हेंचि सखे गे मजसी

हा 'मत्सर घातकि'—बोध असा जनिं करिसी
मग वचनाची त्या चाड न तुजला कैशी

सन्मार्ग सुचवि जी मती तुझी इतरांसी
लाविशी बळें मग तिजला कां कुपथासी

हेंचि कां ग्रंथिं वाचीशी। निशिदिनीं
हेंचि कां तत्त्व काढीसी। त्यांतुनी
हाचि कां बोध ठसवीसी। निज मनीं

याहुनी अशिक्षित बरी म्हणावी वनिता
कीं दोष तत्करें घडति सुशिक्षण नसतां

हा मत्सररूपी अंकुर हो तरु पुढतीं
जैं फलें तया ये उजेड पडतो चित्तीं

अति दुःसह वाटति अंतीं। तीं फळें
भोगणें प्राप्त होतीं तीं। ना टळे
नयनिं मग अश्रु बहु येती। ना खळे

अनुताप होय मग खरा खरा जरि चित्तीं
तरि लाभ काय तो समयाचि गेल्यावरती

४

# नूतन भागीदार

( मज मदनें फसविलें० या चालीवर )

शिशुपण हें कितितरी
गोड असे भूवरी

प्रिय मातेच्या मृदु अंकावरि
बालक मूर्ती मन हरणारी
सुंदर कैशा लीला ती करि
स्वच्छंदें बहुपरी

विशाल उदधीवरि आकाशीं
दिव्य तारका निशासकाशीं
सुम-कलिका वा रम्य तरूशी
शिशु दिसतें त्यापरी

तज्जननी त्या करिं घेवोनी
नच दुखवीतां झोंके देउनि
प्रेमभरें त्या गोंजारूनी
तृप्त मना निज करी

रडतां असुं ये गालावरुतें
चुंबन घेउनि शोषवि जल तें
कुतुकें निज सुत वदना बघते
प्रीति काय ही तरी

देखुनि बालक करि जी लीला
वर्णु शके नच कधिं ती तिजला
ठेवुं कुठें तिज नकळे त्याला
प्रिय इतुकें अंतरीं

जगती ही तिज तुच्छ वाटते
अलंकार ते व्यर्थ मानिते
त्यापुढति न तिज कांहीं गमते
प्रिय दुसरें अंतरीं

हरणाऱ्या ! मम सती-प्रेम-मन
होइ विलोकुन हृदय विदारण
बाला ! जरि हें चोरियलें धन
द्वेष तुझा नच धरीं

प्रीती उत्कट मम जीवरती
तीच तुझ्यावरि करि रे ! शुचि रति
बहु आनंदें ह्मणुनी तुजप्रति
अर्पण ती मी करीं

५

# सुलोचना

( सुरा सुरा जणुं० या चालीवर )

असें कसें मज पिसें असे हें,
दिसे वसे मनिं सुलोचना.
मुला चुंबितां फुला हुंगितां
किती शोभिता, तदंत ना.
प्रणयें रमतां, सहास्य बघतां,
मंजुळ गातां, हरी मना.
अशांस अबला म्हणे न, मतिला
भ्रंश जहाला सुखें म्हणा.

६

# चंद्रमा

चंद्र उगवला नभांत हा । नभांत हा
सुंदर कितितरि दिसे अहा
शोभतसे जणुं दिव्य हिरा । दिव्य हिरा
अथवा तिलकाचि शुभ्र खरा

सकल तारकांसह साचा । सह साचा
खेळ खेळतो मौजेचा

कुरवाळी त्या प्रेमभरें । प्रेमभरें
समजुनि अपुले पुत्र खरे

दुजा न ठेवी भाव मनीं । भाव मनीं
हर्षवि किरणें ही रजनी

दुःख न बघवे मुळिं ह्याला । मुळिं ह्याला
प्रसन्न ठेवी जगतीला

जरी ताप दे घनमाला । घनमाला
ढळूं न दे लव शांतीला

सदा रम्य हा दिसे जनां । दिसे जनां
सुंदर रूपें सुखवि मना

७

# भ्रम

( दिंडी )

कुठें नाहीं सौख्य या जगामाजीं
तरल कमला ती थोर या भवीं जी

अशा ठायीं गुंतुनी प्राप्य काय
सरुनि हरितें उद्धरूं आत्म काय

न वनिं गेल्याविण हेतु-सफलता ही
चित्त चंचलता इथें आड येई
करुनि निश्चय दृढ असा, ‘ उद्यां जावें. ’
मग्न झालों प्रभुनामिं पूज्यभावें
कांहिं कालें रव एक उदित झाला
प्रथम मजला कळलें न, कुठुनि आला
परी केला रसभंग निर्दयानें
सौख्यसिंधूंतुनि ओढिलें तयानें
शांत असतां जलनिधी तो उदार
देइ सरिता कलरवें त्रास फार
क्रुद्ध मुद्रें तो बघे काय पाहीं ?—
प्रिया आनंदें रमविण्यास येई
कडेवरती घेउनी कौतुकानें
रम्यबाला, रंजवी मंजु गानें
अशी रमणी मन्निकटिं उभी आहे
तेंवि कोपें पाहतां हेंच पाहे
चारुगात्री, झाल्यास विपिनवासी
काय जवळीं बघतील नयन ऐशी
कर्णमधुर स्वर्गीय मंजु गीत
श्रवण करतिल का श्रवण असें तेथ
असति कोमल हे ओष्ट रक्तवर्ण
करिल मग तें आकंठ पान कोण

## आनंद-गीत

त्यजुनि जाइल रक्तिमा तयां जेव्हां
दोष दंतीं येईल काय तेव्हां
गुलाबहि सर करि न ज्या कपोलांची
देति आशि ते निज साक्ष चारुतेची
चुंबनाविण ते रुक्ष जाहल्यास
पुढतिं ओष्ठावरि काय सकल दोष
स्वर्ग-सौख्य न ज्यापुढें तुल्य होतें
वदति केवळ आनंद-धाम ज्यातें
स्मशानहि तें वैकुंठ गमे ज्यानें
असें लाधे सुत-सौख्य सुदैवानें
सुधामय त्या बोबड्या मधुर बोला
अजुनि पुरत्या मिळती न ऐकण्याला
बालपणिंच्या त्या गोड रम्य लीला
कुठें लागति नुकत्याच दिसायाला
नित्य सदनीं मुखचंद्र मत्प्रियेचा
पूर्ण, अकलंकी हास्ययुक्त साचा
दृष्टिं पडतां आनंद किती होतो
तुच्छ वाटे मोक्षही त्यापुढें तो
निशाकालीं नभिं चंद्र उदय पावे
स्वमनिं इच्छी तो विश्व तोषवावें
होइ दिग्भागा रवि-स्पर्श जेव्हां
लया जाई तदुदारपणा तेव्हां

कलंक, क्षय, निस्तेजता जयाला
खरें नकळे किति सौख्य तन्मनाला
असा जो जगीं तो कधीं कुणा अन्य
दर्शनानें निज करिल काय धन्य
चित्तिं उद्भवतां असे हे विचार
तरल केलें शुभ निश्चयास फार
गोड वाटें तइं भवचि हा असार
पुन्हां मायेचा होय कर्णधार

( श्लोक )

मतिसि कां भ्रम हा पडला असा
नकळतें जरि मी करिं साहसा
झणिं निवारिल सत्पथ सांगुन
खचित धन्य तया जगिं मानिन

८

# सरिता

झुळ झुळ वाहे ही सरिता । प्रसन्न होई मन बघत
ईश दयेनें या जगतीं । वस्तु निर्मिल्या नच गणती
अर्थी असती जगीं सर्व । नसे कुणाला निज गर्व

तयांत सरिता । असे अद्भुता । किती वर्णितां
शद्ब नसति ते मजपाशीं । वदा कोणत्या बघुं कोशीं
सुधा विपुल ती सुरभुवनीं । सुज्ञ बोलती, ये श्रवणीं
तीच अवतरे मर्त्य जनीं । असें वाटतें इज बघुनी
सतांस तारी । खलांस तारी । पतितां तारी
इजसम कोणी दयामया । नसे शोधितां त्रिजनीं या
भूमि खेळवी मांडिवरि, । वितान प्रेमें नभ वितरी
बंधु पवन मधु वचां वदे । सागर पति तो रमे मुदें
चंद्र—दिवाकर । सुत जोडुनि कर । शासनिं तत्पर
तारकांसवें शांत निशीं । हितगुज करिते सृष्टीशीं

९

## प्रणय-शोभा

( सुरा सुरा जणुं० या चालीवर )

जिवाहुनी प्रिय असे मला जी झटे रती मी करावया
न बोलतां करि व्रणांस कोपें कपोल ओष्टीं धरोनियां
विचारितां तिज दग्ध करी तनु निमित्त नेत्रें बघोनियां
अति त्वरें मग मदीय कंठीं स्वबाहु फेकी नसे दया
अशीच दुःखद विशुद्ध रीती प्रणयाची कां जगांत या
गमेल प्रणयीं कुणा पडावें दिसेल शोभा अशी तया

१०

# साधु-महिमा

( श्लोक )

त्रिखंड नमितें जया धरुनि भाव चित्तीं निका
श्रवूनि अभिधान जें सुटत कंप त्या अंतका
अगाध करिं शक्ति ज्या वसतसे खरी निश्चल।
समर्थ वसतो असा जगतिं एक साधू भला

असे उदधि शांतिचा व्यसनिं जो ढळेना कदां
तयास सुखदु:ख तें समसमान वाटे सदा
कुशद्ब वदतां कुणीं न धरि रोष, मानी सखा
विकल्प हृदयीं जरा न, अरि, मित्र तो सारखा

सुधामय निघे सदा वच मुखें मुदें सत्य तें
असत्य नरकापरी समय घोर ये केंवि ते
कुटुंब वसुधाच ज्या सकळिकीं कृपा सारखी
न भेद मनिं, इच्छितो जग सदा असावें सुखी

कसा न अभिमान तो सकल ठायिं सौजन्यता
सदा हंसित वृत्ति, ज्या कधिं न ठाउकी खिन्नता
सुरम्य नव हर्म्य वा उटज जीर्ण ज्या सारखें
त्रिकाल, सगळे ऋतूहि उपभोगितो तो सुखें

न भोजन मिळे तरी पवन भक्षुनी राहतो
त्यजी न अपुल्या स्थला, करि न याचना अल्प तो

खरा भरंवसा हरि स्मरणिं " जें घडे तें खरें—
न पर्ण तरि हालतें प्रभु-कृपेविणें या नरें "

सुमार्ग कथण्या जनां सदुपदेश मोदें करी
तदीय हित साधण्या अवघड श्रमा स्वीकरी
तयांत तनुला पडो कितिहि कष्ट खंती नसे
स्वपुत्र जन हे तया सुदृढ भावना ही असे

असेल सुख तें कुठें ? —खचित सज्जनाचे गृहीं
तिथेंचि बघतां दिसे अनुपमेय आनंदही
जगांत हरि तो कुठें ?—सतत साधु-ठायीं वसे
भवांत भवमुक्ति जी म्हणाति तींहि तेथें असे

पवित्र सरिता करी सकल पाप-भारा दुरी
स्वशीत किरणें शशी विरहताप सारा हरी
हरी सकल दीनता पुरवि इष्ट कल्पद्रुम
परी सकल हीं जगीं पुरवि एक सत्संगम

तरोनि पर तारितो, महति कोण वर्णील ती
प्रभूहि थकला, श्रमे चतुर शारदेची मति
तिथें अबुध हा कुठें !—हरिपुढें जसा मूषक
पदां सविनयें नमीं, कविसि तो असो तारक

## ११

# मनोहर स्वप्न

( अजि अक्रुर हा० या चालीवर )

अति मोदभरें निद्रित असतांना मी
स्वप्न तदां पडलें नामी
तें स्वप्न नव्हे सुखकर काल वयाचा
दैवि पुन्हां का लव त्याचा ?
त्या शुभ घडिची महति न वदवे वाचें
उपकारच त्या देवाचे
अक्षय्यचि ती लाभावी
इच्छा ही मजला भावी
परि दैवा पूर्ण अभावी
क्षण मृगजलसम दावी भास मनाला
प्रतिभा ती वा नयनांला
शशि तारांशीं गगनीं अनुपम मोदें
क्रीडा करि हास्य विनोदें
हें बघुनि सुटे मत्सर त्या चपलेला
दाखवि मग निज लीलेला
आव्हान करी प्रेमें त्वरित प्रियाला
धांवत ये तो समयाला

## आनंद-गीत

मानिती देव प्रणयाला
समजती भक्त उभयांला[1]
आवडे कोण तो त्याला
भक्तींत; अशी स्पर्धा उभयीं चाले
निज कार्यीं रत ते झाले
तों ' दा–' या मधु अस्फुट बाल– रवानें
गमलें तें स्वप्न लया ने
जें स्वप्निं बघे जागृतिं तेंचि दिसावें
यापरतें काय असावें
तांबूल करीं, कटिवर बालक, निकटीं
उभि ऐशी रमणी होती

हृदयांत धरुनि सद्भावा
तांबूल कुणीं मज द्यावा
उभयांत असा हा दावा
स्व–प्रीतीचा प्रभु मज ते मानीती
निज भावा व्यक्त करीती
तैं प्रेमाच्या त्या कलह निनादानें
मन भरलें आनंदानें
अनुभवितां त्या निरुपम स्वर्ग–सुखाला
विसरलों देह भानाला

---

१ चंद्र तारका व मेघ चपला.

भाग्यवंत अजि मीच गमे या लोकीं
जगताला तुच्छ विलोकीं
वच ' लबाड ' वदनीं आलें
बालक तंव हंसुनी डोले
कर पुढतीं घ्याया केले—
तों दंश करी वृश्चिक हरिला गर्व
कळविलें स्वप्न तें सर्व

## १२

# लता आणि फुलें

फुलें लटकती लतांस हीं । म्हणुनी शोभा तयांस ही

कुसुमें सुगंध पसरविती । वायुसवें दशदिशांप्रति
जननी–अंकीं खेळुनियां । नभा चिडविती हांसुनियां

आम्ही तारे भूवरिचे । डोलुनि दाविति त्या साचे
वरती बघती मत्तपणें । लाज गमे त्यां क्षिति बघणें

गर्व तयांना बहु होता । समजत होतीं श्रेष्ठ स्वतां
जननीं कथिती नम्र असा । परि न ऐकती तीं सहसा

अभिमानाचें घर खालीं । प्रचीति त्यांना मग आली
अवचित तेथें नर येती । निर्दय खुडिती कुसुमें तीं

पुत्र-प्रेमें दुःखि लता । दिसती तेव्हां बहु रडतां
दुःखजनक परि फुलां स्थिति । प्राप्त होय त्यामुळें अति
प्रिय जननीचा सहवास । पुरा अंतरे त्यां खास
पुर्वस्मित तें मुखांवरि । बघतां न दिसे अल्प तरी
गर्व समूळ गळे सारा । म्हणती,—नमवुनि शिर, ‘ तारा ’
मुखा लपवुनी लज्जेनें । प्रभु—गुण गाती मग सुमनें

१३

## विरही-चंद्र

( कृष्णपक्षांतील चंद्र, सूर्योदयानंतरही पश्चिम दिशेस कांहीं वेळपर्यंत दिसत असतो, त्याला उद्देशून )

( वीरा भ्रमरा० या चालीवर )

सखया चंद्रा ! अधोवदन तव ऐसें कां जाहलें ?
पूर्विचें तेज कुठें लोपलें ?
सुता तारका पतिगृहिं गेल्या, कन्याविरहामुळें
म्हणुनि कां शोकीं मन दाटलें ?
कन्याजन हें धन दुसऱ्याचें ठाउक असुनी तुला
मग कां त्रास असा मांडिला ?
सखी कौमुदी विहार करितां मुदित मनें, सोडुनी
गेली विरहिं तुला लोटुनी;

म्हणुनिच दिससी म्लानवदन तूं कारण हेंची खरें,
परि तिला दोष न देणें बरें !

हितगुज करण्या सखा तुझा प्रिय दिनमणि तव भेटिला
येतां दिसला जेव्हां तिला;

स्त्री नैसर्गिक लज्जा तेव्हां उद्भवली तन्मनीं
लपली घरे–आड जाउनी.

विभवयुक्त ये मित्र पहा, करिं आदर संतोषुनी,
रिझवीं गोड तया बोलुनी.

‘ किती श्रेष्ठ हा ! ’ ‘ दीन असा मी ! ’ जाणुनि कधिं अंतरीं
अशा या पडूं नको मत्सरीं.

विरहदुःख भोगिशी पुरे तें, कशास भर आणखी ?
रहावें, प्रभु जी स्थिति दे, सुखी.

१४

## भिकाऱ्याचे उद्गार

( अजि शेवटचा० या चालीवर )

आम्हि दीन जनीं म्हणुनी पुसति न कोणीं
बघती न अम्हांलागोनी

दृष्टिस पडतां यांच्या मुख लपवीती
अप्रीति भाव दर्शविती

जरि स्पर्श तयां नकळत झाला दुरुनी
अहिसमान बघती नयनीं

वर्षाव शिरीं दुर्वचनांचा करिती
निशिदिनीं काय हीं रीती ?

मानिती श्रेष्ठ अपणांला
लेखिती तुच्छ आम्हांला
' लाडके अम्हिच देवाला '

उन्मत्तपणें वदती लोकीं ऐसें
तन्मनिं हें शिरलें कैसें ?

जरि दीन मुखें लवहि याचितां ह्यांना
मनिं येई अल्प दया ना

जरि घासभरी अन्न याचिलें पोटा
क्रूरपणें दाविति सोटा

' देऊन तुम्हां व्हावें काय भिकारी ? '
अशि वदते जीभ विकारी

' तव देवानें इथें ठेविलें काय ? '
म्हणाति असें निष्ठुर हाय !

दारास लावुनी घेती
भृत्य वा तिथें बसवीती
असुनि ' न कुणि ' निरोप देती

धक्क्यांची वा विटंबना ये भालीं
गरिबांचा कोणि न वाली

यानांच दिला जन्म तुवां कां देवा !
करुनियां आमुचा हेवा

दीनांस दुजा सांग निर्मितो काय ?
संशयें दग्ध हा काय

श्रीमंत खरा अससि जगीं तूं एक
म्हणुनि भक्त तव बहुतेक

तूं इच्छिसि कीं, समान जगत नसावें
कां तुम्हींच देव रहावें

ही सृष्टि दोन देवांची
शंका न किमपि ये त्याची
ही उक्ति तुझ्या भक्तांची

मग योग्य न तव आम्ही, तूंहि न आम्हां
तूं अमुच्या दृष्टिं निकामा

अपवाद खरा म्हणुनि जरी धनवान
करिशील, नको तव आण

' श्री ' प्राप्त जया दत्त पुढें ' ग ' रहातो
मृदुलता विसरवी झणिं तो

ह्या षडरींनीं कुणां तारिलें जगतीं
जे स्वेच्छें वर्तन करिती

मति सन्मार्गीं लावीं, कुपथ न दावीं
भीक अम्हां हीच मिळावी

मग सुखी परम भिकारी
संपत्ति नको तव सारी
प्रभु ! रहा मात्र कैंवारी
त्वत्कृपें उणें भूवरि कांहिं न साचें
अम्हि दास तुझ्या पायाचे

१५

## माझी निराशा

( नृप ममता० या चालीवर )

सुम बकुल मनोहर म्हणुनी
लाविला वृक्ष तो सदनीं । प्रीतिनें
होईल कधीं हा थोर
घालितां गमे त्या नीर । प्रतिदिनीं
येतील फुलें त्या केव्हां
वाहीन कधीं मी देवा । भक्तिनें
दे माला सुंदर करुनी
कधिं म्हणेल प्रियतम भगिनी । कौतुकें
परि तिला चिडविण्यासाठीं
घालून दाखवूं कंठीं । करुनि ती

तिजसमोर ' घे ' ' घे म्हणुनी
नेऊं नच देतां हंसुनी । ती बळें
मग नकळत येइल पाणी
डोळ्यांत तिच्या तें बघुनी । त्या क्षणीं
हिरमुसलें वदन करोनी
जाईल खिन्न होवोनी । तेथुनी
तंव वाहिल बाळपणींच्या
अक्षता शिव्याशापांच्या । मजवरी
सांगेन परी आईसी
बघ वदते मज ही कैशी । उलट मी
मग तीहि रडत येईल
आइला सर्व सांगेल । सत्य तें
तइं हळुंच जाउनी मागें
घालीन माळ अनुरागें । ती गळां
हे असे विचार तरंग
चालतां होइ मन दंग । किति तरी
ये थोरपणा वृक्षाला
अधिकाधिक वाटे मजला । निरखितां
आनंद न मावे हृदयीं
मम आशा वाढत जाई । संमाय त्या
परि आज प्रभातीं बघतां
दिसतसे धरेला नमितां । वृक्ष तो

ही दु:खद तत्स्थिति बघुनी
येति असूं किति तरि नयनीं । तेधवां
आनंदहि पार निमाला
आशांचा लय तो झाला । सकलही
रडवाया इच्छित होतों
परि मलाच प्रसंग ये तो । संप्रति
साधिला कुणीं हा दावा
' आनंद '—मित्र ! तो दावा । विनति ही

१६

## स्वैर विचार

( सबसे राम० या चालीवर )

हे असती स्वैर विचार
कांहीं यांत असे का सार ?
सृष्टि कोठली । कुणीं निर्मिली
स्थिती ही कैशी तिज आली
भूहि विशाली । कशि अवतरली
कोण खरा जगिं इज वाली । कांहीं०
लव न आसरा । दिसत अंबरा
केंवि फिरे नभ— पट सारा

रवि शशि तारा । करिति विहारा
    कुणि न तयां का वदणारा । कांहीं०
पवन वाहतो । कां नच दिसतो
    अविरत अनुभव निज देतो
मेघ गर्जतो । सलिल वर्षतो
    चपलेला कां लपवीतो । कांहीं०
कोठुनि येते । परतुनि जाते
    रजनी कवण्या सदनातें
प्रेम कसें तें । जन्म पावतें
    सांगा कुणि या नियमातें । कांहीं०

१७

## बाल

( होय संसार तरु० या चालीवर )

रम्य हा बाल कुणि । भासतो चंद्रमणि
तोष किति होइ मनिं । सहज त्यातें बघुनि
बोबडें बोलतें । चित्त आकर्षितें
अमृतमय बिन्दु ते । जलनिधीसम वदनिं
स्वच्छन्द जलतरंग । खेळती होति दंग
तेंवि हा बालभृंग । खेळ करि निशिदिनीं

हास्यही विमलतर। विलसतें मुखिं मधुर
शशि-प्रभा अवनिवर। तेंवि पसरे सदनिं
प्राण कीं जननिचा। स्वर्ग जणुं भुवनिंचा
सकल निधि प्रीतिचा। इतर तिज तुच्छ जनिं
उटज, वन त्यास प्रिय। सौख्यकर कालत्रय
शान्त प्रमुदित हृदय। थोरता नृपतिहुनि

१८

## माझे सृष्टीचे शिक्षक

(भूपती खरे ते० या चालीवर)

मम शिक्षक असती जगतिं दयाळु अनेक
सत् शिक्षण देती तेचि मला बहुतेक
ही शिला शिकवितें—हृदय असूं दे थोर
जरि प्रहार त्यावरि होय असह्य अपार
हा पवन शिकवितो—स्वैर फीर कोठेंही
निष्कलंक राहीं, चित्त न ढळुंदे लवही
हा वृक्ष शिकवितो—मुदित मनें नित डोले
व्यसनीं न त्यजीं जरि महान शिरिं कोसळले
हा सागर शिकवी—परोपरीनें सत्य
गांभीर्य ठेविं रे! हृदयिं तुझ्या तूं नित्य

हा पर्वत शिकवी—धैर्य धरीं रे पूर्ण
मग आहे सुखकर हा भव दुस्तर जाण
हा चंद्र शिकवितो—प्रशांत शीतल राहीं
निज शरीर मत्सम करिं न कलंकित कधिंही
तारका शिकविती—धरीं ऐक्यता समता
त्याविणें न वाटे मौज खरी जगिं चित्ता
ही भूमि शिकविते—उदारता हृदिं ठेवीं
निज कृतिनें कवणा विन्मुखता नच दावीं
हा मेघ शिकवितो— मुखें सुधामय धारा
कीं, वर्षीं प्रमुदित होइल जन—गण सारा
ही निशा शिकविते—कपट शिवूं न दे मतिला
करिं धारण मानसिं प्रेमळता ती विमला
ही सरिता शिकवी—लोभ धरीं या भुवनीं
सकाळिकीं सुष्ट, खल भेद न ऐसा मानीं
हा भानु शिकवितो—प्रकाश निज कीर्तीचा
पसरवीं असा कीं, स्पर्श न होय तमाचा
हें गगन दाखवी—मार्ग विशाल सुखाचा
या नश्वर जगतीं वालि न कुणि कोणाचा
ही चपला शिकवी—भव भ्रमाचा भास
भुलुं नको तयामधिं हरि—पदिं लावीं ध्यास
बुडबुडा जलाचा शिकवी—जीवित काल
क्षणभंगुर, बघ तव वाट बघे हा काल

आणीक असति बहु गणति न होय तयांची
विधि निर्मित वस्तू नीति शिकविती साची
त्या त्रिवार करितों प्रणाम कर जोडोनी
तद्बोध वसो दृढ या मम अंतःकरणीं

## १९

## उषःकाल

( भूपती खरे ते० या चालीवर )

हें कोण मनोहर बालक जन्मा आलें
कीं, कवि–हृदयाला स्पर्शें पुलकित केलें
आकाश कपाटीं त्वरें तारका लपती
ही ज्योत्स्ना त्यजुनी घेइ गृहीं विश्रांति
या घोर तमाला विविध शरें संहारी
ही जगती काढी तयांतुनी बाहेरी
तदुपकार म्हणुनी कंठीं घालायाला
ही[1] गुंफि रम्य दंवबिंदू–मौक्तिक– माला
मोहनिद्रामयां नवजीवन तें देई
सर्वांग सुंदरा सृष्टि तयां ही दावी

( १ ) जगती.

मधुगान यशाचें प्रेमें विहंग गाती
तरुलता तयावरि मुदें फुलें उधळीती
दिग्वधू गोजिरें बघुनी सस्मित झाली
चुंबनें आणिली गालिं गुलाबी लाली
निज करीं घेउनी कुंतल मृदु कुरवाळी
त्यासवें करीं ती प्रमुदित चित्तें केली
हा मंद सुगंधित शीत समीरण दूत
तत्कीर्ति पसरवी जगभर, सोडीं भ्रांत

२०

## शारदा देवी

सौख्यदा । असे शारदा
सकल जन-वृंदा । सकल जन-वृंदा
नर-जन्म त्याविणें धन्य न होई कदा
विद्येविण भूषण नाहीं । जगतिं या
द्रव्याचें मोल न कांहीं । पुढतिं या
सुखदु:ख तिजवरी राही । जन्मि या
तनु-मनें । स्मरावी म्हणुनी
शारदा देवी । शारदा देवी
ती प्रसन्न झालिया सार्थकता समजावी

## २१

# गुलाबाचें फूल

गुलाब सुंदर दृष्टिं पडे । चित्त मोहिलें तयाकडे
यत्न तदां मी बहू करीं । विफल होति, तें ये न करीं
फूल चंद्रमा, चकोर मी । मधु वा तें मधमाशी मी
अंबुद वा तें चातक मी । द्राक्षहि तें वा जंबुक मी
स्थिती होय जइं मम ऐशी । सुचे न कांहीं तइं मजसी
पडेल खालीं तें गळुनी । झाड हलविलें मी म्हणुनी
फूल न गळतां नसें परी । पडति पाकळ्या तनूवरी
प्रिय फूलाची तशी स्थिति । पाहुनि वाटे दुःख अति
कसें जाहलें असें बरें? । करित विचारा परत फिरे

## २२

# कलिका आणि भृंग

( शिशुपर्णी गमे हें० या चालीवर )

हा भृंग बैसला कैसा कलिकेवरि या
आनंदित वृत्ति दिसाया । परि त्यांत विपच्छाया
ऐशी स्थिती यावया होय का त्या

हा भृंग बैसला कैसा कलिकेवरि या
ही बसे कशी नटुनीयां । कर्षिते रसिक-हृदया
लाजे रती वैभवा पाहुनी या

हा भृंग बैसला कैसा कलिकेवरि या
गुज गोष्टि तिजशिं सांगाया । मन तिचें वा हराया
कांहीं कळेना तदिच्छा बघाया

हा भृंग बैसला कैसा कलिकेवरि या
आधींच तिला रिझवाया । अनिल हा रमे भ्रमुनियां
गन्धा लुटोनी दरवळे नभीं या

हा भृंग बैसला कैसा कलिकेवरि या
सौन्दर्य फुलें म्हणुनीयां । लोलुप केलि कराया
लोळे पदीं तन्मया चित्त व्हाया

हा भृंग बैसला कैसा कलिकेवरि या
आधींच तिनें कवि- हृदया ! मानिला सखा निज या
खेळे मुदें स्वैर त्या दिव्य ठाया

हा भृंग बैसला कैसा कलिकेवरि या
जरि रमली प्रिय मानुनि त्या । प्रणय-रसा प्राशुनियां
त्यागील, ही भीति तिज गमे, स्व-काया

हा भृंग बैसला कैसा कलिकेवरि या
ये जरा सृष्टि-नियमें या । कलिकेस नित्य तरि या
हें गान ठेवी जना तोषवाया

२३

# दुःखिताचे उद्गार

(एकदां का मनुष्यावर संकटपरंपरा ओढवली आणि असह्य दुःखांच्या अपरिमित राशी त्याच्यासमोर येऊन पडल्या तर अखिल जगतांतील कोणती गोष्ट त्याला प्रिय वाटणार आहे ?)

( ये धांवत कृष्णाबाई० या चालीवर )

हा दीन तुला वनमाली ! । शरण या कालीं
तुजविणें कोण या वाली

आनंद लयाला गेला । शोक हा ठेला
वाहते असूंची माला

प्रेमाची तुटली तार । होइ कठोर
हृदय हें न पारावार

सुखनिधी बुडे हा आधीं । मागुती व्याधी
लोटिती तनुसि दुःखाब्धीं

ही दहनभूमि हें भवन । रम्यता लव न
किति दिसते नयनिं भयाण

सुग्रास अन्न हें खासें । गरलमय भासे
मधुरत्व कुठेंहि न जैसें

ह्या रुचिर तारका आतां । तापदा चित्ता
वाटती सहज त्या बघतां

ह्या चंद्र प्रसवे ज्वाला । सोडि शीताला
दर्शनें टोंचि जणुं भाला

ही निशा जीवनावीण । तळमळे मीन
स्थिति करी तशी मम हीन

हा दिवस साधितो वैर । लादतो भार
जड झालें सकल शरीर

हा गन्धित शीतल अनिल । चित्त हें तरल
स्पर्शुनी करी बहु विकल

आलाप मनोहर नाना । तोष दे न मना
ताप देति कटुतर काना

मित्र हे शत्रु मज दिसती । द्वेष ही रीती
सर्वत्र संचरे जगतीं

सद्बोध रुचे न कुणाचा । विषासम साचा
हो विपर्यास तयाचा

आशाही पार निमाल्या । अतां नच उरल्या
नीरस ह्या वस्तु जहाल्या

ह्या तप्त मानसावाटे । क्षोभ जो दाटे
बाहेर पडेल न वाटे

ही रुक्ष भासते अवनी । अर्थ नच जगुनी
हें जीवन निष्फळ असुनी

बोलती सुज्ञ संसार । खचित निस्सार
तद्वचीं दिसे बहु सार !

२४

# प्रिय फूल

( म्हातारा इतुका न० या चालीवर )

दाउनियां मज हूल । नेलें चोरुनियां प्रिय फूल
काय पडे ही भूल । नेलें चोरुनियां प्रिय फूल

फूल न गेलें । जीवन गेलें हृदय शून्य झालें
काय राहिलें । सर्व संपलें जडत्व हें उरलें

या जड चित्ता । येइ न रडतां पुरतेंही आतां
फुला शोधितां । असूं तत्त्वतां दिसले ते जातां

लोचन सुकले । मतिहि न चाले गेलि कुठें नकळे
संकट आलें । काय तिज कळे म्हणुनि मला त्यजिलें

मन चंचलता । सोडी, स्थिरता दावी या जगता
फूल हरपतां । किति निष्ठुरता धरिती सर्व स्वतां

२५

# नीरस कवि

( भूपती खरे ते० या चालीवर )

ऱ्हा कवी निरंतर गीत मनोहर गाई
तत् सार्थक लवही परंतु लोकिं न होई

काढिती कल्पना सदोष कितितरि नाना
ठरविती अबुधता, नीरस त्या गीतांना

हा सागर शुष्क जहाला । उज्ज्वल
धरणी—पट त्यांत बुडाला । श्यामल
उभयांतिल भेद निमाला । निश्चल

सांगतां असें कवि, खरें मानिती लव न
त्या कुठुनी दावूं संगमता ही नविन

ही कविची फजिती रुचिरा तारा बघुनी
आनंद दाविती, गुणगुणती किति हंसुनी

पाताळ आणिला अवनींवरती सारा
त्या स्थलीं धाडिलें मायेच्या बाजारा

चिडविती म्हणुनि त्या, वदनिं फासिलें काळें
नयनांतुन तेंव्हां बाष्पबिंदु गाळियले

---

१ हा शब्द मेघाला अनुलक्षून आहे.

मग स्रवती मौक्तिक—माला । कविशिरीं
आनंद तयाला झाला । बहुपरी
त्या क्षणींच वाहुनि गेला । भीतरीं

तेथेंहि दाविला प्रभाव अपुला कविनें
खेळला हांसला कवना गाउनि सु-मनें

हें कसें म्हणुनि कुणी पुसती काय कथूं तें
कवि नीरस याहुनि म्हणवुनि घेणें रुचतें

२६

## उफराटी सृष्टी

( भूपती खरे ते० या चालीवर )

हा मीन तडफडे कैसा या सलिलांत
खेळता दिसे हा भूवर नक्र मजेंत

या नील नभीं ही वीज संचरे स्वैर
लखलखती तारा दिनीं किती न सुमार

शशिप्रभा लाजते दीपप्रभेला बघुनी
हा चंद्र लाजवी रविला तेजें हंसुनी

गर्दभा विलोकुनि मुग्ध कोकिला होती
नभिं मयूर विसरे नृत्य बघुनि घनपंक्ति
ह्रीं फुलें सोडिती सुगंध अपुला सारा
मकरंद लुटाया होइ न इच्छा भ्रमरा
विकसुनी कमलिनी अवगणिती त्या दयिता
तो वनींच करुनी विहार रमवी चित्ता
ही सरिता पावे सिंधूमधुनी जनन
कवटाळी प्रेमें झऱ्यास सुंदर म्हणुन
क्षितिवरिच धार ही फिरते, गगना सोडी
हा जंबुक बघतो गगनाची ती गोडी
ही स्वर्गावरती धरा नाचते कैशी
उफराटी सृष्टिच काय करावें त्यासी

२७

## प्रीतीचें चुंबन

( सुलभ मनिं गणा० या चालीवर )

रुचिर हा कपोल करिं न दुरी। या मनिंची करिं हौस पुरी

पर्वत नाना विशाल गगना। चुंबिति काय तरी। प्रीतिनें
तरंग खेळति चुंबन घेती। सलिलीं ते स्वैरी। प्रीतिनें

या धरणीचें चुंबन घेतो । रवि गमतें स्वकरीं । प्रीतिनें
मधु विधु-कांती उदधिप्रति ती । चुंबी, लोभ धरी । प्रीतिनें
चुंबन-महती वद ही जगतीं । कळली काय खरी । प्रीतिनें
सकळ वृथा हें चुंबन पाहे । वितरिसि मज न जरी । प्रीतिचें

## २८

# आनंद

( भूपती खरे ते० या चालीवर )

आनंद-कंद हा म्हणुनि रम्य ही जगती
त्या कुठेंहि बघतां दिसतो सर्वांभूतीं
आनंद व्हावया कुणीं उद्यमीं दंग
आनंदी व्हाया धरिती कुणि सत्संग
गातो कोकिळ आनंदें । सुस्वर
करि मयूर नर्तन मोदें । सुंदर
खेळतो फुलांसह मोदें । मधुकर
आनंदें क्रीडे बालक मन रिझवाया
आनंदावीणें खचितचि सारें वाया
नभिं सूर्य उगवुनी आनंदवि ही सृष्टि
तरु लता विहंगा फलां फुलां दे तुष्टि

विधु क्षितिजीं येउनि निशा हर्षवी मोदें
खग चकोर-नयनां तुष्ट करी आमोदें

तारका हंसति आनंदें । अंबरीं
हिमबिंदु नाचती मोदें । तृण–शिरीं
लीन हो जान्हवी मोदें । सागरीं

नभिं चपला मिरवी स्व–तेज आनंदाचें
आनंदावीणें रुक्ष सर्वही साचें

आनंद संकटा करी दूर निमिषांत
आनंद गुंगवी सदा निजानंदांत

आनंद निवारी सकल उपाधी व्याधी
आनंद दावितो अखिल सुखाचा उदधी

आनंद धाम मोक्षाचें । निश्चळ
आनंद सार सत्याचें । उज्ज्वल
आनंद हृदय प्रेमाचें । निर्मळ

आनंदचि भरला स्वर्गीं भूतलिं सारा
आनंदावीणें मिथ्या सर्व पसारा

२९

# वेडा

( मज गमे ऐसा० या चालीवर )

कुणि म्हणो वेडा जनिं मला । काय त्याचें

बसेन उद्यानीं जावोनी
फुलांतला मकरंद होउनी
प्रेमें अनिलासवें खेळुनी
लीन करिन पदिं मग मधुपाला

सदैव राहिन एकाकी वनिं
कोकिलासवें हितगुज करुनी
वृक्षलतांना करुण कहाणी
कथुनि, करिन वश वनदेवीला

सरिता–तटिं प्रिय मुरली घेउनि
तींतिल मंजुळ सूर होउनी
भेदिन गगना, टाकिन मोहुनि
स्वर्गा आणिन भूशि रमाया

गिरिशिखरावरि निश्चल बसुनी
खुशाल हिममय जाइन बनुनी
रवि शशि तारे पाहिन निरखुनि
लाजवीन त्या खचित नभाला

विजनिं उटज मम असो जिवंत
सदाहि समजा तिथें वसंत
सुंदर कवना गाइन नित्य
काय जगाची पर्वा ह्याला !

## ३०

# मुलें फुलें

पहा पहा हीं मुलें फुलें । साम्य किती तरि उभयिं जुळे
मुलांस बघतां प्रेम जडे । फुलांस बघतां मोह पडे

जननी-अंकीं हंसति मुलें । वृक्षलतांवर रुचिर फुलें
मुलें क्रीडती मौजेनें । फुलें डोलती हौसेनें

मुलें रंजविति लीलांनीं । फुलें गुंगविति गंधांनीं
जननी प्रेमें गाइ मुलां । मधुकर गुङ् गुङ् करी फुलां

मुलें गृहांना शोभविती । फुलें उपवनां भूषविती
रसिक मुलां प्रिय लडिवाळी । वायु फुलां बहु कुरवाळी

मुलें फुलें हीं सृष्टिमधीं । म्हणुनीयां आनंद हृदीं
दोन दिसति हीं जनांतरीं । कविला वाटे एक परी

## ३१

# कोण हें आई

दुड दुड बघ धांवत चाले
वच अस्फुट मंजुळ बोले
आनंदें निशिदिनिं डोले—कोण हें आई ?

स्मित वदनीं किति गोड खुले
कौतुकें दिनभरी खेळे
कधिं रडे, रुसे कधिंहि बळें—कोण हें आई ?

मृदु कच शिरिं शोभति कुरळे
मुखिं दंत हिरे कीं खुलले
कमलीं जणुं मधुकर डोळे—कोण हें आई ?

फूलच कीं उपवनिं फुललें
गंधयुत प्रेम पसरविलें
हर्षित मनिं सकलां केलें—कोण हें आई ?

रवि—शशि जणुं उदया आले
सुख—निधान किति दावियलें
स्वर्ग—भुवन इथेंचि आणिलें—कोण हें आई ?

शशिनें स्व-रूप कीं दिधलें
चुंबनें सुधा ती वितळे
शांतीचें धाम जहालें—कोण हें आई ?

## ३२

# कवीस पाचारण

( मी तप्त जरि मदन० या चालीवर )

हें ताराकुल, अंबर हें, अरुण निजकरें
हा रत्नाकर वीचींहीं, चंद्र निजशरें
सुरलोकिं योग्य, भूवरिं नच वास तव बरा
हे सकल कविसि वदति असें गमत अन्तरा
आकाश म्हणे लागिं पथा धैर्य धरिं मनीं
तुज जाणे अति दूर असे वदत दिनमणी
जों उदधि म्हणे प्रेम-पाश तोडिं सत्वरिं
तों इन्दु म्हणे सुखकर तें स्थल किती तरी
करितील मान सुरवर तव वदति तारका
शिवतें न लवहि दुःख, वसति सौख्य दायका
आव्हान असें करिति मुदें सकल आदरें
हें परिसोनी कवि चित्तीं बहुत बावरे
परि त्याचें मन वदत तया भवचि हा बरा
या ठायिं सकल वांछित तें लाधतें नरा
तूं गेलासी भुलुनि तिथें तद्रुचा जरी
तुज होइल कां लाभ खचित शोधि अन्तरीं
त्या सुरपतिचे अतुल वैभवास पाहुनी
दिपतील तुझे नयन गमे मजासि त्या क्षणीं

सौन्दर्यखनी तेथिल त्या अमर-कामिनी
हरतील तुझें हृदय गड्या ! मोह दावुनी
वाटेल तदा मीच असे कुणि जगांत या
होशील अहंमन्य बहू सोडुनी नया
जाईल तुझी वामपथीं मति न जाणतां
मग विसरशील कर्तव्या जाण तत्त्वतां
यासाठिं तुला हित कथितों ऐकशिल जरी
तरि काव्य-कुंजिं बसुनि सतत रमविं वैखरी
तूं दावित जा अखिल जनां काव्य-माधुरी
जगदीश सदा गाउनियां प्रीतिनें हरी
रे ! उपजवुनी विपुल दया तद्-हृदंतरीं
तो स्वर्गचि तूं आणिशील खचित भूवरी

३३

# सखा असे कवि देवाचा

कविच्या हृदयीं काय वसे । गूढ पडे सकलांस असें
रम्य कल्पना शब्द पदें । उद्भवती किति तया मधें
हंसवी रडवी । भुलवी डुलवी । रिझवी खुलवी
काय असे ही जादुगिरी । नवल तयाचें जनांतरीं

मुलें फुलें हीं स्वैरपणें । हंसती डुलती लुब्ध मनें
चुंबन घ्याया धरणीचें । स्वर्गा मानसिं फार रुचे

रवि शशि तारे । ग्रहगण वारे । नभ, हे सारे
विहार करिती एक मनें । ऐक्य दावुनी समतेनें

आलिंगी ही तरुसि लता । रमे सागरासह सरिता
उठती तरंग मोदाचे । दर्शक किंवा प्रेमाचे

बुलबुल गाणें । गोजिरवाणें । रंजवी मनें
वृक सिंहादिक वनिं सर्व । खेळति विसरुनि पर भाव

सखी प्रियतमा अवनीची निशामूर्ति दुजि शांतीची
रुचिर बालकें सृष्टितलीं । निजवी प्रेमें कुरवाळी

निर्झर प्रेमल । गाती उज्ज्वल । तद्यश अविरल
विहंग परिसुनि तल्लीन । होती, विसरुनि निज भान

जें जें कथितो कवि लोकां । तें तें अवघें खरेंच कां ?
प्रश्न असा जरि करिल कुणीं । वदत तया तो असें:—जनीं

कविची लीला । अघटित विमला । गोचर सकलां
सखा असे कवि देवाचा । अगम्य सुगम करी साचा

## ३४

# खुळखुळा

( भूपती खरे ते० या चालीवर )

‘ खुळखुळा ’ खरा हा खुळाच मासे जगतीं
प्रिय बालसंगमीं वेडा होई चित्तीं

शिशु सान बघुनि त्या धांवत वेगें जाई
तच्चित्त रिझविण्या तत्परता बहु ठेवी

हलवितां हळुच त्याप्रति ध्वनी तो करितो
किति मधुर तरी ! शिशुवृत्ति तन्मया करितो

किति कौतुक करिती त्याचें । ना सुचे
सर्वहि स्थान बालांचें । प्रीतिचें
त्याविना नान्य प्रिय साचें । हृदयिंचें

“ निःस्वार्थी सुहृद प्रिय, मुलां एक तो मीच ”
वाटतें इतर त्या स्वार्थी असती साच

जरि बाल रांगतां दिसे न सदनीं कोठें
अंतरीं तयाला दुःख होतसे मोठें

आनंद सोडुनी उदासीनता धरितो
निज खिन्न वृत्तिनें मूक कुठें तरि बसतो

बोले न, कुणीं जरि दुःखद पीडा दिधली
येथें न ठाउकें पूर्ण तया निज वाली

प्रार्थुनी प्रभूला मागे । तो निकें
" सदनिं या देइं अनुरागें । बालकें
खेळेन तयांच्या संगें । कौतुकें "

प्रभुकृपें लाधतां नवल न वेडा हो तो
सन्मित्रा ऐशा कवनिं मुदें कवि गातो

## ३५

# प्रेम-मीलन

( अंजनीगीत )

परस्परांचें परस्परांवरि
प्रेम अखंडित होतें अजवरि
प्रिया सद्गुणी कोपे मजवरि—कारण तें नकळे

राग तियेचा शांतविण्यासी
यत्न कराया पाहीं मानसिं
अवधि न देई परि ती मजसी—विफल करी सगळे

मग्न विचारीं उपवनिं असतां
' राग सोडिं अनुराग धरिं अतां '
जवळीं जाउनि प्रेमें वदतां— कांहीं नच वदली

आशंकित मन गेलें बनुनी
प्रेमरहित ही भासे अवनी
एक आणखी उपाय म्हणुनी—प्रेमपत्र लिहिलें

विचार जे जे उद्भवले मनिं
कसें तरी ते शब्दीं लिहुनी
प्रेम सर्वही त्यांत ओतुनी—हृद्गत कळवीलें

तयें कोणती केली करणी
बघण्या उत्सुक झालों स्वमनीं
त्वदीय सन्निध गेलों म्हणुनी—तिज न कळूं देतां

खरी शांतता नांदत होती
भयें करित परि धडधड चित्तीं
विकल्प नाना हृदयीं शिरती— काय तदां पाही !

सव्य करीं मम पत्र घेउनी
दुज्यावरी निज कपोल ठेउनि
आर्त दृष्टि त्यावरी लाउनी—विगत भान दिसली

मंदस्मित तें विलसे वदनीं
प्रेमसलिल तें चमके नयनीं
भालीं गालीं घर्मबिंदुनीं—प्रीती दर्शविली

आशाजनक स्थिति ती बघुनी
हर्ष दाटला इतुका मन्मनिं
हृदय फुटोनी गेला गगनीं—कोंदुनि कीं राहे

हळुंच करें मी स्पर्शीं हनुला
दचकुनि मुखशशि मागें वळला
अवचित अधरा अधर भेटला— काय नवल तरि हें !
प्रेमळ हृदयें एक जहालीं
कळे न स्वर्गीं किंवा भूतलिं
हर्षा तेव्हां वाट मिळाली— अविरल अश्रुजलें

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. .... .....
३६

## अंबरास

( मज मदनें फसाविलें० या चालीवर )

धन्य गड्या अंबरा !
तूंचि जगीं या खरा
निश्चल निर्भय ज्ञागिं अविकारी
पुण्यवंत किति भवकांतारीं
कुणि न असा कीं तव समता करि
वर्णु किती वद जरा
शरद्-पौर्णिमा तुज कुरवाळी
चंद्रज्योतीनें ओंवाळी
शुभ्र रुपेरी तेजें उजळी
नील तनू निर्भरा

प्रेमें आश्रय देशि घनांप्रति
इतस्ततां ते म्हणुनि विहरती
स्वच्छंदानें खालुनि वरती
प्रीतीच्या सागरा

श्रांत करिति क्षिति प्रखर भानुकर
निःश्वासा ती साडि भयंकर
प्रणयचुंबनें सुखविशि अंतर
लपवुनि त्या दिनकरा

तरला चपला चंचल भारी
विश्रम घेई तव ठायीं परि
उदारता प्रकटविशी किति तरि
लाजविलें सुरवरा

स्वैर विहारी त्या पवनाची—
गती नावरे कवणा साची
परी अडविलें स्वबलें तूंची
धैर्यनिधी जगिं पुरा

कृपाछत्र तव सृष्टिसतीला
म्हणुनी शोभा तिज ही अतुला
नातरि पुसतें कवण वद तिला
सदय हृदय तूं खरा

रुचिरा तारा धरणी रजनी
विरहाकुल बहु होती स्वमनीं

इच्छित त्यांचें प्रेमें म्हणुनी
भेटविसी हिमकरा

मुदें विहरतो रवि प्रभेशीं
रमे चंद्रमा प्रिय ज्योत्स्नेशीं
मौज बघुनि मन शांत ठेविशी
नच करितां मत्सरा

हिमनग तरुवर स्पर्धा करिती
उंच मनोरे गर्वित होतीं
कुतुकें बघसी, न गमे खंती
त्वत्प्रेमीं अंतरा

उंच भराऱ्या विहंग घेती
आंदोलन तें पतंग करिती
सद्भावें तुज भेटूं म्हणती
सुगुणखनी सहचरा

सद्गुण ऐसे तव हृदयीं किति
निर्विकल्प ते वास करीती
तव त्यायोगें अबाधित गति
जगता ही गोचरा

कलिकालाची तुजसि न भीति
षड्रिपु दुरूनचि नमुनी पळती
क्षोभ, शोक, भय न हे गांजिती
दुःख शिवे ना जरा

अखिल चराचर धुळींस मिळतें
लयास जाती ब्रह्मादिक ते
पालटते युगगति परि तव तें
नोहे स्थित्यंतरा

कृपा प्रभूची खरी तुजवरी
नसे अपेक्षा तदीय मुळिं परि
सद्गुण अपुले प्रेमें वितरीं
इच्छा ही किंकरा

३७

# कवि आणि कलिका

( म्यां नयनिं देखिला० या चालीवर )

कलिका पहिली:—

हा निकटिं पातला कवण भृंग बघ ताई !
तन्मनीं काय तें ऐसें । कळेना कांहीं

भासतो चतुर तस्कर । चौर्यकर्मीं
तरलता नयनिं गोचर । दृष्टि कामी
गमतसे दुष्ट अन्तर । पापधामी

बघ दिसे न मधुकर काळा । रमाया येई ।। हा निकटिं०

हें उपवन ईशदयेनें । निर्मियेलें
विहरण्यास स्वच्छन्दानें । अम्ही बाळें
अलि, अनिल सुहृद् नशिबानं । लाधलले

अधिकार इथें यायाचा । कुणाला नाहीं ।। हा निकटिं० ।।

किति अघटित परि तत्करणी । ये न ध्यानीं
स्थिति केली केविलवाणी । लाज आणी
मन हरी हृदय भेदोनी । नुमटे वाणी

लपुं कुठें, जाउं मी कुठें । सांग मज कांहीं ।।हा निकटिं० ।।

कलिका दुसरी:—

या वद् न सज्जना अदय बोल मुखिं ताई !
जगिं म्हणाति तात सृष्टिचा । तयाला पाहीं

हा थोर पुरुष प्रेमळ । पुण्यशाली
तन्नयनिं प्रीति निर्मळ । सांठवीली
किति हृदय सदय उज्ज्वळ । सर्व कालीं

बहु भाग्य आपुलें, स्थलिं या । म्हणुनि हा येई ।।या वद० ।।

निर्मी जी वस्तु विधाता । या जगीं तो
परि आधिं तिचा उपभोक्ता । उपजवीतो
थोरपणा म्हणुनि उभयतां । प्राप्त होतो

नातरि न मुळिं ताळ रहातां । स्वैर जग होई ।।या वद० ।।

अलि, अनिल सुखाचे बघ हे। मित्र नोहे
सन्मित्र खरा जगिं पाहे। हाचि आहे
जनिं महत्त्व म्हणुनी राहे। आपणां हें
सन्मान मुदें करि त्याचा। भय न धरिं कांहीं॥ या वद०॥

त्या प्रणय-संगमा वर्णुं किती या समयीं
साम्राज्य प्रीतिचें सारें। अनुभवा येई
सन्देह नुरे लव जेथें। शान्ति वसते
अद्वैत वास करि तेथें। ऐक्य असतें
मधु गिरा, सत्यता रमते। ब्रह्म तेथें
अनुसरिती जें हीं तत्त्वें। प्रभुकृपा होई
त्या प्रणय-संगमा वर्णुं किती या समयीं

× × ×

३८

# आशेस

ज्ञान चक्षुंनीं तुज भुवनीं
वाटे बघती नच कोणी

अगम्य आशे! तव महिमा। जगभर पसरे ती सुषमा
एक न ऐसा जगिं वसतो। कीं, तव मोहीं नच फसतो

स्वर्ग लोकिंचे । मर्त्य जगाचे । पाताळींचे
एकचि सारे एकचि गे । प्रेमें लागति तव मार्गें । ज्ञान०

प्रथम भुलुनियां गोड वचें । हर्षभरें हें मन नाचे
त्यांतचि करिशी तल्लीन । मनोराज्यिं निज गुंफून
स्वर्गीं चढतें । सुधस पी तें । वनीं विहरतें
स्वप्नांतिल ह्या सर्व कला । कळतां स्रवविशि अश्रुजला । ज्ञान०

ग्रीष्मिं जलास्तव मृग फिरतां । इतस्ततां, तनु कष्टविती
दिसतां केवळ आभास । खराच वाटे तो त्यांस
उत्कंठें गे । धांवत वेगें । त्याच्यामागें
" धन्य धन्य तूं असिसि बये ! " । असें वदति कां तद्-हृदयें ? । ज्ञान०

चंद्रकोर ती नभिं बघुनी । चकोर लालस होय मनीं ।
देइल सुख जी शीत करें । म्हणुनी वाही प्रेमभरें
क्षण न लोटतां । लोपुनि जाता । घनें, देखितां
दुःखसागरीं तो बुडतां । इच्छित कां मनिं तव शुभता ? । ज्ञान०

भेटाया ये नलिनिवनीं । उत्सुकतेनें अलि म्हणुनी
भृंगी तिकडे पतिविरहें । काळा कंटित दिन साहे
' येइल आतां ' । प्रणयी चित्ता । असें सांगतां
जेव्हां येत न बघे पति । वर्णित कां ती तव सु-कृति ? । ज्ञान०

पतंग सुंदर मौजेंत । डुलतो अफाट गगनांत
राहो स्थिति ही सुखद नित । इच्छी ऐसें तच्चित्त
त्या स्वर्गांतुन । बळेंचि ओढुन । धुळीस मिळवुन
क्षणांत देशी, तो म्हणुनी । गात मुदें कां तुज स्वमनीं ? । ज्ञान०

## आनंद-गीत

बघुनी गगनीं घनपंक्ति । चातक हर्षित हो चित्तीं
चंचल करिती चंचूला । स्वाती-घन-जल प्यायाला
सुटुनी पवना । दाहि दिशांना । लय होतांना
दृष्टिं पडे जैं अवचित ती । उपकृति कां तव ते स्मरती ?। ज्ञान०

मींच सकळिकीं श्रेष्ठ जनीं । काय समजशी तूं स्वमनीं
तुच्छ लेखुनी इतरांना । दाविशि अपुल्या लीलांना
त्यांत कांहिं जरि । घडे जगांतरिं । खंति न तुज तरि
वाटे, करिसि न लव पर्वा । वश होउनि त्या खल गर्वा । ज्ञान०

दुजी मोहिनी सृष्टितली । ईशें तुजला निर्मियली
वरुनी सुंदर दिससि जरी । कालकूट तें आंत तरी
मोहकता ती । सकल जनांप्रति । फसवी जगतीं
अपराध न तव त्यांत खरा । अम्हांकडे ये दोष पुरा । ज्ञान०

कळतां तव हें रूप खरें । फसूं न त्यातें जाण बरें
पर्वा करिसि न जाशि अमुची । करूं न आम्ही तव साची
अखंड स्मरुनी । श्रीहरिचरणीं । भाव ठेवुनी
आस निराशा त्यजुनि सदा । अनुभवुं मग आत्मानंदा । ज्ञान०

३९

# मौज

मेघवृष्टि नभिं स्थिर होतां । रवि निजकौतुक दावि स्वतां
इंद्रचाप तो स्वकरांनीं । विविध मनोहर रंगांनीं
रंगवुनीयां । दावि जगा या । कर्षी हृदया
क्षणें लोपवी निज हस्तें । मौज कशी तरि मग होते

अस्ता जातां प्रभाकर । तारे चमकति महीवर
प्रफुल्ल सुंदर जणुं नलिनी । नील सरोवरिं विलासिनी
चंद्रकरावलि । ये उदयाचलिं । परि तारावलि
बघतां निष्प्रभ ती दिसते । मौज कशी तरि मग होते

वसंतमासीं सृष्टि खुले । पाहुनि मोदें जगत डुले
कोकिलकूजित चित्त हरी । पुष्पसुगंध विलीन करी
वसंत गेला । नाद लोपला । गंध निमाला
शुष्काचि भासे अवघें तें । मौज कशी तरि मग होते

कविला स्फूर्ति जयीं भेटे । प्रेमपूर तो किति लोटे
स्वर्ग घरेला बनवी तो । स्वानंदामधिं रत होतो
स्फूर्ती गेली । प्रीति उडाली । शांति हरपली
शून्य तिमिरमय कविमन तें । बघतां मौज कशी होते

४०

# प्रेम आणि कविता

( दिंडी )

" प्रेमविरहित बोलती काव्य नोहे
दावितों मी तसेंच रचुनि पाहे "
कवि विनोदें बोलतां सहज ऐसें
सुहृद तेव्हां उपहास करुनि हांसे
क्षणें एका उपवनीं उभय गेलें
रुचिर शोभा तेथली बघुनि धालें
दिव्य कारंजें दृष्टि पडे तेथें
लुब्ध मानस तैं होय कवीचें तें
मौक्तिकांचें जणुं बिंदु जलतुषार
विविध रंगीं रम्यसे घडति हार
गगन चुंबिति कवटाळिती धरेला
स्फूर्ति झाली हें बघुनियां कवीला
पद्य रचुनी तंव सानसें सुरेख
तयावरि, तो सुहृदास म्हणे देख
" प्रेम दाखवि तें यांत कुठें आहे ?
गोड, सुंदर, रमणीय किती पाहे ! "
वचन ऐकुनि मम हास्य तयें केलें
करीं घेउनि तें सकल देखियेलें

पुन्हां हंसला एकदां मुग्धतेनें
" प्रेम म्हणजे ? " पुशियलें कविस त्यानें

" वस्तु बघुंनी जी काव्य-स्फूर्ति होते
तिच्याशीं कवि-तादात्म्य पाहिजे तें

जाहल्याविण काव्यौघ सहजतेनें
कधिं न बाहेरी निघे तन्मुखानें

" रसिक काव्याचे म्हणाति काव्य तेंच
सन्मनें ते मानिती रम्य तेंच

सुधेहुनिही वाटतें गोड तें कीं
त्याच कविला वर्णिती श्रेष्ठ लोकीं

" विषय कवितेचा भव्य सृष्टि साचा
कुणिंहि घ्यावा आस्वाद जगिं तयाचा

स्व-सामर्थ्यें तो खेळवो कसाही
सदा सुंदर दृष्टिनें तया पाही

" विविध देखावे तिच्यांतील सारे
अलंकार तयांतिल बहु प्रकारें

कुशलतेनें लेववीतां तया ते
किति मनोहर तरि दिसे लोचनांतें

" विविध रूपं सृष्टिचीं रूपकें तीं
रुचिर वेषा समयानुसार घेती

कोंदणीं हीं जडवितां दिव्य रत्नें
तोष ऐसा कीं कधिं न हो प्रयत्नें

" समस्तांचें ह्या दृश्य रूप जें, तें
दृष्टिं पडतां प्रीतिला प्राप्त होतें
उशिर नच मग तादात्म्य पावण्यातें
सहज काव्य-स्फूर्ति तैं कविस होते

" खरें मानस तादात्म्य पावण्यास
तिथें प्रेमाचा हवा शुद्ध वास
सुदैवानें असतांहि तद्विकास
क्षण न लागे ब्रह्मांड वळविण्यास

" बोल समर्थीं या काव्य करायाची
स्फूर्ति कैसी जाहली तुला साची
सहज चेतोहर यावया असें हें
कांहिं कारण पाहिजे; वृथा नोहे

" बघुनि कारंजें रम्य मनोहारी
दृष्टि घाली तव खेद जाय दूरी
कोणती ही एवढी शक्ति चाले
तुजवरी कीं तव चित्त तसें डोले

" प्रकट होई या कवनिं तीच खास
तीच कविच्या कळविते हृद्गतास
रसिक-मानस कर्षिते तीच कैसें
काय जादू ही तींत, नवल भासे

" तीच नंदनवन बनवि या जगाचें
तीच शत्रु प्रिय सुहृद करी साचे

रम्य जीवित तिजविणें शून्य सारें
अशी अद्भुत ती कवण सांग बा रे ?
"प्रीतिवीणें कोणती शक्ति अन्य
जिच्यानें हें ब्रह्मांड आजि धन्य
सर्व भूतीं वावरे दैवयोगें
दावि विठ्ठल कुणिं असा तद्वियोगें
" कठिण मनुजा अंबरीं विहरण्याला
बाध येई किति तरी निसर्गाला
परी विहरे आकाश-यान-मार्गें
हेतु सिद्धिस नेइ तो प्रेम-योगें
"चंद्र आणी भूवरी निरखिण्यास
ध्रुव-स्थल ने दूरस्थ दाविण्यास
कार्य अघटित जें घडे मनुज-हस्तें
खरें प्रेमच तें सकल करुनि घेतें
"जगीं दुर्लभ जें सुलभ अति करी तें
गम्य जें न तयें त्वरित गम्य होतें
सरी प्रेमाची ये न कुणालाही
खरें अविनाशी हेंच भवीं पाहीं
" सुख निधान प्रेम हें निर्विकारी
अखिल विश्वीं तें सारखें विहारी
तयावरती आनंद, सुख, सदाशा
सदुपयोगें जीविंच्या वा निराशा

" काय नाहीं, प्रेम हें सर्व कांहीं
तयाविरहित जगिं वस्तु कशी राही
काव्य हें तर सृष्टिचें पूज्य अंग
कसें प्रसवे त्यावीण सत्य सांग
" म्हणुनि इत्यर्थ प्रेम खरें; भावें-
खरी कविता तेथेंच उदय पावे
सकल त्याविण रम्यता तिची व्यर्थ
करिं विचारा लव, कांहिं यांत अर्थ ? "
असें बोलुनियां कविकडे तयानें
स्मित करोनी पाहिलें कौतुकानें
कवी नेत्रें प्रेमाश्रु ढाळिताहे
बघे तेव्हां त्या स्थितिंत तोहि वाहे
प्रेम-कविता-संबंध काय साचा
कळुनि सगळा भ्रम दूर हो कवीचा
" आज सुहृदा ! त्वत्कृपें धन्य झालों "
म्हणत ऐसें सानंद सदनिं आलों

४१

# कृष्णरजनी

( वीरा भ्रमरा० या चालीवर )

ये ये रजनी ! धांवत ये गे गेला हा दिनकर
नीघ चल सदनांतुनि लवकर

अतां कोठवरि लपुनि राहसी काल तुझा पातला
तिमिरही साह्या तव धांवला

द्वारिं उभी ही सन्ध्या देवी दे आलिंगन तिला
सृष्टिचा सौख्य-भोग सम्पला

कशी अतांवरि हांसत खेळत होती नाथासवें
ढाळिते तीच अतां आंसवें

स्वानन्दांताचि मग्न राहुनी मत्त होति वैभवें
तिजसिच शोक पहा उद्भवे

स्मरण तुझें तैं मुळिं न कसें तें काढियलें यामिनी
तीच तव करि सम्प्रति विनवणी

जगीं समजते स्वतां श्रेष्ट ती न धरी अणु भीतिला
लेखुनी तुच्छ बहुत गे तुला

आत्म-वैभवापुढतिं कुणाचें वैभव तिज नावडे
मत्सरें पेटुनि ती तडफडे

शान्त स्थलिं तूं सद्धेतूनें विचारांत बैसतां
रुचेना तिजला तें तत्त्वतां

नाथ—करें दे ताप किती, तुज पळवाया लाविते
सळो कीं पळो करुनि सोडिते
तृप्ति न हो जणुं तुला रडाविण्या तिथेंच ती क्रीडते
प्रियासह मोदभरें हांसते
प्रेम दया वा लवहि न आणी तुजविषयीं अन्तरीं
अन्त न निर्दय ती किति तरी
जेथें तेथें तुझी अवज्ञा उन्मादें ती करी
कळेना काय पडे तत्करीं
अरुण नाथ तो सुज्ञ विचारी पुरुष म्हणवितो जनीं
वश परी तोही तिजलागुनी
काय बिचारा करिल तिजपुढें पडली प्रियतम सती
तिजमुळें सु—शोभाचि त्याप्रती
रुष्ट होय ती कवण विचारीं सद्भावें जगिं तया
म्हणोनि न मानी तो मनिं नया
नृ—करें घडतीं खल कृत्यें जीं कारण ह्या बायका
परी ते करिती तत्कौतुका
म्हणुनी अपुला सूड तिजवरि घे घे निःसंशय
हाच तुज कथण्याचा आशय
घडि जी जाते परत न येते गेली गेलीच ती
विलंब न लावीं तर सम्प्रति
अपराधाची क्षमा मागतों, शरण आलिया कुणीं
करावी मुदें तयाला झणीं

भरीस परि नय—तत्त्वाच्या या पडूं नको तूं कदा
कृति तुला हीच पुढें दुःखदा
आतां जरि ही दीन दिसतसे कांहीं काळें पहा
घेइल तीच सूड तव महा
सदुपकार तव हृदयिं न आणिल जाइल ती विसरुनी
अशावरि दया नये करु कुणीं
प्रियकर तारा तुझ्या मैत्रिणी तत्पर तव शासनीं
घेइं गे सहाय त्यांचें झणीं
म्हणति, तारका हांसति तव हें कृष्ण रूप पाहुन
परी हें खरें गमे कांहिं न
सृष्टीची ही दीनावस्था पाहुनि वेडाविती
निरुपम स्वानन्दहि दाविती
तयांस खेद न मुळिं तिजविषयीं, समाधान पावती
प्रभूचा न्याय कांहिं बोलती
दिनीं सृष्टि जो ताप तयां दे असह्य होतो किती
न दावी दया परी लेश ती
सहाय करतिल तुला प्रमोदें सूड घ्यावया निन
न शंका आणिं, रहा निर्भय
न्दर सुमनें नानापरिचीं जाणति तव थोरता
तयांचें सहाय घे तत्त्वतां
थ—करें तद्—रुचिर वपूंची कोमलता सर्वही
लया ने अद्यपण सृष्टि ही

जन–मन प्रमुदित निमिषिं करि असा गन्ध तदात्म्यासम
सकल करि हरण रवी जणुं यम

मृदुल तनूंची तयां दुर्दशा असह्य होतां अशी
तद्उरिंच जाती जीवानिशीं

आगमनें शुभ तव तद्–हृदयें प्रसन्न होती किती
चारुता वदनावरि ये अति

मन्द शीत पवनासह तीं बघ हंसति डुलति खेळती
परार्थीं लुटति स्वगन्धाप्रति

सौगन्धानें दाहि दिशांला मोहुनि तीं टाकिती
मानसें रसिकांचीं ओढिती

त्वत्सुत म्हणविति प्रेमें म्हणुनी सहाय करतिल तुला
असंशय पुरवी मग हेतुला

शत्रु सृष्टिचे बहुतचि असती तुजशीं जे प्रेमल
वांच्छित सिद्धिस तव नेतिल

तुझेंच वैभव सृष्टीवरि ह्या इतस्ततां पसरिलें
तूंचि तूं सकल अतां जाहलें

काय मोहिनी विचित्र ही त्वां दावियली सृष्टिला
पहुडली तीच बळी बघ तिला

श्रांत होउनी तदीय वल्लभ झोंप सुखें घेतसे
तयाची भीति अतां मुळिं नसे

कृष्णवसन तव सम्मोहाचें अस्त्र जणूं देखितां
मोहिले सृष्टि–सुतहि तत्त्वतां

प्रियतम तत्सुत असा न एकहि समर्थ कीं तो भला
सांप्रत विरोध करण्या तुला
भाट—गर्जना शिथिल जहाली शक्ति न ऐशी कुणा
देइल क्षणिं या उत्तेजना
देहभान विसरलें, हरपलें सकल तयांचें अतां
कृति पहा निद्रेची ही स्वतां
भगिंगी व्यसनीं प्रेमें म्हणुनी धांवत निद्रासती
पातली तुझ्या सहायाप्रति
निष्कण्टक पथ करुनि दिला तव, चल आटप लवकरी
अतां नच व्यर्थ उशिर लव करीं
भ्याडपणाचें कृत्य करुनि तूं स्वतनुपरि न यश करीं
कांहिं तरि लज्जा धरिं अंन्तरीं
पूर्व दिशा फांकली रुपेरी शुभ्र लोळ हा अहा
कशाचा निघे तयांतुनि पहा
लोळ नव्हे हा नभःप्रांगणीं ज्योत्स्नेसह कौतुकें
विहरण्या इन्दुसखा ये सुखें
भिऊं नको आशी तुझा पतिच गे प्रेमें स्वागत करीं
धृतीला पूर्ण धरीं अन्तरीं
मधुर भाषणें निज प्रियाचें रिझवावें अन्तरा
सतीचा धर्म असे हा खरा
सरीं कुमुदिनी सु—मनें हंसती मोद दाविण्या स्वतां
वितरी तोहि तयां चित्सुधा

नभीं तारका लज्जित झाल्या स्नेहभरें देखितां
सविनयें करिं तत्स्वागता

तच्चरणाम्बुजिं तूंहि नम्र हो सहाय मागें तया
करिल गे तुजवरती तो दया

सृष्टि जशी निज नाथा-करवीं क्लेश देतसे तुला
स्वीकरीं तोचि तूंहि पथ भला

परि इतुक्यांतचि पदर सांवरुनि आड उभी कां बरें
कशाचें तनुसि भरें कापरें

तुम्हां स्त्रियांना काळाची ती कळे न महती कधीं
म्हणुनी अजाण म्हणती सुधी

भ्याड मूळचा तया कितीही धैर्य दिलें तरि वृथा
शेवटीं हेंचि खरें सर्वथा

गेलें गेलें विभव सकल तव, तूंहि गलित जाहली
गुलाबी प्रभात बघ जन्मली

कवि स्फूर्तिसह मोहित झाला काव्य-फुलें उधळिण्या
तूंहि जा गृहीं लपुनि राहण्या.

४२

# काल

( सबसे राम० या चालीवर )

खल काल कसा फिरला हा । कुणि तरि सन्मार्गी लावा

वर्षोंवर्षीं पर्वे येती महान हीं दुष्काळांची
दीन अनाथा त्रस्त करिति किति, धरिति वाट यमगृहिंची

पीडित होई प्रजा निरंतर महा भयंकर त्या रोगें
किती अकालीं काल-मुखीं ती पडते गणति न लागे

अनीति, कुमती, अधर्म ' मत्सर संचरिती सकला देहीं
स्वार्थाला वश होती सर्वहि ' परदुःख न जाणति कांहीं

सत्यप्रियता नुरली लवही असत्यतेच्या बाजारीं
इतस्ततां जगिं अहंमन्यता दृष्टिस येते सारी

विश्वासाला पात्र एकहि न निर्दय घातकि सारेही
हे प्रभुराया ! तुजवांचुनियां कोण निवारिल ह्या पाहीं

४३

# मृत व्याघ्रास

( भूपती खरे ते० या चालीवर )

कां असा अचेतन पडसी धरणीवर या
ती भीषणता तव गेलि कुठें या समया
अनुताप होय का पूर्ण निंद्य निज कृतिचा
अभिमान सर्वही सोडिसि का जातीचा
तुज त्यांत पाप का भारी । वाटलें
का न हा मार्ग सुखकारी । वाटलें
कीं पुण्य पडावें पदरीं । वाटलें
ही योगसमाधी काय साधिली म्हणुनी
चित्तास द्यावया शांती ईशस्मरणीं
तव भयद गर्जनें श्वान भ्याड जे लपती
भुंकिती निर्भयें तेच कसे तुजवरती
जे मनुज तुझें भय सशस्त्र असतां धरिती
नि:शस्त्र संप्रती तेच उभे तुजपुढतीं
मारिती खडे स्वकरांनीं । लेंकरें
वदति तीं अदय कुवचांनीं । तुज बरें
वेडाविति अपुल्या गानीं । पांखरें
खेळणेंचि जणुं कीं तयां होय तव एक
खेळतो मजेनें तुजशीं बघ प्रत्येक

परि खरी त वाटे ही तव सारी लीला
जड देहांतुनि तव आत्मा खास उडाला

तूं जिवंत मानी स्थब्ध राहुनी ऐसा
अपमान कधींही सहन न करितां सहसा

या क्षणीं क्षुधेची तृप्ति । पुरवितां
निःशंक निर्दया शक्ति । दावितां
हें पाप, पुण्य भय चित्तीं । न धरिता

जातिचा खरोखर स्वभाव जो प्राण्याचा
उपयोग प्रसंगीं नकळत होइ तयाचा

प्राण्यास घालितो विधि जन्माला जेव्हां
तत्करें घडो लव सत्कृति इच्छी तेव्हां

तो उदात्त हेतू किती पाळिला त्वां रे!
दुष्कर्मिं वेंचिले क्षण आयूंतिल सारे

अबल, दीन हरिलें प्राणा । किति तरि
रडवियलें कितिक जणांना । अजवरि
मिळविले शिव्याशापानां । बहु शिरीं

गाईल अशाची कवण कीर्ति वद जगतीं
अपशब्द सजीवीं, मृत होतांही येती

× × ×

शुभ कृती करावी जन्मुनि यास्तव कांहीं
कीं 'धन्य' म्हणवुनी घ्यावें मेल्यावरही

## ४४

# हा दोष कोणाकडे

( श्लोक )

विश्वाची रचना अगम्य रुचिरा केली जयानें अशी
त्याचें कौतुक गावयास बसतां मंदत्व ये बुद्धिसी
ऐसें ना स्थल कीं चमत्कृति दिसे कोठें न दृष्टीप्रति
येईना परि पाहतां अनुभवा या भूतलीं पूर्ण ती
शिंपा शंख विलोकितां वरिवरी दृष्टीस ये सागरीं
रत्नें सुंदर मूल्यवंत असती नाना तयाभीतरीं
कांती, वैभव, मोल, कीर्ति सगळी त्या नक्र मीनांतरीं
लाधेना मनुजा तदंश म्हणुनी दोषी न तीं हो परी
पुष्पें चित्र विचित्र चारु फुलती तारा जणूं कीं वनीं
त्यांचा सौरभही तिथें दरवळे स्वच्छंद आनंदुनी
कालें जाइ लयास तो पसरुनी वायूंत त्याच स्थलीं
ढुंकूनीहि तयांकडे न जगतीं कोणीं पहाती मुळीं
त्याला का तदुपाय, सर्व असती तीं शांत चित्तें वनीं
ये हा दोष कुणाकडेस पुरता, तो शोध लावा कुणीं

४५

# बा कोकिला

( श्लोक )

बा कोकिला ! सविनयें विनती तुला ही
  गाऊं नको स्वन तुझा बहु ताप देई

कंठा तिच्या परिसुनी तव कण्ठ लाजे
  प्रौढी तुला मिरविणें म्हणुनी न साजे

उद्यानिं याच दयिता जंव मंजु गात
  पर्णे, फुलें, तरु लता डुलती नितान्त

आनन्द त्या समयिंचा नच वर्णवे, तो–
  येतांचि आठव मनीं अति खेद होतो

होता तिचा नशिबिं जों सहवास नामी
  गेले प्रशान्त सगळे दिन सौख्यधामीं

मी एकलाच जगतीं बहु भाग्यवान
  वाटे कुणी नच दुजा मजला समान

स्वर्गीय सौख्य अमुचें न रुचे यमाला
  नेलें क्षणांत हरुनी म्हणुनी प्रियेला

लोटोनियां जगिं असें मज दुःख–पंकीं
  ये तत्करीं निधि असा नकळे खरें कीं

येशी कशास कवण्या स्थलिं या निमित्तें
  होता कुठें अजवरी लपुनी कुचित्तें

होती जिवन्त रमणी प्रिय या जगांत
काळें तुझें वदन तों दिसलें न येथ

वाटे तदां तुजसि कां मनिं लाज भारी
ऐशी म्हणोनि करिसी करणी विषारी

यामाजिं काय गणिसी भविं पुण्य फार
का होय नीति धरुनी तव हा विचार

आधींच पत्निविरहें बहु पीडिलों मी
कां देशि दुःख वरती अदया निकामी

हें थोर लक्षण नव्हे लव शोधिं चित्तीं
जाईं इथूनि झणिं दे मज अल्प शांति

विज्ञप्ति का करुण ही रुचते न माझी
आहे कशास कळुं दे तव चित्त राजी

येती विकल्प हृदयीं बहु या प्रकारें
ते वा खरेहि असती वदतोंचि सारे

" दे कण्ठ मंजुळ विधी जगतांत मातें
माझेंचि गीत गमतें प्रिय तें जनातें

सन्मान देति अवघे सु-मनें मलाच "
होता स्वतां तुज असा अभिमान साच

" नाहीं कुणी मजहुनी जरि आजि थोर
चाले न लेश मम या वनितेसमोर "

त्वां देखिलें जइं असें, दृढ मत्सराचा-
संचार हो तइं तुझ्या शरिरांत साचा

जाशी तसा द्रुत गतीं जवळी कृतान्ता
आधीं न बोध करितां अणुमात्र चित्ता
त्यातें स्वकीय कथिली करुणा कहाणी
होवोनि नम्र चरणीं जुळुनी स्वपाणी
" गाणार, सुन्दर कुणी जगिं एक मीच
या कल्पनेंत दिन जाति सुखांत सात्र
मातें परन्तु अजला दुजि एक रामा
सर्वांगुणीं करित लज्जित, तारिं धर्मा ! "
तोही नसे गमतसे लवही विचारी
विश्वास ठेवि वचनीं तव ह्या विकारी
वारोनि संकट करी तुज निर्भयी रे !
दुष्टें हरी मम परी सति–सौख्य सारें
हा दोष देत न तुला जगिं वा कुणाला
ये जें हृदीं कथुनि शान्तवि या मनाला
दैवामधें लिहियलें सुखदु:ख जैसें
कल्पान्ति ना चुकत रे ! घडतेंचि तैसें
जा जा सुखें परत जा न समोर राहीं
मानीं विनंति सखया ! इतुकीच बा ही
द्वेषी पुरा कुठुनि तूं मम ऐकशील
येथूनि मीच निघतों ! बस, गा खुशाल !

४६

# अस्तंगत तारा

( श्लोक )

वारा मंद सुगंधयुक्त विचरे आल्हाददायी मना
तारावृन्द नभीं चकाकत अहा ! कीं दिव्य देवांगना।
ऐशा सुंदर कालिं भामिनिसवें सौधावरी जाउनी
शोभा रम्य पहात शांत बसलों, तल्लीन झालों मनीं

तेजस्वी इतुक्यांत एक तुटुनी ये भूवरी तारका
फांके तैं क्षण तत्प्रकाश भुवनीं चंद्रप्रभेसारिखा
तेव्हां पाहुनि हें सकौतुक बघे नीलांबरा अंगना
येती स्वस्थितिचे विचार परि मच्चित्तीं, तयां अंत ना

राहीना मुळिं हाय ! ती त्रिभुवनीं उच्चस्थिती निश्चल
व्हावें मत्त न वैभवें कधिंहि, तें ताऱ्यापरी चंचल
ठेवावी नित नम्रता, सदयता, सद्भाव तो अंतरीं
सारें नश्वर विश्व हें अमरता कीर्तीस एका खरी

४७

# विरह-गीत

( तेथेंच उभी कीं आलें० या चालीवर )

मत्प्राण हरोनी नेला
काशि न ये दया खल काला। निष्ठुरा
अश्रुंनों ! स्वैर भटकाया
सोडिलें सुखें समयीं या। भूवरी
प्रिय प्राण शोधुनी आणा
प्रणती ही तुमच्या चरणां। करितसें
त्याविणें शून्य हा देह
क्षिति तमोमय न संदेह। सकल ही
विश्वास। तुम्हांवरि खास। स्मरुनि सत्यास
शपथ मज प्रभुची
करुणा ही इतुकी याची। सुहृद हो !

संतापहारि तुज वदती
बा चंद्रा ! सर्वहि जगतीं। ऐकिलें
तव करां सुधेची उपमा
जगिं अगम्य ऐसा महिमा। वर्णिती
बालकें सृष्टिचीं सारीं
त्वत्कृपें शांत हीं भारी। पाहतों

मजविशीं । अद्‌यता अशी । काय दाविशी
शोभतें न तुला
भेटवी त्वरें कांतेला । विनति ही

कथुं काय तुला मी प्रेमा !
जाणतों सकल तव महिमा । अंतरीं

रे ! अजिंक्य सकलां त्रिजनीं
जाणें न कुणी तव करणी । अद्भुता

तूं सखा अखिल विश्वाचा
म्हणुं कसा द्वेषि मम साचा । मूढसा

अजवरी । वास अंतरीं । तव खरोखरी
विमल जरि असला
झणिं करीं पूर्ण आशेला । माझिया

प्रिय सखये ! संकट समयीं
कामास कोणिहि न येई । हें खरें

उत्सुकता तव भेटीची
वाढली अधिक या मनिंची । परि वृथा

प्रार्थितों रुचिर तव स्मृतिला
जावो न त्यजुनि ती मजला । या पुढें

मृत्यु ना । चुके तो कुणा । तीच परि मना
भेट देईल
चिर तीच हृदयिं राहील । जिवलगे !

तूं तरी किती निष्ठुर गे
फसविलें मला अनुरागें । शेवटीं
मज अशा विरहिं लोटोनी
वांच्छिलें काय तें स्वमनीं । वद जरा
मजवरी प्रेम तव अचल
वदलिस जें हृदयें विमल । हेंच कां ?
स्वर्गांत । तुला सौख्यांत । ठेवु श्रीकांत
सुखाचा लेश
जननि या मज न तो खास । समजलें

४८

## प्रभु-कृति

( ईश्वर पंकज० या चालीवर )

मधु सौरभयुत चंपक अभिमत अलिस न होय परी
प्रभु-कृती रुचिर सारी । नवल भारी
हंसे रुसे शिशु जननिसवें
भुले डुले अहि गान-रवें
प्रतिदिनिं विधु घे रूप नवें

निसर्ग सुंदर गुलाब तरुवर कंटक अंगि धरी
प्रभु--कृती रुचिर सारी । नवल भारी
वीज घनांतुनि घे जनन
सलिलापासुनि कृष्ण घन
उदया ये सरिं कमलवन
मौक्तिक सागरिं शिंपेभीतरिं कैसें वास करी
प्रभु--कृती रुचिर सारी । नवल भारी
घनांबु पी खग चातक तो
हंस जलांतुनि पय घेतो
कोकिल पंचम गुणगुणतो
नभिं कादंबिनि केकि विलोकुनि हर्षे नृत्य करी
प्रभु--कृती रुचिर सारी । नवल भारी
रत्न फणीच्या शिरिं विलसे
सागर--जठरीं अनल दिसे
मृग-- नाभीं मधु गंध वसे
शुष्क होय जरि बकुल पुष्प तरि परिमल तें विखरी
प्रभु--कृती रुचिर सारी । नवल भारी
रवि बघतां कमलिनि हंसते
चंद्रागमनें ती रुसते
दुजि तितुक्यांतचि स्मित करिते
क्षितिचा अंबरिं नभिचा भूवरि फेरे मेघ करी
प्रभु--कृती रुचिर सारी । नवल भारी

कुठुनि भुवनिं ये जीवतति
जाइ कुठें मग परतुनि ती
मिळे कोणती स्थिति पुढतीं

मीन जळांतरिं झोंप खरोखरि घेई केंवि तरी
प्रभु–कृती रुचिर सारी । नवल भारी

गिरि–शिखरावरि हिम चमके
तृणांकुरांवरि दंव झळके
रंग रूप त्यां साम्य निकें

एक अमर जनिं दुज्या मरण क्षणिं अंतर उभयिं परी
प्रभु–कृती रुचिर सारी । नवल भारी

हांसे ताराकुल तिमिरीं
दिव्य फुलें जणुं नील सरीं
शांत सृष्टिला मुदित करी

उषेस बघतां सर्व रुचिरता विलया जाइ परी
प्रभु– कृती रुचिर सारी । नवल भारी

रवि शशि उगवति गगनिं, तरी
क्रीडति ते ह्या धरणिवरी
लघु वंशी जग मुदित करी

रवि सकलांतर तोषवितो परि भीती घूक धरी
प्रभु–कृती रुचिर सारी । नवल भारी

मुग्ध बहर ये तरुवरती
पुष्पें सुंदर मग फुलती
फळें तयांचीं मधु बनती
बाला, तरुणा, वृद्धा भुवना स्थिति ये नित्य खरी
प्रभु—कृती रुचिर सारी । नवल भारी

दीप लाजवी तिमिराला
चंद्र लाजवी दीपाला
दिनकर लाजवि ह्या सकलां
मत्कुणसंगें, हीरक भंगे, न चले तर्क तरी
प्रभु— कृती रुचिर सारी । नवल भारी

रंगभूमि धरणी—पट हा
अगणित पात्रें नटुनि अहा
क्षणभर हंसती रडति पहा
लयास जाती जगास दाविति नश्वरता सारी
प्रभु—कृती रुचिर सारी । नवल भारी

काल जातसे पुढें पुढें
सत्कृति दुष्कृति त्यांत दडे
प्रकटवि जगीं तो जें अवडे
जें भाक्षियलें जें देखियलें सकल तया जठरीं
प्रभु—कृती रुचिर सारी । नवल भारी

४९

# शुक्राच्या ताऱ्यास

( अंजनीगीत )

प्रशांत ताऱ्या ! लुक लुक लुक रे
दिपवुनि टाकीं अंबर सारें
रुचिरा ! शोभसि किति प्रकारें–वर्णु तुला काय

विधु ज्योत्स्नेसह झोंपी गेला
खालीं, वर हा तिमिर पसरला
समर्थ त्याला निवारण्याला–कोण तुझ्यावीण

अष्ट दिशा ह्या निष्प्रभ झाल्या
गालिं गुलाबी छटा निमाल्या
अधोवदन त्या करुनि बैसल्या–मुदित करीं त्यांस

इन्दु–प्रेमा लयास गेला
सकल नभः पट शोकिं बुडाला
निज तेजें त्या तोषविण्याला– निश्चल तूं राहीं

दुःखी कष्टी अति ही रजनी
नाथ सोडुनी गेला म्हणुनी
अनाथ तन्मानस शांतवुनी–सुतधर्मा जाग

सौभाग्याचा तिलक हरपला
धरणी सोडी निःश्वासाला
उल्लासित करीं तद्--हृदयाला--भूषण हें तुजसी

वाट सकौतुक तारा भगिनी
प्रिय बंधूची बघती नयनीं
प्रेमाची घालुनि ओंवाळणि--हर्षवि तच्चितां

दीन होय हा उदार सागर
वदनिं दिसे उत्साह न तिळभर
प्रसन्न सुहृदा ! करुनि तदंतर--डोलविं मोदभरें

लतिका-- स्कंधीं टाकिं करांला
विकसित सुमनें बघुं दे अनिला
विखरुनि जगभर तो गंधाला-- सुखवो सृष्टि--सुतां

भुलुनी सरिता तव रूपातें
हृदिं सांठविलें न कळे तुज तें
हंसुनि खेळुनी प्रेमें तीतें-- रिझवीं तूं सखया

नभः सरोजलिं हंस खगमणी
दिव्य हिरा वा नील कोंदणीं
असाचि राहीं चमकत गगनीं--दाविं न नश्वरता

तुझा समागम घडो निरंतर
असें न इच्छी कोण महीवर
ज्ञानी, सज्जन, उदार, सुंदर--अप्रिय परि काळा

प्रभात बघ तव शत्रु पातला
चंड शरें निज ताडी तुजला
कशास दिससी तन्नयनांला--जा ! जा जा सख्या

५०

# मार्गस्थ कवि

मार्गानें ह्या कवि चाले । अडवुं नका कुणि तो बोले
खुशाल जाऊं द्या ह्याला । का करण्याचें जगताला

तुम्हांस पथ तो । अशुभ वाटतो । भीषण दिसतो
विकल्प अवघे तुमचे हे । विशंक परि कवि जग पाहे

जातो बघतो नभ सारें । हंसती रुचिर कसे तारे
निर्मल हास्यें तीं सारीं । गुंफुनि अणितो हार करीं

एकेका तरि । शून्य मुखांवरि । फेंकुनि सत्वरि
प्रफुल्ल करितो मुखकमलें । रविकर बघतां जशिं कमलें

विपिनीं उपवनिं जावोनी । फुलांत फूलच होवोनी
तद् सौरभ अणितो हस्तीं । सुमनें सु-मनें वितरीती

त्याग घृणेनें । सकल जीं मनें । लयास तीं ने
शुद्ध प्रमोद त्या ठायीं । सुखें रमाया तो लावी

विहंगगामी होऊन । मधुर ऐकितो तद्गान
मानस डोले व्याधि नुरे । तेंच मनोहर आणि करें

कलम रवांनीं । श्रवणें भरुनी । दुःखित अवनी
सहर्ष त्या उधळितो झणीं । मधु रव राहिल दुमदुमुनी

मंदिर जें सत्प्रेमाचें । निधान कीं संतोषाचें
कैवल्य न ज्या तुल्य स्वतां । तुच्छ ज्यापुढें ती प्रभुता

सत्य आणितो । तिमिर नाशितो । तेज पसरितो
तयास नाहीं कुणि चोर । चिंता यद्यश व्हा दूर

५१

## स्वर्गीं कीं भूतलीं

( अजि शेवटचा० या चालीवर )

हा स्वर्गीं कीं भूतलिं सांगा कोणी
विनती ही जोडुनि पाणी
वनदेवी ही नंदनवन माझें तें
बघुनी मन तन्मय होतें
दिव्य अप्सरा पहा कोकिला साऱ्या
मंजु रवें रंजविणाऱ्या
ही मनोज्ञ कलिका मुग्ध
करि हृत्तापाला दग्ध
हृदिं प्रेम ओतितें स्निग्ध
रति लाजे मनिं पाहुनि मदनाची ती
कवि डोले मोदें चित्तीं

५२

## चांगला खेळगडी

( भूपती खरे ते० या चालीवर )

सन्मित्र बोलती तयास जो या जगतीं
सन्मार्ग दाउनी नेई विलया कुमति
अज्ञान-गाढ-तम दूर करितसे साचा
पाडुनी तयावरि प्रकाश सद्बोधाचा
मन उदास मधुर वचानें । तोषवी
जें तप्त हृदय क्रोधानें । शांतवी
सहवासिं प्रेम प्रेमानें । वाढवी
करि साह्य संकटीं मोदें देउनि धृतिला
निःस्वार्थि असा हा गडी नको कवणाला

५३

## शुभचिन्तन

सुहृद बालकांचा । बालका ! अससी तूं साचा
रुचिर रूप सान । बघुनि तव डोलविती मान
मधुर मधुर गान । परिसुनी होती तल्लीन
गुज श्रवण करुनी । हिताचें प्रमुदित होति मनीं

सखया ! हृदयाशीं । प्रीतिनें कुरवाळिति तुजशी
आन्दोलीं बसुनी । प्रमोदें गाती तुज गाणीं

वाट तुझी बघती । उत्सुकें नव चन्द्रापरि ती
आगमनें तुझिया । होतसे तोष किती हृदया

चिर तव सत्संग । इच्छिती हो न कधीं भंग
उदण्ड आयुष्य । संवगड्या ! देवो तुज ईश

## ५४

# ओढा

( अंजनीगीत )

थांब थांब रे ! रम्य निर्झरा
कोठें जाशी बोल मज जरा
कांठीं बैसुनि बोलली मिरा--बाला प्रेमानें

धांवसि ऐसा कां वेगानें
इच्छी, तूं मम जवळीं असणें
घेउनि जाशिल सुन्दर सुमनें--हीं माझीं म्हणुनी

ऐकत नाहीं का माझें तूं
यांत कोणता त्वदीय हेतु

ठेवुं नको रे ! हृदयीं किन्तु--सांग सांग मस्वया
लक्ष असूं दे परि मम वचनीं
तुजपुढतीं मी धांवत जाउनि
कोठें जाशी तें जाणोनी--घेइन निश्चित हें
तशीच बाला धांवत असुनी
कोठें निर्झर जाई पळुनी
माग न लागे परि तिज अजुनी--ऐसें ये श्रवणीं

५५

## कवीची ओळख

( हे प्रभो विभो० या चालीवर )

हा कुणी जनीं गुणज्ञ कवि, मज वदती
मम वचनीं प्रेमें डुलती
सन्मान सन्मनें करिती
आगमनें हर्षित होती
हा श्रेष्ठ कुणी निज भंवतीं
भावना धरुनि ही चित्तीं
" लाडका पुत्र देवाचा
तूं खरा अम्हांहुनि साचा "

अशि वदे नित्य तद्भाचा
आग्रहें ' गीत गा ' म्हणती

हें काय गौडबंगाल
कळतें न मर्म त्यांतील
परिसुनी तयांचे बोल
भ्रम होइ विचारें अंतीं

पूर्णेन्दु जेंवि या गगनीं
तुम्हि तसे विलसितां भुवनीं
काजवा तिथें मी कुठुनी
मिरवेन तेज किति पुढतीं

गुण काय तुम्हांला दिसले
माझिया ठिकाणीं असले
लुब्ध तुम्ही जेणें झाले
भ्रमर जेंवि कमलावरती

जगताचें लव न ज्ञान
योग्य परिस्थितिची वाण
अगदींच खुळा, मतिहीन
मग कुठली प्रतिभाशक्ति

मम वाणी संस्कृतिहीन
मधुर वा रम्यही ती न
मम लिखित तसें अति दीन
जणुं गंधहीन कुसुमतति

जें काय बोलतों लिहितों
मुळिं तदर्थ मजच न कळतो
तें सर्व हरिच जाणें तो
लक्षणें कशाचीं असती

वेंचुनी शब्द--सुमनांला
गुंफितों तयांची माला
कशि तरी, गमे जें मतिला
ठेवितों सज्जनांपुढतीं

आदरो तिला कुणि स्वमनीं
अप्रीति दर्शवो बघुनी
हृदिं धरो न वा प्रमानीं
मज हर्ष-विषाद न चित्तीं

जलचि कीं सर्वही असतें
वर खालीं एकच रमतें
वर--तें घन, खालीं जल तें
यासमान मत्कृति हो ती

५६

# लिहूं कविता कोणती

( गडे लीले० या चालीवर )

कुणावरती । वद कशी ती
लिहूं कविता कोणती

जिकडे जातों तिकडे सारे
अवमाना करिती । जगतीं

विफल वाटतें जीवित तेव्हां
प्रसन्नता चित्तीं । नुरते । लिहूं०

वसंत-शोभा लिहिण्या जावें
वनांतरीं प्रिय ती । मोदें

निर्दय निर्झर, बुलबुल निष्ठुर
हरिती मम शांति । नादें । लिहूं०

फूलपाखरा ! थांब लिहूं दे
कविता तुजवरती । मजला

कुठें ऐकतें परि माझें तें
मारि भरारी ती । गगनीं । लिहूं०

हंसती गाती नर्तन करिती
तारे व्योम-पथीं । प्रेमें

वर्णाया तें बसतां निष्ठुर
वदना लपवीती । तेव्हां । लिहूं०

वा इंदो ! क्षण थांब गुंफितों
कवनीं तव कांति । रुचिरा
मेघ—कपाटीं, पश्चिम भागीं
क्षणांत करि वसती । वदतां । लिहूं०
शांत सागरा ! असाच राही
वर्णाया शांति । तव ही
झंझावातें गिरिप्राय त्या
लाटा नभिं भिडती । निमिषीं । लिहूं०
गंधित वायो, सुगंध विखरीं
असाच मजभंवतीं । लिहिण्या
दुर्गंधीच्या गरल धूलिनें
दाहि दिशा भरती । निमिषीं । लिहूं०
प्रफुल्ल सुम हो ! हंसा डुला तुम्हि
जोंवरि मी पुढतीं । सु-मनें
मनोज्ञता मृदुलता लिहाया—
हाय ! शुष्क होती । निमिषीं । लिहूं०
चिता पेटतां स्मशानिं बघुनी
विरक्त होय मति । पुरती
करुण रवे परि क्षणें लोपते
विषण्णता चित्तीं । उगवे । लिहूं०
प्रमोदसमयीं खेद उद्भवे
दुःखीं हर्ष अति । होई

कालाचा हा भेद क्षणोक्षणिं
कविता कुठली ती । रुचिरा । लिहूं०

५७

## आधुनिक कवींची कुरकूर*

रसिकच नाहीं कुणि जगतीं । असें निरंतर कवि वदती
अशी अहंता हृदयाशीं । धरुनी करिती काव्यासी

काव्य स्वतांचें तयां तर । अमोल वाटे मनोहर
कौतुक करण्या कुणी नसे । विषाद म्हणुनी वाटतसे

कींव दाउनी रसिकांची । प्रौढी मिरविति काव्याची
अहंतेस जो बळी पडे । तदीय हस्तें काय घडे

सुंदर चिर जी काव्याची । भावी आशा जगताची
नष्ट होतसे समूळ ती । शुष्क फुलें जणुं करिं येती

ट ला ट वा धी ला धी । जमवुनि नोहे काव्य कधीं
असें निर्मितां काव्य जनीं । रसिकहि वदती कवि न कुणी

बोल लावितां कविस असा । दोष न ये रसिकां सहसा
सत्य जगतिं या खेळतसे । म्हणुनि विश्व हें चालतसे

---

* महाराष्ट्र कविपरंपरा । खंड न पडला तिला जरा । उणीव रसिकांचीच परी । आज भासते खरोखरी— या ' Bee ' च्या विधानास उत्तर

कविंना वाटे स्ववच खरें । तसेंचि रसिकां कां न बरें
आजकालच्या काव्यांची । दिसे फुलांपरि स्थिति साची

फुलें विकसती मौजेनें । सृष्टीचीं जणुं आभरणें
तद्विकसन तें रिझवि किती । मधुर गंध तो मोहि मती

मानस सारें त्या समयीं । ती स्थिति पाहुनि वश होई
कांहीं कालें सुमनें तीं । मलूल, शुष्कचि परि होती

सुगंध वातावरणांत । लोपे, मोहि न लव चित्त
प्राप्त होय क्षणिं कुरूपता । आनंदा ये विषण्णता

अशा स्थितिमधें घडिभरिनें । वारा येउन चोरुनि ने
कोठें नेउन तो टाकी । नकळे केव्हां हें लोकीं

कांहि क्षणानें खेदहि तो । हर्षामागुनि मावळतो
स्मृतिही गोष्टीची नुसती । ध्यानीं स्पष्ट न ये पुढतीं

पुनरपि कालें दुसरीं तीं । कुसुमें त्या स्थलिं उद्भवती
होय तयांची तीच स्थिति । नवल न कांहीं हें जगतीं

विचार करुनी जरा मनीं । पहा अंतरीं शोधोनी
उणीव सांप्रत रसिकांची । असें खरोखर म्हणण्याची

लज्जा वाटावी कविंना । व्यर्थ घडे निज विटंबना
वृथा अशा या वचनांनीं । होय हंसें अपुलेंच जनीं

व्यास, वाल्मिकी, भवभूति । रसिकांमुळेंचि दुमदुमती
नातरि कवण तयां पुसतें । कधींच काल-मुखीं दडतें

डोहामधिं इंद्रायणिचे । अभंग बुडले तुकयाचे
खरें काव्य तें म्हणुनीयां । प्रभुचि धांवला ताराया

घरोघरीं अजि 'तुका' 'तुका'। येइ न कर्णी हा ध्वनि का
रसिकांविण का हें सगळें--। सत्कविंनो ! घडतें, घडलें
कवि रसिकांचें हें युग्म। भक्त हरीसम मनोरम
यास्तव कविंनो ! काव्य करा। अमर करी जें काव्य--करा
सांप्रत ऐशा काव्याची। गरज जगा या बहु साची
रात्रंदिन जग तळमळतें। सत्वरि लागा सत्कृतितें
मग त्या अलिसम मधु पानीं। रसिकचि येतिल धांवोनी
रवि--प्रभेसम कवि--कविता। भूषण होइल कीं जगता
शाश्वति ऐशा काव्याची। समजा होइल जगताची
चिर काव्याला जग नमितें। महत्त्व रसिकें जगता तें

५८

# मुरली

( येउं दे दया०या चालीवर ).

बाजवी मुरली। मधु नादें जी भरली
कुंजवनिं मुरलीधर अपुली
सुंदर ध्वनि। कोमल मंजुळ स्वनीं
हळुं हळूं निघे तिच्यामधुनीं
सप्तसूरांत। गीत येइ रंगांत
उमटलें तेंच प्रतिध्वनित

गान दुमदुमलें । नभोमंडळीं भरलें
कोंदलें, वि-रंगलें सगळें

अहा ? अवतरले । असंख्य मुरलीवाळे
वाटलें, जगभर त्यावेळे

नादसुधा घुमली, । ब्रह्मांडघटीं भरली
दिव्य ती भरोनियां उरली

तयाची लीला । दावियली जगताला
सन्मनें परिसा ती विमला

नवल हें भारी । प्रीती हें सकल करी
तया ये बाध न अवनिवरी

तरुलतांचीं तीं । पर्णे पवनें डुलती
प्रेमोदें त्यासंगें रमती

त्या समयाला । करुनी रसभंगाला
वेणु—रव कर्णपथीं पडला

स्तंभित झालीं । एकाएकीं सगळी
डोलणें स्वच्छन्दें भुलली

मूढचि होती । लव राहि न देहस्मृति
मोहिनी पडे तयांवरती

तींहि त्या समया । मुरलीसह यदुराया
लागलीं ' कृष्ण कृष्ण ' गाया

नवल हें भारी । प्रीती हें सकल करी
तया ये बाध न अवनिवरी

वना जवळूनी । उन्माद रवा करुनी
हंसत मुखें नटुनि थटुनि तरुणी
चलिसि भेटाया । कालिंदी नव जाया
अंतरीं उत्सुक बहु जाया
ध्यान रमणाचें,— । सद्गुण स्मरुनि तयाचे
लेखुनी तुच्छ जगत साचें
शांत गंभीर, ! स्थिति काय सभोंवार
नुमजे, ती वैभवि र. फार
श्रवणीं पडतां । मंजुळ रव ओझरता
टकमका पाहे ती सरिता
ध्यान विसरिलें । भान लयाला गेलें
कृष्णपदिं प्रेमें तें जडलें
स्थिर ती झाली । कृष्ण-चिंतनीं रमली
पतीची आसक्ती नुरली
नवल हें भारी । प्रीती हें सकल करी
तया ये बाध न अवनिवरी
विहंग तरुवरि ते । गीत गात जे होते
विसरती स्मरे न पुढतीं तें
तयांचें गान । वेणुरूप होऊन
तदर्थहि मधुर ' कृष्ण कृष्ण '
फुलांवरि भृंग । मधु पानीं बहु दंग
समयिं त्या डुले अंतरंग

क्र. क्रि.

तन्मन रंगे । गुंजुरव अनुरागें
करूं आरती वेणुसंगें।

व्याघ्र धेनू हीं । खेळति एके ठायीं
निमाला वैरभाव उभयीं

वत्स स्तनपान । करूं लागती सान
मुखीं पय, तसेंचि तें वदन

हरित तृणातें । मृग लावुनि स्वमुखांतें
राहती, तसेंचि स्थिर परि ते

रेखिलीं चित्रें । चित्रकारें पवित्रें
जणूं कीं मृण्मय तद्गात्रें

अहा ! त्या कालीं । विगत भान तीं दिसलीं
सकलही गान लुब्ध झालीं

नवल हें भारी । प्रीती हें सकल करी
तया ये बाध न अवनिवरी

सुगंधित वात । मंद मंद निभ्रांत
तोहि त्या विचरे नादांत

चराचर शांत । त्या नाद प्रवाहांत
जाहलें सहज क्षणधांत

लोपला द्वेष । सर्व त्यांत, अवेशष
राहिलें प्रेम एक खास

तरल स्थिर झालें । स्थिर चंचल हो सगळें
सजिव जड, जड सजीव बनलें

नवल हें भारी । प्रीती हें सकल करी
तया ये बांध न अवनिवरी

व्रजीं व्रज-रमणी । अमृतमय रव श्रवणीं
परिसुनी तरल होति स्वमनीं

सुचेना कांहीं । संभ्रम जडला देहीं
स्मृति न मुळिं स्वस्थितिची राही

रमण हा, सुत हा । लय समूळ होइ पहा
भावना मनिंची ही तेव्हां

प्रिय सखी, दीर, । सासु, श्वशुर, घरदार
मग तिथें कैंचे हे इतर

जेथलें तेथें । पडे स्मरण कवणातें
नादमय दिसे सकल जग तें

वृत्ति विसरल्या । प्रेम- जलीं त्या विरल्या
रंगल्या, स्वानंदा रतल्या

मुखें हरि-गीत । नाचत, डोलत, गात
मिळवुनी मंजु वेणु-ध्वनित

सोत्कंठेनें । ध्वनिच्या अनुरोधानें
चालल्या जिकडे तत्पद ने

कुंजवनाला । येतां जंव व्रजबाला
मानसीं प्रेम-पूर आला

दिसेना कृष्ण । सर्वत्र ' कृष्ण कृष्ण '
नाद परि ऐकति तत्कर्ण

चहुंकडे बघती । बघतां विगलित होती
दुणावे उत्कंठा परि ती

जाणुनी अंतीं । निर्मल भक्ति प्रीति
प्रकटली परब्रह्म मूर्ति

हास्य तें खुललें । रमणी– ओठांवरलें
देखतां सहर्ष मन डुललें

सकल तैं युवती । कृष्णस्वरूप होती
कोणता 'कृष्ण' पडे भ्रांति

नवल हें भारी । प्रीती हें सकल करी
तया ये बाध न अवनिवरी

विमानीं बसुनी । सुरेंद्र, सुर, सुर–रमणी
विलोकुनि ती हरिची करणी

समजती सगळीं । सार्थकता अजि झाली
पारणीं दृष्टींचीं फिटलीं

फुलें उधळीती । वरुनि अमित त्यावरती
कृष्णमय तींहि तदा होती

पंचत्रययुक्त– । त्या ब्रह्मानंदांत
जाहलें विलीन हें जगत

वर्णायाला । त्या ब्रह्मानंदाला
कोण तो समर्थ जनिं झाला

१ पंचमहाभूतें आणि त्रिगुण यांनीं युक्त असें जगत.

महज्जन अंतीं । ‘ नेति नेति ’ ते वदती
कवि हा पामर तेथ किती

धन्य ती मुरली । जी श्रीहरिकरिं रमली
स्वनादें सृष्टिहि रमवीली

गावया तिजला । ‘ आनंद ’ कवी नटला
नमितसे श्रीहरिपदकमलां

नवल हें भारी । प्रीती हें सकल करी
तया ये बाध न अवनिवरी

५९

## शांति

[ एका मित्रकन्येस उद्देशून ]

ऐकुनी सुधेहुनि गोड नाम तव ‘ शान्ति ’
अवतरली वाटे मूर्तिमती ती शान्ति

डोलणें खेळणें सदा सर्वदा शान्त
बोलणें हांसणें सर्व कांहीं निभ्रान्त

भवरी नभींची आली । तारका
कीं शापें उर्वशी झाली । बालिका
कीं विधुची नव फुललेली । चान्द्रिका

वडिलांस नवल नच मिळे स्वर्ग सहवासीं
निज दर्शनमात्रें करिशी वश इतरांशीं

६०

# कविता हरवली

( सज करुनि चाप० या चालीवर )

गेलि कुठें प्रिय कविता हाय ! हरपली
दावा कुणि देइन त्या पृथ्वि ही भली

रविस प्रभा सोडुनि ती । विधुला वा तत्कांति
राहिल कशि दूर जगतिं । कविताही तशि कविप्रति
याच संशयांत मती गुंग जाहली

अवमानुनि सागरास । गंगा त्या निर्झरास
प्रेमौघा दाविण्यास । ठाउक ऐकुनि कुणास
लाजुं नका बोलण्यास, काय भेटली

कमलिनिच्या चरणतलीं । प्लव वसती करि अपुली
म्हणुनि तेथ कां जडली । तत्प्रीती कुणिं पाहिलि
हृदयींचा प्रियकर जो त्यागुनी अलि

सर्व खरें हें असलें । परि सखिनें मज त्यजिलें
रडतां हे असुं थिजले । चरण शोधितां थकले
नकळे तिज काय मिळे यांत भूतलीं

निर्झर-तटिं लहरींशीं । हितगुज वा मैनेशीं
करण्यास्तव गेलि अशी । शंका ये मन्मानसिं
म्हणुनि जाय बघण्यासी तेथ कोठली

उद्यानीं रिझण्याला । सुमनांसह हंसण्याला
भ्रमरांसह गायाला । मकरंदा लुटण्याला
गेलि वदे कुणि मजला परि न लाभली

नित्य नवी जगताची । मौज बघाया साची
मिळो, आस ही मनिंची । जन्म सफल करण्याची
मैत्रि म्हणों वायूची दिसलि ना खुळी

एकांता सेवाया । शांतीला मिळवाया
गेलि जगा त्रासुनियां । गिरिगव्हरिं म्हणुनिया
अवलोकीं परि न तिथें दृश्य जाहली

उडुमंडळिं शोधियलें । प्रति ताऱ्याप्रति पुशिलें
' ना म्हणुनी ते वदले तेहि खिन्न मनिं दिसले
पाहुं कुठें मति न चले युक्ति कुंठली

अमरपुरीं देखियलें । नंदनवनिं शोधियलें
गंगाजलिं निरखियलें । ब्रह्मांडीं धुंडियलें
अंश तरी नेत्रयुगुलिं नाढळे मुळीं

गेलिच ना अंतिं त्यजुनि । दुःखार्णविं मज लोटुनि
एकाकी जनिं सोडुनि । जीवाची प्रियकरणी
जपलों किति तिजलागुनि हृदयिं ठेविली

आप्तेष्टा या जगतीं । अवगणिलें तिजपुढतीं
वश व्हाया प्रेमें ती । रात्रंदिन झटलों अति
नुमजे कां मजवरि ती रुष्ट जाहली

प्रिय कविते ! कोठेंही । असलिस तरि सुखि राहीं
तुजवरची मम कधिंही । प्रीति लोपणार नाहिं
जडलीं मम चित्तवृत्ति तुझ्या मंगलीं

अंतरलों मोदाला । वश झालों शोकाला
हंस उडुनि तो गेला । जड पंजर हा उरला
सखि-विरहें हृदयाची होत काहली

× × ×

दुःखित कवि ऐसा मनिं । हृदयांतुनि येई ध्वनि
' श्रमसि फुकट काय म्हणुनि । शोधाया मज भुवनीं
होउं नको रे हताश, शांत हृत्स्थलीं

शोधीं रे निज मानसिं । पाहिं तिथें तूं मजसी
बाहेरी मात्र बघसि । दिसेन परठायिं कशी
कविता कधिं कविपासुनि दूर राहिली '

हें मधु वच कवितेचें । श्रवुनि मुदें कवि नाचे
प्रिय संगमिं हृत्-सखिचें । चित्त रमे मग कविचें
तन्मोदा अंत नसे, वृत्ति शांतली

६१

# वियोग

( उद्धवा शांतवन० या चालीवर )

प्रिय वस्तु-वियोगा बघुनी । कां आणिसि नयनीं पाणी
उल्हास न अंतःकरणीं । दुःखाची छाया वदनीं
अस्पष्टाहि नुमटे वाणी । स्थिति झाली केविलवाणी

जाऊं दे गेली तर ती
कां निराश होसी चित्तीं
तुज नसे उचित ही रीति

हंस गड्या पुन्हां हर्षोनी । कां शिणसी वायां रडुनी
त्वप्रेम तिजवरी भारी । हें ठावें मजला पाहीं

ती तुझ्या जिवाचा प्राण । उभयांत भेद मुळिं नाहीं
तिजवीण शून्य तव देह । संदेह यांत नच कांहीं

तूं तिच्या सुखद सहवासीं
रात्रंदिन बघ रमलासी
प्रिय एक तीच जगीं तुजसी

वाटला स्वर्गही थोडा । तुजला त्या हर्ष-निधानीं
हें विश्व चराचर सारें । यावरी दृष्टि लव फेंकीं

ती काय काढिते सार । तूं सु-मनें तेंचि विलोकीं
हा सहस्त्ररश्मी भानु । परि राहु स्वमुखिं त्या टाकी

प्राण्याचें जीवित कधिंही
समतोल न जगतीं राही
सृष्टि बद्ध या नियमें ही

आनंद-सागरीं आज । तो उद्यां दिसे गुरु व्यसनीं
रडलास कितिहि जरि आतां । तूं अपुल्या प्रेमासाठीं

सोडुनी पूर अश्रूंचे । भिजविलि ही धरणी मोठी
आक्रोशें पाझर फुटला । दगडास ऐकुनी चित्तीं

उपयोग काय तरि ह्यांचा
शेवटीं भंग आशेचा
नियत हा नियम कालाचा

यापुढतीं कधिं न दिसेल । प्रिय वस्तु जाण ती नयनीं
गेलें जें गेलें सखया । तें ये न पुन्हा भेटाया

मग रंक असो वा राव । नीचहि वा उच्च दिसाया
शोधुनी पहा हृदयांत । मज नको साक्ष ही द्याया

तव जे जे पूर्वज गेले
परतुनी काय ते आले
श्रवणीं वा कधिं ऐकियलें

ही परंपरा ऐशीच । चालली अबाधित भुवनीं
तरि सोड सोड रे शोका । कां फुकाचि कार्यें शिणसी

हें दृश्य सकलही जगत । जाणार खचित विलयासी
ही केवळ माया प्रभुची । हें तत्त्व धरीं हृदयाशीं

हा सेवक काल तयाचा
यावरी भार विश्वाचा
ईशेच्छें चालवि साचा

प्राण्यांस हांसवी रडवी । विश्वास धरुं नये कोणीं
जंव प्रीती-संगम तिजशीं । जाहला तुझा या लेकीं
हांसला खेळला, तुज ती । सप्रेमदृष्टिं अवलोकी
तद्वियोग होइल ऐशी । स्वप्नीं न कल्पना तुज कीं

परि कोठुनि वस्तू आली
तिज कुणीं कशी निर्मियली
ही विचारणा कधिं केली ?

हा विचार जरि तूं करिता । येतें हें दुःख कुठोनी ?
मृत्तिकेपासुनी कैसा । घट सुबक मनोहर होई
परि हस्त-स्पर्शें फुटतां । तो मिळुनि तिच्यांतचि जाई
परि कारण दोहोंलाही । मृत्तिकाच असते पाहीं

हें तेंवि विश्व संपूर्ण
शून्यांतुनि घेई जनन
लय पावे त्यांतचि फिरुन

हा विवेक नित्य करोनी । जा खुळ्या ! लोळ सुख-सदनीं

## ६२

# माझी कविता

( सुरम्य सौधावरि उभ्या० या चालीवर )

मलाच माझी रुचे खरी कविता । मनोहर

गर्दभ–रव तो प्रिय न जनांतरिं
खंत तया नच तदीय लवभरि
स्व-कंठ वाटे गोड किती तरि

स्व-गीत आलापि तो मुदें चित्ता । रमविण्या

स्वरूप सुंदर किति मोराचें
कुरूप तितुके चरण तयाचे
तयास प्रिय ते परि बहु साचे

तयेंचि नर्तन करी मुदें चित्ता । रिझविण्या

कज्जलासही लाजविणारा
काक-वर्ण तो जगिं दिसणारा
करिति कटु वचें जन धिक्कारा

स्व-रूप मिरवी जगांत तो चित्ता । सुखविण्या

गंधहीन सुम कोराटीचें
म्हणुनी रसिकां मुळिही न रुचे
आवडतें किति परि तें तरुचें

धरोनि वक्षीं प्रमोदवी चित्ता । सुखें त्या

गंधहीन वा वर्णविहीन
कुरूप भेसुर अथवा दीन
कुणी आदरो अशि मत्कृति न
असो कशी ती प्रमोद दे चित्ता । माझिया

६३

## प्रेमाचें गाणें

गा गा प्रेमाचें गाणें
प्रेमावांचुनि सर्व सुनें
अक्षयिंचा कीं आनंद । आनंदाचा सुखकंद
धरणी प्रेमी । वायु प्रेमी । गगन प्रेमी
मीलन म्हणुनी तें होत । ह्या सकलांचें प्रेमांत
रुचिर तारका गगनांत । प्रेमाचीं गाणीं गात
ऐकायाला । त्या गानाला । निशा प्रेमला
तिष्ठत बसते प्रेमानें । विसरी भाना विलोकनें
उठती लहरी गाण्याच्या । निर्झरावरी प्रेमाच्या
विहंग नाना । तयास वीणा । समजुनि ताना
मंजुळ मंजुळ त्या घेती । प्रीती सारी दर्शविती
निर्मल हृदयाची तार । गाणीं गाते मनोहर
'विश्वीं सगळें । प्रेमचि भरलें । द्वैत न कसलें'
या अर्थाचें तें गान । सहज कर्षितें हें भुवन

## ६४

# बाल-शांति

( प्रणयतरंगासवें० या चालीवर )

बाल-हृदय-मंदिरीं । वसंत शांति ती खरी
यापरी । अणुभरी । नाढळे जगांतरीं

शुद्ध मोद भोंवतीं । तेंवि दुःख जरि अति
विचल होय लव न ती । सकल सारिखें तरी

घेउ चुंबना कुणी । सुष्ट खलहि तो जनीं
सन्मनें विलोकुनी । दावि हास्य-माधुरी

अंधकार सर्वही । वा प्रकाशमय मही
नसोत वा दोन्हिही । तिळ न दुःख त्या परी

रवि न उदय पावला । चंद्र पूर्ण राहिला
उदधि शुष्क जाहला । हर्ष-शोक ना वरी

जगत हें बुडो जलीं । जल उरो न भूतलीं
उभय जरी नष्टलीं । नच विषाद तिळभरी

हंसोत तारका किती । रडोत बापुड्या अति
अढळ राहि तन्मति । मृदुल शांत वैखरी

वसति निबिड काननीं । रम्य हर्म्यि, उपवनीं
भेद मुळिं न तन्मनीं । विश्व सुखद अंतरीं

हर्ष मूर्ति बालक । क्रीडतो अहेतुक
करि स्वयेंचि कौतुक । जणुं खपुष्प महिवरी

देवें ही निर्मिली । मूर्त शांत बाहुली
ती जयास लाभली । तोचि धन्य भूवरी

६५

## आंधळें जगत्

दीपज्योती उजळून । होई प्रकाशमय भुवन
स्वाद क्षण दे मोदाचा । विहार करवी सृष्टीचा

तया भुलूनी । होति हृष्ट मनिं । मूढ बनूनी
ज्योतिखालच्या अंधारा । कुणी न बघती मुळीं जरा

पूर्णेंदूला विलोकुनी । प्रमोदती जन हे स्वमनीं
' अमृतनिधी हा अवतरला ' । वदति कौतुकें ह्या बोला

फूल हांसरें । हर्षनिर्भरें । कीं, नभिं विहरे
सुधारसाला स्वेच्छ पिती । कलंक परि नच कुणि बघती

गुलाबकलिका वनीं फुले । मोहकतेनें चित्त डुले
सृष्टिदेविचें हें मूल । जगता पाडी बहु भूल

गंध सेविती । हृदयीं धरिती । गाणीं गाती
कंटक जे त्याच्या जवळीं । कुणी न बघती तयां मुळीं

वृंदावनफल तरुवरती। नयनमनोहर दिसे किती
दृष्टिस पडतां अवचित तें। चित्तवृत्ति तन्मय होते

तया खरोखरि। लोलुप अंतरिं। भक्षाया, परि
तदंतरींच्या गरलाला। कुणी न बघती त्या काला

किरण देखतां अंधारीं। हर्षित मन हो किती तरी
विसरिति अपुली क्षण स्थिति। गणिती प्रभुची सदुपकृति

प्रभुलीलेचें। कौतुक साचें। करिती वाचें
गाढ तिमिर जो त्या भंवतीं। अलक्ष करुनि न कुणि बघती

चिर मानुनि ह्या संसारा। श्रमे सुखास्तव जन सारा
धन, सुत, वनिता मम सत्य। मनोभावना ही नित्य

एक मित्र तरि। दुजा होय अरि। अशि कृति सारी
'अखिल विनाशी चराचरीं'। नेणति कुणि हें अल्प तरी

वृथा अशा या भ्रमपटलीं। भुलति,फसति, जनमति जडली
'माझें' 'माझें' करूनियां। अंतीं जाती ते विलया

चिरंतनातें। चिन्मोदातें। विसरति त्यातें
काय म्हणावें ऐशाला। जगत आंधळें गमे मला

६६

# रजनी-चंद्राचा मंगल विवाह

( घुष्पें वेंचूनी० या चालीवर )

प्रेमें पाहूनी । हिमकर नयनीं
सजली रजनी । नटुनि थटूनी
शुभ्र रुपेरी । वस्त्रधारिणी । शोभे गौरी । जणुं ही तरुणी
चर्चि विभूती । धवल तनू ती । चंद्र धूर्जटी । विलसे सुगुणी
दोहाः—वायूचा हा सुबक मनोहर शोभे अंतरपाट
प्रेमग्रंथि दृढ करि उभयांची चकोर गाउनि पाठ
सुस्वर गायन । सुंदर नर्तन । करिति विलोकुन । सुररमणी
मोद पसरला । भूवरि खुलला । नभीं रंगला । बहुपरिनीं
—प्रेमें पाहूनी०

विवाहकालीं । शिरिं जी आली । अक्षतावली । चोंहीकडुनीं
भूवरि पडल्या । सुमनें बनल्या । तारा झाल्या । वरती गगनीं
दोहाः—अष्ट दिशा ह्या करवल्या पहा विनोद करिती फार
वऱ्हाड मंडळ विश्व, लीन हें आनंदांत अपार
त्या मोदाला । मोहुनि गेला । कवि हा बनला । भाट जनीं
मंगल गायनिं । वधुवर गुंफुनि । रसिका अर्पुनि । धन्य गणी
—प्रेमें पाहूनी०

६७

## अनुकरण

( मज गमत गगन० या चालीवर )

हे चंद्र सूर्य नियमित बघ दर्शनास देती
जन हितार्थ सतत मुदें स्वतनु कष्टवीती
झीज झीज तूं असाच सतत जन हितास
ऐकुनी डुलोत लोक सकळ त्वदिय कीर्ति

६८

## सरोवरावरील सायंकाळ

( चंद्रकांत राजाची० या चालीवर )

अहा ! सरोवर किती मनोहर दिसे लोचनांते
दिव्य शांति ही शांत जलावरि शांतपणें रमते
कुणी धाडिलें ह्या शांतीला असें खेळण्याला
अतांवरी ही कोठें होती ठाउक कवणाला
दिनकर गेला हा अस्ताला नामशेष झाला
दुःखाची त्या स्मृती काय ही देई जगताला

छे ! भलती ही नको कल्पना अभद्र जाणावी
मंगल कालीं मंगलकारक चित्तिं असों द्यावी
श्रमुनी दिनभर धूलिकणांनीं तनू मलिन झाली
स्नान कराया प्हा उतरला या निर्मल सलिलीं
कितिक सोशिले कष्ट तयानें या जगतासाठीं
उल्हासें, ते सर्व तयाचे निर्हेतुक असती
कृतज्ञता कर्तव्य म्हणुनि निज अल्प दावि जगतीं
विश्रांतीच्या वेळीं त्या ही नजर करी शांति

सरोवराच्या कांठीं बाला केंवि उभी राहे
कोण कुणाची ? आश्चर्यानें सृष्टि तिला पाहे
कोठुनि आली कुणीं आणिली कुणीं धाडिली ही
चपलेसम जणुं दिव्य मूर्ति ही प्रकटे या ठायीं
प्रेमाचीं हीं गाणीं गाते मंजुळशी कोण
प्रणय-रक्तिमा गालीं विलसे, वदन हास्यपूर्ण
रिझवायाचा हेतू दिसतो उत्कट तरि कवणा
नामाचा जयघोष चालला परि तो उमजेना
स्वैर पवन परि मोहुनि गेला परिसुनि तीं गाणीं
चोरुनि अणिला सुगंध सारा अर्पि तिच्या चरणीं
मंद मंदसा डुलतो कैसा विसरे अपुल्यास
ती न बोलतां होय तिचा हा आज्ञांकित दास
सात्त्विकतेला वश तो झाला स्वैर वृत्ति गेली
सरोजला ह्या त्रास न देतां प्रेमें कुरवाळी

(१) संध्या.

विजयपताका कीर्तीची ही फडके सोनेरी
ब्रह्मगोल हा रंजित झाला डुले मुदें भारी
स्वर्ग म्हणे मम, धरा म्हणे मम, कलहचि उभयांत
खरी कुणाची कांहिं कळेना,—छे ! अर्थ न यांत
सरोजलावरि पांघरला हा शेला भरजरिचा
होय विलोकुनि मोदमग्न तें कितीक मोलाचा
तया प्रीतिची कुणीं देणगी प्रेमें दिधली ही
प्रेम-ल्हरि तद्‌-हृदयीं येती, परि न सत्य हेंही
पीत वसन हें प्रिय नाथाचें घेउनि निज हस्तीं
तया नेसण्या तीरीं उभि ही संध्यादेवि सती
पति-प्रेमाला जागरूक जी सदैव जगतीं या
कायावाचामनें करोनी, तीच खरी आर्या
ध्यास पतीचा तिला असे हो ! स्वानंदीं मग्न
चला रसिक या इकडे, करितां कशास तो मग्न

अर्धस्फुट हें मंगल गायन ऐका विहगांचें
वृक्षावरि निश्चित बसुनि या मंगल कालाचें
अतांवरी जीं गाणीं म्हटलीं कष्ट कराया तीं
सहाय होवो म्हणुनि तयांनीं, अचिंत परि नव्हतीं
हा प्रेमाचा आनंदाचा शांतीचा काल
पातल्यावरी तेथ कोठलें हृदय असें लोल
प्रेमळ गानीं आनंदानें वृक्ष कसे डुलती
गाढालिंगन वेलि देति त्यां, वेडावुनि जाती

२) सायंकाळची सोनेरी प्रभा.

अजब जादु ही !–क्रोधपरिप्लुत पुष्पें हीं होती
छटा स्मिताची कशी नाढळे, मुखीं आढ्यता ती
शांतिपाठ हा दिव्य स्वरांनीं चालत असतांना
हंसलीं डुललीं भुललिं मुदें तीं ताल देति गाना
दिव्य गायनें वेडी झाली सृष्टि पहा कैशी
तप्त मानसा शांतवि प्रेमें खेळे हृदयाशीं

कुणीं सोडिले गुच्छ मनोहर हे पाण्यावरती
दिव्य गायना, दिव्य शांतता सारे अनुभविती
कुणि उचलेना कौतुक करण्या त्यां न गमे खंती
सुंदरतेचा असा अनादर !–छे ! चुकली दृष्टि
कुणावरी तरि ढाळितसे कुणि दिव्य चामरें हीं
काय नवल हें भाग्यवंत तो झांकुनियां जाई
भाग्य आपुलें पहा प्रकटला शांतीचा पुतळा
कसा डोलतो वैभवगिरिवर लाजवि मदनाला
मूर्तिमंत वत्सलता त्याची मुद्रांकित होते
अलंकार हा अमोल शोभे थोर माणसातें
तृषित लोचनें प्रिय रमणी पति सोत्कंठें पाही
तसाच तोही फेड तिची करि, अधर–सुधा घेई
कुणा कुणाचा विरह न साहे क्षणहि एकमेकां
दिव्य प्रेमाची जोडी ही साक्षच भूलोका

(३) कांठावरील वृक्षांच्या छाया. (४) चंद्र. (५) रोहिणीचा तारा

दार उघडुनी चोरुनि बघते हळूंच ही कोण
पुन्हां लाविते पुन्हां बघतसे शंकित मनिं पूर्ण
भीतिग्रस्त ही दिसे, नाकळे परि भय कोणाचें
अंग थरथरां कांपे, स्पष्ट न शब्द फुटे वाचें
चंचलनयना निज नयनांला चोंहिकडे फिरवी
कुठें दिसेना भयद वस्तु तिज धीर अल्प येई
कोण चोरटा छळी असा इज कींव न मुळिं त्याला
स्त्रीजातीवर हात टाकि तो शूर तरी कसला
चमत्कार हा काय घडे हें नवलच इतुक्यांत—
उदास तेजोहीन होय तें प्रसन्न तच्चित्त
भीति उडाली छटा पसरली गालिं गुलाबी ती
मधुर हास्य तें वदनीं शोभे, मुखीं प्रणय–दीप्ति
सलज्जतेनें प्रेम-कटाक्षा फेंकि कुणावर ती
बळें ओढुनी प्रकट कोणती करि मनिंची वृत्ति

स्फटिकाची ही दीर्प–पंक्ति या स्फटिक जलावरती
विराजते कशि, झुले बैसुनी आंदोलीं जणुं ती
नीलांबरिं कीं सोज्ज्वल रत्नें ठायिं ठायिं जडलीं
दिव्य मण्यांची माला तुटुनी इतस्ततां पडली
सलिल-पटावरि मनोज्ञ चित्रें काढि चित्रकार

---

( ६ ) निशेस उद्देशून. ( ७ ) सूर्याला उद्देशून. ( ८ ) तारका.

काय विकसलीं कल्पलतेचीं दिव्य फुलें स्वैर
सुंदर दर्पण बघुनी भुवनीं स्वर्गींच्या रमणी
कीं अवतरुनी वदनें बघती हर्षित होवोनी
स्वर्गंगेच्या तेरीं बसुनि कीं स्वर्ग उतरला हा
मौज बघाया जगताची या प्रशांत कालिं अहा
होय किती हें दिव्य मनोरम मीलन स्वर्भूचें
धन्य ! धन्य ! हा काल निमालें राज्य द्वैताचें
चित्र कोरलें कवि–हृदयीं जें त्या मंगलतेचें
तेंच उमटवी वाग्देवी या शब्द–मुकुरिं कविचें

× × ×

तुझ्याच द्वारीं स्फूर्ति कविस ही वायुसुता म्हणुनीं
गानरूप हें सुमन वाहि कवि प्रेमें तव चरणीं

---

( १ ) नौकेंत.

६९

# दर्पण

( फुलें वेलीचीं० या चालीवर )

दर्पणा असशी । तूं कोण कळेना मजसी

कुणीं घडविलें तुजला जगतीं
कुशल गमतसे बहुत तन्मति
म्हणुनि संभवे अशी चमत्कृति

तुझ्या ठायीं रे । कीं नवल जगाचें सारें

भाग्यवन्त किति दैवाचा तूं
कुणा तुजविशीं नसतो किन्तु
प्रेमाचा मनिं एकच हेतु

सान थोरास । सारिखाच तूं प्रिय खास

भव्य रम्य थोराचें मंदिर
क्षुद्र झोंपडी अथवा लघुतर
सर्व स्थळिं तव वास खरोखर

तुला सगळेंही । समसमान वाटे पाहीं

तेजोमय त्या रवि-किरणाचा
प्रशान्त शीतल इन्दु-कराचा
प्रवेश होणें शक्य न साचा

जिथें केव्हांही । निःशंक तिथें तव होई

रमणीशीं तूं हितगुज करिसी
बालकलीला तेंवि शिशूशीं
गभीरत्व दाविशि मनुजाशीं

जेंवि तव मित्र । वागशी तसा सर्वत्र

हास्य प्रेमा क्रोध निराशा
बद्ध नससि या विकारपाशा
जीवित्वाची तीहि न आशा

खरा अविकारी । दिससि तूंचि जगिं सुखकारी

सत्स्वरुपाची मूर्तिच केवळ
न शिवे तुजला विकल्प कज्जल
सदैव अन्तर उज्ज्वल, निर्मल

योगि या लोकीं । वाटसी खचित मजला कीं

शत्रु तुझा वा मित्र असो कुणि
तयास कथिसी सत्यच भाषणिं
हंसो रुसो तो कांहिं न तव मनिं

क्षणिकशा भुलुन । मोहास पडसि कधिं बळि न

कितीहि दूषण येवो तुजवरि
खेद तयाचा तुजसि न तिळभरि
सत्यव्रत निज प्राणान्तावरि

पाळिसी अचल । प्रभु—कृपें जन्म तव सफल

× × ×

हृदय–दर्पणीं बघतां जैसें
दृश्य जगत हें तसेंच भासे
सत्यासत्य न भेद कळतसे
भावना मनिंची । तशि मिळे फलश्रुति कृतिची

७०

## कलिका

ही कलिका । सौंदर्याची जणुं लतिका
स्वर्गींची । काय देवता ही साची

उडुबाला । कीं शापें ये जन्माला
अवतरली । चन्द्रकला कीं धरातलीं

सृष्टि भुले । पाहुनि हर्षें चित्तिं डुले
वायु पहा । रिझवायाला तत्पर हा

मधुनादें । रंजविलीं किति खग–वृन्दें
भानुकर । बागडण्याला सहोदर

पण अजुनी । झळकत नाहीं स्मित वदनीं
कवणाशीं । कांहिं न बोलत ही कैशी

काय हिला । होतें तें नकळे मजला
लक्ष नसे । कुठें तरी तें भ्रमत असे

हें काय । करी कुणास्तव चित्त लय
जगतातें । तुच्छ हृदयिं कां ही गणिते

पापमय । जग हें म्हणुनी धरी भय
बघणेंही । गोड हिला वाटत नाहीं

नश्वर ही । तनु म्हणुनी दुःखी होई
प्रेमाचा । झरा आटला हृदयींचा

सौख्य खरें । जगतिं न, सारें दुःख भरे
अपणांला । दुःख शिवो नच आस हिला

निजान्तरीं । जगतास्तव कां दुःख करी
जगिं सगळे । शत्रु गमति कां इज अपुले

मूकव्रता । धरिलें म्हणुनी जग बघतां

× × ×

वदन फुले । नवल कोणतें इज गमलें

गान-सुरा । परिसे कवणाच्या मधुरा
ही हंसली । कवि-हृदयीं डुलली, रमली

## ७१

# संक्रान्तीचा तिळगूळ

घ्या हा तिळगूळ । खचित हा प्रीतीचें मूळ
अनन्त उठतात । प्रीतिचे तरंग हृदयांत

करा पुढें हात । होउं द्या मीलन प्रेमांत
हृदय-सम्पुटांत । ठेवुनी रमा प्रमोदांत

केवळ नच हलवा । असे हा प्रेमाचा मेवा
गोड गोड बोला । ऐकुं द्या प्रेमाच्या बोला

कधिं कटु वचनांनीं । अवज्ञा नकळत मजकडुनी
होय; क्षमादान । मागतों पदरा पसरून

उदारधी सगळे । तुम्ही बहु ऐसें मज कळलें
सोडुनि निज हेका । प्रेम तें देउं एकमेकां

नसे एकट्याचें । प्रीतिधन साऱ्या जगताचें
लपवुनि ' ना ' म्हणतां । काय तुम्हि कृपणा लाजवितां

मोल तुम्हां काय । पाहिजे अर्पि मुदें काय
करा करा लव ही । उपकृति मजवरती कांहीं

अखण्ड सौख्यांत । तुम्हां तो ठेवो श्रीकान्त
कवि हा प्रेमाचा । भुकेला किंकर जगताचा

## ७२

# मित्राची भेट

होय अनुदिनिं उदयास्त भास्कराचा
कुणा वाटे का हर्ष–शोक त्याचा
द्वितीयेच्या बघतांचि हिमकराला
किती होई आनंद अंतराला

ऋतू सगळे अनुभविति नेंहमींचे
लक्ष असतें का त्यांवरी कुणाचें
परी होतां आगमन वसंताचें
मुदें प्रकृतीचें हृदय किती नाचे

प्रती मासीं पौर्णिमा येइ नेमें
काय बघती तिजकडे कुणीं प्रेमें
परी बघतां तिजलाचि शरत्कालीं
मनें कवणाचीं मुदित नाहिं झालीं

नद्या, निर्झर कासार भूवरी या
सदा तत्पर जे तृषा शांतवाया
परी चातक चुकुनी न तयां स्पर्शी
मेघबिंदुच पी बहुतदिनीं हर्षें

दिनावधिनें सन्मित्र भेटल्यास
होइ तेव्हां किति मोद मानसास
भरतभेटच ती जणूं, तिज यथार्थ
जगतिं वर्णाया, कोण तो समर्थ

७३

# खेळगड्यांस हितोपदेश

( बागेसरी-झंपा )

प्रभातीं उठोनी । प्रभूला स्मरावें
गुरूतें नमावें । सदा भक्तिभावें

सदा सत्य, केव्हां-। न मिथ्या वदावें
स्वधर्में चलावें । सुमार्गा धरावें

जनीं सज्जनांशीं । धरा नम्रतेसी
सुखानें रहावें । तयांच्या निवासीं

खऱ्या संगतीची । धरा हांव साची
नको दुर्जनाची । निराळें असावें

न मातापित्यांची । अवज्ञा करावी
सदा गोड बोलोनिं । त्यां सौख्य द्यावें

वनीं राम गेला । प्रतिज्ञा कशाला
करी भीष्म, याला । विचारांत घ्यावें

कथी ज्ञान कोणी, । तया आदरोनी
धरा नित्य ध्यानीं । मती शुद्धि पावे

जगीं कृत्य व्हावें । भलें ज्या म्हणावें
समस्तां रुचावें । असें आचरावें

नका त्रास देऊं । नका शाप घेऊं
नका स्वार्थ पाहूं । परार्थीं झटावें

सदा बोल वाचें । जणूं अमृताचे
वदोनी जनांचे । मना तोषवावें

नको गर्व चित्तीं । न निन्दा स्तुती ती
दुखे चित्तवृत्ती । असें ना वदावें

जरी बोल सोने । तरी अर्थ घेणें
जगीं व्हा शहाणे । मला हेंच व्हावें

७४

## कवितेस

( विधिनें नच मदनें० या चालीवर )

कविते ! राज्य कुठें तव बाले
कोणतें भुवन अलंकृत केलें

---

( १ ) लहान.

र्तन करिसी । गे मयुराशीं
गुज लतिकेशीं । प्रेमभरें

ेहंगमाशीं । मंजुळ गाशी
विनोद करिसी । कलिकेशीं

ालिल–तरंगें । त्वन्मन रंगे
रमसि अभंगे ! । त्यासंगें

शलिता गौरा । नव सुकुमारी
दिससि तूं खरी । गिरि–कुहरीं

वनीं विहरसी । स्वैर खेळसी
हृद्गत कथिसी । सरितेसी

डुलसि फुलासीं । हंससी उडुसीं
अलिसह पीशी । मधु कोशीं

हिमाचलावरि । अफाट सागरिं
विशाल अंबरिं । तूं वससी

उषःकालिंचे । मनोज्ञतेचे
हार दंवाचे । तव रुचिचे

संध्यासमयीं । सुवर्ण वलयीं
जगताठायीं । विराजशी

पवन–विमानीं । त्रिखंड फिरुनी
शोभा बघुंनी । तुष्ट मनीं

मैत्रिण चपला । तिजशीं विमला
करिसी लीला । परोपरी

सान मुलाशीं । स्वेच्छ खेळसी
त्यांतचि गणसी । मोद खरा

प्रिय मित्राची । तूं आवडिची
नव चंद्राची । रुचिर सखी

प्रकाशिं उज्ज्वल । सलिलीं निर्मल
तिमिरीं कज्जल । रूप तुझें

कल कल कलरव । किल किल अभिनव
मधु गुंजारव । नित करिसी

वीणा छेडित । बससि सदोदित
हृदया रिझवित । आनंदें

नीरस भुवना । देउनि पाना
नवरसपूर्णा । त्वां केलें

तूं अविकारी । पूर्ण विकारी
तव न महिवरी । अंत कुणा

कुठेंहि तुजसी । बघो तयासी
क्षणिंच भेटसी । प्रेमवशी

सकल विश्वभर । वाम निरंतर
तुझा मनोहर । मज भासे

किति मोहकता । किती चारुता
कोण जनयिता । तव मधुरे

ब्रह्मांडाची । जननी साची
त्याच पदाची । तुज उपमा

सर्व खरें परि । महति तुला तरि
कवि—हृदयांतरिं । दुजि न कुठें

७५

# नूतन वर्ष

## —जगास संदेश—

( वीरशिरोमणि० या चालीवर )

कळी उमलली नवी मनोहर काल— तरूवर पहा
परिमलें विश्व मोहिलें अहा

जिकडे तिकडे गुढ्या तोरणें विजय—पताका कशा
फडकती नभिं, दाविति तद्यशा

स्नानें मंगल करुनी गाती मंगल गीतें नव
करिति जन हर्षें तद्गौरव

दिग्वधू सखीला करिते पंचारती
हा वसंत तिजवरि फुलें उधळितो किती
हे विहंग नाना तदीय गुण वर्णिती
आनंदानें सारीं भुवनें नाचुं लागलीं जिथें
कुठचा दु:खलेश मग तिथें

गत कालाची क्षणांत विस्मृति कशी जगा या पडे
येइ हें कोडें माझ्यापुढें
विश्वरंगणीं खेळ खेळलें नानापरि तोषुनी
जयाच्या वैभवीं रत होउनी
प्रीति तयावरि शुद्ध असोनी तोचि असे तारक
म्हणुनि तें करि बहु तत्कौतुक
अन्याय कोणता घडे जगा ! तत्करें
विसरसी तया क्षणिं अदयपणें कां बरें
हेंचि कां तयावरि शुद्ध प्रेम तव खरें
कृतघ्नता अशि दावुं नको तूं स्मर सदैव त्याप्रति
धरि न लव वृद्ध म्हणुनि तो क्षिति

आज तुला आनंद होय जो कोण तया कारण
पाहिलें काय तुवां शोधुन
होउं नको उन्मत्त असा रे ! हृदय ठेविं निर्मल
जणूं कीं शुचि गंगा प्रेमल

तुझ्यासारिखे कितिक पाहिले जग तेणें अजवरी
क्रमे तो अखंड निज पथ परी
तूं पापी तुजला कळेल हें कोठुनी
तुज छळी अहंता कुटिला रात्रंदिनीं
मग योग्य दुष्टता वसते तुझिया मनीं
जगद्–वंद्य संतास कधीं का बरवें म्हटलें खलें
नवल ना त्वन्मन त्या विसरलें

पापपुण्य तूं कांहिं न जाणशि, परवा नच त्याविशीं
परी रे तळमळ कविमानसीं
तुजसाठीं किति काळिज तुटतें, अश्रु सदा लोचनीं
विचारीं मग्न हृदय निशिदिनीं
सर्व भार टाकिला प्रभुवरी, तोचि तुला देइल
सुबुद्धि, सुपथासहि लाविल
जो विश्व चराचर खेळवि चेंडूपरी
शुभ घडी दाविली आज जयानें खरी
तुज तोचि थोर पदिं बसविल, आशा धरी
भगवंताच्या मनोज्ञ लीला कळति न त्याच्याविणें
तयाचे गुण गावे भक्तिनें

किति मोहकता । किती चारुता
केण जनयिता । तव मधुरे
ब्रह्मांडाची । जननी साची
त्याच पदाची । तुज उपमा
सर्व खरें परि । महति तुला तरि
कवि–हृदयांतरिं । दुजि न कुठें

७५

## नूतन वर्ष

### —जगास संदेश—

( वीरशिरोमणि० या चालीवर )

कळी उमलली नवी मनोहर काल– तरूवर पहा
परिमळें विश्व मोहिलें अहा
जिकडे तिकडे गुढ्या तोरणें विजय–पताका कशा
फडकती नभिं, दाविति तद्यशा
स्नानें मंगल करुनी गाती मंगल गीतें नव
करिति जन हर्षे तद्गौरव

दिग्वधू सखीला करिते पंचारती
हा वसंत तिजवरि फुलें उधळितो किती
हे विहंग नाना तदीय गुण वर्णिती
आनंदानें सारीं भुवनें नाचुं लागलीं जिथें
कुठचा दुःखलेश मग तिथें

गत कालाची क्षणांत विस्मृति कशी जगा या पडे
येइ हें कोडें माझ्यापुढें
विश्वरंगणीं खेळ खेळलें नानापरि तोषुनी
जयाच्या वैभविं रत होउनी
प्रीति तयावरि शुद्ध असोनी तोचि असे तारक
म्हणुनि तें करि बहु तत्कौतुक
अन्याय कोणता घडे जगा ! तत्करें
विसरसी तया क्षणिं अदयपणें कां बरें
हेंचि कां तयावरि शुद्ध प्रेम तव खरें
कृतघ्नता अशि दावुं नको तूं स्मर सदैव त्याप्रति
धरि न लव वृद्ध म्हणुनि तो क्षिति

आज तुला आनंद होय जो कोण तया कारण
पाहिलें काय तुवां शोधुन
होउं नको उन्मत्त असा रे ! हृदय ठेविं निर्मल
जणूं कीं शुचि गंगा प्रेमल

तुझ्यासारिखे कितिक पाहिले जग तेणें अजवरी
क्रमे तो अखंड निज पथ परी
तूं पापी तुजला कळेल हें कोठुनी
तुज छळी अहंता कुटिला रात्रंदिनीं
मग योग्य दुष्टता वसते तुझिया मनीं
जगद्–वंद्य संतास कधीं का बरवें म्हटलें खलें
नवल ना त्वन्मन त्या विसरलें

पापपुण्य तूं कांहिं न जाणशि, परवा नच त्याविशीं
परी रे तळमळ कविमानसीं
तुजसाठीं किति काळिज तुटतें, अश्रु सदा लोचनीं
विचारीं मग्न हृदय निशिदिनीं
सर्व भार टाकिला प्रभुवरी, तोचि तुला देइल
सुबुद्धि, सुपथासहि लाविल
जो विश्व चराचर खेळवि चेंडूपरी
शुभ घडी दाविली आज जयानें खरी
तुज तोचि थोर पदिं बसविल, आशा धरी
भगवंताच्या मनोज्ञ लीला कळति न त्याच्याविणें
तयाचे गुण गावे भक्तिनें

७६

## सिंहगड पाहिल्यावर

( श्लोक )

पाहीं सिंहगडा कुतूहलपणें चौफेर, धालों अति
कैलासीं नित या गमे विहरतो सानन्द गौरी– पति
स्वार्थी लोपति कल्पना, विसरलों या क्षुद्र देहाप्रति
अश्रूपूरित लोचनांपुढतिं ये तैं दिव्य पूर्वस्मृति

७७

## चंद्रसेना

[ प्रसंगः–ज्यावेळीं, श्रीरामचंद्र अहीमही रावणाचा वध केल्यानंतर चंद्रसेनेच्या महालांत गेले, आणि ते तिच्या मंचकावर जाऊन बसतां क्षणींच तो मोडला तेव्हां पूर्वीं ठरलेल्या बोलीप्रमाणें. मध्येंच विघ्न उपस्थित झाल्यामुळें श्रीरामचंद्र परत जाऊं लागले; त्यावेळीं उद्भवलेल्या आकस्मिक संकटामुळें भांबावून जाऊन सर्वस्वीं दीन झालेल्या चंद्रसेनेनें श्रीरामाची जी प्रार्थना केली ती खालील पद्यांत गोंविली आहे. ]

( ये धांवत कृष्णाबाई० या चालीवर )

श्रीरामा ! मंगलधामा ! । गुणविश्रामा
त्यजुं नको दीन ही रामा

---

१ गौरीपति=शिव; पक्षीं=शिवराय ( शिवाजी )

कां ऐसा निष्ठुर होसी । या अबलेशीं
ही कृति न शोभते तुजसी

तव नाम सुधेचा सिंधु । त्यांत विषबिंदु
कालवीं न हे नतबंधू

मी अनाथ केवळ अबला । मोल का मजला
परि रक्षीं स्व—ब्रीदाला

जें तुला जिवाहुनि थोर । रमेहुनि प्यार
विसरलास कां तें पार

तूं अखिल जगाचा स्वामी । यःकश्चित मी
परि झालें तव अनुगामी

तूं एकवचनि म्हणवीसी । विमुख त्या होसी
विपरीत रीत आचरिसी

गाईल कोण तव महिमा । तुझ्या शुभ नामा
अपकीर्ति झालिया रामा !

मग जगा काय आधार । सकल अन्धार
माजेल जाण साचार

करिं सत्य सख्या ! निज बोल ! करिं न ते फोल
हा पहा साक्षि भूगोल

स्व–ब्रीद न दवडीं वाया । विनंति तव पाया
किति अंत बघसि रघुराया

तूं दीनदयाघन म्हणुनी । कीर्ति ये श्रवणीं
मम वृत्ति जडे तव चरणीं

मी सर्वस्वें अति । दीन पदीं तव लीन
नच तारक कुणिं तुजवीण

आशेच्या शिखरावरती । चढे ही वृत्ति
नैराश्य-कूप कां अंतीं

तुजवीण जगत हें शून्य । जिविं न चैतन्य
नच आस तुजविणें अन्य

आलिया शरण कुणि तुजसी । पदरिं निज घेसी
मजविशी अदय कां होसी

जाउं मी शरण कोणाला । सांग बा मजला
तुजहुनी दुज्या थोराला

हृत्ताप करी बेजार । मला अनिवार
कीं, करिल झणीं संहार

तुजसाठीं प्रिय पति अपुला । स्वर्गी धाडियला
का कारण होतें मजला

नच भीतां जनलज्जेला । कुलक्षय केला
काळिमा येइ वदनाला

केवळ तव लाभासाठीं । निंद्यतम गोष्टी
ह्या आचरिल्या जगजेठी

तुजपुढतीं सर्वस्वास । त्यजिलें खास
फसवीं न अतां दीनेस
प्राणाचा माझ्या प्राण । तूंचि मज जाण
तूझिया गळ्याची आण
तव पायचि मज आधार । अंतिचें सार
रघुराज ! तार कीं मार

( श्लोक )

ऐशापरी विनवितां रघुसत्तमाला
तो शांतवी मृदु वचें रमणी– मनाला
" मी एकपत्नि सति ! सांप्रत सत्य जाण
कृष्णावतारिं तव होइल भाव पूर्ण "

७८

# असें कां

( श्लोक )

कोणा आवडतो मयूर–रव तो कोणी पिका वानितो
कोणी इन्दु सुरम्य शांत म्हणतो; कोणी तया निंदितो
कोणा हर्म्ये रुचे; श्मशान कवणा; कोणा रुचे झोंपडें
वाटे उग्र सुधा कुणास; अशि ही भिन्ना रुची कां पडे

अंबारींत कुणी; हयावरि कुणी; पायीं कुणी संचरी
पंगू अंध कुणी; कुणी बधिरही; कोणा नसे वैखरी
लक्ष्मीचा सुत होतसे अबुध तो; दीन स्थिती पंडिता
दुःखी नित्य कुणी; तसा कुणि सुखी; कां ही अशी भिन्नता

कोणी नेणुनि पापपुण्य जगतीं कृत्यें करी निर्दय
कोणी नित्य परोपकार म्हणुनी खर्ची तनू निर्भय
कोणी सेवक मूढसा रमणिचा; माता कुणी पूजितो
वृत्तीची अशि कां दिसे विषमता नोहे मुळीं तर्क तो

विश्वास एक असतां प्रभु निर्मिणार
कां भिन्नता मग अशी दिसते अपार
कोण्या मिषें घडत ही रचना अगम्य
मी मंद धी, मजासि हें नच होय गम्य

७९

# कर्तव्य—जागृति

[ प्रसंगः—राजा दशरथाचा वचनभंग होऊं नये म्हणून पितृ-आज्ञा-परायण श्रीरामचंद्रांनीं माता कैकेयीच्या आज्ञेनुसार चौदा वर्षे वनवास मोठ्या आनंदानें पत्करला. वनवासास जातांना सर्वांचा निरोप घेतां घेतां श्रीराम प्रिय माता कौसल्येचा निरोप घेण्यासाठीं आले. मातृ-हृदयच तें! आपल्या प्रिय पुत्र रामाला सगळे सुखोपभोग सोडून देऊन वनवासी व्हावें लागणार या परम दुःखद विचारानें माता कौसल्या अतिशय शोकाकुल झाली. त्यावेळीं त्या प्रभूनें जी आपल्या मातेची समजूत केली ती खालील पद्यांत गोंविली आहे. ]

( श्लोक )

आहे तुला विदित हें नव वर्तमान
आशिर्वचा मजसि दे नच खेद मान
देई प्रसन्न हृदयें जननी अनुज्ञा
माझी करीं सकल गे ! सुफला प्रतिज्ञा

( उद्धवा शांतवन० या चालीवर )

ठेउनी प्रेमकर शीर्षीं । मज निरोप देई माते
तूं पूर्ण विवेकी असशी । नच योग्य शोक हा तूतें
तव उदरिं जन्म मज येई । हें भाग्य नसे मम कोतें

परि जन्म सार्थकीं कांहीं
लावूं दे मजला आई
नच पुन्हां परत ये घडि ही
तव कूस होउं दे धन्य । नातरी विफल अवघें तें

मी तुझ्या जिवाचा जीव । प्राणाचा पंचप्राण
मी तुझ्या सुखाचें भवन । मोदाचें तुझिया स्थान
मी कैवल्याचें धाम । तुज गमतो ' प्रेम-निधान '
हा प्रभाव नच मम साचा
तो तुझ्या मातृ-हृदयाचा
हा निसर्ग धर्म जगाचा
या प्रेम-बंधनें सारें । हें विश्वचि निगडित जाण

अजवरी तुम्हां जी होती । लालसा पुत्र-सौख्याची
परमावधि ज्यास्तव केली । जप दान धर्म नवसाची
जे कष्ट सोशिले अंगें । नच गणती होय तयांची
तें काय सुखें लाडाया
तें काय मुखें चुंबाया
तें का त्या नयनिं बघाया
कीं, थोर कृती या जगतीं । तत्करें घडावी साची

निज जरठपणीं अपणाला । सुत ठेवो शांति सुखांत
मृदु वचें रंजवो चित्ता । आज्ञेंत असावा नित्य
वांछितास पुरवो सगळ्या । हो काठी वार्धक्यांत

ही स्पृहा जन्मदात्यांला
कां नसतें ? दे वचनाला
हें उलट काय सत्याला

सुत-धर्म पाळुं दे माझा । निज चित्त ठेविं तूं शांत

पति-दैवत जगतीं मान्य । प्रिय सुताहुनी साध्वीतें
सुखदु:ख पतीचें जें जें । जाणसी तियेनें तें तें
रात्रंदिन सद्भावानें । पाळिसि तूं सति-धर्मातें

या अशा वचन-भंगानें
रौरवीं बुडावें पतिनें
कां इच्छावें तव मतिनें

वश न हो क्षणिक या मोहा । हो जागृत कर्तव्यातें

( श्लोक )

श्रीरामराय वदतां जननीस ऐसें
तन्मोह आवरण दूर सरे अपैसें
कर्तव्य-जागृति खरी पटतां सतीला
कष्टें निरोप दिधला प्रिय आत्मजाला

८०

# ऐक्याचा प्रभाव

या सारे जन ! या मिळुनी । राहुं नका हो कुणि लपुनी
भीति कुणाची तुम्हि धरितां । भयद न सांप्रत काल स्वतां
लज्जा कैंची । तुम्हां कुणाची । का जगताची
निःसंशय या इथें चला । स्थळ न मनीं द्या द्वेषाला

द्वेष संचरे ज्या चित्तीं । शंका भीति तया छळिती
प्रेमळता जें हृदय धरी । विश्व सकल तें मित्र करी
जैशी दृष्टि । तशीच सृष्टि । गमे निश्चितीं
बाध न ये ह्या तत्त्वाला । निखिलांचा जरि लय झाला

महा मत्सरी ह्या रमणी । ऐसें वदती सकल जनीं
नवनीताची सवत तया । खपत नसे, करि विगत-नया
परी तत्त्वतां । अनंत सरिता । रूपी वनिता
प्रेमालिंगन उदधीला । देतां, दाविति समतेला

कळी विकसितां उद्यानीं । दुजि न फुले कां तिज बघुनी
रीति अन्यथा याहूनी । अनुभविली कां या भुवनीं
शुद्ध मनानें । विकसुनि, भुवनें । निज गंधानें
भारुनि टाकिति सर्व जणी । ऐक्य-जया दाविति कृतिंनी

पुष्पापरि तुम्हि सर्व बना । सरितांचा गुण मनिं आणा
अंतःकरणा शुद्ध करा । पावित्र्यानें विश्व भरा

अभिमानाला । दुष्ट बुद्धिला । त्यजा आजला
मग पाहूं या का कमती । तुम्हांस आहे या जगतीं
आळस सोडा व्हा जागे । झोंप तुम्हां ही काशि लागे
जगत चाललें पुढें किती । किमपि तरी हें घ्या चित्तीं
जागृत होउनि । डोळे उघडुनि । बघा मेदिनीं
उन्नतिच्या ह्या उषेमुळें । द्रोह-मोह-तम दूर पळे
एके ठायीं या तर या । भूषण आणूं जगता या
ताऱ्यांसम हा फेर धरूं । प्रेम-द्रोही जगिं पसरूं
ओळख अपुली । होइल सगळी । शंका कसली
आपण आहों कोण खरें । तरिच जगा हें ज्ञान बरें

## ८१

# अनुकाराचा प्रतिकार

[ 'आधुनिक कवींची कुरकुर' या कवितेवर 'Bee' चा पुन्हा 'अनुकार' प्रसिद्ध झाला. त्याचा हा प्रतिकार' आहे.]

( फुलें वेलीचीं० या चालीवर )

दोष जो करिल । दोषीहि तोचि होईल
एकें लुटिलें नृप—भांडारा
चढे सुळावर परंतु दुसरा
जेथें या अविचारा थारा



१०

म्हणावें काय ? । अंधेर नगरिचा न्याय
अंतर्वीणा–तंतूवरुनी
कोमल कर कां फिरवी न कुणी
कां कर्कश रव पडती श्रवणीं
दुर्दैं स्वर गाई । दोष कां तया जन देई
शुचि सारस्वत–तीर्थावरती
पंक फेकितां दुष्ट दुर्मति
तया वारितां कुणी मन्मति
त्या वंदील ? । जगत वा शिरीं घेईल ?
प्रभुचि एकला अनादि सिद्ध
बाकी जग हें उष्टें शुद्ध
कशास होतां अंतरिं विद्ध
दृश्य अदृश्य । उच्छिष्ट प्रभूचें लास्य
प्रभुमय सारें विश्वचि असतां
तत्कृति गावी कुणिहि तत्त्वतां
रचनेमाजीं सर्व चतुरता
दिसुनी येई । नच दुजें याविणें कांहीं
कराल धारेची तरवार
सदुपयोग करि तो नरवीर
नातरि भेंकड, निर्बल, चोर
संबोधूनी । लेखितों तुच्छ त्या भुवनीं

बाह्य सृष्टिवरि कवि–मानस तें
नवल वाटतें कैसें भुलतें
कविची शक्ती ' न्यारी ' असते
शक्ति कवीची । करि रचना नव सृष्टीची
अखंड सौरभयुत उज्ज्वलतर
सदैव सुंदर जगन्मनोहर
विश्व-विभूषण पुष्प हवें तर
असें टिकणारें । क्षणिं नको शुष्क होणारें
दुखवुनि लघुगुरु तरुलतिकांना
दु:ख जाहलें जरी तन्मना
गमेल हर्षचि, जनकजननिंना
कीर्तिमान् पुत्र । नावडे कुणा सर्वत्र
एक शब्द मन प्रसन्न करितो
एक शब्द परि दु:खद होतो
भिन्नपणा हा कां मग वसतो
निज हृदयांत । जो अनंत सांठवि त्यांत
कटु प्रतिध्वनि ज्याला न रुचे
मधुर नाद काढावा वाचें
हेंचि कृत्य कीं सुज्ञपणाचें
घ्यावें द्यावें । नियम हा सृष्टिला ठावें

× × ×

[ उपसंहार ]

( श्लोक )

सत्या झांकुनि ठेविलें किति जरी राही न झांकोनि तें
अंतीं दूर करोनि सर्व पटलां रूपा निजा दावितें
दावी कांच महत्त्व लोकिं अपुलें घे मान्यता तोंवरी
नाहीं सन्मुख रत्न जों, मग तिची होते परीक्षा खरी

८२

# बाल-संगीत

गा ! गा ! गा ! बाळा ! । उगा तूं राहिं न वेल्हाळा
कर्णमधुर गीत । ऐकुं दे तुझेंच संगीत
तुझिया गाण्याची । माधुरी अवर्ण्य मज साची
सदैव गाणाऱ्या । सारिका कोकिलादि साऱ्या
नीरस त्या ठरती । सोनुल्या तव गाण्यापुढतीं
लज्जित मनिं होती । बघ कशा स्वमुखा लपवीती

एकताननेतें । गाइं गा ! असेंच तूं गाणें
गाण्याचे सूर । पसरिती पहा किती दूर
त्रिखंडांत भरुनी । उरति जे, पडती मम श्रवणीं
उदास हें गगन । अंतरीं अतांवरी जाण

तव मधु गीतानें । तें निकें डुले प्रमोदानें
ऐकाया गान । तुझें तें लावी निज ध्यान
वायु कौतुकानें । दिगंतीं उधळी तव गाणें
मोहुनि तो गेला । प्रमोदें कुरवाळी तुजला
कुरळ्या केसांशीं । तुझ्या बघ लीला करि कैशी
शिड्या उभारियल्या । स्वरांच्या स्वर्गी पोंचविल्या
नवल काय जगतीं । विस्मयें स्वर्गींच्या युवती
पडदा दुरि करुनी । नवल तें निरखिति निज नयनीं
सभोंवार बघतां । दृष्टि ये शिड्याचि त्या अमिता
एक सती आली । कौतुकें शिडीवरी चढली
प्रसन्न चित्तानें । तुझें ती ऐकितांचि गाणें
नादलुब्ध झाली । विसरली देहस्मृति अपुली
दुजी तिजी आली। मागुनी तत्स्थिति पाहियली
कळे न कांहिं तयां । शिड्यावारि परि चढती क्षणिं त्या
एका मागूनी। एक मग येति सर्व रमणी
प्रत्येकीवरती । शिडीच्या एक एक चढती
धिःकारिति गगना । जणूं कीं नकोच तें त्यांना
स्वागत तव करिती । प्रीतिनें मंगल इच्छीती
तुजकडेचि बघती । टकमका विमुग्ध त्या होती
निज गीता भुलती । स्मिताची छटा मात्र ओष्ठीं

तारका

पिंग्याचा फेर । घालण्या जगता चौफेर
विसरति, तव गान । ऐकितां आत्मसुखीं लीन
स्थिरता जी दिसत । तिला हें कारण तव गीत
ओळख सत्याची । तयां अजि होय पूर्ण साची
कधिं न विसरतील । जाण रे ! हा मंगल काल
सत्य तत्त्व पटलें । त्यांहिं जें अजवरि शोधियलें

असेचि आलाप । काढिं रे ! वारिं विश्वताप
एकतार दृष्टि । लावि ही कशी पहा सृष्टि
सकलहि जीवगण । गानिं तव झाला तल्लीन
तुजभंवतीं फिरती । आपुले कर्ण तृप्त करिती
यापरतें कांहीं । मधुरसें दिसत तयां नाहीं
विमल मधुर गीत । प्रेममय निर्हेतुक शांत
मिळतें ऐकाया । कोठलें तयास जगतीं या
स्वार्थाच्या ताना । अवनिवर दिसति पसरतांना
लहरी द्वेषाच्या । उसळती हृदयीं—जगताच्या
द्वैताचा नाद । घुमतसे इतस्ततां सान्द्र
जेथ रीत ऐशी । कोठचा शुद्ध मोद त्यांसी
दुःखांतचि चूर । अजवरी नयनिं अश्रुपूर
कशी कळी खुलली । चित्सुधा तयांस जणुं गमली
दैवी गीताचें । बुभुक्षित बहुता दिवसांचें

कसे गीत-नादें । अहा ! ते नाचति स्वच्छन्दें
तुझ्याचि भजनांत । रंगले कसलि न त्यां भ्रांत
या सौख्यापुढतें । स्वर्गसुख तुच्छ तयां वाटे
गमे तयां पाहीं । पर्वणी चिदानंदमय ही
देहभान हरपे । तयांचें कर्तव्याहि लोपे
खरें खरें आजी । समजती दैव होय राजी
भाग्यवंत गणती । सहर्षें स्वतांस ते जगतीं

ताल बंध कांहीं । गड्या ! तव गाण्याला नाहीं
उघडीं भांडार । आपुल्या गीताचें सार
होऊं दे स्वैर । वायुजलिं त्याचा संचार
अर्थ न तव गानीं । बोलती कुणी असें भुवनीं
प्रौढी मिरविती । जगाला उगाचि फसवीती
दाविति अज्ञान । आपुलें ऐसें बोलून
नश्वर वस्तूसी । प्रीतिनें धरिती हृदयाशीं
वृथा मोहपटलीं । जयांची मतीच भ्रमलेली
ह्या बाह्यावरती । निरर्थक लोभुनियां पडती
केवळ आभासीं । रमविती अपुल्या चित्तासी
नाशिवंत जगतीं । जोंवरी भासे प्रिय चित्तीं
नुमजे गीतार्थ । तोंवरी तयांस हें सत्य
स्थिरचर विश्वांत । चाललें मंगल प्रभु-गीत

अगम्य गूढ खरें । अगोचर अविरत जें विचरे
कोण तया जाणें । अल्पशा परिच्छिन्न ज्ञानें
तया जाणणारा । एकला समर्थ तोच खरा
तोंचि गूढ गाणें । उमटवी तुझिया तो वदनें
जयास जो रुचतो । तसा तो अर्थ करुनि घेतो
पटेल तोचि तया । असंशय उत्कंठित हृदया

गाण्याचा बाळा । सदाचा असुं दे तुज चाळा
काढुनि मंजुस्वन । तोषवीं माझे हे श्रवण
त्यांत ओत धारा । दिव्यशा गीताच्या मधुरा
कटु रव परिसून । त्रासलें मानस हें जाण
कर्ण–पथें चित्तीं । येउं दे सुधाब्धिची भरती
स्वैरपणें तेथें । खेळवीं नादब्रह्मातें
मी-पण विसरूं दे । रज:कण जगतीं भासों दे
नको मोहपाश । झणीं रे दग्ध करीं त्यास
संसृतिचें खूळ । जाउं दे पाडिं पूर्ण भूल
मुलापरिस मूल । होउं दे हर्षाचें मूळ
अंतर्बाहि ठावें । प्रमोदाचि प्रभु–कौतुक गावें
असाचि गाईन । निरंतर प्रभुला रिझवीन

८३

# प्रेमाची खूण

( वीरशिरोमणि या० चालीवर )

संतत वाहे यद्—हृदयांतुनि विमल प्रेम निर्झर
त्रिभुवनीं धन्य धन्य तो नर
पितरांचा उद्धार कराया, दृढ निश्चय अंतरीं
धरुनियां यत्न भगीरथ करी
अगणित वर्षें घोर तपाला आचरिलें त्या तदा
लखुनी तुच्छ जीव—संपदा
प्रसन्न होउनि प्रभू तयावरि अमृत निस्यंदिनी
स्वर्गींची दिधली मंदाकिनी
उद्धरो न अथवा पितर तयाचे तयें
त्या इष्ट फलाचा हो न मोद वा स्वयें
तत्कौतुक जगतीं करो न कुणि विस्मयें
तत्प्रेमाची खूण जान्हवी अहा ! भूवरी परी
अहर्निश पतित जगा उद्धरी

कृष्णसारथ्यासवें धनुर्धर पार्थवीर नरमणी
ठाकला युद्ध कराया रणीं
प्रतिपक्षावरि दृष्टि फेंकितां आप्तगणाचि देखिले
तन्मना संमोहें व्यापिलें

त्या मायेंतुनि मुक्त कराया भगवंतें त्याजला
पाजिली बोध—सुधा निर्मला
अशि पुराणांतरीं सुरस कथा वर्णिली
ती खरी असो वा नसो, कुणीं पाहिली
तीवरी जवनिका कालानें ओढिली
आज परी ती जडासही कीं चैतन्या देतसे
म्हणुनि हें प्रेम—चिन्ह गमतसे

वृद्धपणीं निज मातापितरां दुःख देइ अंतरीं
छळुनियां पुंडलीक बहुपरी
प्रिय रमणीच्या प्रणय—भाषणीं दक्ष राहि सर्वदा
वाहुनी सर्वस्वा तत्पदा
यौवनकालीं उच्छृंखलता जडतां अंगीं पुरी
मनुज तो उत्पथक्रम आचरी
अंधार जाउनी प्रकाश ये भूवरी
जरि रत्न मलिन, जगिं तेज दावि कधिं तरी
या न्याया पुढतीं तज्जीवन स्वीकरी
'विठ्ठल' 'विठ्ठल' सदैव हा जो घोष अंबरीं भरे
कशाची खूण असे ही बरें

नाशिवंत जड तनू जिवाची जाते जाइल लया
नियम हा कालाचा जगतिं या

जाणें हें जो स्वयं स्फुर्तिनें त्याच विमल अंतरीं
वसते विश्वबंधुता खरी
स्थिर चर भेद न जगत्रयाचे आत्मे लय पावती
तदात्मीं, प्रेमें सुख भोगिती
तत्प्रीति मंगला दिव्य रूप घेउनी
जोंवरि विहरती रविशशि तेजोमणी
करुं शके न कालहि विरोध तिज कोपुनी
धन्य जननि ती ! धन्य काल तो ! धन्य धन्य ती क्षिति
कीं असें प्रेम-चिन्ह प्रसवती

८४

## गुलाबास

मन माझें मोहिलें । तूं गुलाबा
जननी-वक्षीं मुदें विहरसी
स्वच्छन्दें पवनासह डुलसी
मधुर परिमलें जगा सुखविसी
तुज वश जग हें जाहलें
दाहि दिशा ह्या प्रसन्न केल्या
सौगंधानें पुष्पा ! अपुल्या

बघुनि त्याहि तुज मोहित झाल्या
भान तयांचें हरपलें

बंधुगणामधिं हंससि खेळसी
आनंदें निज काळ कंठिसी
कसलि न चिंता तुझिया मानसिं
तव मन हर्षें भारिलें

स्वीकारी परि विनया सुमना
त्रिखंड पूजी याच सद्गुणा
शिवुं नच देई अंगिं अवगुणा
तो न कुणाचें करि भलें

अमोल सद्गुण स्वरूप सुंदर
एकचि ठायीं असणें दुष्कर
धन्य धन्य तूं या अवनीवर
तुज दैवें हें लाभलें

यास्तव माझी तुजला विनती
परोपकारें तोषविं जगतीं
रूपें मोहविं तेवीं जन- मति
तरीच जीवन हें भलें

सुकृत गमे तुज जें जें कांहीं
याच क्षणिं रे ! करुनी घेई

वेळ न ऐशी पुनरपि येई
क्षण पुढचा तो नाकळे

तुज विधि दे क्षण आयुष्याचा
सदुपयोग करिं कांहिं तयाचा
धरिं न भरवंसा ह्या कालाचा
कितिक तयानें फसविलें

अनंत ह्या कालाच्या पोटीं
विश्वाच्या किति जिरल्या कोटी
केवळ उरते सत्कृति पाठीं
मनीं आणीं हें आपुले

८५

## दुःखाचें बीज

( श्लोक )

आशेच्या शिखरावरी बसुनि म्यां ब्रह्मांड हें पाहिलें
नाना सुंदर वस्तुंनीं सकल तें दृष्टी पडे व्यापिलें
दुःखाचा लवलेश त्यांत कधिंही येणार नाहीं मुळीं
ऐसें भावुनि चित्तिं हिंडत अहा ! हर्षे तदा भूतळीं

जो बिंदू दुरुनी दिसे रुचिरसा मोती दुजा वाटतो
जातां सन्निध त्या क्षणींच फुटुनी होतोचि निःशेष तो
आशा उत्कट मानसीं किति तरी होती—कथूं ते कुणा
ऐसा अंत समूळ होइल तिचा स्वप्नीं न हीं कल्पना

झाला खेद बहू तरी निरखिण्या संपूर्ण सृष्टीप्रति
आशेनें फिरलों पुन्हां तदपि हा ! होई निराशाच ती
इच्छा एक मनीं, स्थिती अनुभवा तद्भिन्न येई परी
आहे केवळ दुःखबीज जगतीं आशा पिशाची खरी

## ८६

# ईश-कुतूहल

( नवयुग )

विविध कल्पना नव्या नव्या । येती ज्या ज्या दिनिं उदया
त्याच दिनाला नवें युग । म्हणती किंवा नवें जग
परंपरेनें । तेंचि युग जुनें । जगहि पुराणें
केवळ शब्दाचि ' नवा ' ' जुना ' । ओळख पटवी जगन्मना

सतार असते तीच जुनी । तीच तिची ' दिड—दा ' वाणी
प्रतिदिनिं परि वाजविणारा । नवीच म्हणतो ती मधुरा

मोद नवा तो । तयास गमतो । नित्य भोगितो
तन्मयतेचा मधु पवन । व्यापी भंवतींचें भुवन

वृद्धपणा ये जिवाप्रति । उषाचि नवयुग बाहे ती
ते दिन भोगाया पुढतीं । बालरूप तो घे जगतीं
सकल महीवर । पूर्वि अगोचर । वस्तु मनोहर
अधिकाधिक त्या त्या दिसती । होतो दिनिं दिनिं मोद अती

विश्वोत्पत्तीपासून । पाहतसे क्षिति निरखून
भूपतिची करितां गणती । अजवरि झाले नष्ट किती
प्रत्येकातें । सुन्दर दिसते । प्रिय ती गमते
वृद्धा म्हणुनी परि कोणी । नुपेक्षितो तिजला अजुनी

साधुचरित रघुनाथाचें । लीलाकौतुक जगताचें
दिसतें ज्या ज्या तें दिवशीं । नवेंचि वाटे जगतासी
दिन मावळला । पुन्हा उगवला । भेद राहिला
नवा जुना हा जगतातें । ईश—कुतूहल हें गमतें

८७

# सुस्वागतम्

( वैशाखमासिं० या चलीवर )

ती शारदाच सुस्वागत आपुलें करो
कीर्ति सुखा वितरोनी असुख संहरो
त्या शारदा–स्थलीं न कांहिं भेदभाव तो
निज विमल मनें तन्मंदिरिं कुणि प्रवेशितो
इच्छेनुसार सान थोर तिजसि पूजितो
जगिं तद्गुण गाण्याचें प्रेम विस्तरो

त्या देवीचे कण्ठमणी तुम्हि विराजितां
जी शोभा या जगताला आजि तत्त्वतां
त्या कारण तुम्हि विबुध सकल जाहलां स्वतां
तत्प्रसाद आर्य–संस्कृतीस उद्धरो

८८

# जॉर्ज बादशहास प्रार्थना

( मज गमे ऐसा० या चालीवर )

तुज असे विनती आमुची । जॉर्ज राया
नृपा ! देव तूं भक्त अम्ही तव
जरी सर्वही एकच मानव
जोडी कशि ही शोभे अभिनव
येई न इजला सर कवणाची
निजरूपाची ओळख देई
प्रेमें मिळवीं अपुल्या ठायीं
हीच प्रार्थना प्रभु ! तव पायीं
कांस धरिल सुत वद कवणाची

८९

# मधुबोल

( साध्य नसे मुनिकन्या० या चालीवर )

चरण स्मरा श्रीहरिचे । तोचि चिरायू करिल तुम्हांला
निजधर्मी रत सतत असावें
सत्य व्रतानें जगति चरावें

सद्गुण हे थोराचे । नच चाले यापुढतिं कुणाचें
मातृभूमिवरि प्रीति करावी
गुरूजनांवरि भक्ति असावी
आशिर्वचन तयांचें । मंगल करिती या जीवाचें
परोपकारीं मति रमवावी
प्रभु—गुण—गानीं ती रिझवावी
जो सगळ्या जगताचें । प्रेमें नियमन करितो साचें
ध्रुव बाळाची निष्ठा बघुनी
दर्शन देई तया तोषुनी
देउनि अढळ पदातें । केलें लोकीं अमर तयातें
प्रल्हादाच्या भावासाठीं
स्तंभीं प्रकटुनि तो जगजेठी
निर्दालन असुरांचें । करुनी रक्षण करि दासाचें
ईश परात्पर सकलां ठायीं
भरला ऐसें जाणुनि हृदयीं
कृति ऐशी करिं व्हावी । जगतासी जी सत्पथ दावी

९०

# ईश-प्रार्थना

( पावना वामना० या चालीवर )

ईश्वरा शंकरा सुरवरा
रे ! करिं भारतीं दया करुणाकरा
चिच्छक्तीचा दीप मावळे । घोर निशा ही गोचरा
ज्योत पेटवीं ओळख व्हाया । निज रूपाची अन्तरीं
सदा रडावें एकें जगतीं । भोगि दुजा सुखसागरा
सर्वसाक्षि तुज समान सगळे । वदे साधुची ही गिरा

९१

# बालमूर्ति

( भूपती खरे ते० या चालीवर )

ही दिसे मनोहर बालमूर्ति किति नयनां
आनन्द-निधानचि लाधे कीं ह्या भुवना
जणुं मूस ओतिली विधिनें निर्मलतेची
निज शक्ति वेंचिली सारी दिव्यत्वाची

हीं नभिंची लुकलुकणारी । तारका
उपवनिंची कीं हंसणारी । मल्लिका
कीं मंजुळ वच वदणारी । सारिका

वाटतो स्वर्ग भू म्हणुनिच हा मनुजाला
त्या मधुर समागमिं विसरे भव–भानाला

## ९२

# प्रेम–प्रार्थना

[ प्रसंगः—भगवान् श्रीकृष्ण देवी रुक्मिणीच्या भेटीस फार दिवसांनीं गेले. तेव्हां इतर मत्सरी स्त्रियांप्रमाणें त्यांची अवहेलना न करितां देवीनें मोठ्या स्नेहभावानें श्रीकृष्ण–चरणीं लीन होऊन जी त्यावेळीं प्रार्थना केली ती खालील पद्यांत गोंविली आहे. ]

( उद्धवा शांतवन० या चालीवर )

श्रीकृष्णा सखया राया । स्वीकारीं हा तांबूल
हा त्रयोदशगुणी नाहीं । सौगन्धहीन कीं फूल
या समयीं सुचत न कांहीं । पडलीसे मजला भूल

परि गोड करुनि घे याला
ही प्रेम-याचना तुजला
पथ योग्य हाचि थोराला

समज हा दीन दासीचा । तरि खचित प्रीतिचें मूळ

हा करुणमूर्ति शशि दीन । तूं सूर्य तुजकडे पाही
हो दयार्द्र कांहीं हृदयीं । मुख-रुची तुझी तो वाही
तव सु-कृपेवीण तयाच्या । साफल्य जिवाचें नाहीं
जी महती चंद्रालागीं
ज्या अमुप सुखा तो भोगी
तें केवळ रवि-अनुरागीं
छे ! अकलंकित तांबूल । तव तनू श्यामवर्णी ही

तूं परिस अमोलिक नाथा । हा लोह क्षुद्रतर हीन
रतिभरही मोल न त्याला । जागें तुझिया स्पर्शावीण
लोटणें नरकिं वा स्वर्गीं । केवळ हें तव आधीन
थोरांच्या जरि संगतिनें
श्रेष्ठत्व न दीना येणें
तरि थोर केंवि त्या म्हणणें
कृति परी अन्यथा ऐशी । स्वप्नीं न देखिली अजुन

छे प्रभो ! नसे हा माझा । विपरीत बोलिलें बोला
मन्मनें वाहिलें जेव्हां । तव चरणीं ह्या देहाला
तेव्हांच सर्वही माझा । 'मी-पणा' लोपुनी गेला

मी स्वतांचि माझी नसतां
हा कुठला माझा परता
ही तुझीच सारी सत्ता

तुज वृथाचि म्यां शिणवीलें । करिं क्षमा विनवितें तुजला
मज भेटुनि दिन बहु होती । संशय हा मनिं आणोनी
नच कष्टी होईं हृदयीं । प्रार्थना तुझ्या ही चरणीं
जें महत्त्व प्रभु ! अबलांचें । पतिमुळेंच तें या भुवनीं

पतिमोदाचि ब्रह्मानंद
पतिदर्शन मुक्ती सुखद
पतिचिंतन मधु सुखकंद

दैवताचि पतीहुनि अन्य । युवती न जाणती साचें

९३

## स्वभाव-धर्म

( असे कालाचि जी भगिनी० या चालीवर )

कुणाच्याही स्वभावाला । कधींही द्या न दोषाला

रवि-किरणीं हिम कितीहि जपलें दृढाचि काय राही
शीत चंद्रमा प्रखर ज्वाला सिंचि काय देहीं

कोरांटीच्या तरुसि येइ का सुगंध सुमगुच्छ
तरुणी नलिनी प्रणयी भ्रमरा काय गमे तुच्छ

कोकिल-कंठांतुनी कधीं का गर्दभ-रव निघतो
सिंह भुकेला म्हणुनि जंबुका शरण काय येतो

वसंत ठेवी काय चोरुनी आत्मवैभवाला
शरत्‌—पौर्णिमा निज हास्यें का ताप देइ महिला

वृंदावन फल काय येतसे आम्रतरूलागीं
बाभळीस का विळखा घाली अहि तो अनुरागी

जातां पुढतीं काल मागुती फिरुनी का बघतो
चातकापुढें दुग्ध मांडिलें पिईल कधिं का तो

अवर्षणीं तो राजहंस कुणिं कूपिं देखिला का
बघुनि होय का परनारीला मोद चक्रवाका

एकाचि ठायीं वायु रमे कधिं काय मजेनें तो
मारुत-वेगें कुंजरराणा का पथ आक्रामितो

निज उदरांतिल वस्तु निर्भयी अनल काय ठेवी
कधीं विषाची सुधा जाहली अमृत विष होई

मयूरीस त्या किती पढविलें फुटेल का वाचा
स्वरांस म्हटलें तरी त्यजिल का संग बांसरीचा

दया सोडुनी कोप कधीं का दाविल जगदीश
स्वभाव जो का असे मूळचा तोचि अहर्नीश

९४

# सुर-बाला

निजान्तरीं, सुरबाला । उत्कण्ठित का बघण्याला
ढकलुनि द्या ह्या रविला । स्वमनीं भीती त्या अबला
नको नको हा चंद्र । लाजवि त्यांचा मुखचंद्र
करीं धरा हा वारा । हळू हळू त्या मुक्त करा
फेंकुनि द्या घनमाला । त्रासविती तन्नयनांला
करिं बांधा चपलेला । व्रण करि त्यांच्या ती गालां
दाहि दिशा ह्या लपवा । करितिल त्यांचा त्या हेवा
धाडुनि द्या मधुमासा । सुखवित जो तद्–हृत्कोशा
सरोवरा ! शांति धरीं । बघुं दे निज मुख त्यां मुकुरीं
स्थिर राहीं तूं जगता । भंगु नको तत्–प्रशांतता
ह्या नभिंच्या कुंजवनीं । जमतिल रत्नांच्या खाणी
स्वर्गींच्या ह्या बाला । करितिल हर्षें मधु लीला
अवलोका तैं विमला । स्वैर तयांच्या हास्याला
मधु गीतें गातील । परिसा श्रवणीं पडतील
प्रेमाचा मधु फेर । धरुनि नाचतिल चौफेर
तन्मधुराऽऽमोदांत । होइल चंचल मन शांत
दिव्य प्रभु–संदेश । कथितिल मग त्या जगतास
‘ स्थल हेंची सत्कृतिचें । न्यायी ईश्वर दे साचें
विश्वाचें भूषण हें । म्हणुनि रम्य तें दिसताहे ’

२५

# संध्या

( श्लोक )

भर्ता ये करण्या विहार बघतां संध्यासती कौतुकें
ओंवाळी करिं घेउनी सविनयें पंचारती त्या निकें
तच्छीर्षी प्रणयें गुलाल उधळी हो हर्ष यद्दर्शनें
चित्तस्नेहविभाव नाथ वितरी ओंवाळणी प्रीतिनें

प्रेमीं प्रेम मिळोनि एक बनलें द्वैता नुरे स्थान कीं
ऐसें जें पतिपत्नियुग्म भविं या तेंची म्हणावें सुखी
होई श्रांत बहू म्हणोनि पतिची सेवा कराया सती
गेली घेउनि मंदिरीं निज तदा लावी कपाटास ती

९६

# राधा-माधव

( ईश्वर पंकज० या चालीवर )

अनंत आत्मीं अनंत स्वामी भरला जगताचा
विपरीत भेद कैचा—। साधु-वाचा
अनृत कैसें वच मानूं
खरें तरी या केंवि म्हणूं
भ्रमांत पडलें खचित जणूं
वर्षाकालीं रवि घनजालीं बोध न तम दिनिंचा
निजांतरीं मी तुज बघतें
कां नच दिससी तूं तेथें
समजूं का मग वद मातें
तमास भास्कर तेंवि दूर कर संभ्रम हृदयाचा
( कोंदण रत्नाविण राही )
सरोवरीं सारस नाहीं
मेघामाजिं न जल कांहीं
तेंवि मदंतरिं तूं नसतां हरि मान जगीं कुठचा
कृष्ण हवासा जरि गमला
विनयें प्रेमें याचि मला
( म्हणेल तोचि का अजला )

‘ सदैव नसतो वसंतऋतु तो ’ विचार करिं याचा
तूं-मज मी-तुज आजवरी
नाहिं विसरलों क्षणहि हरि
स्वरूप मुख जणुं अवनिवरी
त्यजी उदधि जल खरेंचि धरातिल का या कोणि वचा
सहस्त्र वरुषें अजि झालीं
वियोग घडला ज्या कालीं
बोलूं हें कवणा जवळीं
शशि ज्योत्स्नेला सोडुनि गेला, अर्थ न कथण्याचा
लपण्या जगतीं बहु वाव
कुणा विचारूं तव ठाव
जाणुनियां हरि तव भाव
असती दुर्बळ कथण्या केवळ विषय न इतराचा
अन्य स्थलिं मजवांचुनिया
मोद कसा हो तव हृदया
नवल गमे हें पाहुनियां
रमे न जैसा दीपक सहसा संग न ज्योतीचा
जरी सर्वही अनुकूल
कांहिं न आजी प्रतिकूल
तरी तुजविणें बघ्र विफल

## आनंद-गीत

प्राण शवांत न तयास नटवुन अर्थ न विभवाचा
घडलासा अपराध तुझा
त्याग करिसि म्हणुनी माझा
बोल बोल तूं त्या काजा
अही समजसी रज्जू पिटसी, हेतु तुझ्या मनिंचा
राजाश्रय नच विबुधाला
सारि दुरी तरु लतिकेला
मौक्तिक तेजा जरि मुकला
तवाश्रयाविण का मज्जीवन पथ वरि विजयाचा
तूं राणा या गोकुळिंचा
सु-मित्र असशी तूं अमुचा
तेंवी किंकर सकलांचा
जो या त्रिगुणीं रत रात्रंदिनिं शोभे नृप महिचा
तूं देवकिचा तनय स्वतां
वृषभानूची मी दुहिता
अर्थी संबंध न बघतां
प्रेमाकर्षण हृदया कारण चुंबक जणुं साचा
श्रीमंताचा तूं थोर
बघ गवळ्याची मी पोर
लाज गमे का तुज फार
लतिकेसही गंध न देई गुलाब तरु कैंचा

विमल प्रीती अजवरिंची
काय निमाली अंतरिंची
लेश न माया तुज कैंची
परि प्रीतिविण जगणें शक्य न जीव प्राण्याचा

रूप घेतलें वनितेचें
मजसाठीं, हें पूर्वीचें
आठवतें ना तुज साचें
त्या प्रेमासी आज विसरसी, आठव करिं त्याचा

हृद्गत सांगूं मी कवणा
एकहि न दिसे मन्नयनां
पात्र तयाला तुझ्याविना
जो तूं जाणासि भाव दुज्यासी कळेल तो कैंचा

तव नामाचा जप करितें
तृप्ति न मनिंची परि होते
तव मुखचंद्रा बघण्यातें
दीन चकोरी आतुर भारी तव पदिं ही याञ्चा

बहुतचि लागे मज तृष्णा
पुरविं मनोरथ हा कृष्णा
करिं न तयाची अवगणना

१ ही गोष्ट राधाविलासांत ऐकण्यांत आहे.

श्यामल सुंदर मूर्ति मनोहर सत्वरि बघण्याचा

पळ पळ युगसम भासतसे
उत्कंठा तशि वाढतसे
मन लालस तव ठायिं असे

जो शरणागत मरण न दे पथ हा जनिं थोराचा

शेवटिं त्वां मज अवगणिलें
म्हणुनि न दर्शन दे अपुलें
खरेंचि जाणूं हें सगळें ?

जग उफराटें होय न, वाटे स्थिर घट विश्वाचा

आशेमाजीं गुंतवुनी
वृथाचि विरहीं लोटोनी
श्रमविशि यापरि कां म्हणुनी

मदंत व्हावा हाच हेतु वा यांत असे तूझा

जिवंत राधा ही जगतीं
कृष्णा तोंवरि तव महती
करूं नको विपरीत कृती

राधा मरतां तुझ्या तत्त्वतां लय हो नामाचा

परंतु तुझिया भेटिविना
नच त्यागिल ही स्वप्राणा
खूण गांठ ही बांध मना।

तुं जगिं जोंवरि मीही तोंवरि सत्य समज वाचा
ये ये धांवत ये सखया
कोठें रमसी या समयां
करिं पावन ही झणिं काया
दर्शन घनजल पाजीं अविरल टाहो चातकिचा
तव मुरलीचा मधु ध्वनि
पाडीं प्रेमें या श्रवणीं
उचंबळूं दे इच्छा मनीं
' राधा-माधव ' जोडा अभिनव शोभविं मधुतेचा
नयनांतिल ह्या जल सरलें
ओष्ठद्वयही हें सुकलें
त्राण शरीरीं मुळिं नुरलें
तारीं मारीं हे कंसारी प्रश्न त्वदिच्छेचा

( श्लोक )

ऐशापरी स्मरुनियां प्रिय माधवाला
झाली विमूर्छित तदा विरहार्त बाला
" राधे उठीं, उठ गडे, शिणसी वृथा कां "
येवोनि माधव अशा तंव मारि हांका

९७

# राम-काल

( जगदीशा तात० या चालीवर )

रामकाला ! आजि वाढदिवस तव आला
आनन्दें प्रेमालिंगन देई या जगताला

प्रीति तुझी जोंवरि जगतावरती
उपभोगी सर्वांगें सुख शान्ति
वसत नसे लेशाहि चिन्ता चित्तीं

अनुभवि ये तेव्हांच गड्या ! रामराज्य सकलांला

दिन गेले रामराज्य समयाचे
नांव उरे ग्रन्थि मात्र शान्तीचें
दिन आले क्लेशभूत चिन्तेचे
स्वप्नींही ते दिन येति न, दोष न हा नशिबाला

राम-सुखा अनुभविलें त्वां सखया
ऐसे हे कां मग भोगिसि वांया
कांहिंच का वाटत नाहीं हृदया

कांचमणी वेंचिसि जेथें वेंचिलेंस रत्नांला

९८

# सीता-शोक

( उद्धवा शांतवन० या चालीवर )

असशाल कुठें या कालीं । रघुकुलोद्धारका रामा
कळली का तुज ही वार्ता । गांजिती असुर तव रामा
त्वां काय योजिलें स्वमनीं । मुनिजनमानसविश्रामा
मनमोहन मेघश्यामा
जगजीवन आत्मारामा
जानकिच्या हृदयारामा
किति अंत पाहसी आतां । मज भेट देइं अभिरामा

ह्या अशोक वन वदताती । शोकाब्धि गमे परि मातें
शुकमयूरकोकिल सारे । शोकाचीं गाती गीतें
तरु गगनचुंबि बकुलादि । पसराविति न मधु गंधातें
मम रुदनाचि कर्णीं येई
कारण या एकच पाहीं
इथ राम दिसत मुळिं नाहीं
ज्यामाजिं असेना 'राम' । मधुरता कोठली तेथें

रविशशिविण जैशी संध्या । राहते पोरकी बाला
विक्रमी भानुसम नाथा । तूं नच या संकट काला
वात्सल्य इन्दुसम ज्याचें । पारखी आज जनकाला

कथुं कुणा कहाणी करुण
येईल कोण धांवून
शार्दूलें धरिला हरिण
काळही नेइना कैसा । नच मिळे वाट पळण्याला
हा ! नको नको हा जीव । कष्टला बहुत दरमारें
आकाश मंडळीं चरती । तेजाचे कण हे तारे
याचिते साधुजन ! तुम्हां । या तर या या क्षणिं सारे
जाळुनी गगन—हृदयाला
शिणवितां कशाला त्याला
मजवरती वर्षावाला
झणिं करा करा यावेळीं । चुकवा ही स्थिति उपकारें
वैभवीं सागरा दंग । नेणसी काय घटनेतें
तव स्वसात्मजा दुःखांत । धरिं कांहीं मनिं लज्जेतें
स्वत्वास न विसरीं अपुल्या । आजि सोडीं मर्यादेतें
अति उदार तुजला वदती
सत्यता दाविं या क्षणिं ती
अबलेची तुज ही विनती
निज वीचिसवें नेवोनी । जठरीं दे इज शांतीतें
निःस्तब्ध बांधवा शैला । देखिसी मौज तूं कसली
तव हृदीं प्रेम वसतेना । सत्याची वेळा आली
भगिनींची दुःस्थिति बघुनी । कां मिटासि नयन करजालीं

मृदु हृदय उमा तव तनया
तरि प्रीति खचित तव ठाया
ह्या स्वसेवरिहि करिं माया
करिं चूर्ण इचें स्वाघातें । दीनेचा होईं वाली
सद्धर्म प्रवर्तक चंद्रा । करितोस दग्ध विरहाला
तव कीर्ती ऐशी जगतीं । तूं ज्वलन रसाचा प्याला
करिं रक्षा तेजें निमिषीं । विरहार्त असे ही बाला
धर्माचा तूं अभिमानी
तुज वदती ऐसें ज्ञानी
तरि विनती ही मनिं आणीं
भंगतां घट पुढें काय । येईल मोल या बोला
बा अशोक वृक्षा आजी । करिं सार्थ आपुलें नांव
तव शीतल छायेमाजीं । शोकाला नसतो ठाव
सप्रेम प्रार्थना तुज ही ! तव चरणिं खरा मम भाव
परिहार करीं शोकाचा
घे दुवा सती–हृदयाचा
करिं संचय तूं पुण्याचा
इतरांसम तूं नच होईं । मृदुतेचा जेथ अभाव
प्रतिकूल जेथ हें दैव । अनुकूल कोण असणार
उपहास उलट करितात । जे असती थोर उदार
रघुराया ! या दासीला । तुजविणें नसे आधार

दाखवीं आपुले चरण
उद्धरिं ही अवला दीन
जातील ना तरी प्राण
त्वत् प्रीति विमल मजवरिची । अनुभविं ये अपरंपार

९९

## चतुर-हंस

विश्वाची चंचलता सरतां बसुनि एक ठायीं
सृष्टिदेवता शांत मनानें लागे निज कार्यीं
मानस कासारांतुनि वेंचुनि आणि दिव्य मोतीं
प्रसन्नतेनें जाल तयांचें गुंफि मनोहर ती
सुधाधवल प्रिय राजहंस जो प्राणाहुनि भुवनीं
तिला फसवुनी दुरी उडाला गवसे नच अजुनी
तया धराया जाळें फेंकी नील भूमिवर ती
परि चुकवुनि त्या मारि भरारी येइ न तो हातीं
दिसे गवसला, क्षणें तयांतुनि निसटे लीलेनें
असें देखितां विषण्ण ती हो क्षणाचि निराशेनें
तोडुनि टाकी बनलें जाळें गोळा करि मोतीं

फिरूनि तयांचें जाळें गुंफी कौशल्यें भगवती
नीट नेटकें पुन्हां प्रमोदें तयास पसरीतें
चतुर हंस परि पळुनी जाई कातरतां नच ते
पुन:पुन्हा तें तोडी गुंफी प्रेमें ती पसरी
हंस न ये करिं, हताश होई धीर न सोडि परी
नित्यक्रम हा असा चालला कितितरि दिन होतीं
हंस न लाधे नयनां दिसुनिहि यत्न लया जाती
परि हंसाची त्या जाळ्याची देवीची लीला
बघुनी येई आनंदाची भरती विश्वाला
उपाय बोला कुणी तियेला सकलां ताद्विनती
परी नियंत्याविण कथण्या का समर्थ कुणि जगतीं

१००

## वसंतकालीन बालभानु

( चंद्रकांत राजाची० या चालीवर )

उदयगिरीवर कुणीं उडविला चेंडु सुवर्णाचा
परत न जातां खालीं कैसा अलग राहि साचा
का लटकविला सुन्दर गोलक व्योम—छता कोणीं
गगनश्री का दिव्य कुण्डला खोंवी निज कर्णीं

सुवर्ण रंगित सुपक्क फल कीं काय गळुनि पडलें
त्या झेलाया उदयगिरीनें हात वरी केले
भालीं धरि कीं तिलक मनोहर हा प्रकृती देवी
सौभाग्याविण ललना-जीवन नीरस हें सुचवी

प्रमोद चित्ता होतां उठती हास्य-लहरि गालीं
एकवटोनी चराचरां ही तीच दिसे लाली
अदृश्य आत्मा जो ब्रह्मांडा चैतन्या देई
दृश्य दिव्य ह्या रूपें पुढतीं काय उभा राही

शांत स्थलिं कीं प्रशांत शीतल नील सलिल बघुनी
प्रसन्न झाला धनी जगाचा निज अंत:करणीं
कारंजें हें म्हणुनि लाविलें रुचिर इथें सान
अग्रभागिं हें चक्र हेममय त्यावरि असमान

कारंजाचे तुषार कोमल पडती गिरिशिखरीं
बंधुबंधुचें मीलन होतां उठति हर्षलहरी
प्रेमें हृदया हृदय भेटतां प्रेमाश्रू स्त्रवती
त्याच अश्रुंना कुणी संभ्रमें ‘ सरिता ’ हें वदती

उदार सज्जन जगीं उपकारा कधिंही नच विसरी
त्या कारंजा तदीय जीवन शैल मुदें वितरी
मन्द मन्दशा शीत तरंगें मारुत जो विचरी
शीतलता ती चोरुनि आणी तेथूनिच सारी

कीं जें केलें सागरमन्थन सुर दानव मिळुनी
तदा चतुर्दश सुन्दर रत्नें निघति तयामधुनी
रत्नांसाठीं युद्ध तयांचें होई जें उभयीं
अवलोकुनि तें विषाद वाटे सागरास हृदयीं

रत्न अमोलिक म्हणुनि एक हें लपवुनि ठेवितसे
तेंचि आजच्या शुभ दिनिं काढुनि विश्वा लावि पिसें
कुणास द्यावें ह्या रत्नाला विचार करि स्वमनीं
असुर बुभुक्षित सुरही तैसे दिसे न पात्र कुणी

सत्कविच्या मृदु हृदयकोंदणीं निज रत्ना बसवी
निरिच्छ प्रेमळ तया आढळे जगतीं एक कवि
प्रत्येकाच्या काव्यामाजीं विलसे हें रत्न
म्हणुनी शोभा तदीय कवनां, सफल होति यत्न

क्षितिजीं उगवे सहस्रदलयुत रक्त कमल कीं हें
दिङ्मंडलिं जो सुगन्ध भरला, तेंचि विखरिताहे
अफाट सगळ्या सरोवरीं ह्या एकचि कमल कसें
परि गुंजारव करित रसिकवर मधुप कुठें न दिसे

काय न दिसलें सारस फुललें तयास हें अजुनी
शक्य न हें परि अतांच कीं तो निघे तयामधुनी
" ह्या कमलांतिल मधु प्राशितां शुष्क होय अंतीं
होइल केंवी जनमनरंजन त्याकरवीं पुढतीं "

विचार ऐसा करुनी गेला स्वस्थानीं भृंग
उदारतेच्या नित्य कल्पनीं थोर जीव दंग
रम्य वस्तु कधिं भोक्त्याविण कां निर्मिल प्रभु भुवनीं
म्हणुनी हस्तें तया खेळवी कवि अपुल्या कवनीं

अदयपणें तो ग्रीष्म पोळवी कृश करि सकल मही
नाजुक ऐशा वसुन्धरेला तिमिर ताप देई
सत्याला पळवाया लावी ताण्डव अनृत करी
क्षमे दयेची होळी करुनी भीषणता पसरी

अज्ञानाचें राज्य पसरुनी मूढ करुनि सोडी
आत्मत्वा विसरवुनी जगता, विषयिं लावि गोडी
अशा राक्षसा संहरण्या कीं इच्छुनि वनमाळी
उदयगिरीच्या समईवरि हा रत्नदीप उजळी

मोह-पटल जणुं उडे निमिषिं तम पाताळीं दडला
चोंहिकडे हा सत्तत्त्वाचा प्रकाश कीं पडला
अज्ञानाच्या गर्तेमाजीं जग बुडलें होतें
निज प्रभावें वरि काढी तो, लावि योग्य पंथें

सत्या धरुनी, ईशा स्मरुनी स्मर कर्तव्याला
जगालागिं सन्देश सुचवि हा करि स्वोद्धाराला

मग ही धडपड कशास चाले स्थिरचर सृष्टीची
कुणी कुणाचें ऐकत नाहीं, गोष्ट कौतुकाची

अति त्वरेनें चन्द्र पळतसे प्राचिकडे हां का:
कुणास भारद्वाज मारितो मंजु रवें हांका
प्रेमें कवणा बघति तृणांकुर सहस्र नयनांनीं
कुणास भिउनी नयन झांकिले नभिंच्या ताऱ्यांनीं

तेज:स्फुटता दीपावलिची अंस्फुट कां झाली
चिमणीं बाळें चिंव चिंव करिती चिमण्या घरकुटलीं
कवणाच्या स्वागतास करि हा द्विजवर चण्डोल
कुणा पाहुनी डुले प्रमोदें अखिल विश्व गोल

वेद्मंत्र जयघोष द्विजांचा कोणास्तव चाले
तद्रमणींच्या मंगल गीतीं कोण दिसे भरलें
सुगन्ध अर्पिति कुणा सन्मनें पुष्पराजि अपुला
कुणास लाजुनि पदर मुखीं घे ही रजनीबाला

ईश-मंदिरीं घंटा-रव जय बोले कवणाचा
कुणास हळुं हळुं वारा घाली पर्णवृन्द तरुचा
विकसित झाल्या कलिका परिसुनि कवणाची वार्ता
कुणा देखुनी मुदें बिलगती लतिका प्रिय नाथा

त्यजुनि मलिनता होति शुचिर्भुत किमर्थ घनपंक्ति
बंदिवान 'जय' कार गर्जुनी कवणा पथ देती
मुग्ध कमलिनी वेड्यासम ह्या हांसत कां सुटल्या
करांत कर टाकुनी कुणाच्या नाचत कीं बसल्या

## आनंद-गीत

दृष्टि काढिती आम्रमंजिऱ्या हर्षें कवणाची
शाल कुणावरि झळकत आहे दिव्य वसन्ताची
हळुं स्पर्शुनी मृदुल करें निज उठवी कोण मुलां
स्वागमनानें कोण दुभंगी प्रेमी हृदयाला
प्रतिबिम्बित ही झाली अवनी कुण्या दिव्य रूपें
द्वेष, मोह, मद, स्वार्थादिक हीं जळती कीं पापें
चित्शक्तीचे पाट वहाती कुण्या घटामधुनी
पान करी मनसोक्त विश्व हें सुखें तटीं बसुनी
प्रसन्नतेचें गीत भावमय सगळ्या महिवरते
अणुरेणूमधिं घुमे, ऐकुं ये कारण ना कळतें
काय हरपलें कुणा संभ्रमें द्विज शोधिति सु-मनें
कुणास बघुनी लिही रुचिर नव कवि अपुलें गाणें
हीच हीच कां वस्तु सकळिकां अनामिका दिसली
म्हणुनी ऐशी चंचलता का तद्-हृदिं संचरली
छे ! छे ! भ्रम हा सोडा सोडा सत्य हृदयिं आणा
उषादेविचा कुमार सुन्दर हा गोजिरवाणा
तज्जन्माच्या आनंदाचा प्रभाव हा सारा
त्याच वीचिची ही चंचलता, कुठुनि दुज्या धारा
पुत्रोत्सविंच्या आनन्दासम इतरिं न गोडि खरी
सुर दानव वा मर्त्य असो तो एकचि हृदय परी

नभः प्रांगणीं सोडि हळुंच ती क्रीडण्यास त्याला
लीला-कौतुक पाही दावी प्रेमें जगताला
शुभ्र वसन परिधान करुनि ह्या दाहि दिशा नटल्या
त्या रिझवाया गाणीं गाती, देह-भान भुलल्या
पोटावरि त्या घेउनि सागर खेळवि प्रेमभरें
तन्मृदु कुन्तल कुरवाळी हा मारुत हर्षभरें
प्रिय भगिनीच्या सोनुकल्याला बघण्या चुंबाया
त्वरा करी अति सरितामाई, हीच वदति माया
जननीची ही गडबड बघतां स्वतांहि खेळाया
मुदें तयाशीं निर्झर बालक लोळण घे पायां
कडे उचलुनी तया झणीं ती चाले वायु–गति
उषा-सुताहि कर-झांप टाकि निज तदीय तनुवरती
गुरूजनांचीं आशिर्वचनें लाभो प्रिय बाळा
दिगंत कीर्ती होवो पुढतीं इच्छा जननीला
ब्रह्माण्डाच्या अंकावरि ती ठेवी सुत म्हणुनी
मोहित झाला अवलोकुनि त्या गाई कवि कवनीं

( श्लोक )

रंजवी शिशु जसें जननीला
गुंजवी नव कळी भ्रमराला
बालभानु रिझवी वसुधेला
तेंवि हें कवन हो रसिकांला

१०१

# नांवांत जादू आहे

[ " Bee " कवीच्या, ' नांवांत काय आहे ' या कवितेस उत्तर ]

( भूपती खरे ते० या चालीवर )

नांवांत असे जी जादुगिरी भरलेली
अन्यत्र कुठेंही नसेल वाटे असली
' श्रीकृष्ण ' नाम हें श्रवणीं वदनीं येतां
ती दिव्य पुढें ये कर्म-समर्था ' गीता '
षंढही षंढपण विसरुनियां भट होतो
हा प्रभाव नुसता ' ग्रंथ ' शब्दिं कां दिसतो
सुचविते ' शकुनि ' ही व्यक्ति । का जना
' कर्णार्जुन ' का बोधीती । आपणा
सतीधर्म गांधारी ती । दाविना ?
परिसतां ' भीष्म ' किति हृदयीं उठवि तरंग
ज्यापुढें प्रतिज्ञा होय हरीची भंग

' तव नाथ येइ गे ! ' वच हे पडतां श्रवणीं
सानंदमना किति होय विरहिणी रमणी
वाटेल इतरिं का तिला स्निग्धता तीच
प्रथमाभिधान मग महती ये स्वरुपींच

मोद दे दृष्टि जननीची । बालका
तैशीच इतर युवतीची । गमत का
कवणाला प्रचिती याची । नाहिं का
' आई ' ह्या शब्दीं दिव्य सांठलें जितुकें
प्रत्यक्ष ईश्वरीं नसेल वाटे तितुकें

" नांवांत मोहिनी भासो सामान्यासी "
कविराया वदसी कवनीं ह्या बोलासी
मग बाभळिचीं का कुणी वेंचिती सुमनें
( तोडिती श्रमें कां गुलाबपुष्पा सु-मनें )
प्रज्ञासचि नामीं भासे । मोहिनी
सामान्य उलट उपहासे । जाणुनी
जग रम्य वाटतें ऐसें । देखुनी
कलहंस रसिक हा जलमिश्रित पय जग हें
पय पितो तयांतुनि रसिक घटघटा पाहे

व्यवहारी जग हें सकलहि नच वेदांती
सर्वात्मभाव नच म्हणुनि वसे तच्चित्तीं
हा सूर्य जयद्रथ नित्य पाहिजे त्यातें
तर्करीति देई दूर झुगारुनियां तें
कोळसा हिरा हे समान गुण धर्मांचे
कोळशास मग कां कुणि दे मोल हिऱ्याचें

अग्नीवरि पद ठेवील । का कुणी
कूपांत उडी घेईल । का कुणी
कालकूट गरल पिईल । का कुणी
हें समजुनि करि त्या खुळ्यांत जग लोटील
मग सुज्ञ जगाला दोष कोण देईल

१०२

## सुधाकराचा उदयकाल

( भूपती खरे ते० या चालीवर )

ह्या पूर्व दिशेला कुणीं हंसविलें गालीं
ती प्रसन्न मुद्रा क्षणांत कैशी झाली
कुमुदिनी-कपोलीं कोण कोंदवी लाली
त्या कशास इतुक्या होति खुळ्या या कालीं
हें सरितेचें जल नील निरंतर वाही
तें धवल दुग्धमय कोण करी लवलाहीं
हा सागर कवणा बघुनी वीचिकरांनीं
भेटाया उत्सुक होई मोदें स्वमनीं
दे रजनीला हा प्रेमालिंगन कोण
ती मान मुरडिते कुणा लाजलाजून

उघळिलीं कुणाच्या शिरीं तारका-सुमनें
 करि कौतुक ऐसें कोण कुणाचें सु-मनें
नेसवी अंबरा कोण शुभ्र वसनाला
 मालिन्य पूर्विचें नेइ कोण विलयाला
उन्मत्त काजवे असे आड कां लपती
 निज हीन छवीची लाज गमे का चित्तीं
हा कोण सृष्टिवर अविरत सिंचि सुधेला
 तिज कोण अर्पितो प्रेमें शांति—सुखाला
अवतीर्ण होय हा पहा सुधाकर जगतीं
 स्वागतास करुं या चला रसिक हो! पुढतीं

## १०३

## वेणुरव

( प्रिये पहा रात्रीचा० या चालीवर )

प्रशांत हें जग असतां
 श्रवणिं मधुर नाद कुठुनि येइ हा
वायु चरे मंद मंद। नव विकासित सुम-मरंद
जोत्स्नेचा ललित छंद। भूपृष्टीं रुळत हा
विश्वाची चंचलता। घेउं नका नांव अतां
गेलि कुठें ती ललिता। विश्वि दुज्या का अहा

यमुनेचें नीर तरल । शांति-भंग करित विरल
पथिकांचें मृदु पदतल । हीच तरलता महा
अंगाई गाइ गीत । बाळांच्या सुषुप्तींत
सृष्टि जननि मधुसुरांत । किति मंगल-काल हा

जेंवि चंद्र आकाशीं । तेंवि शांति भूकोशीं
ठाव नसे द्वैतासी । राम-काल जणुं अहा
खल चिंता नामशेष । आशाही नच विशेष
देवपणा एक शेष । शोधुनी तया पहा

ऐशा या मधु समयीं । मुरली जी स्नेहमयी
नाद तिचा जग-वलयीं । कोण भरतसे अहा
गीताचे सप्तसूर । घुमत घुमत जाति दूर
परि बदलुनि ते स्व-नूर । केंवि जवळि येति हा

नादाचे विविध रंग । उमटति जणुं जल-तरंग
सान थोर हा विभंग । ये न बोलतां अहा
जा कुठेंहि सारिखेंच । श्रवणिं पडति सूर तेच
मोद तोच सुखहि तेंच । अनुभवास ये पहा

श्रुतिकटु जो आंतिल रव । येइ रूप त्या अभिनव
ही जादू पाहुनि भव । घे नवीनता अहा
गगनाचा पट विशाल । नादाची ओढि शाल
म्हणुनि अचल अंतराल । स्थित एके ठायिं हा

भुवन शांत गगन शांत । पवन शांत समय शांत
अंतर्बाहि शांत शांत । शांतींतहि शांत हा

वेड्यासम होय खुळें । कां मग हें जग सगळें
शोधण्यास ना भुललें । दिव्य नाद काय हा
आजवरी का दिसला । बोल जगा ! कवणाला
रव बा तो करिं आला । श्रमसि फुकट तूं पहा
नाद हवा जरि वाटे । जेथुनि रे ! तो उमटे
स्थल शोधीं तें नेटें । वेंचि पुण्यबल महा
थोर भाग्य तव असलें । सुखनिधान करिं आलें
जाण खचित तें सगळें । धन्य तूंचि तू महा
तरिही हा नाद भला । नाहिं लाभणार तुला
जो दे त्या जननाला । तोचि जाणतो पहा
तदानंद कल्पनेंत । जो इच्छी त्यास मिळत
इतर पारखेच होत । ठेविं हृदयिं मंत्र हा
कल्पनानुसार जगत । कल्पनाच सारभूत
कविहि कल्पनेंत रमत । सत्य एक हरि पहा

× × ×

तारालंकृत नभास । बघुनि होय कविसि भास
मूर्तिमंत कीं विभास । विस्तरला राग हा

## १०४

# उषा

( भक्तजन सदा० या चालीवर )

नेत्र उघडुनी । बघसि कुणा काय जनीं
प्रेमें विहग । गाती सुभग–। स्तोत्र तुझें सुस्वनीं
चोंहिकडे रम्यपणा । बघुनि तोषवीसि मना
पद्मीं मधुप । विश्वीं उडुप । रुचिर सृष्टि मानिनी
वेणींतिल उडुपुष्पें । कोमेजलिं हीं शापें
दृष्टी करुण । न्हाणी भुवन । गमत तुझी अश्रुंनीं
शशि-कन्दुक कीं तिमिरीं । मौजेनें खेळत करिं
गेला उडुनि । दूरी म्हणुनि । बघसि तया निरखुनी
मालेचे तइं मोतीं । क्रीडण्यांत विस्कळती
हस्तें तरल । ते गे सकल । काय वेंचिसी मणी
स्वागतास तव कमलिनि । प्रेमभरें करिति हंसुनि
प्रेमालिंगन । मोदें देउन । शांतविसी तन्मनीं
मन्द हास्य मुखिं विलसित । वत्सलता नयनिं दिसत
भालीं अलक । शोभे कनक-। कान्ति दिव्यरूपिणी
निद्राकुल जगतातें । चैतन्या द्यायातें
माते दर्शन । देशी धांवुन । काय उषे ! हर्षुनी

१०५

# सरस्वतीभक्तांस

[ मुंबईच्या आठव्या महाराष्ट्र-साहित्य संमेलनानिमित्त. सन १९१५ मे ]

( चंद्रकांत राजाची० या चालीवर )

परम मंगला सरस्वतीच्या रुचिर मन्दिरांत
तुम्हां पाहुनी हृदय रमे हें प्रेमानन्दांत

अवलोकुनियां इन्दुस एका सागरास चित्तीं
आनंदाच्या सुखदाशेच्या प्रेमोर्मी येती
या समयीं मग अमित चन्द्र हे समोर असतांना
मम हृत्सागरिं कां न उठाव्या हर्ष—वीचि नाना

नयनरम्य ही मला वाटिका गमे शारदेची
तुम्ही त्यांत जणुं मधुर मनोहर पुष्पें बहुपरिचीं
जगदुपवन भारुनी टाकिलें आत्मसौरभानें
रसिकमधुप त्या भुलुनि सौरभा नाचति मोदानें

दिव्यरूपिणी सरस्वतीच्या कण्ठांतिल रत्नें
तुम्ही शोभतां विराजितां कीं लोकीं आत्मगुणें
अनन्त कालावधी लोटिला युगें युगें जरिहीं
ज्या रत्नांची प्रभा निरन्तर परमोज्ज्वल राही

ठायिं ठायिंच्या पवित्र गंगा एकठायिं मिळुनी
निरुपम पावन संगम होई हा वाटे बघुनी
अज्ञानाच्या तमीं पहुडले ऐशा पथिकांतें
स्वयंप्रकाशित दीपचि जणुं तुम्हि मार्ग दाविण्यातें

प्रेमपुरस्सर करांत कर घालुनी काय आलां
सरस्वतीच्या तीरीं तुम्हि ह्या मंगल स्नानाला
व्यास, वाल्मिकी, कालिदास, भवभूति, बाण, भास,
मयूर, वामन, कबीर, तुलसी, ज्ञान, तुका, दास,
नाथादिक ह्या महा विभूती परम पूज्य महिला
जेथें मज्जुनि पावन झाल्या, वरिलें कीर्तीला

महाराष्ट्र-भाषारूपी जणुं ललना मोदें ही
इतर रमणिगणिं स्वप्रभाव कीं दावाया जाई
वस्त्राभरणें करुनि अलंकृत सर्वांगें तिजला
शोभविणारे तिचे प्रिय सखे तुम्हि गमतें मजला
शब्दार्णविं जीं अमोल रत्नें, वेंचुनि अचुक तयां
तिला नटवितां कुतूहलानें तुम्हि स्थलिं जणुं या

आर्यजननिच्या सत्पुत्रांनो ! थोर चरित तुमचें
यावरि गाया समर्थ नच हा जडमति कवि वाचें

१०६

## स्वैरविचार

( •सबसे राम० या चालीवर )

हे असती स्वैरविचार
कांहीं यांत असे का सार !
ज्योति कुठोनी । प्रकाश आणी
कोठें प्रकाश–जनि भुवनीं
पंकापासुनि । उगवे नलिनी
कज्जल कां ज्योतीमधुनी । कांहीं०
चन्द्रागमनीं । उदधि स्वमनीं
प्रमुदित होई सुत म्हणुनी
परी कुमुदिनी । हृदयिं तोषुनी
विकसित होती कां बघुनी । कांहीं०
गुलाबाप्रति । कण्टक दिसती
आशीच रुचिरता कां जगतीं
दीपावरती । मरण संप्रतीं
पतंग कां मग उडि घेती । कांहीं०
निज नाभींतुनि । सुगन्ध असुनी
भ्रमें फिरे कां मृग विपिनीं
काष्ठीं बसुनी त्यासचि भक्षुनि
दर्प मिरवि कां वन्हि जनीं । कांहीं०

१०७

## वनमाली

( हृदयविदारक वार्ता० या चालीवर )

कुंजवनीं या कोण वाजवी मंजु रवें मुरली
बुद्धि तरल झाली । मनाची भ्रान्ति लया गेली
वेड कुणाचें या मुरलीला
संतत काढी मंजुळ बोला
मोहुनि मोहवि या जगताला
गणीं भाग्यशाली । मनाची भ्रान्ति लया गेली
स्वर वेणूचे कोठें जाती
कोठुनियां ते परतुनि येती
लीला-स्थल का दुसरें जगतीं
जन-मति रविं रमली । मनाची भ्रान्ति लया गेली
याच रवा का राधा गौळण
भुलुनी प्रेमें करि आत्मार्पण
सख्य जोडिलें हरिशिं चिरन्तन
तन्मय ती झाली । मनाची भ्रान्ति लया गेली
याच रवें का मूढ जहाली
चित्-शक्ती ही विश्वामधली
अंकिं बसविण्या तो वनमाली
शिलारूप बनली । मनाची भ्रान्ति लया गेली
यमुनेनें जणुं बहार केली

श्याम रूपिं तीं स्वतांचि नटली
चिन्मयतेनें डोलुं लागली
वेणुरवीं मुरली । मनाची भ्रान्ति लया गेली
हृद्या नभ कां उघडें ठेवी
दिव्य स्वन का त्यांत सांठवी
तारकरूपें जगता दावी
शान्त निशाकाळीं । मनाची भ्रान्ति लया गेली
नन्दयशोदा संमोहानें
कुणास म्हणती सुत लोभानें
मुरलीनादें भरतां श्रवणें
स्वरुपिं लीन झालीं । मनाची भ्रान्ति लया गेली
गोपरूप ते विचार सर्वहि
नादें मिळती एक्या ठायीं
कुठें भिन्नता ! समत्व येई
रमले पदकमळीं । मनाची भ्रान्ति लया गेली
स्वैर तरल ह्या वृत्ति-गवळणी
वेणु-सुधा मधु पान करोनी
स्थैर्या पावति प्रेम स्थानीं
हृदयिं एक मुरली । मनाची भ्रान्ति लया गेली
हृद्य-निकुंजी सुखें बैसुनी
कोण गातसे सदैव गाणीं
तींच प्रकटवि जगदुद्यानीं
तोचि वनमाली । मनाची भ्रान्ति लया गेली

१०८

# स्वैरविचार

( सबसे राम० या चालीवर )

हे असती स्वैर विचार
कांहीं यांत असे कां सार ?
कोण तरूते । घालि जलांते
ग्रीष्मि पालवी ये त्यांते
मंजु रवातें । बोलायातें
मधुमासाचि कां विहगांते । कांहीं०
फुलें उमलती । जग तोषविती
कुठुनी सुगन्ध निज आणिती
दिन क्रमें तीं । सुकतां अंतीं
राहि कुठें परिमलवसती । कांहीं०
विमुग्ध कालीं । युवति-कपोलीं
नैसर्गिक ये मधु लाली
अपाप सगळी । जरी नष्टली
दोष कुणाच्या ये भालीं । कांहीं०
तुच्छ जी शिला । ये रूपाला
कां नमवी शिर जग तिजला
निष्ठुरतेला । दावी अतुला
तरी वंदितों कां काला । कांहीं०

१०९

# भारत भूमीचें दुर्दैव

[ ता. १९ फेब्रुवारी १९१५, ना० गोखले यांचा मृत्यु ]

हा ! हा ! देवी वसुंधरे ! तूं किति गे दुर्दैवी
दुर्दैवाची अद्भुत लीला तुज न काय ठावी
ह्या दैवानें किती छळियलें तुजला आजवरी
अंत न लागे अजुनीही नें पुरेल कोठवरी
तुझें दैवबल ऐसें दुर्बल पाहुनियां माते
हृदय फुटे हें देह गळोनी भान लया जातें
अश्रूंना तर ठिकाण नाहीं अजवरि किति गळले
दीनाश्रूंची किती शक्यता स्वस्थ चित्त बसलें
नेत्रांनीं तरि किति गाळाव्या सतत अश्रुमाला
स्थल न दिसे तव असें टीचभर चिंब व्हावयाला
धर्म बुडाला, ज्ञान लोपलें, तपाचरण गेलें
सत्याचा लवलेश दिसेना, बंधुत्वहि नुरलें
गत वैभव तें होतें कैसें, मान काय अपुला
होते कैसे पूर्वज, अजि किति किंमत अपणाला
ह्या गोष्टींचें स्मरणहि नुसतें आजि न तव बाळां
शोचनीय याहुनि ' स्वत्त्वा ' चा समूळ लय झाला
' अपुलें वाइट ' ' परकें उत्तम ' याच भावनेचा
सुकाळ होई, सुटशिल यांतुनि तो दिन सोन्याचा

शौर्य धैर्य तें कोठें लपलें ? ग्रंथिं मात्र दिसतें
कर्तृत्वाची शक्ती नसतां हांक ऐकुं येते
कला कुशलता सर्व बुडाल्या नामशेष झाल्या
पूर्वींचीं स्मारकें तयाच्या देती साक्षीला
शांतीचें मुळिं लागत नाहीं वारें हृदयाला
जीवन–कलहीं सदैव धडपड अवसर मग कुठला
आत्मरक्षणीं आजि तुझे सुत स्वतां शक्त नाहीं
प्राणान्तावरि खुशाल त्यांना दंडावें कुणिही
अपराधाविण हाल अपेष्टा तदीय जगिं होती
शासनकर्ते परि टकमक त्या सुखेनैव बघती
अखिल चराचर एकच देवें निर्मियलें वदती
भिन्नपणा हा कां मग ठेविति तेच सुज्ञ चित्तीं
पाणी दिधलें तरीच प्यावें स्थिति ही यायाला
परावलंबी जीवित आर्ये ! कारण मुळिं ह्याला
वडवानलिं ह्या कशि तव शाश्वति अजुनि राहिली ही
जबाब द्याया ह्या प्रश्नाचा बिकट नसे कांहीं
ललाट थोर न तुझें तरी तव कूस भाग्यशाली
उदार आत्मे मधुनि मधुनि ती जन्माला घाली
असंख्य गारा जरी उपजती संतत तव ठायीं
एक रत्न त्यांमधें चमकतां महत्त्व त्यां येई
तारामंडाळें जेंवि चंद्रमा, गुलाब उद्यानीं
कुपुत्र लक्षावधी तरी त्यां शोभवि एक गुणी

चोहिंकडुनि जरि दीन स्थिति ही आज तुला आली
' नाना रत्ना वसुंधरा ' ही ख्याति न तव गेली
अल्प महति जी आज तुला गे ! साऱ्या जगतांत
कोहिनुरासम अमोल रत्नें तुझीं विलसतात
परंतु आर्ये ! येइ आडवें तिथेंहि दैव तुझें
ज्या गोष्टीमधिं कष्टी मन तव मानी सुख लव जें
करिल अभ्युदय कांहीं मम तव आशा ज्यावर ही
बघसि कौतुकें ज्या रत्ना नित अनिमिष नयनांही
ज्या रत्नाचा स्वाभिमान तूं धरिसी हृदयांत
हेंचि पांग मम फेडिल गे ! तुज इच्छा जी सतत
हातीं पायीं खेळविसी ज्या जिवापरिस जपसी
हेंचि लाडकें स्वर्गीं नेइल म्हणुनि नित्य वदसी
यत्कीर्तीचा गंध विखुरितां जगभर तें बघुनी
ऊर्मि उसळिती हर्षाच्या तव हृदयाब्धीमधुनी
कोठें ठेऊं, कोठें नच ज्या होइल दृष्ट अशी
चिंता वाटुनि जयघोषाचें लिंबलोण करिसी
परमेशाला सदा प्रार्थिसी—'चिरायु करिं बाळा '
बहीण तव मी इतुकिच घालीं ओंवाळणि इजला
प्रिय बाळहि तव कृतघ्न होइ न तुजविषयीं पुढतीं
कायावाचामनें झटे तो तवोन्नतीसाठीं
' अखंड सेवा घडो मत्करें मातृभूमिचीच '
रात्रंदिन याचना करितसे ईश्वरास हीच

चिरंजीव व्हावया कुणीही येइ न या भुवनीं
विश्व चराचर सगळें नश्वर जाणति मर्त्य मनीं
एक दिवस भेटण्या मृत्युला केव्हां तरि जाणें
मनुजमात्रिं हीं रूढ कल्पना बसते प्रमुखपणें
तरिच दिसे लव ताळतंत्र या स्वच्छंदी जगतीं
कुणी कुणाला विचारितें ना स्वैर वृत्ति रमती
सुख-समयीं वेदान्त असा हा सकलां आठवितो
परंतु तुजसम अभागिणीला कोंवि रुचावा तो
लेश सुखाचा तुझिया भालीं विधिनें नच लिहिला
दोष तुझा नच, येइल कुठुनी तो तवं वांट्याला
विष्णुमधवादिक हीं रत्नें अकालींच हरुनी
तुज रडवी खल काल मनोरथ भग्न तुझे करुनी
सुकति न सुकती ते दुःखाश्रू-पूर भूमिवरचे
तोंचि हाय ! अजि तव हृदयावरि दुःख-शैल नाचे
आकाशींची कुऱ्हाड तुजवरि आर्ये ! कोसळली
शक्ति न कवणा निवारिण्याची तिजला या कालीं
जगद्-वंद्य नव दिव्य रत्न जें, तुजजवळुनि जननी !
अदय कृतान्तें अकालींच त्या नेलें चोरूनी
गाळ गाळ किति अश्रु गाळशिल सहस्र नयनांनीं
तरि परत न ये हिरा तुझा कधिं काल-मुखामधुनी
नक्रें गिळिलें माणिक आलें परत ऐकिलें का
सर्वभक्षकाचि जिथें आज ती सोड सोड शंका

( बा मृत्यो ! तूं प्रमुदित होसी रुचिर रत्न हरुनी
परि शोकार्णवि तुवां लोटिली अक्षय तज्जननी
जठर फुगविलें खला तुवां या अशा अधम कृतिंनीं
परंतु भारतभूची केलिस केवढि तरि हानी ! ! )
निबिड तमांतुनि हळुं हळुं अयि ! तूं प्रकाशांत येतां
त्याच पुन्हां गर्तेंत पडावें ! दैवयोग पुरता
स्पर्श न व्हावा त्वदंगास मुळिं आर्ये ! उन्नतिचा
असाच वाटे हेतु असावा दयासिंधु हरिचा
म्हणुनिच होती घात अकालिक असे तुझे माते
कुणास रिघसी शरण संप्रती ?—कोण दिसे तूतें
दैवभोग संपे न पुरा तव प्रथम भोगिं त्यातें
झाला तर उत्कर्ष जननि ! तव पुढें कधीं वाटे
दुर्दैवाची तुझ्या कहाणी अतां वर्णवेना
दुःखभरें लेखनी न चाले अंधारी नयना
निःस्वार्थी कर्तव्य-वेणु मधु ज्यानें वाजविली
आर्यजननिच्या अभिनव कुंजीं, सर्व देशिं घुमली
परलोकीं " गोपाल कृष्ण " त्या दिव्य विभूतीला
देइं विभो ! प्रार्थना तुला कीं, अक्षय शांतीला

( श्लोक )

आक्रन्दनें परत का गत जीव आला
' गोपाल '—सद्गुण-मणी निज कण्ठि घाला
सम्भूषवूनि जनना, पितरा, स्वदेशा—
त्रैलोक्य-वन्द्य-कृतिनें, रिझवा रमेशा

## ११०

# वीरतनय

[ प्रसंगः—कौरव पांडवांच्या युद्धांत श्रीकृष्ण व अर्जुन हे संशप्तक राजाशीं युद्ध करण्यासाठीं गेले असतां इकडे द्रोणाचार्यांनीं चक्रव्यूह रचिला. तेव्हां धर्मराजाला तो व्यूह भेदण्याकरितां पाण्डवचमूंत कोणी कुशल रणपटु दिसेना. सबब धर्मराज थोडेसे चिन्ताक्रान्त झाले. ही धर्मराजांची खिन्न मनःस्थिति पाहून बालवीर अर्जुनपुत्र अभिमन्यु त्या व्यूहाला भेदण्यासाठीं सज्ज झाला. त्यावेळीं धर्मराजांचा आणि अभिमन्यूचा जो संवाद झाला तो खालील पद्यांत गोंविला आहे. ]

**धर्मराज म्हणतातः—**

( श्लोक )

ओठावरील सुकला अजुनी न जार
त्या मी तुला वद कशें रणिं धाडणार
बोलेल काय मजला तव तात बाळा
कीं धाडिलें लघु शिशूस कसें रणाला

**अभिमन्यु म्हणतोः—**

( उद्धवा शांतवन० या चालीवर )

मी तुम्हा दिसे जरि बाळ । परि काळ असे वीरांचा
द्या मला अनुज्ञा ताता । नच लेश यांत भीतीचा
शत्रूस आपुल्या साऱ्या । पाहुं द्या पराक्रम शिशुचा

झुंजार रिपू वधण्याला
उत्साह मानसीं भरला
ये स्फुरण बहू बाहूंला
हा सांन, थोर हा ऐसा । क्षण नोहे हा बघण्याचा
जरि मरण पातलें मजला । समरांगणि लढतां लढतां
धन्यता खरी मानूनी । शान्तवा आपुल्या चित्ता
अभिमन्यु बाळ हा मेला । कीं कर्तव्याला करितां
' अजि वीर पांडवीं नाहीं
नातरी काय ही द्वाही
फिरवीतां शत्रु-समूहीं
हा कलंक निरया नेई । मृत्यु बरा त्याहुनि ताता
चळचळां कांपती वीर । यन्नाम मात्र परिसोनी
देवेंद्र नमविला ज्यानें । हरि-सखा ख्यात जो भुवनीं
जाहला तुष्ट शिव भोळा । यद्विक्रम भीषण बघुनी
मी छावा त्या केसरिचा
जिरवाया मद कुरुकरिंचा
कां शक्त हा न अजि साचा
( येईल काळिमा त्यातें । केला न समर जरि भिउनी
मज धनुर्वेद शिकवीला । तोही न कुणी सामान्य
गुरुदेव परात्पर ऐसा । जो तुम्हां, त्रिलोका मान्य
पढविलें कशास्तव त्यानें । घेउनी श्रम असामान्य

विहित कालिं तद्विद्येचा
उपयोग होय नच साचा
तो गुरू शिष्य मी कैंचा
शूरत्व मला दावाया। अशि वेळ न येइल अन्य

ह्या क्षात्रकुलीं जन्मूनी। मनुजानें काय करावें!)
ललनांत बैसुनी वदनें। पांडित्य काय दावावें?
कंकणें घालुनी हस्तीं। नटुनियां जनीं मिरवावें?
सर्वज्ञ, तुम्हां हें ठावें
म्यां कसें काय वर्तावें
तें तुम्हींच मज बोधावें
निज कुला उचित वागावें। कीं धर्मपराङ्मुख व्हावें

(श्लोक)

संमोह सारुनि दुरी मग त्या क्षणाला
धर्में दिली अनुमती रणिं जावयाला
श्री–कीर्ति–भूति–सु-यशान्वित तो कुमार
शोभे रणांत जणुं केसरिचा किशोर

१११

# देवाची करणी

( ०भरि रात्रीचा काळ० या चालीवर )

चैतन्य जडा मिळे जिच्या योगानें
संकटें पळति भीतीनें
ही स्वर्ग धरा निर्मिषिं जियेनें होते
साम्राज्यचि मोदाचें तें
चित्‌-शक्तीची टिके न कधिंही जोड
कटु विश्व जिहीं बहु गोड
जिस सदैव गाणीं गातो
जी अक्षय हृदयीं धरितों
जीसाठीं प्राणा त्यजितों
ती प्रीति कुणा नयनां दिसत न साची
धडपड कां मग जगताची

जो आत्म-गुणें मनुजा ने स्वर्गांत
निमिषिं वा लोटि नरकांत
जो दुःखांतचि पान सुधेचें करवी
जो सुखांत शोकें रडवी
यन्मूल्य कधीं अधिकचि पृथिवीहूनी
कधिं कवडिस न पुसे कोणी

जो प्रथम जगीं अवतरला
सांठवि जो ब्रह्माण्डाला
आद्यन्त नसे मुळिं ज्याला
ॐकार कसा रंग-रूप-आकारें
नेणतां जगत कां भारे

हें शोभे छत नीलवर्ण जें वरती
अष्ट दिशा खांबावरती
ये रुचिर जया शोभा रविशशि-दीपें
चिकटविलीं तारकपुष्पें
जिथ मेघांच्या परिसुनि वाद्यकलेला
करि ताण्डव हर्षें चपला

हा रसज्ञ वायु गुणांचा
घे परामर्ष सकलांचा
अशि बोले सत्कवि-वाचा
परि नकळे नभ सत्य काय तें अजुनी
मदित कां जगत हो बघुनी

जो देइ खरा जीवा आत्मानन्द
अति अलभ्य जो सुखकन्द
यन्नामाहुनि मंगल दुसरें नाहीं
भवमुक्त स्मरणें होई

अणुरेणूही देति जयाची ग्वाही
शासक जो अमुच्या देहीं
विश्वांत एक जो सत्य
सकळिकीं एक जो नित्य
जो एकचि मायातीत
तो परमात्मा कुणा न गोचर होई
जगत कां गोडवे गाई

आधार जरी ब्रह्माण्डाला शून्य
कां मोल तयाला शून्य
तोयास जरी स्वत्व नसे मुळिं अपुलें
कां जगत्कंठिं तें बसलें
श्रीहरिची जरि रमा लाडकी रमणी
कां क्रीडे अन्त्यज–सदनीं
वाणीस नयन नसतांना
वाणीहि तशी नयनांना
कां भाव गम्य हृद्गगना
अशि देवाची नवलपूर्ण ही करणी
कां गाउं नये तिज कवनीं

## ११२

# तारका

( जरि हीन कुळीं० या चालीवर )

ह्या गगनाच्या सौधावरि बसुनि तारका
हा गंधयुक्त मंद पवन सेविताल का
ह्या मेघांच्या मधु लीला कीं विलोकिती
प्रतिबिंब बघुनि नीर मुकुरिं काय हांसती
कीं कुमुदिनिंच्या प्रेम—कौतुकास दाविती
परि सत्य न हें,
इन्दुवदनदर्शनोत्सुका

## ११३

# चला जाऊं—चला पाहूं

( मी नवबाला० या चालीवर )

कुंजवनीं या । चला जाऊं
काळी काम्बळ पांघरलेली
तो वनमाली । चला पाहूं
पीत वसन कटिं कालिन्दी-तटिं
विहरत नट तो । चला पाहूं

धेनु सकौतुक देखिति यन्मुख
यदुनायक तो । चला पाहूं
विश्वबांसरी खेळवि अधरीं
असा मुरारी । चला पाहूं
पंकज लोचन विधुसम आनन
मनमोहन तो । चला पाहूं
मधुवनमाला धरि कंठाला
व्रजप्रियाला । चला पाहूं
राधा-स्कन्धीं भुज-तट बांधी
तो जगजेठी । चला पाहूं
दाउनि लीला तोषवि सकलां
त्या गोपाला । चला पाहूं
जगदाधारा करुणागारा
नन्द-किशोरा । चला पाहूं
चिद्--ब्रह्माची पूर्णांशाची
मूर्ति हरीची । चला पाहूं

## ११४

# हांस हांस सारसा

( चुंबिं चुंबिं बालका० या चालीवर )

हांस हांस सारसा । मूक दिससि कां असा
हृदय अर्ध उघडितां
जग भुलेल तत्त्वतां
ही स्पृहा तुझी वृथा । पुढतिं होय खेद मानसा
आभासीं फसलेलें
बहिरंगीं भुललेलें
मन कधिं कां स्थिर झालें । भ्रंश होय तुजसि हा कसा
अंतरंग सर्वही
प्रथम उघडिं, दाखवीं
मग जगास मोहवीं । हाचि मार्ग तुजसि उचितसा

११५

# बांसरी

हृदयमधुर बांसरीस वाजवीं मुरारी
तीच सुधा प्राणेशा ! जीव-ताप-हारी
विश्वान्तरिं मधुरपणा । भरला जो रिझवि जना
तरि न शान्ति होइ मना । बोलती विचारीं
मधुरतेंत कसल्याही । क्लेश लेश मुळिं नाहीं
सांग कथा मज अशि ही । मधुर भासणारी
प्रतिपदिं या लोकिं परी । दु:खराशि पडति शिरीं
सौख्य खरें शान्ति खरी । कुठुनि लाभणारी
बन्धु भगिनि तात तनय । सहचर वा धनसंचय
रूप सुगुण हीं अक्षय । काय राहणारीं ?
'दु:ख-शैल-शिखरांतुनि । पावे चिर शांति जनिं'
म्हणसि काय ह्या वचनीं । हेंचि मी विचारीं
भोगित जगिं दु:खभार । श्रान्त होइ जीव फार
विकल तनू सुख अपार । कधीं भोगणारी
नश्वर ह्या सृष्टिवरी । वदसि काय 'लोभ धरीं'
धैर्य धरूं कोठवरी । काल हांक मारी

× × ×

म्हणशिल जरि तूं मातें । नाथ पूज्य युवतीतें
हें सारें मज कळतें । परी मन विकारी
किति तयास समजावीं । तरि न मुरड अल्प दावि
आत्म-भाव अचल ठेवि । चरणिं तव मुरारी
म्हणसी हें चित्त तरल । नवल न , मम यत्न विफल
नागिं व्हावें उलट सकल । काय रीति सारी
तरि माझी ही करणी । स्त्रीधर्मा लाज आणि
सख्यासचि तद्वदनीं । ग्रहण लावणारी
करि विरोध निज पतिशीं । नरकवास त्या स्त्रीशीं
ठावें रे ! मन्मनासि । वचन हें मुरारीं
काय करूं परि नुपाय । हारवि मन मजसि , हाय
धरि विवेक मुळिं न पाय । होय मति विकारी
जगद्-बन्ध रे ! सवहि । मजपासुनि तुटुनि जाइ
त्याजवळुनि मी होईं । खचित आज दूरी
जगतांताचि जो नाहीं । तच्चिन्ता त्यांनेंही
ठेउं नये केव्हांही । उभयिं सौख्यकारी
निष्कारण जगताला । चिन्ताप्रद जो झाला
तो बरवा नसलेला । दुष्ट देहधारी
लाभ मुळिं न होय कांहि । स्वस्थ न तरि बसुनि राहि
निज कृतिचें फल देई । मात्र तो विषारी
जगताच्या वृत्तीला । जो देई मोदाला

तोचि जगीं पुरुष मला । जगाहि तदुपकारी
तच्चिन्ता जग न धरी । जगताची तोचि करी
याहि जगदुद्धार शिरीं । तोचि जगत तारी
वसति तयाची जगतीं । मग कुठेंहि राहो ती
जग भिरट्या उलट किती । घालि सभोंवारी
असलें हें सत्य जरी । दुष्टाविण महति तरी
सुजना नच अवनिवरी । जाणशीं मुरारी
जगताच्या कल्याणा । अवतरसी व्रजरमणा !
म्हणुनीं जग तव चरणा । वन्दितें मुरारी
लाजविण्या रमणिकुला । राधा ये जन्माला
तिजसम मग सांग मला । कोण दुराचारी
तुजसि घडे संग तिचा । म्हणुनी रे ! हा साचा
परिमल तव कीर्तिचा । चहुंकडे विहारी
यासमयीं वास्तव तूं । पुरवीं मम हा हेतु
आणुं नको मनिं किन्तु । लेशही मुरारी
सुष्ट दुष्ट कशिहि जरी । असले मी आज तरी
राधा ही अल्प खरी । जाण त्वदुपकारी
कृतघ्नता एकानें । दाविलि तरि दुसऱ्यानें
जावें कां मार्गानें । त्याच खेदकारी
दुष्कृतीस करण्यातें । हेतु हवा मनुजातें
व्यर्थ न हो कवणातें । कुमति घातकारी
वाम पथें मज जाया । हेतु वेणु तव सखया
सत्य वदे वचनीं या । तिजचि तूं विचारीं
धन्य असा वद न तरी । मज वेडें कोण करी

कृति अशि ही घडवि करीं । आत्मघातकारी
म्हणुनिच विश्वास मला । ध्यास लावि जी अपुला
शेवटिं त्या पाप मला । तींच वारणारी
दिव्यपणा सांठविला । मीपणाहि लोपविला
सर्वकाल ती अखिला । चिदानन्दकारी
परब्रह्म मोहियला । चिन्मय करि राधेला
ती वेणू जगताला । सुखद हो मुरारी

११६

## प्रभु-मोद

[श्रीकृष्ण हे एका शिलाखंडावर बसले असून मुरलीला न वाजवितां ती तशीच दोन्ही हातांत धरून पूर्वेकडे, कोणाची तरी मनांत आठवण करून मोठ्या कौतुकानें ते वाट पहात आहेत अशा एका सुंदर तसबिरीस उद्देशून.]

(श्रीकृष्ण तो परमात्मा० या चालीवर )

मनिं चिन्तिसी कुणाला । यदुराज ! बोल बोला
सर्वस्व मानिसी जी । प्रेमामृतासि पाजी
ती मूक वेणु—बाला
तूं चिंतिसी जगातें । कीं चिंति तेंच तूंतें
कथणार कोण ह्याला
हंसतांचि कंज भुंगा । भंवतालिं घालि पिंगा
बोलावि कोण त्याला
हरि ! वृत्ति मोदवीं ही । जग लीन होय पायीं
प्रभु-मोद मोक्ष गोलों

---

१ विश्वाला

१ १ ७

## कृष्णनाम

( आनवान० या चालीवर )

‘ कृष्ण ’ ‘कृष्ण ’ नाम सकल
वदति कां बरें । हें प्रेमभरें
ज्ञानवन्त समजोनी । बोध करिति सकल जनीं
जनप्रिय परि । निखिलांतरिं
कृष्ण एक वावरे
कर्तव्यीं गुंगविलें । जग सगळें आत्मबलें
भ्रमनिरास । व्हावयास
तोचि एक अवतरे

१ १ ८

## भाऊबिजेचें रहस्य

( चंद्रकांत राजाची० या चालीवर )

आनंदाची भरती आली सृष्टि-मानसाला
आजचि कसला तिला एवढा हर्ष मनीं झाला
नाथागमनें मोद म्हणावा सृष्टिस होय जरी
सलज्जतेचा भाव पाहिजे तयांत कांहिं तरि
ही तर दिसते षोडशवर्षा मनोरमा बाला
अल्लडतेचा भाव पूर्ण जणुं सर्वांगीं नटला

आनंदें परिपूर्ण भरे कीं हृदयाचा गाभा
दिव्य प्रेमा सांठवुनी किति नयनां दे शोभा
हिरवा शालू नेसुनियां कीं बहु मोलाचाही
यौवनधामीं प्रवेश होई नुकता, हें सुचवी
मधु कंकण-रव विहग-मुखानें मोही जगताला
निर्झर-कलरव सुंदर नूपुर शोभवि चरणाला
तेजोमय त्या मुखकमलांतिल विकसित शांतिरस
कुतूहलानें कविभृंगे हे धांवति लुटण्यास
केशकलापीं रुचिर बालकें[1] फुलें गुलाबाचीं
कंठिं विराजे अमोल माला मानवरत्नांची[2]
अशि ही प्रमदा यौवनभारें विनम्र कीं झाली
हर्षोन्मादें परि तें ओझें उतरविलें खालीं
प्रथम दर्शनीं, प्रथम मीलनीं, प्रथम चुंबनींही
हर्षाची परमावधि होई ललनेच्या हृदयीं
हा तर अनुभव कधींच इजला येउनियां गेला
अपत्य-मुखदर्शन इज वाटे देई तोषाला
मार्गामध्यें भटकत असतां सृष्टीची तनयी
सर्वे आणिली दिनकररायें हस्तें धरुनीयां
कटिबंधांतिल अंगणि सोडुनि गृहिं आपण गेला
सागरगोटे पुढें टाकुनी तिला खेळण्याला
प्राणप्रिय ही अपुली बाला कुणीं चोरट्यानें[3]

१ बिजेची चंद्रकोर. २ तारे. ३ मेघ.

मेळि न चोरुनि म्हणुनि काय ही प्रमुदित हो तेणें
बाल मनानें बाल करानें सागरगोटे हे
कशी खेळते प्रिय दुहिता कीं प्रेमें ही पाहे
गोजिरवाण्या मुखा चिमुकल्या पाहण्यास सृष्टि
कीं लावी ही स्नेहभरानें एकतार दृष्टि
परी दिसे जो हर्ष आजचा तन्मानसिं भरला
या मोदाहुनि कांहिं निराळा खचित गमे मजला
फार दिसानीं शरद्बंधु प्रिय गृहिं अपुल्या येई
म्हणुनि सृष्टिच्या हृत्-कासारा परम हर्ष होई
भाउबीज ही येतां बंधू गृहिं आल्यावरती
हर्ष प्रीतिला कां न ऊत ये भगिनीच्या चित्तीं
विश्वभवन निज करी अलंकृत भगिनी बहुपरिनें
चार दिवस कीं प्रिय बंधूचे जाउत मोदानें
मेघधूलिनें हीनपणा जो नभोंगणा अणिला
वातलहरिनें झाडुनि सगळा स्वच्छ करी त्याला
सुंदरशीं स्वस्तिकें काढिलीं तयावरी हस्तें
कौतुक व्हावें बंधूकडुनी कीं अपुलें मोठें
आवाराचीं द्वारगवाक्षें सजविलिं सद्भावें
कुठेंहि जावो नजर तयाची, प्रेमचि वाटावें
ठायिं ठायिं लाविले प्रमोदें गगनदीप नामी
अंधार न लेशही दिसावा बंधुस कीं धामीं

व्यजनाला ती हालविण्यातें पवनाला बसवी
चकोर गवया दिली अनुज्ञा ' मधु गीतें गावीं '
सुरगंगेंतिल जलें न्हाणिलें शरद्-बंधुराया
सुमगंधाची उटी लाउनी तोषवि तद्-हृदया
स्वप्रेमाचा टिळा लाविला शरदाच्या भालीं
सद्-वृत्तीचीं शिरावरी कीं पुष्पें उधळीलीं
निर्मल हृदयाच्या तबकावरि आत्मज्योत उजळी
उत्कट प्रेमें उत्कट हर्षें बंधुस ओंवाळी
बंधु-प्रीती विमल मानसीं अजवरि जी रुजली
तबकामध्यें भाउराय ती ओंवाळणि घाली
बंधुभगिनिचें मीलन जणुं हें प्रीती भक्तीचें
या दृश्यावरि लक्ष असावें महाराष्ट्रभूचें

× × ×

फुलें सुगंधी एका उपवनिं जिथें उमलतात
कोरांटीचीं गंधहीन ही तिथेंचि हंसतात
दोघांनाही सृष्टी जननी मोदें आलिंगी
भिन्नभाव नच धरितां प्रभुही धरी शिरोभागीं
निसर्ग ऐसा सद्गुरु असतां अम्ही मूर्ख जीव
धिक्कारीतों तया, न भजतां तत्पदराजीव
परस्परांचे मानसमोतीं ऐक्यभावनेनें
प्रेम-सूत्रिं जिथ निगडित होतीं संदेहावीणें

शुद्ध प्रीती मोद खरा वा सुयश विजय सत्य
जगदीशाचें अधिष्ठानही वसे तेथ नित्य
स्वर्गवासि शिवभूपतिचा सुत यवनांनीं वधिला
शाहु खलांच्यां बंदित, राजा जिंजीवासाला
परम करुण अति घोर भयंकर ऐशा समयातें
स्वतंत्रतेची मेढ टिकावी शक्य न हें होतें
स्वतंत्रतेची खुलिल न खुलली कळी तोंच तिजला
वडवाग्नीनें जाळायाचा विचार मनिं केला
स्वजनीं मत्सर, द्वेशबुद्धि ही तशाच दु:शंका
स्वदेशांत तइं असत्या तरि तुम्हि हे दिन बघतां का
खल कलहाग्नित कधींच तुम्ही भस्मसात होतां
जिवंत कोणी आज मराठा नयनां नच दिसता
' महाराष्ट्र ' जो स्व-देश म्हणुनी अभिमानें वदतां
रज:कण तरी आज तयाचा दृष्टिं काय येता
ईशदयेनें जरि तुमचा अजि असता अवशेष
तद्गति पुढतीं होती कैशी मनिं आणा लेश
ते गुण नसतां आज तुम्हांला काय जगीं मान
विचार याचा करुनी बोला स्थिति ही जाणून
शूर धनाजी जाधव यापरि ऐक्याचे पुतळे
होते म्हणुनी अजि तुमचा हा माथा कीं उजळे
क्षुद्र गणुनियां मतभेदाला एक देश-भक्ती

सर्वांतरिं कीं जाज्वल्यानें विहरत तइं होती
तरीच दिसतें जिवंत आजी 'महाराष्ट्र 'नाम
जिवंत रत्नें जिथें उपजती तेंचि धन्य धाम
निज देशाला जिवंत ठेवी तोचि पुरुष धन्य
वृथा प्रसवली तयास माता गमे बघुनि अन्य
ऐक्याभावें व्यर्थचि कीं हा पेशवाइ गेली
गेली गली स्वतंत्रता ती, पारतंत्र्य झालीं
उघडा उघडा वाचा वाचा गेला इतिहास
उगिच कशाला बळेंच पडतां अशा आग्रहास
ऐक्य थोरवी जयास कळली किंवा समजेल
भाउबिजेसम शुभ कालहि त्या तसाचि उमजेल

## ११९

# देशभक्तांचें आगमन

( जरी कुणा श्रीमंताची० या चालीवर )

देशभक्त येती सदनीं धन्य दिवस तोची
जन्म-सफलता खरि होई त्याच कीं दिनाची
नको जावयासी कोठें अन्य पंढरीला
नको आळवीणें नामें श्रीश विठ्ठलाला
नको चंद्रभागमाजीं स्नान करायाला
सर्व महति एकाचि ठायीं या त्रिसंगमाची

हृदय शुद्ध व्हावें म्हणुनी पुण्य धामिं जाणें
मधुर व्हावि वाणी म्हणुनी पुण्य नाम घेणें
पापशैल निवटो अपुले एतदर्थ स्नानें
देशभक्त-दर्शनमात्रें प्राप्ति ह्या त्रयीची

पुण्य धामिं यास्तव जाणें– आत्म-भूति व्हावी
पुण्य नाम यास्तव घेणें–आत्म-भूति-व्हावी
स्नान पुण्य यास्तव करणें–आत्म भूति व्हावी
साधणें परी ह्या स्वार्था मुळिं न महति साची

सकल भूतमात्राठायीं मीच एक राहें
तीच ममहि, जी तद्भूती, नित्य जाणताहे
जन्म मम तयांच्यासाठीं दिवस रात्र वाहे
असा हेतु ज्याचा मग त्या भक्ति ती कुणाची

अधिष्ठान जगदीशाचें–साधुविचारांत
अधिष्ठान जगदीशाचें–लोकरंजनांत
अधिष्ठान जगदीशाचें–देशाचिन्तनांत
त्रिखण्डांत राहे भरुनी गोष्ट थोरवीची

आर्यबन्धुंनो ! मग कसलीं काळजी वहातां
व्यर्थ दुष्ट चिन्तेनें त्या मना पोळवीतां
धरा धीर लव शुभ घडि ती नसे दूर आतां
देशभक्त ऐसे असतां वाण ती कशाची

१२०

## बाळा जो जो रे

बाळा ! जों जो रे । घननीळा । निज रे निज गोपाळा
होवो निद्रा ही । सुखदायी । पुढच्या तव शुभ कार्यीं
अवनी ही शान्त । निश्चिन्त । डुलते आनन्दांत
अपुलें मन तेंवी । तूं ठेवीं । जनहित तत्पर राहीं
क्षण जो आलेला । तो अपुला । व्यर्थचि नातरि गेला
घेई यासाठीं । विश्रान्ति । सोडुनि मनिंची भ्रान्ति
हंसणें वा रडणें । जगतीं या । तुझिया कृतिवरि सखया

१२१

## शुक-निष्ठा

( श्लोक )

श्री भारतीं विमलशा अनुशासनांत
पृच्छा करी म्हणुनिया मधुरा नितान्त—
भीष्में कथा कथियली जशि धर्मराया
मी तेंवि अल्प मतिनें वदतों वचीं या

( वीरा भ्रमरा० या चालीवर )

काशीराजा नामें नृप जो विश्रुत बहु भारतीं
जयाच्या अधिराज्या नच मिति

विजयपताका विमल यशाच्या दिगन्तरीं फडकती
जयाची प्रजानुरंजनिं मति
नानापरिचीं वनें उपवनें ठायिं ठायिं शोभती
बघाया परजनही लोभती
मधु फळें फुलें तरु गगनचुम्बि बहुगुणी
किलबिलाट करिती जिथें विहग सुस्वनीं
दणदणे पशूंच्या क्रूर भयद गर्जनीं
जलाल विष लावुनी शराग्रा, ऐशा विपिनामधीं
पातला मृगयेस्तव पारधी
चापाशी आकर्ण ओढुनी सन्धाना रेखिलें
बिचाऱ्या हरिणावरि निज बलें
चुकतां शर-सन्धान अचुक लव अनर्थ किति कोसळे
जाणतो तयालाच हें कळे
जन्मामाजीं बाण-शस्त्र तें स्वप्निं न कधिं देखिलें
खरोखर कळेल त्या कोठलें
सन्धान चुके साधिलें अचुक हातुनी
प्रभु-कृपें दीन तें हरिण जाय वांचुनी
परि हाय ! केवढा घात होय त्या क्षणीं
विश्वगोलका भूषणीय जो वृक्ष निकटिंचा असा
काल-शर भेदी हा ! त्या कसा

सौन्दर्याचा ऐश्वर्याचा केवळ निधि भूवरी
येइ त्या जरत्कारुता खरी
पुष्पें सुकलीं पर्णें गळलीं फळेंहि पडलीं तळीं
जीर्णता शाखांसहि पातली
विपत्काल आलिया कुणासहि होती रिपु मित्रही
नियम हा जाणति जगिं सर्वही
द्विजकुलें तदाश्रित जाति दुज्या तरुवरी
देखिती वन्य पशु छाया कुठली तरी
करवतीं तयाचे खण्ड खण्ड कुणि करी
अशी तरूची मानखण्डना जनीं चालली सदा
दिसेना हिताकर्ता कुणि तदा
बघतां तरुची दीन दशा ही सर्वांगें अशि परी
कळवळे एकचि शुक अन्तरीं
अशनजीवनावीण अहर्निश मायवृक्ष- चिन्तनीं
त्याच तो वृक्षिं राहि बैसुनी
कण्ठीं आला प्राण तयाचा ऐशा खडतर व्रतें
ठाउके तच्चित्ता मुळिं न तें
त्या दीन तरुविना दिसे न कांहीं तया
त्या कधींच जाती मर्त्य सुखें त्यजुनियां
सकलहि त्याच्या मनोवृत्ति तन्मया

पूर्वस्थिति ह्या प्राणप्रिय निज तरुला येइल कशी
शुकाच्या हेंचि एक मानसीं
शुक-भक्ती ही तरुवरची त्या एकनिष्ठ पाहुनी
तोषला सुरेन्द्र अपुल्या मनीं
मानवलोकीं कृतज्ञपण जें दुर्लभ बघतां दिसे
तेंचि या शुक-ठायीं किति वसे
लावाया शुक-निष्ठा निकषीं तत्सन्निध येउनी
पुरन्दर वदे शुकालागुनी: —
" तरु-वैभव सारें खल कालें हारिलें
मग कशास वससी प्रेम सोडिं येथलें
संवगडी जाति तव बघुनि अन्य सुस्थलें
प्रेतवताला कवटाळुनि ह्या आत्मघात करिसि कां
येथुनी त्वरित जाइं तूं शुका ! "

शुकः—

" नमन असो तुज इन्द्रा ! जरि तूं बटुवेषा घेतलें
तरी म्यां ज्ञानबलें जाणिलें
उदार हृदयी थोर विचारी लोकीं तूं म्हणविसी
उलट कां आचरसी कृति अशी
स्वस्थितिचें मज कांहिं न वाटे, बोल तुझे हे हरी
पाडती घरें काळिजा परी

तूं काय सुरपते ! निज ठायीं समजशी
कीं तुझीच ओळख मात्र सत्य नीतिशीं
का तूंचि एकला कृतज्ञता जाणिशी
तिर्यग्योनित देइं जनार्दन कृतज्ञता बुद्धिला
बाध कां करिसी मग हा मला
बोधावा सद्धर्म जनां त्वां अधर्म मग मज कसा
स्वधर्मी असतां शिकविशि असा
मद्‌—बन्धूगण सोडुनि गेले, जाइनात बापुडे
धरिति पथ तयांस जो आवडे
कृतघ्न होउनि तसाच मीही स्वभूमिच्या प्रीतिला
पारखा होउं काय वद मला
या जन्मभूमिचा खरा भक्त मी जनीं
ढळणार कधींहि न निज व्रतापासुनी
मग पिता वदो वा ब्रह्मदेव येउनी
उदरासाठीं निज भूमीला, कर्तव्या का त्यजूं
कुणाला जगांत मग मी भजूं
तरुवरि ज्या मम पूर्वज जन्मति, जिथें मृत्यु पावती
माझिही जन्मभूमि हीच ती
हिरवीं पानें मृदु सेवुनि मम पक्ष तेंवि जाहले
पिउनि रस समरसपण लाधलें

फळें शेंदरी रुचिकर भक्षुनि कण्ठ चंचु शेंदरी
तरुण हो शिशुचा ज्या तरुवरी
वैभवीं जयाच्या वैभव उपभोगिलें
ज्यावरीं सर्वथा निज प्रेम ओतिलें
पारध प्रसंगीं लपवुनि मज रक्षिलें
विपदेमाजीं असतां प्रियतम वृक्ष सनातन असा
बोल त्या सोडुनि जाऊं कसा

ज्याची तनु ही जन्मापासुनि तयाच्याच सार्थकी
हवी ती झिजवाया जगतिं कीं
ज्याच्या ठायीं अमोल ऐसे सद्गुण मज लाभले
जयें कीं तुजला मीं जाणिलें
ज्यानें मजवरि मातेच्यापरि निज प्रेम दाविलें
काय ती मातृभक्ति तुज कळे

मी जिवन्त अजवरि ज्याचिं फळें भक्षुनी
दुजिं काय सेवुनी जगूं, त्यासि त्यागुनी
कल्पनाच ही किति तापद हो मन्मनीं

थोरपणा तव लव न गणीं मी, विषयामधि या हरि
मजहुनी अति श्रेष्ठ तूं जरी
' करूं नको तूं पवित्रतम ह्या जन्मभूमि-भक्तिला '
कोण तूं असें कथाया मला

प्रमोद, सुख तें स्व-देश भक्तित वाटतसे किति तरी
कशी तुज कळेल ती माधुरी
अनुकम्पेचें ढोंग करुनि तूं अभद्र वाणीं अशी
वदोनी कशास मज फसविशी ॰
धनी न हो तूं पापाचा या, मजलाही नच करीं
फिटेल न कधिं तें जन्मान्तरीं
मन्मार्ग तुला रे ! दिसे न बरवा जरी
तूं जाईं परतुनि सुखें आपुल्या पुरीं
बोधास अधमशा बोधुं नको मज परी
'वृक्षा आधीं मरशिल तूं रे' असें जरी बोलिला
त्यांत बहु तोष होय हरि ! मला"

इन्द्रः—

"परा भक्ति ही स्वर्गचि मिळण्या करिसि न कां पांखरा
खचित तुज नेतों चल सुरपुरा"

शुकः—

"स्वर्ग तुझा लखलाभ तुजशिं हो आस कशा दाविशीं
जाइं तूं स्वमुख न दावीं मशीं
शक्यचि तरि तो स्वर्गच मी या तरुठायीं पाहिन
सुखें वा इथेंचि मृत होइन"

इन्द्रः—

"मग काय इच्छिसी बोल बोल द्विजवरा"

शुकः—

" गत वैभव लाभो या मत्प्रिय तरुवरा
यावीणें अपेक्षा दुजी न या पामरा "
प्रसन्न होउनि अमृत तरुवरी हरिनें तइं सिंचिलें
पुन्हां त्या वैभवगिरिं चढविलें

× × ×

ज्या देशामधिं मातृभूमिचे खरे दास निपजती
तेथली वर्णू महती किती
पृथ्वीचा ते स्वर्ग करीती स्वोत्कट भक्ती-बलें
म्हणुनि जग अजवरि स्थिर राहिलें
स्वर्ग निरय तो इथेंचि वसतो. आपुल्याच कृतिवरी
शोधणें नलगे ग्रन्थान्तरीं
सद्भक्ति आर्यजन ! करा स्व-देशावरी
निज धर्म बाळगा सदैव अपुल्या उरीं
निज सत्त्वापासुनि न ढळा कधिं तिळभरी
करील करणी होइल नर तो नारायण भूवरी
साधुची हीच वदे वैखरी

× × ×

( श्लोक )

लाभो जो म्हणतो, स्पृहा परम जी आनंद जीवा खरा
व्हावें सौख्य अपार दुःख हरुनी प्रार्थीत जो ईश्वरा
यत्नांतें करि जो सदैव मिळण्या चित्तास शान्ती खरी
भक्ति प्रीति खरी अहर्निश करी तोचि स्वभूमीवरी
ज्या हो क्लेश अतीव बन्धु विपदीं पाहूनि लोकान्तरीं
स्वार्थाला तिळमात्र मोल नच दे जो पाहि विष्टेपरी
मुक्ती बन्धन भेद ज्यासि कळतो, सन्मार्ग जो आचरी
भक्ति प्रीति खरी अहर्निश करी तोचि स्वभूमीवरी
व्हावा जन्म जगांत धन्य अपुला इच्छा अशी जो धरी
बाहे जो निकटीं निरन्तर वसो श्रीशेषशायी हरि
हीनत्वीं सुरलोक नेत्रिं बघण्या सोत्कण्ठ जो अन्तरीं
भक्ति प्रीति खरी अहर्निश करी तोचि स्वभूमीवरी

१२२

# चंद्रावलोकन

( मज गमे ऐसा० या चालीवर )

खेळ रे चन्द्रा ! अम्बरीं । सन्मनानें
कशास बघसी भारतदेशा
काय इच्छिसी हेतुस ऐशा
होइल अन्तीं तुझी निराशा
सोडिं सोडिं हा मोह झडकरी
तूं रमणारा स्वतंत्र धामीं
रुचेल थोडिच तुज ही भूमि
जरि असली ती भुवनललामीं
तरी आज परतंत्र पंजरीं
दिव्य बघाया क्षितिजीं येशी
काय पडे तों तव दृष्टीशीं
हीनपणा ये बहु आर्येशीं
पूर्वि बघसि जी विभवमान्दिरीं
प्रवेशितां नभिं प्रफुल्ल दिससी
परत जाशि तैं खिन्नचि होसी
कारण वाटे एक तयासी
परवशता भारता महिवरी

अपराधाविण पायिं शृंखला
दुर्दैवें पातली कुणाला
स्वतंत्रतेनें विहरे त्याला
बघुनि रुचावें केंवि अन्तरीं

काल एक रे ! असाचि होता
कुणिहि बघावी भारतमाता
तृप्त कराया नयनां चित्ता
तद्यश-गानीं श्रमे वैखरी

तिलाच बघ अजि अखिल जगानें
करुनि बहिष्कृत, अभिमानानें
सदैव ताडावें खल वचनें
पूर्व स्मृति ती विसरुनी परी

पालक सगळ्या जी जगताची
तीच विनवणी करि दुसऱ्याची
कुटिल गति खरी त्या कालाची
याहुनि दुसरें काय म्हणुं तरी

तुजसम सज्जन अनुकम्पेला
दावुनि ढाळिति करुणाश्रूंला
भारत—सुत जों वश निद्रेला
काय तयांची महति तोंवरी

१२३

# आत्मकल्याण

( तूं टाक चिरुनि० या चालीवर )

इच्छितां काय जनिं मान । आत्मकल्याण
सोडुनी तनूचा ह्या धरा निज राष्ट्राचा अभिमान
जाळिलें पोळिलें ज्वलनीं
गिरिवरुनि लोटिलें धरणीं
धरि अखण्ड निष्ठा वचनीं
तेव्हांच मिळे प्रल्हादा जगतीं " भक्तमणी " बहुमान
त्यागिलें सुखा सगळ्याही
जरि सान वयें ध्रुव पाहीं
वायूस भक्षुनी राही
जगदीश तरिच भेटे मिळवि तो विश्वीं अचलस्थान
असहाय स्थिति निज जाणें
गुरु जनीं भक्ति दृढ बाणे
कर्तव्य करुनि धैर्यानें
या राष्ट्रिं रोंवुनी भगवा झेंडा गाजवि ' शिव ' अभिधान
जाळिला क्षुद्र संसार
निज राष्ट्र मानि घरदार
जन्माचें शिकवी सार
म्हणुनीच बोलती रामदास तो केवळ ईशसमान

कर्तव्यिं जागरुक फार
निज धर्मीं भाव अपार
करिल तोचि आत्मोद्धार
सहज का मिळाला आजवरी हा स्वातंत्र्याचा मान

१२४

## विश्वामित्राची याचना

( श्लोक )

प्रथम होउनि नृपा ! वचनांकित
करिसि भंग मग हा, नच शोभत
रविकुलीं अयश हें कुणिं घेतलें ?
स्वकुलकीर्ति मनिं वागविं आपुले

( वीर शिरोमणि० या चालीवर )

दीन वदन तूं केलें राया ! वचना या परिसुनी
काय तुज रुचे न मम विनवणी
सकल महीचा पाल म्हणविसी. त्राताही या जगीं
न शोभे कृति तुज ही वावुगी
आर्त जनांच्या आर्त रवांना शान्तविण्या कोण तो
नृपाविण थोर दुजा राहतो

मग समर्थ भूपचि हतबल होतां स्वतां
जगिं कोण तयाची वारिल ती दीनता
कुणि शक्त असा का बोल बोल तत्त्वतां
रिता होय घट भरिल तया कुणि टाकुनि जल सत्वरी
सागरा भरतिल कुणि कुठवरी
ज्याच्या योगें मोहीं गुंतसि पुत्र तोचि राजया
इच्छिला प्रभुजवळीं कासया
स्वराज्य-वृक्षा विश्व—विभूषण रुचिर पुष्प येउनी
तोषवो समस्त ही मेदिनी
गृहीं बसुनि हीं काय सदिच्छा फलद्रूप जाहली
कुणाची, जगतीं त्वां देखिली
हा मनुज प्राणी वाणिज या भूवरी
निज गुणावगुण जइं विक्रय जगतीं करी
तरि होय परीक्षा तदाच त्याची खरी
फलास नुसतें बघुनि लोचनीं कळेल का माधुरी
केंवि शशि उगवे अन्धान्तरीं
अधिपद दिधलें पृथिवीचें ह्या परमेशानें तुला
भोगण्या नच रे ! सुख सोहळा
प्रजानुरंजन तुवां करावें झटूनियां सर्वदा
तयांच्या वारुनियां आपदा

समान दुःखीं सुखीं असावें, प्रजानुनय-चिन्तनीं
विचारा रमवावें निशिदिनीं
तव सिंहासन हें तन्मानसिं जाण पां
तन्मुखीं स्तुती जी तीच कीर्ति तव नृपा
तन्मोद हींच रे! यशःसिद्धि तव तपा
तद्विरहित तव वर्तन घडतां किंचित् राजेश्वरा
तयांना कृतान्त वाटे बरा
प्रजानुरंजन व्रताहुनी नच खडतर व्रत दूसरें
असेलचि, सोडीं हा भ्रंश रे
माळ्यावरुनी अजा हांकणें—नव्हे प्रजारक्षण
वृथा वा करणें मधु भाषण
करभारें भाण्डार फुगाविणें—नव्हे राज्यवैभव
दाविणें भावि काल वा नव
वेंचणें प्रति क्षण जनता-हित कारणें
सन्तोष शान्ति सुख द्याया निधि लुटविणें
जनतामय व्हावें केवळ त्वां नृपतिनें
'पिता खरा हा भूपचि अमुचा' ऐशी दृढ भावना
पाहिजे व्हाया जनतामना
तुझा स्वतांचा तूंचि नससि रे नराधिपा! मालक
नृपतिचा जनता ही चालक

कलत्र दारा सकल सम्पदा ताशी अणुरेणूवरी
सत्ता जनतेचिच ती खरी
' जनतेचें कल्याण ' एक हा नृपा सतत जप हवा
होतसें जनता-हित तेधवा
मग प्रसन्नता तव मुखीं न कां झळकली
खिन्नताचि अवघी गोचर कां जाहली
मानिसी काय तूं अम्हांस अपुल्या स्थलीं
जनता रामीं बघशिल जेव्हां, स्वकर्तव्य जाणिलें
तरिच रे ! तुवां खचित आपुलें
खलतापानें अमुच्या नयनीं वाहति अश्रूसरी
इथें तूं पोहसि सुख–सागरीं
क्षुधा तृषेनें व्याकुळ अमुची दैन्यावस्था अशी
इथें तूं मोदमग्न राहसी
प्रभुदानाचें महत्त्व कांहीं आणिं जरा अंतरीं
बुडूं नको व्यामोहीं तिळभरी
तुजलाच काय सुत नृपा ! तुझा लाडका
त्यावरिचा जनता–स्नेह न का मुळिं निका
नच विकल्प आणीं सर्वथैव हा फुका
नेता, त्राता, भावी जनिता अमुचा निःसंशय
अम्हांला प्राणाहुनि तो प्रिय

( दिण्डी )

कळे यापरि निर्धार गाधिजाचा
राम सुकुमारा सर्वं न्यावयाचा
राज–धर्में अनुमती देइ भूप
परी कोन्दे तच्चित्तिं तम अमूप

१२५

## तारकांचें मनोराज्य

( जरि नाहिं कमल० या चालीवर )

हा चारु मधुर चन्द्रमा । त्यजुनि रक्तिमा
वरी सुषमा । पातला अम्बरधामा

चौकटी घनाची करुनि । बळें फसवुनी
तींत धरुनी । त्या, वदति रमूं उडुरमणी

बिघडला काय श्रृंगार । रम्य जरि फार
श्रमुनि अनिवार । नटविली तनू सुखसार

त्या अचल शान्त दर्पणीं । बघूं निरखुनीं
मुकुर गणुनी । येईल खरें समजुनी

मधु विलास करुं नर्तनें । मंजु भाषणें
कौतुकानें । रंजवूं तया सन्मनें

कुमुदिनींस तो चुम्बुनी । सुधा वितरुनी
खुलवि हंसुनीं । निकटिंच्या अम्हां त्यागुनी

त्याभंवतिं मिळूं सर्वही । दृष्टि त्याचि ही
कधिं न जाई । कीं, तयांवरी अल्पही

मग लाभ तयां प्रीतिचा । मिळे कोठचा
तिच्यावरिचा । अधिकार सर्वथा अमुचा

हा विचार करुनी मनीं । सर्व कामिनी
स्नेह नयनीं । त्याचिया जाति मागुनी

तइं मीलन हो चक्षुंचें । ललित मूर्तिंचें
उभयतांचें । मूढ हो चित्त युवतिंचें

नेत्रांची शर पल्लवी । कोण उमटवी
हृदयिं शिकवी । त्या परी मना चालवी

तन्मनोराज्य आधिंचें । होय हृदयिंचें
विफल साचें । दर्शनें अहा ! इन्दुचें

ही जादु नेत्र-मीलनीं । प्रणयि प्रणयिनी
काय भुवनीं । अनुभविती रात्रंदिनीं

कृत निश्चय तें लोपती । जगा विसरती
काय धरिती । निर्बंध राहिना मति

घनपंक्ति पुढें, शशि मधीं, । सख्या मागुती
विचरताती । प्रेक्षण तें तोषवि किती

१२६

# प्रणय-कोप

( तरुण कुलिन गोरा० या चालीवर )

त्वरित गड्या येईं । माधवा ! त्वरित गड्या येईं
असशील कुठें जरि तसाचि येई करीं करीं घाई
तुज गोष्ट एक मज सांगायाची असे
त्यासाठीं तुजला भिर भिर मी बघतसें
परि तुझा कुठेंही माग लागला नसे
न घडे हें कधिंही । माधवा ! न घडे हें कधिंही
मज भेटायाची आजाचि तुजला बुद्धि न कांशि होई
अधिर बहू झालें । माधवा ! अधिर बहू झालें
सांगेन गोष्ट ती तुला कधिं असें होउनि मज गेलें
या अधिरपणें ती जाइन कीं विसरुनी
मग कुठली सांगूं गोष्ट तुला मीलनीं
तइं उलट तूंचि मज बोलशील बोलणीं
पापचि हें आलें । माधवा ! पापचि हें आलें
मजपुढें वाढुनी, तुज कथण्याचें उगिच मनीं अणिलें
नवे नवे येती । माधवा ! नवे नवे येती
सन्देह मनामधिं, कुणा विचारूं त्याची स्फुट रीति
तूं अससी माझा जीवाचा संवगडी
तुजवरीच चाले माझी सगळी उडी

इतरत्र जाण रे ! केवळ मी बापुडी
खरोखरी भ्रान्ति । माधवा ! खरोखरी भ्रान्ति
म्यां स्मरण करावें तुवां नसावें जवळीं वा पुढतीं

कोप काय आला ? माधवा ! कोप काय आला
गत निशीं चुम्बितां हळुंच वळविलें अपुल्या मीं गाला
तदुपरि श्रीहरी ! कितिक तुवां चुम्बिलें
श्वासही टाकण्या क्षण नच मज सोडिलें
करुं काय ! शेवटीं तवच ओठ भागले
बोल बोल बोला । माधवा ! बोल बोल बोला
मीं ' नको ' म्हणुनि का म्हटलें ? तेव्हां राग तुला कसला

वेणु गळुनि पडली । माधवा ! वेणु गळुनि पडली
तइं सहज विनोदें खालुनि उचलुनि तव करिं नच दिधली
परि सांग मला तूं त्वां जगिं जें त्यागिलें
तारील कोण तें किंवा कुणिं रक्षिलें
विपरीत वळण हें काय जगा लागलें
मात कुणीं केली । माधवा ! मात कुणीं केली
तुजवरी अशी ही, गोष्ट खचित म्यां अजुनि न ऐकियली

वेळ न लावि अतां । माधवा ! वेळ न लावि अतां
मम आनंदाचा घेइं भाग तूं, कोण तुझ्यापरता
त्या आनन्दाचा लाभ तुझ्याकारणें

नैवेद्य तयाचा तुला अर्पिल्याविणें
काशि सेवूं, मम हें कृतघ्न होइल जिणें
विचारिं तव चित्ता । माधवा ! विचारिं तव चित्ता
भोगण्या सुखा ज्या सुहृद नसे तो हतभागी पुरता

× × ×

कशास आलासी । माधवा ! कशास आलासी
कुणिं पाचारियलें तुजला, श्रम हे वृथा घेतलेसी
शोषविला अपुला गळा तुझ्यास्तव कुणीं
नुरविला थेंब का रडुनि कुणीं लोचनीं
नवस का बोलिले कुणीं जीव तोडुनी
न दाविं वदनासी । माधवा ! न दाविं वदनासी
तुज काय वाटलें गरज असे ह्या अपुली अबलेसी
सांगणार नाहीं ! माधवा ! सांगणार नाहीं
तुज गोष्ट आपुली खचित जीविंची केलें जरि कांहीं
म्यां कसें एक नव रुचिर चित्र देखिलें
उभयतांस अपणा कसें त्यांत रेखिलें
छे ! मुळिंच सांगणें नको तुला त्यांतलें
पहा चाललें ही । माधवा ! पहा चाललें ही
तूं येशि जसा हा तसाचि जाई परतुनि निज गेहीं

× × ×

( श्लोक )

पदां वळवितां तदा पहुडली कुणाच्या भुजीं
हनूस धरुनी अहा ! मुदभरें पुसे कृष्णजी:—
" असेंच मधु चित्र तें चितलें तुवां का स्वयें
मुखा न फिरवीं अतां प्रणय-कोप दावीं सये ! "

## १२७

# विवाह मंगलाष्टक

( श्लोक )

शैलाग्रीं वसते नदी उदधि हा भूमीपदीं खेळतो
कोणाचा सुत कन्यका तशि जगीं कांहीं न संबंध तो
त्यांचें मीलन हें अकल्पित असें दावी जना रम्य जो
होवो तो[1] शुभदायि या वधुवरा—कुर्यात् सदा मंगलम्
नाहीं रूप न गंध तेंवि अभिधा, निर्देश ज्यासी नसे
विश्वाचें परि सूत्र चाळवितसे इच्छाबलें हें कसें
प्रत्येकीं हृदयीं तरी वसतसे अव्यक्त ज्या बोलती
होवो तो[2] शुभदायि या वधुवरा—कुर्यात् सदा मंगलम्
भालीं इंदु शिरीं पवित्र सलिला भागीरथी जो धरी
कोपें कांपवि कोपतां चळचळां ब्रह्मांड सारें परी
चर्ची अंगिं विभूति भूति तरि दे दीना जना जो सदा
होवो तो[3] शुभदायि या वधुवरा—कुर्यात् सदा मंगलम्

---

१ ईश. २ परमात्मा. ३ श्रीशंकर.

## आनंद-गीत

जेथें सर्वहि तेज एकवटलें, भानू जणूं चंद्रमा
संहारी असुरां, सुरां अभय दे सीमा न यद्विक्रमा
जीच्या योगबलें सचेतन दिसे त्रैलोक्य संपूर्ण हें
होवो [1]ती शुभदायिनी वधुवरा–कुर्यात् सदा मंगलम्

येती सात्त्विक भावना विमलता ठेवी सदा मानसीं
विश्वप्रीति खरी जगास शिकवी आत्मप्रभावें तशी
कर्तव्यीं करि सावधान विबुधा, प्राचीनता जाणवी
होवो [2]तो शुभदायि या वधुवरा—कुर्यात् सदा मंगलम्

विश्वा चंचलचित्त जो करितसे कोलाहलें केधवा
आनंदोदधिं पोहवी स्थिर मनें कौतूहलें या भवा
थोरांना नमवी पदीं सहज जो, सेवा कुणाची करी
होवो [3]तो शुभदायि या वधुवरा—कुर्यात् सदा मंगलम्

देहीं क्लेश अपार साहुनि जयें आर्यत्व संपादिलें
आली हीन दशा तरी स्वधृतिनें ज्यांनीं तया रक्षिलें
यन्नामामृत सेवितां परम हो संतोष जीवा सदा
होवो [4]ते शुभदायि या वधुवरा—कुर्यात् सदा मंगलम्

जावो दृष्टि कुठेंहि ये अनुभवा निर्व्याज सौंदर्य तें
श्रीरामासम भूप सत्यवचनी, सीता सती हो जिथें
भक्तीचा ध्वज अंबरीं फडकला, गीता जिथें जन्मली
होवो [5]ती शुभदायिनी वधुवरा—कुर्यात् सदा मंगलम्

---

१ शक्ति. २ सनातन धर्म. ३ काल. ४ महात्मे. ५ आर्यभूमि.

१२८

# हिन्दभूमीचें सौभाग्य

( सबसे राम० या चालीवर )

सौभाग्य हिन्दभूमीचें । राखा राखा आर्यांनो !

ढळ ढळ अश्रू गाळित होतां महाराष्ट्र-भू ज्या कालीं
शिवरायानें देह अर्पुनी तिला हंसविलें तइं गालीं
सन्ताजीच्या समशेरीनें विमल तिचें यश गौरविलें
त्या बाजीनें परम भक्तिनें दिगंतरीं तिज चमकविलें
चतुर बुद्धिनें अरिला दिपवुनि करि सन्तोषित तिज नाना
परशुराम तो बाहुबलानें स्पर्शुं न देई तिज कवणा
तेव्हांपासुनि दुर्दैवें परि तद्यश गाजी कुणि न दिसे
व्याकुल हृदयें तृषित लोचनें भिर भिर वेडी पाहतसे
मंगल कुंकम तिचें यशान्वित काल करें पुसुनी राही
तिलक बाल हा उरे कपाळीं आणा हृदयीं तरि कांहीं

१२९

# आर्यांची-शान्ति

( सेवि रविकरा० या चालीवर )

रणधीर वीर हो । कोठवरीं शान्ति खरी
नाहीं चिन्ता । जोंवरि चित्ता । तोंचि दिसे ती बरी
प्रतिक्षणिं ती रडवितसे । आर्य-हृदय जाळितसे
कठिण स्थिति ही । सकलां येई । काय नुमज अन्तरीं
आर्यांचा आर्य देश । उचित त्यांस सुखविशेष
परि उफराटें । घडुनी येतें । वृत्ति होय बावरी
पूण्यभूमि आर्यांची । मंगल कृति करण्याची
शुचिता समता । किमपी नसतां । कशि घडेल ती तरी
भरतखण्ड आर्यांस्तव । सद्‌-ग्रंथीं हाची रव
परि परधामीं । सुख तें नामी । मानिती निजान्तरीं
आर्यांचा आर्यपणा । उरला का परि जाणा
निज धर्मातें । कर्तव्यातें । तुडविति ते पदतळीं
क्षितिवरची आर्यधुरा । म्हणुनि जाय परदारा
अवनत होई । अन्याठायीं । क्षिति न मुळीं तिळभरी
जो अपुली प्रिय रमणी । धाडि सुखें परसदनीं
त्या वर्णाया । शब्दि न माया । मूक होय वैखरी
विसरे कर्तव्य, धर्म । विभव जाय निघुनि तिथुन

नष्ट दशा ही । अपाप येई । अपराधी नच हरी
ये निवासिं कुदशा ती । तिजचि म्हणाति जन शान्ति
रीती ऐशी । चाले देशीं —। कोणत्याही, महिवरी
आनन्दें भग्न त्रिजगी । दृढ धरिती करपाशीं
त्यागुनि माता । परकी वनिता । नाचविती निज शिरीं
'शान्ति' 'शान्ति' म्हणुनीया । जप जपती बैसुनियां
निज राष्ट्राला । परि अवनतिला । नेति ते किती तरी
भोगितां अतीव शान्ति । मोहें हो व्याप्त मति
जडता तनुतें । सहजीं जडते । जाइ चपलता दुरी
नोहे ही शान्ति खरी । चैतन्या दग्ध करी
मानवतेला । खल ग्रहणाला । लावि ती खरोखरी
प्रथम शान्ति रम्य गमे । यास्तव हें चित्त रमे
परि अनुभूति । येई अन्तीं । वारयोषितेपरी
नामशेष जगतांतुनि । शेवटिं ते होति म्हणुनि
नाहीं वर्धन । कोठें कृतिविण । जग कथी परोपरी
आलस्यें मनुजाचे । जड फत्तर हो साचे
दीन मतीचे । हीन कृतीचे । सढळ मात्र वैखरी
दृढ यत्नें पाषाणा । येइ दिव्य देवपणा
वाजे भेरी । तरिहि न वारी । काळ झोंप अजवरी
जगत चाललें पुढतें । कां तुमची मति अडते

स्वप्न तुम्हांतें कैचें पडे तें । विशद करा झडकरी
मर्दपणा मावळला । जीव होइ हा दुबळा
मन अविकारी, । वाटे भारी—। मधुर वसति शवेरीं
तेजानें नेत्र दिपति । बघतां त्या पद्द फिरती
कुणि दाखवितां । धिक्कारीतां । गणुनि तया तस्करीं
स्वाभिमान मुळिं नुरला । बन्धुभाव हारपला
याची प्रचिती । अजुनि न चित्तीं । काय तुम्हां ये खरी
शान्तिवारुणी पिउनी । धुन्द तुम्ही स्वस्थानीं
धुन्दी जातां । स्थिर मन होतां । मग कळेल माधुरी
कीर्ति पूर्वजें वरिली । धरणी ही रंजविली
तुमच्या सु-मतें । कारण त्यातें । काय शान्ति खेचरी
जगणें वा मरणें हें । अजि तुमच्या करिं राहे
सत्य वदे हें । व्यर्थचि नोहे । वचन काव्य-मंन्दिरीं

१३०

# चंद्रिका

होय लोभन नव चन्द्रिका-विकास
    मुदित विश्वा ! हो धरुनि तिची कांस
रवि-वियोगें तव खिन्न दशा झाली
    म्हणुनि तिजला बहु कींव तुझी आली
कुमुदिनींनो ! हा पर्वकाळ येई
    करा स्नानें ह्या पावनीं प्रवाहीं
हंसा, नाचा, बागडा सखी-संगें
    तदागमनें सृष्टि ही मनीं रंगे
पाठ धूका ! तूं गाइं चन्द्रिकेचा
    तीच कारण ही तुजासि फुटे वाचा
उचित तेव्हां फेडणें तदुपकार
    ' जगत अवगणि मज ' हा न करिं विचार
बा चकोरा ! ये अंकिं बैस तूर्ण
    तुझी जननी आमोदिं दंग पूर्ण
प्रेम-पान्हा अनिवार होय तीतें
    किती भूमीवरि सांडिलें पयातें

शान्त ऐसा हा समय महाभागा !
काढिं शोधोनी जनोद्धार मार्गा
दिनीं कोलाहलिं मन न होइ जागें
आर्त जन हा तितुकाच रुाहि मागें

१३१

## बालक

( भूपती खरे ते० या चालीवर )

हा विश्वरसाचा मोदरसाचा प्याला
सप्रेम रसिकवर करिं घ्या 'बालक' आला
प्राशून सुधेला चिरंजीव व्हा जगतीं
ह्या ब्रह्माण्डाची उभारणी यावरती
त्रैलोक्य लयाला जाई । जेधवा
लघु रूप देव तो घेई । तेधवा
मग होइ तदात्मा विस्तृत सृष्टिरुपानें
शोधावें मूला वस्तुमात्रिं मनुजानें

१३२

## भारतास सन्देश

( भक्तासाठीं तो जगजेठी॰ या चालीवर )

ऊठ ऊठ भारता ! कुठवरी निद्रा घेशी अशी
जागृती येइ न अजुनी कशी
एक शतक जाहलें तरी तूं निद्रित भूमंडळीं
सुचेना काय म्हणावें मुळीं
किती दिवस घ्यायचें ठरविलें सुखी झोंप ही अशी
असेलचि निश्चित तव मानसीं
का कुम्भकर्ण कर ठेवि शिरीं तूझिया
जाहला कुलक्षय सुषुप्तींत ज्याचिया
अणुमात्र तरी ती कळलि न वार्ता जया
निगाढ निद्रा हवी होती तर मुचकुन्दासम तुवां
याचिलें कां न तदा माधवा
असा शिवाजी, तैसा नाना, शूर रघोजी खरा
बाजी स्वामिभक्त तो पुरा——
वदसी विक्रम भीषण करुनी त्यांनीं जग दिपविलें
स्व–नामा अजरामर ठेविलें
कोप चढे ब्रह्माण्डा तुझिया कुणीं तयां निंदितां
न मावे हर्ष नभीं वन्दितां

मी वंशज त्यांचा अभिमानें म्हणविसी
तें रक्त खेळतें माझ्यामधिं बोलसी
हें सत्य जगाला सर्वथैव पटविसी
परी तुझें कर्तव्य आजचें हेंचि खरें इष्ट का
यांतचि मोक्ष-लाभ का निका
करा आणखी कागद गोळा अपुरी ही माहिती
म्हणसि तूं संशोधनिं वाण ती
पूर्वज-परिचय करुनी घेशी मोदें श्रम घेउनी
खरोखरि धन्यचि तूं या जनीं
करीं विचारा परी भारता ! यावरुनी निज मनीं
असे तुज इतुकिच मम विनवणी
तूं करिसी ज्या ह्या पूर्वज-संशोधना
ह्या लोकिं होति ते ' खरे मनुज ' म्हणुनि ना
मग दुजें त्यांत तुज दिसे न का त्याविना
तव पुत्रादिक पुढतिं असें तव करुं जातां शोधन
काय त्यां येइल रे ! समजुन
ढळ ढळ अश्रू गाळतील तैं पाहुनि तव ही दशा
होतिल शून्य तयां दशदिशा
परम्परा खण्डिली आमुची मानव्याची खरी
म्हणुनि तुज निंदितील बहुपरी

परम्परेचें महत्त्व कांहीं तुझ्या पाठिशीं तरी
दिसेल न तेंहि तयां तिळभरी
होईल तयांची स्थिति पुढतीं कोणती
याविषयीं बोलते काय तुझी सन्मति
तें सांग सांग तूं तव चरणीं मम नति
त्रिशंकूपरी लटकत बसतिल आधाराविण जगीं
नसे ही तर्करीति वावुगी
ऊठ, ऊठ, झडकरी फेंकिं तो मऊ बिछाना तुझा
आळसा करीं भयंकर सजा
गत इतिहासा लपवुनि शौर्यें पुढें आणिं आपुला
आचरीं कृति अशि तूं निस्तुला
दिपवुनि टाकीं जगत असें कीं इतस्ततां तूंचि तूं
ध्यानिं मनिं स्वप्नींही तूंचि तूं
श्रोता न कुणाचा यापरि राहीं भवीं
चैतन्य-शक्तिची तूंचि वेणु वाजवीं
त्या स्फूर्ति रवांनीं सकल लोक डोलवीं
करीं बांसरी येई तुझिया देउं नको फेंकुनी
भारता ! उमज उमज बा मनीं

पत्नीचें शिर उडवाया
सज्ज होइ खन्ति न हृदया
सत्त्वातें निज रक्षाया
नृप हरिश्चन्द्र–करिं विराजिली जी तीच काय गे ! ही

कष्टत फिरला रानिं वनीं
परि न होय नत अरिचरणीं
प्रतापराणा वीरमणी
जगिं जिच्या सहायें पुन्हां विभविं ये तीच काय गे ! ही

यवनांचें तोडुनि जाल
मुक्त करी परवश काल
स्वजनांचे चुकवी हाल
जी म्हणति भवानी शिवरायाची तीच काय गे ! ही

हा महाराष्ट्र जो अपुला
उचलून जियेनें धरिला
यवनाब्धिंत बुडुं नच दिधला
जी खऱ्या संकटीं खरी चमकली तीच काय गे ! ही

रणिं पडतां विश्वास गडी
रण-कल्लोळीं टाकि उडी
चर चर कापी शत्रु थडी
तो भाउ जिच्यासह अभय मनानें तीच काय गे ! ही

१३३

# लांकडी तरवार

[ प्रसंगः—दसऱ्याच्या दिवशीं मुलानें हट्ट धरल्यामुळें त्याची आई त्याला लांकडाची तरवार देते. त्यावर तो आईस म्हणतोः—]

( तूं टाक चिरुनि० या चालीवर )

तरवार लांकडी ही । देशि आई
समशेर बोलती जिला सकल जन तीच काय गे ! ही
पूर्वजें घेउनी स्व-करीं
तळपविलि विजेसम समरीं
विक्रमा दावुनी भारी
पळविण्या लावि जी अजिंक्य शत्रू तीच काय गे ! ही
तेज जिचें बघुनी नयनीं
जग थरथर कांपे स्वमनीं
आर्यांची प्रियतम रमणी
जी प्राणासम कटिं राहि निरन्तर तीच काय गे ! ही
तोडुनी मान दैत्यांची
नुरविली भीति देवांची
सुरवरें अर्पिली साची
ती जगज्जननि जी करीं धरी निज तीच काय गे ! ही

पत्नीचें शिर उडवाया
सज्ज होइ खन्ति न हृदया
सत्त्वातें निज रक्षाया
नृप हरिश्चन्द्र—करिं विराजिली जी तीच काय गे ! ही

कष्टत फिरला रानिं वनीं
परि न होय नत अरिचरणीं
प्रतापराणा वीरमणी
जगिं जिच्या सहायें पुन्हां विभवि ये तीच काय गे ! ही

यवनांचें तोडुनि जाल
मुक्त करी परवश काळ
स्वजनांचें चुकवी हाल
जी म्हणति भवानी शिवरायाची तीच काय गे ! ही

हा महाराष्ट्र जो अपुला
उचलून जियेनें धरिला
यवनाब्धित बुडुं नच दिधला
जी खऱ्या संकटीं खरी चमकली तीच काय गे ! ही

रणिं पडतां विश्वास गडी
रण-कल्लोळीं टाकि उडी
चर चर कापी शत्रु थडी
तो भाउ जिच्यासह अभय मनानें तीच काय गे ! ही

फेंकुनी मराठी दण्डा
भेदिलें यावनी गण्डा
अटकेस रोंविला झेण्डा
त्या जिच्या बळावरि म्हणति भरारी तींच काय गे ! ही

" अपयशें मुळीं नच भेणें
गत विभव मिळवुं शौर्यानें "
जो प्रभुस बोधि ह्या वचनें
त्या बापूसह जी होय कालवश तीच काय गे ! ही

स्पर्शानें जिच्या हो शूर
लक्ष्मी सती रणधीर
विक्रमें लाजवी वीर
करि विफल दुष्ट निर्धार शत्रुचा तीच काय गे ! ही

मज कांहिं न कथिसी जननी
तव वृत्ति मुग्ध ये दिसुनी
मीं हट्ट धरियला म्हणुनी
कीं, युक्ति योजिली आळ पुरविण्या तीच काय गे ! ही

पण वाहति ह्या अश्रुसरी
होय काय या निमिषिं तरी
तुज केवळ मी प्रश्न करीं
जी शुभ दिनिं तुज या लावि रडाया तीच काय गे ! ही

१३४

# लढाईवर जाणारा मुलगा

‘ जाशि कुठें बाळा ?’
‘ जननि ! गे समरीं लढण्याला ’
‘ कशास लढणार ? ’
‘ आपुला देश रक्षणार ’
‘ होय काय देशा ? ’
‘ शत्रु हे देती बहु क्लेशा ’
‘ देशचि कोणाचा ? ’
‘ तो तुझा, माझा, सकलांचा ’
‘ परि तूं इवलासा ?’
‘ बलवती अंतरिं मम आशा ’
‘ असुनि लाभ काय ? ’
‘ खड्ग हें असे निज सहाय ’
‘ खड्ग भंगल्यास ? ’
‘ सुखानें अर्पिन देहास ’

## १३५
# नवल कौतुक
( श्लोक )

लज्जा, रती, मधुरता, परिहास, कोप
केव्हां घडे विरह-दाहन, शोक-लोप
ती प्रेम-केलि रमणी रमणास ठावें
मोदें दुजें नवलकौतुक तें करावें
अर्ध स्वरूप अपुलें करि भिन्नतेला
हा देव, भक्त म्हणुनी विभु दावि लीला
ठेवी रहस्य परि तें श्रुतिरम्य काला
गाया सदा नवलकौतुक पामराला
पृथ्वीवरी सलिल कीं धरणीच तोयीं
दीपीं निशा वसत कीं तमिं तेज राही
दुःखांत सौख्य अथवा सुखि दुःख राहे
ठावें कुणा ! नवलकौतुक मात्र पाहे
जें जें जगीं जनन घे मुळिं नष्ट तें तें
हें देखितों, परिसितों नच संशयातें
घे प्रेम तेंवि जनि अन्त न कां तयाला
कीं राहि तें नवलकौतुक व्हावयाला
अज्ञान विश्व अवघें, वच सत्य जाणा
लीला अगम्य हरिच्या कळणार कोणा
जी जी चमत्कृति नवी घडते जगांत
त्याचीच ती, नवलकौतुक राहुं गात

१३६

# गोपींची याचना

( अजि अक्रुर हा० या चालीवर )

बा नन्द-सुता वाट सोड माझी ही
जाऊं दे गृहिं लवलाहीं
हा डोइवरी भरला घट पाण्याचा
क्षण नोहे परिहासाचा
ह्या व्यर्थ अशा होतां कीं उशिरातें
निन्दितील गुरुजन मातें
जाणतें तुला मी देवा
तूं माझा प्राणविसावा
परि नेणति ते[1] तव भावा
मीं दृष्टिपुढें नित्य रहावें तुझिया
तरि वळविं तयांच्या हृदया
अधिकार तुझा मात्र मनावरि सदया
देहावरि खचित नसे या
जरि म्हणशिल तूं तनू मनापरि चाले
हें शक्य इथें नच, बोले

---

१ गुरुजन.

त्या दोहोंचा धनी एक राहील
तरिच तें घडुनि येईल
मन गुलाम तव हृषिकेशी
वडिलांची काया दासी
या घडिला स्थिति ही ऐशी
मन रमलें तव रूपिं बहुत यदुराया
तनु आतुर परि गृहिं जाया
निज धर्मानें जीव मात्रिं चालावें
बोधिसी असें समभावें
मग असतां ही स्व-कार्यें तत्पर काया
रोधिसि कां तत्पथ वाया
वाटेल तरी तिला परीक्षेसाठीं
कसल्याहि संकटीं लोटीं
परि तिजसी ज्या हेतूनें
हें रूप दिलें जगतानें
पुरवूं दे तिज तो कृतिनें
बल देइं तिला प्रभो ! याचना तुज ही
याविना अपेक्षा नाहीं

१३७

## हे कल्याणी

( अजि शेवटचा लाभचि० या चालीवर )

चल शीघ्र गडे कुंजवनाला जाऊं
हरि सखा लोचनीं पाहूं
तद्दर्शन दे स्मृती आत्म-रूपाची
विसरवी भूल मायेची
रव वेणूचा चिदानन्दि करि लीन
कालासी करुनी दीन
तो स्वयं परात्पर थोर
घे जडासाठिं अवतार
शोधुनी पहा साचार
क्षण दवडुं नको वाया, हित होईल
ही पुन्हा न घडि येईल
कुंजांत हरी जोंवरि आहे बसला
तों विचार ठरवीं अपुला
जों वेणु धरी अधरीं, घे आलाप
करिं दूर जिवाचा ताप
मुखिं हास्याच्या मधुर लहरि जों रमती
मार्गास लाग तोंवरती
बघ उदार त्याची वृत्ति
आनंद-सागरावरती
स्वच्छन्द खेळते जंव ती

करिं आश्रय तों प्रेमें हरि-चरणाचा
कृपणही तो ग मुलखाचा
किति दिवस असा सूर्य सारखा फिरतो
परि ' बैस ' न हा त्या म्हणतो
ती रमाणि रमा निशिदिनिं चुरि पदकमलां
परि पुरे म्हणेना तिजला
त्या शेषाच्या शिरावरिल जड धरणी
उतरविना खट हा अजुनी
हा असा कृपण जगजेठी
किति कथूं तयाच्या गोष्टी
ही पुरे न लिहिल्या सृष्टि
परि दाताही त्यासम दुसरा नाहीं
दुर्मीळ साध सन्धी हीं
तो मुदित मनें प्रसन्न होतां तुजला
देइल गे आत्मपदाला
निर्धार असा ठेविं मानसीं सखये
कालही शरण चरणीं ये
दृढ निश्चय गे ! सर्व सुखाचें मूल
होतसे विश्व अनुकूल
उचलीं गे ! उचलीं पाय
नियतीला घेइं सहाय
उन्नतिचा हाचि उपाय
हे कल्याणी ! विचार अपुल्या हृदया
कल्याण कोणत्या ठाया

## १३८

# हिन्द भूमीचें ध्येय

( उद्धवा शांतवन० या चालीवर )

कुल, धर्म, पन्थ, भाषादि । आर्यांच्या अभिनव देशीं
जरि असंख्य तारा असती । ह्या राष्ट्ररूप वाद्यासी
तरि गेय-राग त्यावरती । एकचि तो या समयासी
होय तयें त्या सकलांच्या । मधुर स्वर संयोगासी
त्या एक्या तालावरतें
निजराज्य ध्येय गीतातें
गातसों एकमय चित्तें
नच अतां शक्य यामाजीं । होणें त्या स्वर भेदासी
व्हावीच खरी त्या गीतें । अमुची ती ध्येय प्राप्ति
हा असा आत्मविश्वास । जागृत हो अमुच्या चित्तीं
' तुम्हि एक राष्ट्र नच जन हो । नच पंथ एक नच जाती
भिन्न भिन्न नाना भाषा । तैशा त्या नाना रीति '
हीं अशीं तिरस्कारानें
कार्य न हो वदुनी वचनें
कडबोळें व्यर्थचि म्हणणें
जरि मधुर लागलें रुचिला । तत्कार्य सिद्ध हो जगतीं
जरि अठरा धान्यें असलीं । एक जीव त्यांचा होई
दृष्टिच्या आड हें करणें । मुळिं आत्मवंचना होई

वंचना आपुली अशि ही
करूं नये राजकृत्यींहीं
उभयतांस बरवें नाहीं
आमुचें ध्येय अजि एक। न ढळूं अम्हि तेथुनि कधिंही

१३९

## जीवित-कर्तव्य

( सबसे राम० या चालीवर )

तो मनुज म्हणावा गुण्डा। जयाचा तिन्ही लोकिं झेण्डा
जन्मा येउनि जगतीं प्राण्या! केव्हां तरि मरणें
परि महिषासम कुणा रुचे कां जिणें घालवीणें
असावा तिन्ही लोकिं झेण्डा

उदरासाठीं तनू झिजविणें उचित असे जगिं या
सूकरापरी तेंच ध्येय निज रुचेल कां हृदया
असावा तिन्ही लोकिं झेण्डा

कर्तव्याची यास्तव जीवा! कांस धरुनि कांहीं
स्व जीवितांचा मातृभूमिचा उद्धारक होई
असावा तिन्ही लोकिं झेण्डा

आनंद-गीत

## १४०

# स्नेहता

( श्लोक )

" हा जाणे तोच कीं रे ! तुजविषयिं खरें प्रेम चित्तीं वसेना "
" नाहीं, मित्रा ! तयाच्यासम जगतिं मला मित्र कोणी दिसेना "
" कोणीं नाहीं म्हणावें, सुजन जगिं तयावीण दूजा नसेल– "
" छे ! छे ! वंन्दीं पदातें न वद वच पुढें, दुःख तें जाणवेल "

## १४१

# आत्मविश्वास

( श्लोक )

" सोडीं या आग्रहातें ' मजसम जगतीं सुज्ञ नाहींच कोणी ' "
" दावीं मित्रा ! दुजा तो मग मम कशि ही मानिसी व्यर्थ वाणी "
"आधीं शोधीयलें का अनुमति दिधली या विचारा जगानें "
" माझें तें', मी तयाचा हृदयिं मम असा आत्मविश्वास बाणे "

---

१ जग.

१४२

# शान्ति समाधान

( श्लोक )

" जातों मी दूर देशीं, नशिब उघडतें काय तेथें पहातों
येथें कष्टें तनू ही बहुत झिजविली लाभ कांहीं न होतो
देशातें दीनता ये चहुंकडुनि किती, थांग कोठें न लागे
अन्तीं ह्या निश्चयाला करिं, तव सुहृदा ! दे, निरोपास मागें "
" दैवाचा हीन जो का अवनिवरि कुठें हिण्डला त्रस्त चित्तें
कर्णीं का ऐकिलें त्वां कधिंहि तरि तया घातली माळ वित्तें
या साठीं स्वीय देशीं वसुनि कृति करीं, ठेविं निष्काम वृत्ति
नाहीं उत्कर्ष झाला तरि जन-नयनें होतसे आत्मशांति
" देशाला ये विपत्ती बहुतपरि तुला येतसे हें कळोनी
उद्धाराया तयाला तिळहि न करितां यत्न, जाशी त्यजोनी
बोलावें काय यातें ! अशि निज जननी टाकुनी दुःखपंकीं
जाशी कां अन्य देशीं वद वद सखया ! आण माझी तुला कीं
" आपत्तिग्रस्त जें जें बुध मनुज बघे सन्मनें या जगांत
त्यांतोनी मुक्त त्यांना करुनि, बसविण्या सौख्य-सोपानिं शान्त
सोशी कष्टा अपेष्टा परि न डगमगे तो कदा भी न काळा
धिक् धिक् त्याचें जिणें कीं बुध तरि त्यजितो पाहुनी दीन डोळां
" क्लेशांत बान्धव जनीं असतां जयाचे
ज्या दुःख मात्र सुचतें अपुलें स्वतांचें
कैचा असे पुरुष तो ! अबला बरी ती
कष्टीं सखी बघुनि हो जिस दुःख चित्तीं "

१४३

## साधु-वाणी

( श्लोक )

‘ कोणीं नाहीं कुणाचें ’ ‘भ्रमिं फिरासि वृथा ’ ‘सत्य तो देव जाणे’
हीं बोधाच्या मिषानें निवति सु-वचनें सज्जनांच्या मुखानें
ठेवीं रे! भाव, सेवीं सकल जनमना ईशरूपी बघोनी
ब्रह्माण्डीं रोम रोमीं प्रभुवर भरला व्यर्थ ना साधु-वाणी

१४४

## अक्षम्य पाप

( सबसे राम० या चालीवर )

स्वातंत्र्य हराया जाई । तोची नामशेष होई
इन्द्रपदास्तव तत्–स्वातंत्र्या हरावया बळि बहु झटला
परंतु तो येतांचि खरा क्षण रसातळाला गेला
सकल देव बंदींत टाकुनी तयां नाचवी स्वैरमति
असा वीर दशकंठ अंति तत्-कंठ दश दिशा जाती
सुइच्या अग्रीं बसेल तितुकीं पंडु-सुतां नच दे महितें
कुरु-सुत बोले परि परिणामीं तोचि भाक्षि धूलीतें
इतिहासाची परम्परा ही डोळ्यांपुढतीं असतांना
लत्ताप्रहरें दूर लोटिती बळेंचि, लाभ न त्यांना
आधिंच मानव जन्मापासुनि सृष्टि- नियम-बंधनिं राही
जीवन-स्वातंत्र्यातें हरणें दुजें पाप जगिं नाहीं

१४५

## पुण्य-महति

( कुंजवनीं या कोण ० या चालीवर )

सत्त्व हराया म्हणुनी गेला बळिच्या सदनाला
काय म्हणूं याला । प्रभू तो गमवी स्वपदाला
दोष यांत ये कोणावरती
कांहिंच निर्णय होइ न चित्तीं
केंवि घडे मग कृति ही जगतीं
भ्रंश पडे मतिला । प्रभू तो गमवी स्वपदाला
" पुण्यपथें मज समीप येई
पापी कृतिनें नरकीं जाई "
हरिची वाणी बोले आशी ही
ठावें मनुजाला । प्रभू तो गमवी स्वपदाला
बळि ह्या नियमा अनुसरुनीयां
पुण्य बलाच्या करी आश्रया
नीचत्वा दुरि झुगारुनीयां
यांत दोष कसला । प्रभू तो गमवी स्वपदाला
सहज बुधा हें वाटे जगतीं
वामपथें नच जावो स्वमति
पुण्य-बळें निज लाभो सुगति
जाणें बळि ह्याला । प्रभू तो गमवी स्वपदाला

त्रैलोक्याचा नाथ परात्पर
काय उणें त्या या धरणीवर
तोचि मुदें करि नत दीनांवर
कृपा प्रसादाला । प्रभू तो गमवी स्वपदाला

लोहपिष्ठ, जल, वायु भक्षुनी
सहस्र वरुषें तप आचरुनी
स्वप्नीं न दिसे, येइ न ध्यानीं
प्रसन्न मग कुठला । प्रभू तो गमवी स्वपदाला

कठिण असा हा जगदाधारी
चालत येउनि बळिच्या द्वारीं
याचकरूपें बळी समोरी—
हात पुढें केला । प्रभू तो गमवी स्वपदाला

स्वरूप टाकुनि बटु वेषातें
घेणें पडलें किमर्थ हरितें
' पुण्य बळीचें ' कारण त्यातें
सत्त्वं छळूं सजला । प्रभू तो गमवी स्वपदाला

सत्त्व छळानें विजय प्राप्ति
कुणास झाली अजवरि जगतीं
गाधिजादि हो विनम्र अन्तीं
अनुभव हा सकलां । प्रभू तो गमवी स्वपदाला

पदरिं पुण्य बहु बळिच्या होई
अतां स्वर्गिंचें पद तो घेई
शंका येउनि ही हरिहृदयीं
बहुत तदा भ्याला । प्रभू तो गमवी स्वपदाला

जरि पुण्याची उणीव होती
सत्ता-लोलुप होता चित्तीं
दूरी मग करवेल कशी ती
गूढ पडे त्याला । प्रभू तो गमवी स्वपदाला

अधोवदन मग सुरेन्द्र करुनी
शरण जाइ तो प्रभुस तत्क्षणीं
कथिली अपुली कर्म कहाणी
तोही वश झाला । प्रभू तो गमवी स्वपदाला

शरण कुणीही येवो सु-मनें
ब्रीद प्रभूचें तया तारणें
दावि जगा हें सदैव कृतिनें
कधिंहि न जो चुकला । प्रभू तो गमवी स्वपदाला

दुर्जें, तोहि जगिं सत्ताधारी
म्हणुनि होय सुरपति-कैवारी
पुढतिं न जाणो, बळि हो भारी
पुण्यबळें त्याला । प्रभू तो गमवी स्वपदाला

पुण्यात्म्याचें कौतुक करुनी
धन्याचि व्हावें प्रभुनें स्वमनीं
योग्य सरळ हा न्याय असोनी
नवल, कसा भुलला । प्रभू तो गमवी स्वपदाला
पुण्याचें फल सन्तोषानें
उचित प्रभुला जिवा वितरणें
तदधिकार तो तें फल मिळणें
बाध कुठें आला । प्रभू तो गमवी स्वपदाला
कठिण कसोटी नच पापातें
कां राहावी मग पुण्यातें
पापाहुनि मुळिं अधिक मोल तें—
काय नसे त्याला । प्रभू तो गमवी स्वपदाला
जाई नरकीं तिळ पापानें
लाभुं नये कां स्वर्गाचि पुण्यें
विहित असे ही रीती असणें
समान जग ज्याला । प्रभू तो गमवी स्वपदाला
बळी ढळावा सत्त्वापासुनि
उलट असा दृढ निश्चय करुनी
लघुत्व त्यास्तव स्वीकारूनी
लावि कसा त्याला । प्रभू तो गमवी स्वपदाला

उदार दृष्टी हो अनुदार
विश्व-प्रियता गेली पार
स्वजनांचें हित हाचि विचार
तन्मानसीं शिरला । प्रभू तो गमवी स्वपदाला.

बोल लागला प्रभु-वचनाला
सिद्ध होय हें त्या समयाला
प्रभुच स्वीकरि अन्यायाला
कळलें जगताला । प्रभू तो गमवी स्वपदाला.

सुष्ट दुष्ट कीं देव नराचा
पुण्य-फळें हो या भावाचा
तो क्षण होता लय होण्याचा
संधि-काल गमला । प्रभू तो गमवी स्वपदाला

होउं नये कधिं सुर असुरानें
कधिं न करावें अज्ञ शहाणे
तज्ञ समजुनी ऐसें म्हणणें
न्यायचि हा कुठला । प्रभू तो गमवी स्वपदाला.

पुण्या हारक प्रभुची शक्ति
वृत्ति आसुरी पापी वदती
केंवि चरावें जीवें जगतीं
कोणि तरी बोला । प्रभू तो गमवी स्वपदाला

प्रबल पुण्य कीं प्रबल शक्ति, ती
परीक्षणाची वेळाचि होती
समबल होत्या उभय प्रवृत्ति
यश ये कवणाला । प्रभू तो गमवी स्वपदाला

जगदुन्नति ती एकीवरती
दुजि अवनतिला कारण होती
हुरहुर लागे यास्तव चित्तीं—
अखिला विश्वाला । प्रभू तो गमवी स्वपदाला

देहिंच केवळ चाले शक्ति
जिंकी आत्मा पुण्यद वृत्ति
तत्त्व कळुनि ये त्या कलहान्तीं
भ्रमनिरास झाला । प्रभू तो गमवी स्वपदाला

रसातळीं बळि देहें गेला
परि तत्पुण्यें जयाचि मिळविला
त्रिखण्डनेता वदति जयाला
द्वारपाळ बनला । प्रभू तो गमवी स्वपदाला

१४६

## श्रीशारदेस

( भक्तजन सदा० या चालीवर )

नमन शुचिमनें । विधितनये ! तव चरणीं
सारें जगत । तूतें विनत । कुणि न थोर तुजविणें
हा शठ, हा बुध लोकीं । तुजमुळेंच अवलोकीं
हें जल, हें पय । हें भय, निर्भय। उमज तुझ्या दर्शनें
विषमता समानता । न्यायनिति अनयता
हें स्वातंत्र्य । हें पारतंत्र्य । बोधिसि तूं निजगुणें
अर्ध प्रभा रवि देई । क्षीणबलचि शशि पाहीं
परि तव ज्योती । नित्य असे ती । करिं कृपा जगज्जीवने

१४७

## अभिनन्दन

[ नागपूर येथील प्रसिद्ध विद्वान् वयोवृद्ध वे. शा. सं. भाऊशास्त्री घुले यांस त्यांच्या विद्वत्तेबद्दल बादशहांनीं आपल्या जन्मदिवशीं ( ३ जून १९१८ ) ' महामहोपाध्याय ' ही पदवी देऊन त्यांचा सन्मान केला. त्या अभिनन्दनार्थ हें पद रचिलें. ]

( प्रेमसेवा शरण० या चालीवर )

शारदोपासका ! गानिं तुज गावया
तोष किति होतसे मानसा माझिया

श्रीस त्या सेवितां । मतिसि ये तरलता
त्यागिसी जाणुनी दुरुनि तिज नमुनियां
शारदा-कमलिनीं । ज्ञान-मधु सेवनीं
वेंचिलें सकल निज त्वां मिलिन्दा ! क्या
मधुर त्या परिमळें । नृप–हृदय कर्षिलें
तव गुणीं रंगलें रंगवुनि तुज सख्या
नृपतिचा जन्म दिन । वितरि आनन्दघन
हें जिथें ये दिसुन मानिति न यमभया
भूषवीलें कुला । तूंचि रे ! जगिं भला
आयु देवो तुला विनति रघुराजया

१४८

## मुरलीची जादू

( सुटला पितृदिशेचा वारा० या चालीवर )

हरि ! तूं वाजविसी वेणुतें
माझें चित्त कम्प पावतें
कां व्हावें ऐसें कांहिंच नकळे मातें
तें सांग सांग मज सख्या ! विचारीं तूतें

कुठली मुरली ही जडमूर्ति
मी तर चैतन्याची पूर्ति
जडजिवीं वास करि काय अशी ती शक्ति
कीं सचेतनाला भ्रमवी नकळत जगतीं
मग तूं मलाच त्या जडदेहीं
जन्मा घातलेंस कां नाहीं
मुरलीसम जगता मोहुनि मंजु रवांहीं
स्वामिनी तयाची क्षणांत होते पाही
जरि या देहीं चैतन्याचा
भरला पुरोपूर रस साचा
परक्याच्या स्वाधिन होय तरी तो कैंचा
जड देह याहुनी स्वतंत्र अधिक सुखाचा
अपुला ठाव न देतां कोणा
घे दुसऱ्याच्या ठाव ठिकाणा
छेडुनी तयाचा स्वेच्छें अन्तर्वीणा
त्यालाच विसरवी कौशल्यें ती भाना
होतां दर्शन चैतन्यासी
आणी जडत्व ती त्या निमिषीं
ती स्थितीच वाटे परमधाम जीवांसी
निज पदा नेइ जी किति वानावें तिजसी

प्रभु ! तूं थोर जगाच्याहूनी
नवल न, वससी तन्मुखिं म्हणुनी
वद लोकदृष्टिनें मोल काय तिज भुवनीं
करि वास परी ती रात्रंदिन तव वदनीं
जग हें समजुनि तुज जीव-गडी
अपुल्या चित्त-कपाटीं कोंडी
जग-वंचक म्हणविसि फोडुनियां ती कोंडी
खेळशी तिच्याशीं दावुनि अशि कां गोडी
मुखिचा एक शब्द तरि तुझिया
श्रवणीं यावा इच्छा हृदया
तूं मुका जगाशीं, तिजशीं बोलका सदया
हें द्वैत पेरिलें कुणीं सांग तव ठाया
निघती वेणु-मुखीं जे बोल
गणिते तुझेच सारे लोल
त्यावरीच अपुली तृषा शमविते खोल
श्रीहरी ! पय न कां जला पाजिसी बोल
परि त्या जळिंच माधुरी खास
वाटे सुधेहुनी हृदयास
हें खरें कितीही असलें तरि जगतास
लाविशी धराया तिचीच कां तूं कांस

परि किति विचित्र ही वेणु-कृति
सांगू काय खरोखर तुज ती
करुं कशास कथुनी तिच्या सुखाची माती
ही नव्हे नव्हे रे ! थोरांची, जगिं रीति
धरुनी तुझी आस हृदयांत
येते तुजजवळीं श्रीकान्त !
दुर्लक्ष करुनि ती न त्यजी निज एकान्त
निर्लज्ज अशी कीं तिज न गमे मुळिं खन्त
राहो भक्तराज कोणीही
नादीं आपुल्याच ती लावी
प्रभुहुनी श्रेष्ठता जगा भासवी, दावी
अनुमती तुझी या कृतीस काय असावी
श्रीहरि ! भेट तुझी नच होई
वाटे मनास खेद न कांहीं
मुरली-रव कानीं न जरी पळभर येई
तळमळे जीव किति ! नको कल्पना छे, ही
घडतां कांहीं कालें ऐसें
कुणिही तुज न विचारिल कैसें
मुरलीची जादू करुनि जगाला पिसें
मुरलीच श्रीहरी मानिल जग सहवासें

तुझिया सत्तेवरती अपुली
गाजवि सत्ता निर्भय मुरली
तुज रुचली का रे ! तिची कृता ही असली
तिज धाभीं चल जा नको वसति तव इथली
अशि तव शिरावरी जी नाचे
वदसि न एक शब्द तिज वाचें
ती थोर तुजहुनी म्हणुनी कां मन कांचे
' जगदीश ' तुझें हें वाटे नाम फुकाचें
सूत्रें जगताचीं मग सगळीं
हलविल यापुढतीं ही मुरली
तूं मूर्ति शिलेची जणूं देउळामधली
' वन्दनास केवळ ' हीच कीर्ति तव पुढली
केला त्याग तिनें हरि ! कसला
दिधला मान तिला त्वां असला
लावियला चटका मला, जगाला, तुजला
' आनंद ' कविहि तिज भावें गाया सजला

१४९

# मोल काय त्याला

( अहा जडली० या चालीवर )

सुखें बोला । प्रेमाच्या बोलां
कृतिविण तें विफल जगाला
पोपटपंची कितीहि केली
जग हें भुलण्याला । वरुनी
कृतींत कांहीं दिसलें नाहीं
काय मोल त्याला । येई । कृतिविण०
बसल्या ठायीं वन्दन करणें
सहज असे रविला । भावें
परि तद्-गुण ते मनिं न उतरिले
काय मोल त्याला । येई । कृतिविण०
धरणी देवी उदार म्हणुनी
कण्ठशोष केला । कितिही
आकुंचितपण जाइ न मनिंचें
काय मोल त्याला । येई कृतिविण०
मेरुपर्वता खचित बोलतों
धैर्याचा पुतळा । भुवनीं
फोल अवाजें घरात दडतों
काय मोल त्याला । येई । कृतिविण०
वैराग्याची मूर्तिच केवळ
वृक्षराज याला । गणितों

कवडीस्तव परि जीव टाकितों
काय मोल त्याला । येई । कृतिविण०
जनहित तत्पर मेघ कधींही
घे न विश्रमाला । वदतों
हंसत बैसतों बंधु विपदिं तरि
काय मोल त्याला । येई । कृतिविण०
एकभाषणी अभिमानें कीं
वदतों रघुपतिला । प्रेमें
पदोपदीं परि वचन मोडितों
काय मोल त्याला । येई । कृतिविण०
स्वस्त्रीविरहित दुजी कामिनी
जननी शिवबाला । कथितों
परनारीचा ध्यास सदा तरि
काय मोल त्याला । येई । कृतिविण०
जनक श्रीहरी रामदास ह्या
कर्मयोगी यांला । ध्यातों
पद उचलेना पैशाविण तरि
काय मोल त्याला । येई । कृतिविण०
गुणनिकरीं ह्या असे रंगला
तिलक बाळ अपुला । म्हणतों
वर्तन अपुलें तसें न जोंवरि
काय मोल त्याला । येई । कृतिविण०

१५०

# बाल हट्ट

[ प्रसंगः—गडाच्या खालीं लढाई चालू असतांना एका लहान मुलाला ती लढाई पाहण्याची इच्छा झाली. तेव्हां तो आईस म्हणतोः— ]

( सहज कशि खेळविते ललना० या चालीवर )

जननि ! मज घेइं कडेवरती
नयनिं बघूं दे रणरीति
शंका कसली । तुजला आली
बुद्धि कोंवळी । जरि मम भ्याली
होय काय मग पुढतीं
व्यर्थ तुझी ही । शंका आई
शोभत नाहीं । तुज हें मुळिंही
भ्रमविं न मोहीं स्व-मति
रण रुधिरानें । दृष्ट काढणें
स्नान घालणें । स्व-सुता सु-मनें
मातेची हीच कृति
रणभेरीनें । तया हंसविणें
भयद रणानें । भीति पळविणें
मातेची हीच कृति
वीरगर्जना । त्याच्या श्रवणा
पाजिल्याविना । क्षणहि गमविना
मातेची हीच कृति

कोमल शिशुपण । शिशुपणिं जाळुन
वज्रच तन्मन । करि, त्याजवळुन
पळवि दुरी यम भीति

समशेरीची । चकमक साची
खेळायाची । हौस सदाची
उपजवि त्याच्या चित्तीं

अनुभव नाहीं । नच बघणेंही
कळेल केवीं । कुणास कांहीं
कळलें वा वद जगतीं

शूर वीरवर । रणभूमीवर
समर भयंकर । करुनि अरीवर
विजय कसा मिळवीती

ध्येयापुढतीं । न दुजें बघती
तृणसम गणिती । स्व-प्राणाप्रति
शत्रु कसा दिपवीती

शत्रु-मुखानें । निज यशगाणें
मंजुरवानें । शुद्ध मनानें
सतत कसे वदवीती

निज पक्षाचें । निज भूमीचें
निज धर्माचें । निज कीर्तीचें
रक्षण कैसें करिती

उद्या बालपण । जाइल संपुन
हें गडरक्षण । शत्रूपासुन
येइल माझ्या हातीं

शत्रु विलोकुनि । जाणें पळुनी
रुचेल का मनिं । तुझिया जननी
बोल, तुझी काय मति

हा तव दिटा । तनय पळपुटा
खरा करंटा । अशी जगिं भटां
वदविंशि का निज कीर्ति

समरधुरन्धर । हाच खरोखर
अशी सर्वभर । कीर्ति विमलतर
रुचते का तव चित्तीं

वीरकामिनी । ऐशा वचनीं
मिरविशि भुवनीं । आज या क्षणीं
होइं वीरसू जगतीं

मीहि पित्यापरि । चमकिन भुवरि
तरि हें तुजवरि । जाण अन्तरीं
जेंवि तुझी शिकवण ती

१५१

# मातेचा आनन्द

करिं घे तरवार । करिं ठार । अरिला हो अनिवार
स्वस्थाचि बसलासी । कां बघसी । छळिलें तव मातेसी
नयनीं देखियलें । तें सगळें । बाहु न कां फुरफुरले
षंढा ! त्वेषबलें । का जळलें । सकल तेज तुजमधलें
कशास आलासी । उदरासी । शिणविलेंस मातेसी
वन्ध्या याहुनि ती । जरि असती । बरवें होतें जगतीं
अवमानित आई । जो पाही । क्रोध न ज्यातें येई
पुत्रचि तो कैंचा । वैऱ्याचा । वैरी गत जन्मींचा
' तूं नच वीरसुता ' । मज म्हणतां । स्तब्ध कसा तूं होता
कांपिलि कां न तुवां । रे तेव्हां । त्याची ती खल जिव्हा
चाड न अब्रूची । कीर्तीची । जननी-अपमानाची
त्यातें काय म्हणूं । किति वानूं । कोण तयाला मानूं
कुण्ठित मति झाली । जड पडली । चेतनाहि हारपली
अब्रूहुनि प्यार । तनु फार । काय तुला साचार
लढतां लढतांना । जरि मरणा । येतें कांहिं न दैना—
जगताची होती । नित्य किती । तुजसम जन्मति, मरती
लाज न तुज कैशी । कां दिससी । जिवंत मन्नयनांसी
बलाढ्य शत्रू तो । का दिसतो । म्हणुनी धीर न होतो
सूडाचि घ्यायाचा । त्यावरिचा । वद, का फुटली वाचा

निर्बल हाडांचा । हृदयाचा । खेद न का तुज ह्यांचा
दुबळें जीवन हें । शुचि नोहे । अमर जरी तें राहे
कोण पुसे गवता । ना चुकतां । निशिदिनिं त्या शिरिं लाथा
दुबळ्या नच त्राता । हा कित्ता । लावीं अपुल्या चित्ता
क्षणिक जरी असला । देह भला । तेजानें चकमकला
सार्थक देहाचें । हो साचें । तरीच नरजन्माचें
अभिमन्यू बाळ । तुजपरिस । लहान होता खास
कीर्तिस्तव गेला । लढण्याला । विक्रान्तां नच भ्याला
भीषण किति लढला । जगताला । प्रताप दावी अपुला
कर्णादिक वीरा । रणधीरा । पळवी तो माघारां
मेला त्याच दिनीं । परि अवनी । गाते त्यातें अजुनी
त्याचा मकरन्द । सानन्द । पितात सुगुणि मिलिन्द
वन्द्य गमे जगता । हा कित्ता । लावीं अपुल्या चित्ता
यःकश्चित् सुमन । जन्मून । रिझवी सारें भुवन
क्षणेंच त्या मरण । हें बघुन । पोळे अंतःकरण
लोभन तें जगता । हा कित्ता । लावीं अपुल्या चित्ता
चल तर झणिं ऊठ । रे ! ऊठ । धरिं शस्त्राची मूठ
अरिचा निःपात । निमिषांत । करुनि रिझविं मम चित्त
आनन्दित जननी । जरि स्वमनीं । काय उणें तुज भुवनीं

१५२

# पाऊस

(एक लहान मुलगा पाऊस पडतांना पाहून आपल्या आईस म्हणतोः–)

पाउस कोठुनि हा । गे ! पडतो । हळुं हळुं कां झिरपी तो
फुटलें का टाकें । पाण्याचें । भरलेलें जें वरचें
कोणीं फोडियलें । जाउनियां । धरि कसा हो हृदया
न दिसे जातांना । वर कुणिही । चोरुनि कां तो जाई
टाक्यामधिं पाणी । परि कोणीं । टाकियलें येथोनी
बरोबरी कैसें । त्या नेलें । कुणीं न का अडवियलें
म्हणुनी जल नदिचें । कामि झालें । उगाचि म्हणती सुकलें
गरीब रवि त्याला । दोष किती । मूर्ख लोक देताती
सोडुनि चोराला । संन्यासी । असेंच देति का फांसी
परन्तु तें टाकें । स्थिर कैसें । आकाशीं ह्या बैसे
आकाशाचि उलटें । टांगियलें । बघतों आपण सगळें
आई हें कोडें । मजसि पडे । उकलुनि झणिं सांग गडे

१५३

# वाणीची श्रेष्ठता

( सबसे राम० या चालीवर )

वाणीस देव जो मानी । तोची धन्य धन्य भुवनीं

परोपरी गुरु वदला बळिला दान न देई त्या बटुला
मुळें न ऐकिलें वचनासाठीं जरी रसातळिं तो गेला

स्व-राज्य दिधलें स्वप्निं पाहिलें हरिश्चन्द्र भूपानें
त्याचक्षणिं तें वचन पाळुनी स्वतां फिरे रानोरानें

द्वारिं मृत्युच्या कर्ण जरी तो ' देतो ' विप्रा वच बोले
दन्त स्वतांचे स्वतां उपटुनी दिधले वच नच फिरवीलें

बहु कष्टानें राज्य मिळविलें गुरू दक्षिणा मागे
चरणिं अर्पि तें शिवबा मोदें परन्तु न फिरे मागें

जसें भाषणीं तसें वर्तनीं तिलक दिसे सकलां
राज्य-रक्षणीं पुत्र आपुला दिधला तेव्हां वदला

अशी अखंडित परंपरा ही सद्-वाणीची म्हणुनी
अशा दशेंतहि आर्यभूमि ही जिवन्त राही अजुनी

वचन मोडणें जरा न ठावें ध्यानिं मनीं स्वप्नीं
त्या आर्यांना कसें रुचावें बोल एक दुसरी करणी

राजकारणाहुनी अमोलिक सत्यपूर्ण वाणी
कितीक राज्यें आलीं गेलीं अभंग परि ती वाणी
त्या वाणीची स्वार्थपरायणिं विटम्बना करणें
सुज्ञ म्हणवि त्या मुळीं न शोभे तयानेंच हें बघणें
वाणी तैशी करणी त्याच्या चरणीं जग लोळे
वाणीहुनि विपरीत यत्कृती तो नर कैसा नकळे
शक्तिबलावरि बोल बोलिले फोल जरी केले
शक्ति संपतां कोण पुसे त्या न्याय जगाचा बोले

१५४

## मनमोहन

मधुर मधुर गाई । विनति हरि ! तुला ही
ही प्रसन्न ना जरी । हास्य लास्य भूवरी
कोठचें दिसे तरी । बोल बोल कांहीं
मदानन्द भोंवरा । जरि न फिरे गरगरा
तो दिसे कुठें खरा । बोल बोल कांहीं

एक शब्द मधु जरी । वदलि न मम वैखरी
मग कुठली माधुरी । बोल बोल कांहीं

नूपुर मम नच रमे । जग उदास तुज गमे
कां तव मति तैं भ्रमे । बोल बोल कांहीं

नेत्र-शर न ज्या स्थलीं । क्षिति तममय तेथली
कां वाटे जाहली । बोल बोल कांहीं

हृदयिं मम न शान्तता । उदित होय कशि स्वतां
तव मानसिं प्रेमळता । बोल बोल कांहीं

नच सुखांत राहिं मी । तूंहि दुःख कर्दमीं
जरि न जगतिं तुज कमी । बोल बोल कांहीं

सौख्य, दुःख, शान्तता । भुवनींची रम्यता
राधिकाच तत्त्वतां ! कळुनि तुजसि येई

जगताचा जगपणा । देवांचा प्रभुपणा
हरिचाही हरिपणा । राधिकाच पाहीं

तूंच गोष्ट ही खरी । जाणलीस अन्तरीं
म्हणुनि येशि महिवरी । याविना न कांहीं

क्लेश हो न मुळिं कदा । हरुनियां तदापदा
मुदितचित्त तिज सदा । उचित म्हणुनि ठेवीं

तरल हो न मन तिचें । मधुर नाद मुरलिचे
परम थोर प्रीतिचे । सतत भंवतिं ठेवीं

अन्य याहुनी कृति । तुजसि बोल कोणती
लीन लयीं मन्मति । धन्य हृदयिं होई

रंजनार्थ माझिया । अवतरसी लोकिं या
मग विनंति कासया । संवय परि न जाई

मनमोहन या रितीं । तुजसि सकल बोलती
'आनन्द' हि निज मति । रमविण्यास गाई

१५५

## पूर्वस्मृति

( नृपममता रामा० या चालीवर )

वाटेल तसा रड हृदयीं
स्मित लहरि दावि परि वदनीं । प्रियतमा
हंसशिल तरि हंस बेतानें
आणुनी लोचनीं पाणी । प्रियतमा
नम्रता धरीं बाहेरी
सन्ताप आलिया गिळुनी । प्रियतमा

क्षणच हा—विकट ये महा—उलट किति पहा
उद्या जगताच्या
खोट्यावरि पडती भारी । प्रियतमा

अनिवार हाय का इच्छा
शिव—चरित तुला गायाची । प्रियतमा
त्या बोधुनि चोर लुटारू
स्व—जनां दे ओळख त्याची । प्रियतमा
होईल खचित या योगें
तुजवरी वृष्टि पुष्पांची । प्रियतमा
परि खुळ्या—वचीं बावळ्या—नृपा सांवळ्या
मूर्ति धर्माची
वदशिल तरि प्राप्ति शिव्यांची । प्रियतमा
श्री समर्थ-वाणी स्मरशी
अजि महती काय तियेची । प्रियतमा
बघ 'समर्थ' किति या काळीं
घे सन्धा तद्—वचनांची । प्रियतमा
' स्वातंत्र्य हेंच सुखधाम '
करि निन्दा ह्या बोलांची । प्रियतमा

‘ बन्धनीं—आर्य मेदिनी—होय विजयिनी ’
वदे तद्—वाणी
न म्हणे तरि ती कुटिलांची । प्रियतमा

‘ घे हट्ट गड्याचा माता ’—
ती खुळचट होती अबला । प्रियतमा
‘ आणि पुरवि तया सुत मोदें ’—
बघ तीच प्रसवे त्याला । प्रियतमा
परपुरुषीं नटण्याचा हा
स्त्रीहट्ट मधुर या घडिला । प्रियतमा
वानिती-सुज्ञ त्या किती—मुदें पुरविती
उचित वद तूंही
न कधीं हें ने दुर्गतिला । प्रियतमा

मावळे मूर्ख, तूं त्यांना
थोरांत कशाला गणिसी । प्रियतमा
अनुयायी तेच खरे कीं
वदसि दिले जीव जिवासी । प्रियतमा
परि आज जाणते कितिक
अनुकारी बघ नेत्यासी । प्रियतमा

---

१ जिजाबाई. २ शिवाजी.

सांकडें–पुढाऱ्या पडे–कुणिं न धडपडे
तरि न तूं बोल
' पारखे शुद्ध बीजासी ' । प्रियतमा

तरवार हवी का बघण्या
बघ समोर चित्र तिचें हें । प्रियतमा
प्रत्यक्ष विलोकनिं महती
तुज वाटे !–नवलचि आहे । प्रियतमा
तुज भीति कुणाची आतां
तुज जवळिं काय अजि राहे । प्रियतमा
चांगलें–रक्तही पळे–तुज न का कळे
शरीरामधुनी
निश्चिन्त एक तूं पाहे । प्रियतमा

कां ऐसा वरचेवर तूं
आठविसी गत कालासी । प्रियतमा
तो कैसा, हा ऐसा कां
ही वृथा फिकिर कां करिसी । प्रियतमा
तो अपुला हा दुसऱ्याचा
म्हणुनी कां अविरत रडसी । प्रियतमा
मानसीं–किति हळहळसि–असा दिनिं निशीं
मोल परि काय
वद, कोण पुसे जगिं तुजसी । प्रियतमा

१५६

# कोण हें आई

( दिंडी )

" कसें धांवत दुडदुडा पहा चाले
किती सुन्दर बोबडे बोल बोले
डुले मोदें मनसोक्त सर्वदाही
सांग मजला हें कोण तरी आई

फुले वदनीं किति गोड हास्य याचें
खेळ खेळे दिनभरी कौतुकाचे
रडे केव्हां वा रुसतसे कधींही
सांग मजला हें कोण तरी आई

मऊ कुरळे शिरिं केश शोभताती
हिऱ्यासम जणुं मुखिं दन्त चमकताती
भृंग कमलीं, हे तसे नयन दोन्ही
सांग मजला हें कोण तरी आई

फुले फूलच बागेंत जणूं वाटे
सुवासें त्या चहुंकडे हर्ष दाटे
बघुनि जो तो आपुला लोभ दावी
सांग मजला हें कोण। तरी आई

सदा नेमानें सान थोर होई
या श्रमें का बहु जीव थकुनि जाई
म्हणुनि रिझण्या तो चंद्र इथें येई
सांग मजला हें कोण तरी आई

त्रास येई एकलें राहण्याचा
म्हणुनि सोडुनियां वास त्या नभाचा
खेळण्यातें का सूर्य इथें येई
सांग मजला हें कोण तरी आई

सदा आपण जोडितों हात देवा
काय त्यानें हा दिला गोड मेवा
अशा रूपें वा तोच इथें येई
सांग मजला हें कोण तरी आई ”

ऐकुनी हें बोलणें बालिकेचें
हर्ष पोटीं मावे न माउलीचे
जवळ ओढुनि तिज, कथी स्नेहभावें
‘ भाउ तुज हा खेळण्या दिला देवें ’

१५७

# सूर्याचा चन्द्र झाला

( चंद्रकांत राजाची० या चालीवर )

कविसह रसिका ! दिसेल तुजला सूर्य चन्द्र झाला
ठेवुनि येई अपुल्या गेही मात्र संशयाला

एकें दिवशीं सौधावरती अस्तमान कालीं
रमणी-वल्लभ उभे ठाकुनी बघति अंशुमाली
रविवंशी नर, शशिवंशी स्त्री कोंवि जुळे नातें
एकाचें वच सरळ तरि कसें पटेल दुसऱ्यातें
सूर्य बिचारा व्यर्थ सांपडे कलहीं उभयांच्या
परन्तु रसिका ! स्पष्ट सांगतों बन्द ठेवीं वाचा
कारुण्याची मूर्ति असासि तूं जाणतसें मीही
रविचीं ती दुर्दशा पाहतां विवळशील हृदयीं
स्वस्थ म्हणोनी तुजला केलें कठोरशा वचनें
नातरि रविचा होय कसा शशि न कधीं तुज दिसणें
ऐक ऐक रे ! कलह येइ तो खऱ्या स्वरूपांत
जो तो ओढी रविला कैसें अपुल्या रूपांत
" शुभ्र रवीला देइ मुलामा कोण सुवर्णाचा "
" छे ! छे ! ललने ! उडवि रंग तो तुझिया प्रेमाचा "

" म्हणुनिच मज का जखडुनि टाकी अपुल्या करपाशीं "
" छे ! छे ! तुजवरि सुवर्ण-पात्रें करि अभिषेकासी "
" चरण बांधि हा धरेस मम हे पहा पहा हस्तें "
" छे ! छे ! कडिये घे घे म्हणुनी विनवितसे तूतें "
" हृदयावरि हा कसा खेळतो, निर्लज्जचि वाटे "
" छे ! पय प्याया क्षुधित म्हणोनी उरोजिं तव लपटे "
" समोर अपुल्या कंठालिंगन कीं हा देइ मला "
" छे ! छें ! हनु तव धरुनी बोले 'लोभ ठेविं अपुला' "
" बघतांना हें आपण नयनें चुम्बन मम घेई "
" छे ! तव नयनांवाटें मानस बघण्याला जाई "
" काय न हा अपराध तयाचा ओढी केसाला "
" छे ! तव वेणीमागें लपला, बघ त्या पूर्वेला "
" खरेंच बाई !—"
" अतां न वदसी सखा तुझा म्हणुनी ? "
न्याय उघड हा कोण निज जना नांव ठेवि भुवनीं

१५८

# चंद्रास

(कुसुम गंध सुटला ० या चालीवर)

गाउं कसें तुजला । चन्द्रा ! गाउं कसें तुजला

परप्रकाशें । भुवनीं विलसे

लाज न मुळिं ज्याला । चन्द्रा ! कोण गाइ त्याला

दिनिं मुख लपवी । रजनिंत मिरवी

दावुनियां डौला । चन्द्रा ! कोण गाइ त्याला

पिंगा धरुनी । स्त्रीजनिं खेळनिं

मानित हर्षाला । चन्द्रा ! कोण गाइ त्याला

बुल्बुल् वाणी । मात्र रमणिगणिं

पुरुषिं मुग्ध बाला । चन्द्रा ! कोण गाइ त्याला

सदनीं राणा । बाहिर ललना

दावि अशा कृतिला । चन्द्रा ! कोण गाइ त्याला

शीतल वचना । वदुनी भुवना

लावी कुपथाला । चन्द्रा ! कोण गाइ त्याला

मृदु कर फिरवुनि । अंगावरुनी

विसरवि स्वहिताला । चन्द्रा ! कोण गाइ त्याला

अन स्वागमनें । मोहिं बुडविणें
नित्य क्रम ठरला । चन्द्रा ! कोण गाइ त्याला

कामी बनवी । शीला हरवी
हीच कीर्ति विमला । चन्द्रा ! कोण गाइ त्याला

नीच कृतीचा । डाग सदाचा
तनुला चिकटविला । चन्द्रा ! कोण गाइ त्याला

स्त्रीमुख-कांति । चोरुनि जगतीं
जन्म धन्य केला । चन्द्रा ! कोण गाइ त्याला

विलासिनींचा । किंकर साचा
वंश भूषवीला । चन्द्रा ! कोण गाइ त्याला

स्त्रीमुख न दिसे । क्षण, भरे पिसें
जीव होइ दुबळा । चन्द्रा ! कोण गाइ त्याला

केंवि अशाला । वर्णायाला
स्फुरण चढे कविला । चन्द्रा ! बोल, विचारिं तुला

वृथा प्रतिष्ठा । मिरविशि नष्टा !
स्वस्थ बैस अपुला । चन्द्रा ! तो क्षण मृत झाला

जग तें गेलें । अजवरि भुललें
केवळ माधुरिला । चन्द्रा ! काळ अतां फिरला

बालरवीसम । हरुनि मोहतम
ओपी तेजाला । चन्द्रा ! विश्व गाइ त्याला

१५९

# श्रीकृष्णावर फियाद

( उद्धवा शांतवन ० या चालीवर )

निष्ठुरा, निर्दया कृष्णा । तुजवरी असे फियाद

किति तरी तुझ्यावरि माझा । विश्वास आजवरि होता
मानिलें मनोभावानें । तुजलाच जिवाचा नेता
विषय ना ठाउका अन्य । तुजविना माझिया चित्ता

घरदार सर्व सोडोनी
प्रिय आप्तगणां वंचोनी
प्रज्ञांना हेंटाळोनी

हें सर्व तुला समजोनी । घेतला तुझा मी नाद । निष्ठुरा०

समजूत मन्मनाची ही । मुळिं वृथाचि नव्हती कांहीं
हें सत्य मनापासोनी । तुज कथितों आधिंच पाहीं
टाकिल्या उड्या आगींत । मजसाठीं त्वां केव्हांही

दहिदूध चोरुनी खातां
मज कुणी द्यावया लाथा
मागुनी लगबगां येतां

वांचविलें त्यांतुनि कितिदां । याचा न करीं प्रतिवाद । निष्ठुरा०

कुणि गरळण मज मारीतां । तीचेच हात दुखवीसी
करचरण बांधितां कोणी । बेकाम करिसि दोरीसी
टांगितां करुनि वर पाय । तोडिसी तिच्या शिक्यासी
एकदां शिरीं एकीनें
फेंकिलें घटा कोपानें
परि तिजचि तिच्या डोळ्यानें
बघविली स्वतांची हानी । नच करितां अधिक विवाद । निष्ठुरा ०

अन्नाविण कुणि मज कोण्डी । सुचविसी हवा खाण्यातें
घातली कुणीं मुखिं माती । शिकविसी साधु-वृत्तीतें
कुणिं शिखा धरुनि जलिं बुडवी । पढविसी तदां योगातें
आठवूं आणखी कितिक
नाहींच तयास गणीक
होईल ग्रन्थ रे ! एक
तव थोरपणापुढतीं या । विसरिलों सर्व अपवाद । निष्ठुरा ०

इच्छिलें तुझी ही मैत्री । नच तुटो कोणत्या काळीं
तूं एक जिवाचा कालिजा । दुस्मानी दुनिया सगळी
संन्यास संशया दिधला । स्वानंदी पिटुनी टाळी
ब्रह्माण्ड जाहलें थोडें
काळाचे सुटती वेढे
कसलेंही नुरलें कोडें
वाटलें स्नेह-कंदाचा । मनमुराद घेऊं स्वाद । निष्ठुरा ०

सर्वही मीपणा माझा । सोडुनि मज जेव्हां गेला
देखिलें तुवां सर्वस्वीं । जाळ्यांत अतां हा आला
निसटुनी तयांतुनि जाणें । नच शक्य तयाच्या बाला

मग हृदय खरें तें अपुलें
रूपापरि उघडें केलें
अजवरी लपुनि असलेलें

अन्तर्बाहि काळा काळा । मजपुढें करिसि अनुवाद । निष्ठुरा०

बळजबरी माझी ऐसी । थोडीच तुझ्यावरि होती
दिधलीस कशाला मुरली । आशेची करण्या माती
पहिलेंच नकारा देतां । वाटता विषाद न चित्तीं

आधिचा कडुपणा बरवा
दावुनी भल्या परि भावा
शेवटिं न गळा कांपावा

विश्वासघातक्या ठायीं । ही गोष्टच मुळिं 'सबबाद' । निष्ठुरा०

तूं जिवलग गडि जीवाचा । घेतली म्हणुनि मी आळ
अन्याय कोणता त्यांत । दाविसी रूप विक्राळ
वैऱ्याहुनि वैरी राहो । वाटतो बरा बहु काळ

आपुल्या माणसांपाशीं
कां घेउं नये हट्टासी
तूं बरा घेशि माझ्याशीं

तुजलाच ताम्रपट काय । ल्यायचा असा हटवाद । निष्ठुरा०

म्हणतांच चोरिलें लोणी । काठिचा बसे किति मार
वळ वत्र पाठीवरचे । अजुनी न बुझाले पार
उपटिली शिखा राधेनें । लावितां तिचें मी दार
नित्याचा लाभचि ऐसा
परि कथिलें का कधिं सहसा
हा विचार तुजसि न कैसा
जा—दाउं नको वदनातें । मतलबी पुरा वस्ताद । निष्ठुरा०

हो फजिती माझी पुरती । हाच का हेतु तव हृदयीं
पुरलाना आतां तरि तो । कां राहि अजुनिही कांहीं
असशील अतां आनंदी । चर्याच तुझी तें दावी
खदखदां हंसे कुणि नारी
उपहास करी कुणि भारी
कुणि बोले मुरलिस चोरी
मारिती खडे बाळेंही । ही तुला असेलचि दाद । निष्ठुरा०

हंसतोस काय तूं ऐसा । काळीज फाटलें माझें
तुज मौज वाटतें यांत । चालले प्राण परि माझे
कशि तुला गमेना लाज । इच्छिसी मरण कां माझें
तूं निलाजरा मुलखाचा
येईल घाम तुज कैंचा
पुतळाच जणूं दगडाचा
बडवीत रहावें वाटे । राहील तुला मग याद । निष्ठुरा०

जरि शाप तुझा मज फळत्रा । होईन तरी मी भूत
तव कथीन शठता सारी । असतील तुझे जे सूत
आजच्यापरी मग बघतों । यश राहि कसें तव पूत
विश्वास मला दावून
फसविलें अकारण म्हणुन
हा असा सूड घेईन
वाटेल तुज बरी टळली, । नच; जाण पाठिशीं व्याद । निष्ठुरा०

केलीस अजवरी चैन । मुरलिच्या जिवावर सारी
दिनमात्र एक मी करिता । का होती हानी भारी
काळिमा येति का नांवा । तव कीर्ति जाति वा चोरी
तुजवरची माझ्यावरती
गोपींची जडती प्रीति
ही भीति तुझ्या का चित्तीं
व्यक्तिच्या न वेड्या त्या रे । त्यां हवा वेणुमधु नाद । निष्ठुरा०

एकदांहि कुटिला ! मुरली । मंजूळ वाजली नाहीं
मधुर स्मित करुनी जवळीं । गोपिका एकहि न येई
कर कंठिं घालणें प्रेमें—। हें दूरच सगळें राही
मम हताश मन होण्यांत
का तुझ्या पडे पदरांत
परि अशा शिव्या खाण्यांत
तुज काय वाटते हौस—। तें तरी कथीं गोविन्द । निष्ठुरा०

देवभक्ताचा कहल गोडी साखरेच्या वाणी
आनंद मना व्हावया ' आनन्द ' गाइ ही वाणी

१६०

# राम गणेश*

[ राम गणेश गडकरी ऊर्फ गोविन्दाग्रज कवीची मृत्युवार्ता जी कधींही सहसा खोटी ठरत नाहीं ती—खोटी म्हणून पुन्हां वृत्तपत्रांत वाचतांच खऱ्या रसिकांस किती आनन्द झाला असेल; विशेषतः समान-शीलांस तर—जावें त्याच्या वंशा तेव्हां कळे ! ]

( उद्यां बघ जातें० या चालीवर )

परमेशाची । कृति अगम्य रामा ! साची

परत पाठवी कृतान्त तुजला
हेतु कोणता मनीं योजिला
कृती अन्यथा करण्या धजला

नवल दाखविलें । अजवरि जें नाहीं घडलें

निज दूतानें अणिलें चुकुनी
अनय न व्हावा यमें म्हणोनी
तुज परतविलें पुनः मर्त्यजनिं

दावि निज ठायीं । कीं सदा वसे मति न्यायी

काव्य—प्रतिभा—पुष्प अजुनि तव
पुरतें कीं नच विकसे अभिनव
पुरा पुरा तन्मरन्दानुभव

मिळो मर्त्याला । म्हणुनि का परतवी तुजला

* ही कविता लिहिल्यावर तीन महिन्यांनीं गोविन्दाग्रज मृत्यु पावले.

कीं सुभगेच्या सौभाग्याचा
कुंकुम तिलक ललाटावरिचा
पुसण्या धीर न होय तयाचा
यमत्रि का भ्याला । तव सती दिव्य प्रेमाला

तुझ्यामिषें कीं अपुल्या नयना
उघडुनि पाही तो निज कृतिंना
अकाल हरणें जगतीं प्राणा
शिरीं ये पाप । उमगुनि का आवरि चाप

काव्य-गुणें तो कीं तव मोहुनि
विहित न वसती तव सुर-भुवनीं
आणिच परतवी तुजला म्हणुनी
नवरसा पृथिवी । सुधारस एकची त्रिदिवीं

सुरकवि अथवा त्वत्प्रतिभेनें
दिपेल मानसिं या भीतीनें
उचित गमे त्या तुज परतविणें
पराजय स्वजनां । बघवेल सहजपणिं कवणा

असो कसेंही तरी आजला
ठेवा अमुचा अम्हां मिळाला
कितीक प्रार्थू त्या देवाला
खाउ बाळाला । दे हर्ष तसा समशीलां

१६१

# साधु

रत्नाचा आकर रत्नाकर जरि जगतीं
शिंपले शंखही तिथेंच करिती वसती

तरि भंग न पावे रत्न आपुल्या मोला
चांडाळचौकडी त्रास नित्य दे त्याला

परि अधिकाधिक तें उज्ज्वलतेला दावी
कवडीसी किंमत कवडीपरता नाहीं

शिंपल्यासंगतीं राही कांहीं काळ
तरि मोतीदाणा—दाणा तो वेल्हाळ

त्यापरि राहि जरि कोलाहलिं जगताच्या
तो साधु शेवटीं सम सारसपत्राच्या

१६२

# खग्रास ग्रहण

( घेउनि ये पंखा० या चालीवर )

दुःख असें कैंचें । तुज बाळा । हृदयीं जाचतें

डोळ्यांतुनि पाणी । तुटल्या सरावाणी
टपटप हें । टपताहे । भिजवी भूमितें

फुटत न बोल जरा । ग्रीष्मींचा जणुं शुष्क झरा
कोसळलें । परम भलें । संकट सांगतें

उदास मुख तूझें । चन्द्र जसा रवि-तेजें
हृदयकथा । निर्बलता । स्पष्टचि दावितें

धूलि तनूवरि ही । धवलाभ्रें जणुं नभदेहीं
तनु-चिन्ता । तव चित्ता । तिळहि न, वाटतें

रुधिर वाहि चरणीं । जेविं जलघट भंगोनी
भान पळे । स्मरण गळे । उघडचि भासतें

परम थोर लक्ष्मी । दोन्ही लोचन पद्मीं
त्यजुनि तुला । जाय मुला । याहुनि काय तें

वयीं न मोठासा । पक्षि जसा चिमणासा
चिवचिंवणें । हेंचि जिणें । बघणें भोंवतें

हें वय फुलण्याचें । जसें प्रभातीं सूर्याचें
हाय ! तयास । हें खग्रास । ग्रहणचि लागतें

१६३

# बन्दिवान तरवार

[दिल्लींतील मोंगलांच्या किल्ल्यामध्यें ऐतिहासिक वस्तुसंग्रहालयांत दृष्टीस पडलेल्या कपाटांतल्या समशेरीस पाहून सुचलेले विचारः—]

( सबसे राम० या चालीवर )

हे भारतीय समशेरी ! किति तरी दुर्दैवी गे ! तूं
कोण कुणाची कुठें पहुडली विचार हा तुज का
भ्रमिष्टापरी स्थिती दिसे तव म्हणुनी ये शंका
हिंदसुतांच्या करीं निरन्तर लकलकणारी तूं चपला
मेघ-कपाटीं दडून बसलिस काय म्हणूं याला
शूर, मर्द, नरवीर पूर्विंचे काल-मुखीं दडले
म्हणुनि काय संन्यास असा हा तुज घेणें रुचलें
संन्यासी तर दीनोद्धारी स्वतंत्र जगिं असतो
कलिकाळाचें भय न धरी मग कुठें भूप मानव तो
खुळेपणें पण काय तुला मी विचारणा करिं ही
नच घनजालीं, संन्यासी नच बंदिवान तूं पुरती
परवशतेंतुनि मुक्त कराया तुझा जगीं अवतार
काय उलट घडि ! स्वतां तूंचि त्या पारतंत्रिं बेजार
रक्त बिन्दु ते जिथें दिसावे धूळ तिथें सारी
तेज, कान्ति, चापल्य सर्वही कधींच होती दूरी

रुण्डमाळ अर्पणीं धरेला सहज जिची ख्याति
निवारिण्या कीटका न बळ तें सुखें शरीरीं रमती

ओझरतें जरि दर्शन घडलें सिंह धेनु होती
धेनुच सिंहा काय दैवगति लीलेनें नाचविती

नाम ऐकतां कम्प सुटुनि वा धैर्य गळुनि जावें
करमणुकीचें तूंचि तयांचें प्रीतिपात्र अजि व्हावें

कृष्ण अर्जुना, तूं हिंदांना छायेपरि तैशी
परी सम्प्रती तयां घडेना दर्शन वर्षोवर्षी

प्रतिप्रभातीं तुला वन्दणें राष्ट्रधर्म हाची
लेखणीस त्या दैवीं येई पाळी परि भजण्याची

शक्तिविणें मति, मतिविण शक्ती वृथाचि जरि असती
तरि लेखणिहुनि समशेरीची महती जगतीं मोठी

प्रेमें ज्यांसी हस्तान्दोलन थोरपणें करिसी
त्याच करा तव धरुनि बन्धनीं तेच ठेविती तुजसी

अखिल जगाच्या समशेरींनीं निज तेजें जगिं चमकावें
तुवां मात्र या कारागारीं स्वस्थ रडत बैसावें

या दुःखें वा षण्ढ जहाले हिन्दपुत्र म्हणुनी
रडुनी रडुनी लोचन सुकती जाय मुखींचें पाणी

भारतभूभगिनीतें कथिसी कर्मचरित कीं अपुलें
हृदय तिचें तें काय परिसुनी यमुनारूपें द्रवलें

तुवां रडावें तिजजवळीं वा तिनें तुझ्यापाशीं
काय दुजें अजि याविण उरलें अतां हेंचि नशिबाशीं

१६४

# आव्हान

( मज गम ऐसा ० या चालीवर )

गत दिना पाहीं भारता ! । अल्प कांहीं

बाल वृद्ध तरुणादिक नारी
स्वातंत्र्यास्तव झटले कितितरि
कळेल तुज मग या भूमीवरि
कशी नांदली ती स्वतंत्रता

नवलाखाच्या जीवफुलाला
वाहिं सहर्षें जिच्या पदाला
बाल तरी लाजवि थोराला
धन्य धन्य ती—ती स्वतंत्रता

पृथ्विराज नरवीर केसरी
जरी गवसला यवन—पंजरीं
तरि रिपुशिर जी उडवि नृपकरीं
धन्य धन्य ती—ती स्वतंत्रता

सुखाशेस जी मुळिं न भाळली
तृण—शय्येवरि सुखें झोंपली
दावि स्वबला दिपवुनि अरिबालि
धन्य धन्य ती—ती स्वतंत्रता

भारतभूषा नव नव तरुणी
देह—जिवाचा बन्ध तोडुनी
जीसाठीं जोहार करिति जनिं
धन्य धन्य ती-ती स्वतंत्रता

जी केव्हांहि न येवो स्वप्नीं
यत्न करिति जे कुमती म्हणुनी
तरि शिवरूपें तदुदर फाडुनि
धन्य अवतरे ती स्वतंत्रता

रायगडावरि अशी ती उभी
हात आपुले करुनि वर नभीं
पाचारी निज भक्तालागीं
दाविल का कुणि भक्तिप्रियता

१६५

# मोडकी तरवार

( उद्धवा शांतवन० या चालीवर )

कुठल्याशा जागीं एका । तरवार मोडकी होती
कोयता तिचा करण्याला । उचलून घेतली हातीं
निघणार अतां बाहिर, हें । जाणिलें जननिनें चित्तीं
त्याक्षणीं सुता थांबवुनी
डोळ्यांत आंसवें अणुनी
ती बोले करुणा-वाणी

करितोस खुळ्या हें काय । तुज कशी बुद्धि सुचली ही
जाणसि का तूं ही कुठली । ये कशी तुझ्या सदनांत
जगिं मूर्तिमंत स्वातंत्र्य । जो प्रतापराणा ख्यात
स्वातंत्र्य-आहुती न पडो । त्या यवनयज्ञकुंडांत
संवगड्यांसवें ज्या म्हणुनी
तो हिण्डे रानोरानीं
त्यांतील पुढें एकानीं

जामाता कन्येसह ही । शुभ लग्निं दिली हातांत

तानाजी मरुनी पडला । मावळे भयानें पळती
ढासळे व्यूह रचलेला । जाणार लया श्रम युक्ति
होणार कलंकित आतां । शिवबाची ती शुभ कीर्ति

तद्वंशज होता तेथें
चमकविलें ह्या बिजलीतें
रडविलें यवन-मेघातें
हा इच्या प्रखर धारेचा । बघ प्रभाव पहिला जगतीं

जिंजींत अडकला प्राण । ह्या सकल महाराष्ट्राचा
तोडिती पळपुटे वृक ते । नाजूक भाग शरिराचा
भुंकिती भिवविण्यासाठीं । आणुनी आव सिंहाचा
मरणार मराठा सारा
हें स्पष्ट म्हणे बघणारा
खल कालहि देइ इषारा
परि हिनें विक्रमें आधीं । पाहिला मृत्यु शत्रूचा

खडकीस पराक्रम करुनी । घेतली हिनें विश्रान्ति
कां नकळे तें केव्हांही । भंगे न तिची मग शांति
त्या क्षणापासुनी बघ या । देव्हारीं बसली होती
लोटितां कांहि काळाला
तो कुणी एक गृहिं आला
पाहिलें कधींहि न ज्याला
नच विचारितां तो इजला । मोडुनी चालता झाला

त्या दिवसापासुनि करितें । मी विचार या गोष्टीचा
हें कसें जहालें ऐसें । अपराध यांत कोणाचा
देवासम पूज्य अम्हां जी । कां मानभंग हा तीचा

अपयश तें स्वप्नि न ठावें
विजयींच जिनें नित व्हावें
कां तिनें हाल भोगावे
आयुष्य सरे पण अजुनी । लागला थांग नच याचा

प्रतिपार्थ शब्द-वेधांत । पृथुराज सर्व जगतांत
खल कृतघ्न घोरी नमवी । कितिकदां धरुनि समरांत
हे दिवस यायचे होते । उद्भवुनि भेद स्वजनांत
अपुल्याच आपुल्या हातें
कापिलें कंठनालातें
ही तदा असावी तेथें
तो पाप-भोग ये वाटे । आजला इच्या दैवांत

तरवार मोडली तेव्हां । इतिहास लयाला जाई
मी जिवन्त जोंवरि लोकीं । स्मृति मात्र तोंवरी राही
तव ठायीं तीही नाहीं । हें उघड दिसूनचि येई
कथुं काय कोणत्या वाचें
सांगणें हेंच शेवटचें
ह्या तुझ्या वृद्ध मातेचें
तुजकरवि न घडलें कांहीं । स्मृति तरी अन्तरीं ठेवीं

१६६

# मधुबांसरी

मधु बांसरीं । वाजवी मुरारी
वेणू-रवीं । बल सांठवी
न दिसे भवीं । न कथी कवि
अचल असें तें भारी

हृदय तरळ । करुनि सरळ
चुरवि भुरळ । तिळभरी
जिवा शिवाचें । मधुरतेचें
मीलन साचें । मुरलि वाचें
अनुभविं ये निमिषान्तरीं

१६७

## बन्धु-भाव

( भक्तजन सदा० या चालीवर )

बन्धुता खरी । मनिं अपुल्या सतत वसो
सारें जगत । होई विनत । पदिं खरोखरी

द्वेषभावना मनांत । धरुनि, लाभ नच जगांत
द्वेषा वरुन । पावे जय न । कुणिहि अजवरी

द्वेष करी दुर्योधन । बन्धूंचा रात्रंदिन
अन्तीं सकल । होई विफल । स्वकुल संहरी

मुनि वशिष्ठ अरिचेंही । शुभ इच्छी निज ठायीं
येई शरण । शत्रू नमुन । म्हणुनि झडकरी

१६८

## पोरें बिघडलीं

( अजि अक्रुर हा० या चालीवर )

कृति हरिची तूं ऐक यशोदे माई
त्रासला जीव बहु बाई

किति सांगूं हो गुण अपुल्या कृष्णाचे
वदवेना अमुच्या वाचें

किति अमुचा तूं आतां अन्त पहासी
येउं दे दया ह्रदयासी
अम्हि दीन प्रजा तव सारी
तुजवीण कोण कैवारी
असासि तूं थोर अधिकारी
सुखःदुख जरी त्वां न देखिलें कांहीं
त्रिभुवनीं कोण तरि पाहीं
हें सहज असे उषःकाल समयासी
लागते भूक बाळांसी
मिळवोनि तदा सकल मुलांचा मेळा
दुधभात दिला खायाला
तों कोठुनि हा कृष्ण तुझा तरि आला
वाजवी पथीं वेणूला
ऐकतां सूर मुरलीचे
मन तरल होय बाळांचें
त्या क्षणिच टाकुनी पुढचें
हरिभंवतिं तसे धांवत सगळे जाती
नाचती सुरावरि गाती
थोरांस अम्हां त्रास किती जरि दिधला
तरि सहन करूं गे ! त्याला

परि बाळांनीं पाप कायसें केलें
हरि ठेवी त्यांस भुकेलें
हा ताप असा सहन अभय अम्हि करितों
म्हणुनि का सूड हा घेतो
इतुकें न पुरें त्या होई
यमुनेस मुलांना नेई
तेथेंच दिनभरी राही
तुज काय कथूं ?—स्मरण आमुचें नुसतें
होउं न दे त्या कवणातें

गृहिं आल्याही झोंप सुखाची त्यांना
क्षणभरही घेउं दे ना
झोंपेंतहि ते ' कृष्ण ' ' कृष्ण ' ओखणती
नाहींच मना जणु शान्ति
ही सरली का सरेल केव्हां रात्र
फिरफिरुनी उघडति नेत्र
" दहि दूध नको आम्हांला
तूं पाजी वेणुरवाला
हरि ! शान्तवि तीच भुकेला "
ही कितिदां तरि निशीं बोलती बोली
होतसे जीव वर खालीं

त्या मायेच्या खऱ्या दूधभाताला
ते म्हणति विषाचा काला
त्या वेणूच्या वायुरूप नादाला
मानिती सुधेचा प्याला
हा वायु कधीं पोट भरी कवणाचें
हें तुम्हींच सांगा साचें
विपरीत बुद्धि ऐशी ही
उपजविली त्यांच्या ठायीं
हें बरवें कां हो बाई !
अम्हि गरिबांनीं कसें करावें पुढतीं
निपजतां मुलें हीं कुमती

तरि पीडा ही अजुनि सम्पली नाहीं
कळस तो दुरिच बहु राही
पय दिधलें तरि कुणि न सोडि रडण्याला
दावितो कृष्ण भय त्याला
तों कृष्ण उभा समोर अवचित राही
थांबतें रडें लवलाही
परि चमत्कार त्या घडिला
त्या समोरच्या दुग्धाला
तो स्वतां हंसत दे हरिला

निःशंकमनें लहानगा उपवासी
ठेवुनी तोहि पी त्यासी

या करणीनें उदास मन हें होई
ब्रह्मांड आठवे बाई

सर्वस्व पुढें अर्पिणार हरि-पायीं
करितिल मग ' भिक्षांदेही '

हें स्पष्ट दिसे अमुच्या नयनां पाहीं
करिं उपाय याचा कांहीं

फुगणार तुझें भाण्डार
अम्हि जाऊं दारोदार
करिं याचा तूंच विचार

मग म्हणतिल तुज निष्कांचनजनराज्ञी
त्या सुखास भोगिं सुखानीं

१६९

# वाचाळ पंडित

( भक्तासाठीं तो जगजेठी० या चालीवर )

स्वागमनें जो अनुयायांचीं मुखें करी निष्प्रभ
जयांनीं इच्छावें मनिं शुभ
जागृत जे का तयां झोंपवी, लुटे जरी तस्कर
विषाद न मानी जो तिळभर
सद्-भक्तांच्या सुषुप्तींत जो लोपवि अपुल्या मुखा
विधू तो नेतृपदा योग्य का
कीं, स्वतां उठोनी जगास जागें करी
कर्तव्यिं राहुनी मग्न दुज्याही करी
कल्याण-पथा जो दावुनि ऋण आचरी
मानव राहो पशुपक्ष्यांही रंजवुनी तोषवी
रविस त्या बोधूं नेता मवीं !

मान मान्यता तशी श्रेष्ठता दास्यीं ज्या भूवरी
निशिदिनीं तळपे चन्द्रापरी
राजासम अधिकार चालवी, घडविल तें घडतसे
भूप ज्या परि कुणि बोलत नसे
शरीर ज्याचें स्वतंत्र तरि पण बिडी रुपेरी मना
शहाजी रुचे काय तो कुणा

कीं, दऱ्या डोंगरीं स्वतंत्रपणिं भटकुनी
जो हीन दीन जनिं सर्व सुखें मानुनी
स्वातंत्र्यदेविचा हार कंठिं घालुनी
अनुयायी जो घालुनि मागें कालमुखीं घे-उडी
शिवनृपीं बसेल त्या आवडी !

दावुनि वरि विश्वास, मानसीं राष्ट्रघात योजिला
अल्पहीं बीजासि न लाजला
स्वातंत्र्याचा भगवा झेंडा अरिपदतलिं तुडविला
तयावरि वैऱ्याचा रोविला
तुकड्यासाठीं राष्ट्रप्राण तो शत्रुचरणिं वाहिला
काय तो पिसाळ वाटे भला
कीं, स्वातंत्र्यांकुर रक्षी जीवापरी
जो द्रव्यगिरिस गणि विष्टेसम अंतरीं
जो जपे अनाथा वज्र शिरीं ये तरी
स्वामिभक्ति ही दुर्गादासें दावुनि, रिपु दिपविला
तयावरि प्यार खरा आपुला !

---

१ औरंगजेबाचा मुलगा अकबर हा एकदां दुर्गादासाच्या आश्रयास येऊन राहिला होता. त्याच्या अजीम नांवाच्या भावानें त्याला आपल्या स्वाधीन करण्यासाठीं दुर्गादासाकडे चाळीस हजार मोहरा पाठविल्या पण त्यानें अकबराशीं विश्वासघात केला नाहीं.

भेदुनि टाकी गगना ज्याची काव्य भरारी अशी
यवन नृप तोषवि परि मानसीं
आनन्दानें रसा चाखुनी असेल गुरु तोषला
स्वनां परि यवनीशीं रंगला
द्विज म्हणवी जो, परवैभविं परि देहभाव मिळविला
गातसों समजुनि का त्यों भला
कीं, देशभक्तिचें पान जनां करविलें
स्वातंत्र्य-रक्षणीं प्रेतासहि उठविलें
अभिमानी केलें ज्यानें जन ' आपुलें '
पंडित होता असें न अजवरि कुणिहि म्हणे, भाट तो
न देखुनि हृदय तया अर्पितों !

स्वजनांशीं ज्या सख्य कराया परम खेद वाटला
नमाया रिपुचरणिं न लाजला
भूषण मानुनि सन्तोषानें अपुल्या भगिनी मुली
पोंचवी यवन नृपाच्या कुलीं
स्वातंत्र्याचा विक्रय करुनी चिरंजीव जाहला
काय तो मानसिंह पूजिला
कीं, स्वत्व रक्षण्या हिंडे रानीं वनीं
जो सुखोपभोगा देश-चरणिं अर्पुनी
झुंजला अरींशीं अंतावरि गर्जुनी

१ जगन्नाथराय पंडित. २ चांद भाट.

सर्वस्वाच्या प्रेमनिधाना जयावरी लोटितों
केसरी प्रताप तो वन्दितों ?

सर्व खरें हें असलें, आहे, आज भारतीं परी
श्रवणिं ये केवळ ही वैखरी
अंतर्यामा कवणाच्याही बोलापरि शोधितां
भिउं नका, अंधकार सर्वथा
अंशमात्रही स्वाभिमान तो कसा न ये लोचनीं
तयाची खंत धरीना कुणी
पांडित्य सर्वथा कृतींत येइल यदा
तळपेल भरत भू वैभवगिरिवरि तदा
नातरी आपदा टळातिल ना ह्या कदा
बोलुनि नुसतें आजवरी जगिं लाभ कुणा जाहला
भारता ! सांग, विचारीं तुला

१७०

# ईश्वराचा न्यायीपणा

( जरि रात्रीचा काळ ० या चालीवर )

तव न्यायाचें प्रभो ! सदैव स्मरण
का होई ! सांगे कवण
किति कोसळली संकटतति ना गणती
आम्हांवरि आजवरी ती
त्या क्लेशानें शरीर जर्जर झालें
मन, विचार भेंकड दुबळे
सत्त्वास गमावुनि बसलों
श्रीमन्त दरिद्री झालों
निज गेहीं तस्कर बनलों
त्या दोषाचा अंश अल्प तरि तुजला
स्वप्नींहि न केव्हां दिधला
ठाऊक अम्हां न्यायी तुजविण कुणिही
ब्रह्माण्डीं दुसरा नाहीं
तव न्याय विभो ! धारवाडिकाट्याचा
अनुभव हा त्रैलोक्याचा
म्हणुनीच असें अनन्त कालवरी हें
तव प्रभुत्व टिकलें आहे
नातरि या अखिल जगाचा
तव राजमुकुट सोन्याचा
केव्हांच विताळितां साचा

तूं सदनींचा उदार हृदयीं जैसा
व्यवहारीं निष्ठुर तैसा
तुज पाप जसें अल्पसेंहि नावडतें
पुण्य तसें तोषवि तूंतें
चाण्डाळ असो कीं कुणि जनहितकारी
तुज एक न्याय-दरबारीं
तूं राहो वा स्वतां, आप्त कुणि वैरी
सारखें तुला व्यवहारीं
ब्रह्माण्ड हर्षवी तरणी
परि लपवि घूक आगमनीं
हा दोष अल्प त्याकडुनी
परि केतु मुखें शासन करिसि तया तूं
दाखविसी न्यायिं न किन्तु
तूं विश्वाचा सूत्रधार म्हणवीसी
कवणाची भीती तुजसी
तव दोष असो नसो परी जन म्हणतां
जनतेचा करि जो तोटा
तरि कोण तुला शासन करि त्या कालीं
सर्व तुझें पायाखालीं
परि रमणी वनिं पाठविसी
व्याध-कारिं मृत्यू घेशी
दाविशी अशा न्यायासी
म्हणुनीच विभो ! तुजवरि निज विश्वास
ठेवुनि जग टाकी श्वास

जंव दोष घडे तदाच तूं सन्तापें
नच दग्ध करिसि त्या शापें
अपराध किती घडति, काय जग बोले
तोंवरि तव वृत्ति न हाले
अन्याय कधीं स्व-करें चुकुनि न व्हावा
म्हणुनि तूं दक्ष किति देवा
जगतानें दोषी म्हटलें
दशमुखा तदा दंडियलें
हें न्यायीपण तव दिसलें
म्हणुनीच तुला निखिल जीवमात्रानें
ठेविलें हृदयिं अभिमानें
या ठायिं प्रभो ! मान तसा अपमान
पाहिला कधिंहि अपुला न
त्यासाठिं तुवां किती भोगिले क्लेश
नच खेद दावितां लेश
परि न्यायातें कधिं न तुडविलें पायीं
नाचविलें ठेवुनि डोईं
पळवुनि ने अरि ललनेसी
बन्दींत जन्म तरि घेशी
शिववीलें न परि कोणासी
मतिमन्द किती गाइल, प्रभु ! हें देई
तव गुणीं लीन मति होई

१७१

# हिंदभूमिच्या तिलका

(सबसे राम० या चालीवर)

तूं सूर्य भारतीयांचा । तिलका ! ग्रहणरहित साचा
हृदयपुष्प हें तुला वहावें मनीं बहू येतें
परि " हृत् पुष्पीं मीच भृंगसम " कथिलें त्या भगवंतें
असें पराचें समर्पुनी तें लाभ कुणा कसला
तोष कसा हो तुला तरी त्या बघुनी उच्छिष्टाला
कंठिं धरावें सदैव वाटे प्रेमभरें तुजला
परि शिववाच्या कृतज्ञतेनें आधिंच भरुनी गेला
तया दूर सारणें रुचे का तुझिया हृदयासी
स्नेह पूर्ण जो भक्तीभावें तूंचि वंदिसी ज्यासी
काय करावें कांहिं सुचेना विश्व धुंडियेलें
परंतु अन्तीं ईशदयेनें रितें भाल हें दिसलें
तिथेंचि भावें तुजसि ठेविलें, गोड करुनि घेईं
सनाथतेचें समाधान तरि हृदया होइल कांहीं
भिकारीण तरि तिलक सतीला लाखमोल किंमती
त्याच्यापुढतीं भी न कुणा ती ! तुच्छ गणी ही जगती
नरवीरा मांगल्यनिधाना ! काय तुला द्यावें
तुजवरुनी ब्रह्माण्ड गमे हें ओंवाळुनि टाकावें
जरी दरिद्री ! गुलाम जगिं तरि फिकिर नसे कांहीं
सुभगा तिलका ! भालीं तोंवरि धनी जगाचे ही
सज्जन जगता ! कळेल तुजसी रहस्य यांतिल का ?
उघडया नयनें पहा तरी या हिन्दभूमिच्या तिलका

१७२

# नको तें स्मरण

( 'सबसे राम० या चालीवर )

हें भरतखण्ड सोन्याचें--

हाय ! तें नको स्मरण त्याचें

जिथें अहर्निश गगना भेटे धूर सुवर्णाचा
पिंवळ्यापरता ठाउक नव्हता रंग कुणाही साचा !--
हाय ! तें नको स्मरण त्याचें

कटिं पीताम्बर सदैव नेसे पिंवळा वनमाळी
सुवर्णमय ती नवरी शोभे शुभ मंगल-काळीं !--
हाय ! तें नको स्मरण त्याचें

ज्या धूरातें सांठविलें त्या गंगाजलिं रविनें
स्नान करी अस्तोदयिं तेणें अजुनिहि तो प्रेमानें --!
हाय ! तें नको स्मरण त्याचें

त्याचमुळें हीं सुवर्णरंगी फळें फुलें होती
पिंवळें गोरपण नांवाजे आर्यांचें या जगतीं !--
हाय ! तें नको स्मरण त्याचें

'होतें' 'नव्हतें' म्हणतों परि ह्या वर्तमान काळीं
राहि हरिद्रा भारत- भाळीं तीहि न पुरती पिंवळी !--
हाय ! तें नको स्मरण त्याचें

१७३

# भास्करास

( उद्धवा शांतवन० या चालीवर )

कर्तव्य तुझें दिनराजा । आजचें निराळें गमतें
अनुदिनीं बोध सत्याचा । भारता त्वत्प्रभा करिते
परि भारत या समयासी । मागे हें नच वा तूतें
तव वाळें वैभवशाली
ज्या पावन भारत कालीं
क्रीडुनी अन्तरीं धालीं
अभिमान वृत्ति तद्विषयीं । तव हृदयीं सहजचि वसते
परि सत्य सत्य म्हणुनीयां । स्मरण कां तयां नित देशी
भारतीय कुणि तरि केव्हां । जाहला विमुख सत्यासी
वाटुनी लाज तुज केव्हां । लपविणें पडे वदनासी
स्मरतो का तुज दिन ऐसा
दडलासि गृहीं तस्करसा
नुगवितां धरेवरि सहसा
आधिंचा देव जो आहे । प्रहरणा वृथा कां करिसी
भारता अजुनिया काय । शिकविणेंच आहे कांहीं
त्वां दिले पाठ अजवरि ते । विसरिले काय सगळेही
समज हा तुझा होवोनी । भासली गरज तुजला ही

तीव्रता बुद्धिची सारी
लोपली, पळाली दूरी
भारभूत भारत भारी
जाहलें धरित्रीवरि·या । वाटतें काय तव हृदयीं

विश्वास दावुनी अपुला । कापिला गळा कोणाचा
बोलुनी एकदां एक । फिरविली कधीं का वाचा
लोभानें खून कधीं का । पाडिला न्याय नीतीचा
समतेचा डंका पिटुनी
हृदयिंची भिन्नता कृतिनीं
दाविलि कां परि कधिं भुवनीं
जिवलगा तूंचि तें बोल । प्रभु ! सहस्र तूं नयनांचा

भारताविषीं बळकट ही । पश्चिमा धरी जी आढी
त्या गौरतनू–हृदयांत । अधिकाधिक तम जों वाढी
तों भावभेद अन्धार । स्वप्रकाश पाडुनि काढी
तनु काळी अन्तर गोरें
हें दिसे भारतिंच बा रे
बाकिचे पारखे सारे
देहासम करिं तन्मनहीं । मग पहा जगीं किति गोडी

हें शक्य नाहिं होणार । या युगीं तरी केव्हांही
किति जरी घेतले श्रम तूं । उपयोग तयांचा नाहीं
पालथ्या घागरीवरती । ओतितों जलातें जेंवी

पश्चिमा दावि जें द्वैत
भारताविषयिं अत्यंत
तें सूर्या ! तव उदयांत
सांगतोंच लपवुं कशाला । मग कळेल सगळें कांहीं

हांसते पश्चिमेआधीं । जोंवरती पूर्व दिशा ही
जोंवरी किरण तव पहिला । अवतरतो भारत–देहीं
अधिकार तुजवरी गर्वें । जोंवरि निज भारत दावी–
आधींच पूर्व हंसणार–
पहिलाच किरण पडणार--
तुज ' अपुला ' तें म्हणणार–
हें खरें जेवढें, तितुकी–। पश्चिमा द्वेषि असणार

१७४

# तारिलें माहाराष्ट्राला

( उद्धवा शांतवन० या चालीवर )

ह्या कोणी घेइ शपथेला–

'तारितों महाराष्ट्राला'

कुणि तरी सती नावडती । शिवनेर गडीं असहायी
उदरांत गर्भ नवमासी । कुणि जवळ जिवाचें नाहीं
दारिंची भिकारिण बरवी । जीहुनी सुखाची राही
ह्या अशा अवस्थेमाजीं
जन्मास बाळ ये गाजी
राष्ट्रास करी जो राजी
करि कोऽहं जों वदण्याला–'तारितों महाराष्ट्राला'

कोठचें दूध गाईचें । आइचा मुका मायेचा
कोठचें अंगभर वसन । आईच्या पदर लुगड्याचा
कोठचा पिता स्नेहाळू । तो असे हस्त जननीचा
वरि अम्बर पृथिवी खालीं
भोंवतीं परिस्थिति असली
पाठिशीं कुणीहि न वाली
मुखिं बोल काढि परि पहिला–'तारितों महाराष्ट्राला'

रांगतां फिरे घरभर तो । महाराष्ट्र काय त्या वाटे
वृन्दावनिं कष्टें चढतां । तोरणा काय त्या वाटे
तोडितां मान बाहुलिची । काय त्या यवनाशिर वाटे
समशेर घ्यावया जाई
म्हणुनि का भवानी आई
कथणार कोण नवलाई
हुंकार भासवी अपुला—' तारितों महाराष्ट्राला '

दुडदुडा धांवया शिकला । बाहेर पडे मैदानीं
तों दिसति राशि दगडाच्या । थकबला तुरंगावाणी
गांभीर्य मुखावरि आलें । शिशु-हास्य दूर होवोनी
या महाराष्ट्र देशांत
सारेच दगड का वसत
कुणिच का नाहिं जीवन्त
हा विचार येउनि वदला—'तारितों महाराष्ट्राला '

भोंवतीं फिरे जो वायु । सर्वस्विं बाटलों बोले
पदतालिंची धरणी सांगे । पारखी तुला मी झालें
ताटींचें अन्न बजावी । परक्याच्या येथुन आलें
बोधिती कान, जिभ, डोळे
तूं धनी तरी या वेळे
सत्ता न अम्हांवरि चाले
बघतांच असें गुरगुरला—' तारितों महाराष्ट्राला '

एके दिनिं उठुनि सकाळीं । हिमबिन्दु विखुरिले पाही
हे अश्रु ढाळिले कोणीं । आश्चर्यमग्न तो होई
जंव होय रवीचा उदय । हांसली कळी लवलाही

मनुजाच्या यत्नावरती
अश्रूंचे मोतीं होती
ही खूण पटे का चित्तीं

उद्गार चहुंकडे घुमला—'तारितों महाराष्ट्राला'

संवगडी मिळविले भंवतीं । संस्कारहीन जातींचे
धर्म, देश, निज परका हें । स्वप्नांत हि नव्हतें ज्यांचें
मग विचार होते नकळे । त्या बालमानसीं कैंचे

कर्णार्जुन घालुनि पाठीं
झगडण्या स्वदेशासाठीं
कीं हेच वीर यापुढतीं

दाविण्यास हें जगताला—'तारितों महाराष्ट्राला'

चौफेर गडावरि फिरुनी । देखिला भंवतिं वनदेश
निरखिला मनश्चक्षूंनीं । ऐकिला मूक सन्देश
तैसाचि उत्तरीं त्याला । कथियला मुग्ध आदेश

सन्देश परिसिला कैंचा
अर्थ काय आदेशाचा
ज्याचा त्या ठावें साचा

निर्धार मुखीं परि दिसला—'तारितों महाराष्ट्राला'

उतरतां गडाच्या खालीं । पायरी पायरी जेव्हां
पाऊल पडेना नीट । तनु कंपित झाली तेव्हां
चालतां मान नत होई । बोले न कुणाशीं केव्हां
प्रत्येक पावला गणिक,
करितां मी जवळीं नरक
का म्हणे ?—कुणा ठाऊक
परि नन्तर जप जो जपला—' तारितों महाराष्ट्राला '

कटिं तुमान, शिरिं शिरपेंच । पदिं चढाव, कम्बरपट्टा
तो डौलदार आंगरखा । भरजरिचा वरति दुपेटा
चिमुकली करीं समशेर । लटके तो जम्बिया पट्टा
तो द्वादश वर्षी राया
डुलवीत पौरजन हृदया
दरबारिं निघाला जाया
मुखिं म्हणत याच बोलाला—' तारितों महाराष्ट्राला '

तों हाय ! हाय ! हम्बरडा । श्रवणीं ये दीन कुणाचा
वळुनियां पाहतां मागें । काय पडे दृष्टि तयाच्या
तें दृश्य !—नको तें कथणें । तो खेळ एक दैवाचा
किति तरी अशा खेळांला
खेळलें दैव त्या काला
नावरे मुळीं कोणाला
परि अडवि बोल हा त्याला—' तारितों महाराष्ट्राला '

त्या हृदयविदारक दृश्यें । सन्तापें वेडा झाला
भंवताल काल विस्मरला । कांहिंही सुचेना त्याला
अन्धारी ये नयनांला । बेभान होउनी गेला

टपसुनी झणीं तरवार
करि कसाब–कण्ठीं वार
गर्जोनि तसा गम्भीर

घे स्मरुनि शपथ अम्बेला–' तारितों महाराष्ट्राला '

× × ×

या अफाट महाराष्ट्रांत । जा फिरा स्थलीं कुठल्याहीं
दाखवा रिता रज ऐसा । शिव-पद तें नयनिं न येई
कोणत्या द्विजाची वाणी । शिवनामिं रंगली नाहीं

सन्देह कुणा जरि असला
ह्या मनोज्ञ शिवचरिताला
कणकणा पुसा या घडिला

वदतील याच कीं बोला—
' तारिलें महाराष्ट्राला '

१७५

# राधे ऊठ

( घनश्याम सुंदरा या० चालीवर )

ऊठ ऊठ गे पहाट झाली किती वेळ निजसी
चालायाचें काय न तुजसी कृष्ण-दर्शनासी
यमुनेकांठीं तो जगजेठी उभा सर्वसाक्षी
जो आनन्दें जाइल त्याला धरितो निज वक्षीं
आनन्दी हृदयांचा मेळा भंवतिं मिळाल्यावरी
घडेल किति सहवास तयाचा, विचार याचा करीं
गर्दीगर्दीमध्यें नुसतें होइ न बघणें पुरें
दोन शब्द बोलणें कुणाशीं दूरच राही बरें
निवान्त वेळीं जसे उघडती पडदे हृदयाचे—
परन्तु तुज हें ठाउक आहे, काय कथायाचें

कधींच आल्या असातिल गाई, कुठली झोंप तयां
' पहिलें दर्शन अमुचें व्हावें ' हा जप तद्—हृदया
प्रवेश हरिजवळीं न कुणाचा होवो अमुच्याविना
म्हणुनि सर्व पथ अडवुनि बसती निशिदिनिं बघतोंच ना
खऱ्या भाक्तिणी जगांत कोणी परम थोर धेनुका
खाणें पीणें तयां सुचेना, एकचि हरि मनिं निका

आपण मानव हरि आठवितों चैन सम्पल्यावरी
उदासीन किति देवाविषयीं, शोधुनि बघ अन्तरीं
मुक्या जिवांचा धडा असा हा कुणीं न घेतां मुळीं
कींव करितसों उलट तयांची, समजुत किति ही खुळी

ऊठ राधिके ! ऊठ ऊठ हा उशिर बहू झाला
उडुबाला ह्या दर्शन घेउनि गेल्या सदनाला
केव्हांपासुनि यमुनेच्या जलिं स्नान करोनीयां
उत्सुकतेनें तिष्ठत होत्या हरि-दर्शन घ्याया
तुझ्या आंगणीं हरी येउनी बसला असतां ग
कांहिं न वाटे तुजला त्याचें, काय म्हणूं सांग
दूरस्थानीं हाल भोगुनी दर्शनासि यावें
परि घरच्यांनीं वर्षोवर्षीं मुखिं न नाम घ्यावें
नको नको तूं कल्पनेस ह्या बळी पडूं बाई
पूर्व संचितें प्राक्तन फळलें, लाभ करुनि घेई
रश्मिजलानें अरुण अंजली वाहीं हरि पायीं
पदकमलें तीं कशीं हांसतीं तें तरि गे पाहीं
पवन तेंच जल पुष्प-- सुगंधें सोनेरी बनवी
हरिवरती अभिषेक करुनि, तो श्याममूर्ति खुलवी
प्राशनिं तें अभिषेक तीर्थ तरि दावी उत्सुकता
गन्ध उडुनि मग रंग रुपेरी लाभ काय येतां

साध साध ही महा पर्वणी सोडुं नको बाई
या झोंपेतें किती कवळशिल, बांध घालिं कांहीं
आलस्यानें कधीं कुणाचें बरवें झालें जगीं
वदसी जें तूं मग कां ऐसी आचरिशी वाउगी.
अजुनि कशी तव नीज सरेना, उठीं ग लवलाही
आज मुळीं उठण्याचें तुझिया काय मनीं नाहीं
परोपरी किति वदलिस "हरिचा उद्यां वाढदिवस
पहिलें दर्शन आपण घेऊं, उठिव मला खास"
केव्हांपासुनि तुला सारखी हलवुनि मी राहिलें
परंतु तुज गे! जाग येइना, समजुं काय निर्मिले
बळेंच ऐसें करिसि म्हणावें चिन्ह परी नाहीं
निगाढता ही येइ कशाची इतुकी तव ठायीं
स्वानंदामधिं मग्न राहतो जसा थोर योगी
तशी तुझी मज वृत्ति दिसे वद, कसल्या अनुरागीं

× × ×

ना बोलतां स्थिर मनें तंव ती उठोनी
दावी सखीस अपुल्या हृदया चिरोनी
तों पाहि आपण सखीसमवेत तेथ
वन्दी सगोकुळ हरी अरुण प्रभेंत

१७६

## खेळगडी

खेळगडी तूं खेळगडी । नको कुणाला तुझी गडी
गोकुळिंचा तूं गोपगडी । पार्थाचा तूं वीरगडी
मुरलीचा तूं स्नेहगडी । पांचाळीचा बंधुगडी
राधेचा तूं प्रेमगडी । विदुराचा तूं भावगडी
विश्वाचा तूं विश्वगडी । 'आनंदा' चा हृदयगडी

१७७

## कवीचा संदेश

( उद्धवा शांतवन० या चालीवर )

" तत्त्वाचा बन्दा जीव ।
मूर्तीला कोण विचारी "
दाखवा कुणीं झटलेले । केवळ त्या मूर्तीसाठीं
बोलवा विवश जे झाले । तत्त्वहीन मूर्तीपाठीं
ऐकवा अशांच्या चरिता । मूर्तिची प्रीति ज्या मोठी

तत्त्वास्तव मूर्ती जगतीं
तत्त्व वा मूर्तिच्यासाठीं
जग उभें कशाच्यावरती
हें विचार करुनी बोला । मग म्हणा वृथा ह्या बोला–तत्त्वाचा०

एवढा जन्मदात्यांचा । प्राणाहुनि प्रिय जो भारी
यन्मृदुल पदांबुज बघुनी । तृण मखमल धरणी पसरी
त्या कुण्या सुखाची वाण । कां भटके मग कान्तारीं
मन कथीं प्रिया निर्दोषी
कां धाडि वनीं प्रभु तिजसी
विपरीत करुनि बुद्धीसी
त्या मूढ वदा रघुपतिला । मग म्हणा वृथा ह्या बोला–तत्त्वाचा०

तें प्रेम विमल गोकुळिंचें । त्यजण्याची मति कां व्हावी
कां भीष्म भक्त जीवींचा । मारवी शिखंडी करवीं
एकदां प्रतिज्ञा करुनी । कां स्वतांच भंग करावी
बांसऱ्या बहू असतांना
हरिचीच गोड कां भुवना
ओंवाळी कां निज प्राणा
मतिहीन जगत का बोला । मग म्हणा वृथा ह्या बोला–तत्त्वाचा०

अवतार राम कृष्णांचे । किति तरी आजवरि होती
पण आजी काय तयांचें । ते कधिंच कालमुखिं जाती
अवशेष दिसे या घडिला । स्मृति राही केवळ चित्तीं
परि तदवतरण व्हायातें
जें तत्त्व मुळाशीं असतें
बदललें काय कधिंही तें
ह्या श्रवणीं ऐका बोला । मग म्हणा वृथा ह्या बोला-तत्त्वाचा ॰

कां टार करी शिवभूप । त्या चन्द्रराव मोऱ्याला
कां गणी जिजाई दुसरी । ती यवन सुन्दरी बाला
कां पुन्हां धर्म माळेंत । तुटलेला [१]मणि ओंवियला
प्रबल रिपू अवमानुनियां
जनकाची विसरुनि माया
झिजविली निर्भयें काया
हें घडे कशास्तव बोला । मग म्हणा वृथा ह्या बोला-तत्त्वाचा ॰

स्वातंत्र्य स्वजना दे जो । त्या शिवबाच्या शम्भूचा
किति प्यार असावा लोका । ही हवी कशाला वाचा
परि मरण इच्छिलें त्याचें । इतिहास तयाचा वाचा

१ बजाबा निंबाळकर.

मूर्तींत रक्त सिंहाचें
भवतालिं विभव पितराचें
कां घडे असें मग साचें
कां कृतघ्न जनता बोला। मग म्हणा वृथा ह्या बोला–तत्त्वाचा०

त्या पावन खिंडित बाजी। बळि कशास पडला बोला
तानाजी दुर्गम किल्ला। कां चढुनी गेला बोला
बन्धुचें प्रेत सूर्याजी। निःशंक तुडवि कां बोला
चांगुणा चिरी चिलयाला
रोहिदास जनकें विकिला
ध्रुव अवगणि पित्राज्ञेला
हें किमर्थ घडलें बोला। मग म्हणा वृथा ह्या बोला–तत्त्वाचा०

एकट्या रावबाजीस। कां दोष देतसां साचा
ह्या अखिल महाराष्ट्रांत। होउनी विसर तत्त्वाचा
लागला लोभ मूर्तीचा। लय तयींच सर्वस्वाचा
एकला गोखला वीर
ज्या तत्त्व जिवाहुनि प्यार
आमरण धरी तरवार
नामर्द कुणीं त्या बोला। मग म्हणा वृथा ह्या बोला–तत्त्वाचा०

या महाराष्ट्र देशांत। श्री विठ्ठल मूर्ती नाना
मुळिं भेद नसावा बघतां। पूजनीं मूर्ति भक्तांना
मग सर्व देश कां लोटे। पंढरीस एका नमना

नद नद्या जगति अनेक
लाजविति अब्धि कित्येक
परि वन्द्य जान्हवी एक

कां जगा रहावी बोला । मग म्हणा वृथा ह्या बोला—तत्त्वाचा०

श्री बाल तिलक गान्धीस । कां ठेवि राष्ट्र हृदयांत
असतील तयांहुनि थोर । विद्वान मूर्ति देशांत
कां नाहिं पोहतां दिसत । कुणिहि त्या लोकगंगेंत

कर, चरण, नयन, मन यांत
पाहतां सृष्टि रचनेंत
कसला न भेद उभयांत

कां व्हावें ऐसें बोला । मग म्हणा वृथा ह्या बोला-तत्त्वाचा०

तत्त्वावरि निष्ठा नाहीं । तो मनुज म्हणावा कैचा
जो मूर्तिच मानी थोर । तो मनुज म्हणावा कैचा
जो मरतो मूर्तीसाठीं । तो मनुज म्हणावा कैचा

शिणविलें वृथा मातेला
तो भारभूत भूमीला
गर्भांच कां न तो मेला

ह्या असत्य ठरवा बोला । मग म्हणा वृथा ह्या बोला—तत्त्वाचा०

हीं मर्दपणाचीं गाणीं । परिसावि शूर मर्दांनीं
शाहीर मर्द ही वाणी । बोलती कंठनादांनीं
ऐकिली कुणीं कधिं काळीं । नरवीर शूर हो ! कानीं

म्हा चला पुढें या जल्दी
मर्दांची करुं द्या यादी
राष्ट्रास द्यावया वर्दी
मूर्तिची प्रतिष्ठा सोडा। तत्त्वाला हृदयीं झेला
" तत्त्वाचा बन्दा जीव। मूर्तीला कोण विचारी "

## १७८

## प्रणाम

( भूपाळी )

नन्दनन्दना साधुवन्दना निजजनमनरंजना
प्रभातिचा हा प्रणाम घेईं मुरलिधरा मोहना
रजनी सरली प्रभात आली अरुणकांति फांकली
जगत कालचें पुन्हां बघाया दृष्टी सरसावली
त्या जगतासी बघण्या आधीं तुझें पदस्मरण
प्रेमळतेनें निर्मळतेनें होत असे जाण
झोपेंनंतर जगत पहाया मिळे मर्त्य जीवां
तुझ्या कृपेचें फळ केवळ तें, काय दुजें देवा
प्रथम नमन तव प्रथम शब्द वा प्रथम दृष्टिपात
जीवाचें कर्तव्य वाहणें तुला विश्वनाथ

विश्वाकडुनी वन्दन घेणें तुझा स्वयं अधिकार
जलुम करी वा दया दाखवीं, कोण करी प्रतिकार
तूं तर मग हरि ! असासि दयेचा सागर करुणाकरा
कठोरता ती कशी राहते तुज ठावें ना जरा

समय विशेषीं जननी जैसी बाळासी ताडितां
होय तयाची वैरिण का जी स्नेहमूर्ति तत्त्वतां
चुम्बन घेतां प्रेमें जैसें गोड मना वाटे
कां नच व्हावा सह्य कोपही, का हें उफराटें
राग आइचा काय अन्यथा मुलावरी होई
छे ! हें रवि उगवेल पश्चिमे तरि न घडे कधिंही
कुलशीलातें विस्मरण्याची बुद्धि न त्या व्हावी
या हेतूनें या मायेनें जननी रागावी
तसा तुझा हरि ! क्रुद्धपणा जो अनुभवास येतो
द्वेपाचा वा कठोरतेचा त्यांत गन्ध नसतो
तुझ्या कृपेनें विभव लाधलें जया मर्त्यलोकीं
मत्तपणें तुज विसरुनि बुडतो कृतघ्नतापंकीं
कृतघ्नतेचा दोप असा हा त्याकरवीं कधिंही
घडूं नये अशि शुद्ध मनीपा कृपाघना ! तव ही
तसेंच जगतीं हीन दीन जो दीन स्थिति असतां
भाव तुजवरी ठेवी किंवा धरि तो वाम पथा

हालअपेष्टा शिरावरी त्या नाचनाचल्या तरी
शीलच्युत तो मुळिंहि न होवो इच्छिसि हें अंतरीं
द्रव्यगिरी जरि सन्मुख आला चळो न मति त्याची
श्रीमंताहुनि भला दरिद्री बोलो जन वाचीं
म्हणुनि अल्पसें कोपुनि त्यांना भानावरि आणिसी
दुष्टपणा तो यांत कुठें हरि ! समजेना मजसी
गर्भापासुनि—राहो अनुदिनिं निगाढ निद्रेंत
जीवित्वाचें स्मरण कितीसें राही प्राण्यांत
जीव—मन्दिरीं कधीं कुणाचा होइल आघात
उघडपणें, हें शक्य कुणाला कथणें जगतांत
झोंपेमधला, मृत झालेला जीव सारखाच
काय विडंबन शक्य न होणें दुःखप्रद साच
खडा पहारा परन्तु देशी निशीं तया भंवतीं
म्हणुनिच ये त्या निवान्त निद्रा या चंचल जगतीं
इतुकेंच न जी कष्टुनि गत दिनिं शरिरा ये ग्लानी
घालविसी ती वरद हस्त निज फिरवुनि त्यावरुनी
त्रस्त मनें जो त्रासुनि वदतो पुन्हां न जग पाही
अशा निश्चयें डोळे अपुले मिटुनि जीव घेई
परि पाजुनि तूं शांति सुधेतें घोंट घोंट त्यातें
नव्या दमानें, उमेदिनें जग लाविसि बघण्यातें

म्हणा निशेला निद्रा, रजनी अथवा ती माया
जगन्मनाच्या त्रस्तपणाची वाटे मज छाया

अशा समयिं तूं जागृत राहुनि छाया विस्तरुनी
शांतीचें साम्राज्य सर्वभर पसरविसी भुवनीं
तूं जे वदसी दिनीं झोंपुनी रात्रीं जागतसे
सत्य सत्य हें त्रिवार वदतों, मिथ्या कांहिं नसे
असा कृपाळू असा दयाळू प्रभु ! तूं असतांना
कसें पहावें जगता आधीं तुज न वंदितांना
[illegible] चरण नाठवि [illegible] जगता बघण्याचा अधिकार
अंत[illegible] तु [illegible] ज्ञानवा, को[illegible] [illegible] कथणार
श्री, कीर्ती, [illegible] [illegible], मुखिं न नाम गाता
तुझ्या पासुनी सकल [illegible] उगम दयासिंधो
जग बघण्याचें तुझेंच ज्ञानहि साधूंच्या साधो
त्या ज्ञानाचा प्रथम अंश जरि तुज न अर्पियेला
रविकिरणांतिल तरी जग कसें गमेल गोड मला
'आनंदा'चा या भावाचा प्रणाम तूं घेईं
सु-मति देइं हरि ! तरल मना या निज पदिं दृढ ठेवीं

श्रीकृष्णार्पणमस्तु

ह... ...री त्या नाचनाचल्या तरी
...च्छिासि हें अंतर
...ति त्याच

# भरत वाक्य.

( भैरवी त्रिवट )
ताल झी...

...वाक्य ... ...क्य न खरें ...
सुकपणें तव यश ... ...हां । भरत०

बद्ध जीवनीं ये कुठुनी । ... ...णे आननीं
तळमळली जिव्हा । भरत०

पारतंत्र्य मायेमधुनी । जीव भरल मेदिनी
... ...श जेव्हां । भरत०

...तें
...पतें

[ वन्देमातरम् ]

... ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९२९२
..., ठाणे (...)